## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१९

निर्णय दिनांक : १५-०३-२००८

१ श्री. महेश कृष्णाजी जोशी, : अपीलार्थी
प्लॉट नं.४३, वृंदावन कॉलनी,
जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा तहसीलदार, जालना
जि. जालना.

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (म) २,
तहसील कार्यालय, जालना जि.जालना
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, जालना जि. जालना

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) २, तहसील कार्यालय, जालना श्रीमती संगिता नारायणराव वराडे ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना श्री.गणेश केशव निऱ्हाळी ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत, तर अपिलार्थी श्री.महेश कृष्णाजी जोशी (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचे कडील दि. १२.०२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून जालना शहरातील पुरवठा विभागांतर्गत दारिद्रय रेषे खालील कार्डविषयी केलेल्या तपासणीसंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"१) जालना शहरात राशन दुकानदारांची नाव व पत्यासह यादी देण्यात यावी.

२) प्रत्येक राशन दुकानदाराजवळील बी.पी.एल.कार्डधारकांची यादी देण्यात यावी. जे बी.पी.एल.चे कार्ड मा. तहसीलदार व नायब तहसीलदार यांनी जे पुराव्या अभावी बी.पी.एल.कार्ड रद्द केले होते, त्याची यादी देण्यात यावी.

३) जे बी.पी.एल.कार्ड रद्द करण्यात आले होते ते कार्ड पूर्ववत चालू करण्यात आले आहेत का? असतील तर कोणत्या आधारावर चालू करण्यात आले, याची माहिती देण्यात यावी. "

अपीलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २८.३.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ४.५.२००७ रोजी अंतीम सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस त्यांनी दि. १२.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती ७ दिवसांचे आत देण्याचे सूचित केले होते. तथापि जन माहिती शासकीय कोषागारात दि. १५.२.२००७ पूर्वी भरण्याची सूचना केली. जन अपिलीय अधिकारी यांच्या पत्रातील विसंगती नंतर अपिलार्थीने दि. २५.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या निदर्शनास आणून दिली. सदर विसंगती जन अपिलीय अधिकारी यांच्या लक्षात आल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपीलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने यापूर्वीच दि. ३०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयासंदर्भात द्वितीय अपिल दाखल केले होते. या द्वितीय अपिल अर्जामध्ये त्यांनी त्यांचे अपिल मान्य करण्यास व संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कडक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे दि. १२.२.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरवठा विभागाशी संबंधित असल्याने, त्यांनी दि. १४.२.२००७ रोजी सदर माहिती पुरविण्याबाबत पुरवठा विभागास सूचना दिल्या होत्या व त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत पृष्ठांकित करुन देण्यात आलेली आहे. तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाचे प्रमुख म्हणून नायब तहसीलदार (पुरवठा) हे काम पाहतात. अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरवठा विभागाकडून विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरवता आली नाही. तद्नंतर अपिलार्थीने दि. २८.३.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांचेकडे अपिल दाखल केले या अपिलावर त्यांनी सुनावणी घेऊन

जन माहिती अधिकारी यांना ७ दिवसांचे आत माहिती देण्याचे सूचित केले व त्यानंतर दि. २.६.२००७ रोजी संबंधित नायब तहसीलदार पुरवठा यांनी त्यांचेकडे माहिती सादर केल्यानंतर त्यांनी दि. ४.६.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांना सदर माहिती प्राप्त झाल्यापृष्टयर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडील दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्रावर पोचसही दिलेली आहे व त्याचबरोबर सदर माहिती संदर्भात त्यांची आता काहीही तक्रार राहिलेली नाही, असे लिहून दिले आहे. अपीलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी या प्रकरणी आयोगासमोर आपला युक्तीवाद सादर केला. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जालना शहराशी संबंधित असून यामध्ये २४२ स्वस्त धान्य दुकाने, ७३ केरोसीन हॉकर्स व १४० किरकोळ केरोसिन परवानाधारक ४१ अर्धघाऊक परवाने इत्यादी संबंधी माहिती मागितली होती. सध्या त्यांच्या विभागात दोन अव्वल कारकुन व एक लिपीक एवढाच कर्मचारीवर्ग उपलब्ध होता व अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात होती. माहितीची व्याप्ती व अपूरा कर्मचारीवर्ग यामुळे त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवता आली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती त्यांनी प्रयत्नपूर्वक संकलीत केली व ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २.६.२००७ रोजी सादर केली व ती त्यांनी ४.६.२००७ रोजी अपीलार्थीस पुरविली. परंतु अपिलार्थी यांनी त्यापूर्वीच दि. ३०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपिल सादर केले होते. या कालावधीमध्ये त्यांनी, अपिलार्थी यांना, त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यास विलंब झाला असल्याचे मान्य करुन अपिलार्थीस माहिती न देण्यामध्ये त्यांचा कोणताही असद्हेतू नव्हता, असे त्यांनी आयोगासमोर सांगितले. तद्वतच सदर विलंब क्षमापित करण्याची विनंती केली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती क्लिष्ट स्वरुपाची होती व सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत पुरवण्यासाठी संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा) यांचेकडे आवश्यक ते मनुष्यबळ नव्हते. त्यानंतर प्रयत्नपूर्वक अपिलार्थीस हवी असलेली १०२० पृष्ठांची माहिती दि. ४.६.२००७ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आली होती. अपिलार्थीस माहिती देण्याबाबत विलंब झाल्याचे त्यांनाही मान्य आहे. तथापि सदर विलंब कोणत्याही असद्हेतूने लावलेला नाही, असे त्यांनी आयोगासमोर स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने

जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांच्या दिनांक १२.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठी होती. अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्याकरता जन माहिती अधिकारी यांना २०,००० पेक्षा जास्त शिधापत्रिकांचे अर्जांची तपासणी करणे भाग होते. त्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ त्यांचेकडे नव्हते. अशाप्रकारची वस्तुस्थिती त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये स्पष्ट केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. ११.३.२००७ रोजी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती, अपिलार्थीस दि. ४.६.२००७ रोजी देऊन, अंदाजे ८४ दिवसांचा लावलेला विलंब आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावलेला, असे सदर सुनावणीमध्ये मान्य केले आहे. तथापि या युक्तीवादामध्ये नमुद केलेली वस्तुस्थिती,अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ व साधनसामुग्री याचे व्यस्त प्रमाण, यांचा विचार करता, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी व त्यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या इतर सहायक कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही असद्हेतुपूर्वक टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. तरीही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावला हे सत्य शेवटी उरत आहे. सबब अपिलार्थीचे अपिल मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे दि. ४.६.२००७ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली असल्याने, व त्यावर त्यांचे समाधान झाले असल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्याबाबत कोणताही आदेश नाही. माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत संबंधित नायब तहसीलदार (पुरवठा) यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, यापुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक कार्यवाही करावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अपील मान्य.
२. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबात त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून यापुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जावर

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत सकारात्मक कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १५-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. महेश कृष्णाजी जोशी,प्लॉट नं.४३, वृंदावन कॉलनी,जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) २, तहसील कार्यालय, जालना जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, जालना जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९६७

निर्णय दिनांक १५-०३-२००८

श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी,
हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सिडको प्रशासन,
सिडको, नवीन औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सिडको प्रशासक,
सिडको, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक नियोजनकार, सिडको, नवीन औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कल्याण सोपानराव सोनवणे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियोजनकार, सिडको, नवीन औरंगाबाद यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता

श्री. संजय औताडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको, नवीन औरंगाबाद यांचे प्रतिनिधी सहाय्यक पणन अधिकारी श्री. जगदीश लक्ष्मणराव राठोड (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर त्रयस्त पक्ष सचिव शिवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था, एन-६, सिडको हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कायक्षेत्रातील शिवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेला दिलेल्या जागेबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. शिवज्योती सहकारी गृहनिर्माण संस्था, एन-६ या संस्थेचे मेंबर किती ? त्याची सत्यप्रत.

२. या संस्थेस सिडकोने सुरुवातीला एकूण किती जागा दिली व काय दराने दिली याची सत्यप्रत.

३. या संस्थेच्या कोर्टामध्ये आजपर्यंत किती केसेस चालू आहे व मा. कोर्टाने त्यावर काय निकाल दिला व केसेसचे माध्यम काय ? याची सत्यप्रत.

४. या संस्थेने सुरुवातीला दिलेल्या जागेच्या व्यतिरिक्त अतिरिक्त जागा मागितली होती काय ? व सिडकोने अतिरिक्त जागा दिली किंवा नाही, दिली असेल तर काय दराने दिली याची सत्यप्रत.

५. या संस्थेस सुरुवातीला दिलेली जागा, तिचा सुरुवातीचा नकाशा व आजच्या नकाशाची सत्यप्रत.

६. कोर्टाने दिलेल्या आदेशाप्रमाणे सिडकोने संस्थेविरुध्द काय कारवाई केली त्याची सत्यप्रत. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १८-०१-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती. अपिलार्थीने मागणीची व्यक्तिशः मागणी केल्याने अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती घेण्यासाठी व्यक्तिशः येतील असे त्यांना वाटले व अखेरीस त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये ३२५ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे पत्र लिहिले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याच्या त्यांच्या म्हणण्याप्रित्यर्थ त्यांनी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली. त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत त्यांनी आयोगास आयोगाने त्यांना पूर्वकल्पना देऊनही सादर केली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये (जे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०२-२००७ रोजी पाठविले) अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यापोटीचे शुल्क रुपये ३२५ /- हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य

माहिती आयोगाकडे त्यांच्या दिनांक ०२-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक ०५-०२-२००७ रोजी केलेले प्रथम अपील सिडको कार्यालयात दाखल करण्यासाठी ते गेले असता सदर अपील इनवर्ड करण्यास कार्यालयीन कर्मचा-यांनी टाळाटाळ केली. त्यांनी २ वेळेस चक्कर मारली असता अपील इनवर्ड केले व अपिल मिळाल्यानंतर पैसे भरुन माहिती घेऊन जाण्याचे त्यांना सूचित केले व त्यांची दिशाभूल केली. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही त्यामुळे त्यांना आयोगाकडे व्दितीय अपील सादर करावे लागत आहे असा उल्लेख त्यांनी या अपील अर्जामध्ये शेवटी केला आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सिडको कार्यालयातील संबंधीत अधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियमाचा कोणताही मान ठेवत नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य हवी आहे. या प्रकरणासंदर्भात त्यांनी उच्च न्यायालयामध्ये सिडकोविरुध्द दावा दाखल केला होता. या दाव्याप्रित्यर्थ त्यांना १५००० /- रुपये इतका खर्च देखील केला होता त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली रुपये ३२५ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरणा करणे त्यांना फारसे अवघड नव्हते. उपरोक्त प्रकरणातील माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दोनदा गेले होते. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते केव्हा गेले हे विचारले असता याची तारीख आता आठवत नाही व त्याचबरोबर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात गेले होते यासंबंधीचा कोणताही ठोस पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध नाही. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २२-०१-२००७ रोजीचे पत्र त्यांना दिनांक ०७-०२-२००७ रोजी मिळाले

असल्याने त्यांना निःशुल्क माहिती मिळावी असे त्यांनी आयोगास युक्तिवादाच्या शेवटी स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीस सदर माहिती ते सशुल्क देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेल्या मागणी अर्जासंदर्भात अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला गेला असल्याने व अपिलार्थीस आवश्यक ते शुल्क भरण्यास सूचना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे परत आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता येथे असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये ३२५ /- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे वेळेत सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने मूळ अर्जात व्यक्तिशः माहिती अपेक्षित करुन सुध्दा ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत व तसा कोणता ठोस पुरावाही अपिलार्थी आयोगासमोर दाखवू शकले नाहीत. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस दिनांक २२-०१-२००७ रोजी पत्र पाठविल्याचा पुरावा जावक नोंदवहीची प्रत अथवा जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत सादर केली नाही हेही तितकेच खरे आहे. आयोगासमोरील सुनावणीस

येतांना दिलेल्या पत्रामध्ये आवक जावक नोंदवही घेऊन येण्याच्या सूचना जन माहिती अधिकारी यांना दिल्या असतांना देखील ते आज सुनावणीस येतांना जावक नोंदवही ची प्रत घेऊन आले नाहीत याची येथे प्रामुख्याने नोंद घेण्यात येत आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०७-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने सुनावणीमध्ये कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पत्र पाठविले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त होण्याकरिता एकूण १६ दिवस लागले यामध्ये जन माहिती अधिकारी यांचा दोष होऊ शकत नाही. अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्याबाबतचा कोणताही ठोस पुरावा उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत हे पाहता अपिलार्थीने आता त्यांना आवश्यक असलेली माहिती रुपये ३२५ /- इतक्या शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घेणे इष्ट राहील असे आयोगाचे मत आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे अशी ताकीद देण्यात येत आहे की, यापुढे माहितीचा अधिकार अधिनियमाशी संबंधीत विषयावर अर्जदाराशी पत्रव्यवहार करतांना विशेष सतर्क राहून प्रत्येक अर्जदारास विहित मुदतीत सकारात्मक प्रतिसाद द्यावा व अशाच प्रकारच्या सूचना त्यांनी त्यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांना द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११, के ४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नियोजनकार, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८१

निर्णय दिनांक १५-०३-२००८

१ श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव, : अपिलार्थी
व्दारा- बी. एन. चंदनशिव,
श्री. छत्रपती राजश्री शाहु अर्बन को. ऑप.
जालना रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग धारुर, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक तर), उपविभाग धारुर

जिल्हा बीड श्री. हनमंत हरिबा साखरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, बीड यांचे प्रतिनिधी उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, बीड श्री. कुलदीप रेणुकादास धुमाळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बीड जिल्ह्यातील कोल्हापूर पध्दतीचा बंधारा क्रमांक २ च्या अपूर्ण कामाबाबतची खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. विभागीय कार्यालय (स्था.स्तर) ल. पा. बीड यांचे पत्र क्र. तांशा १ /५८ दि. ०४-०१-२००१ च्या पत्राची सत्यप्रत.

२. १७-११-९८ ला काम पूर्ण करण्याची मुदत संपल्यानंतर उरलेले काम पूर्ण करुन देण्याबाबत ठेकेदाराला केलेल्या पत्राच्या सत्यप्रती. (उपविभागीय स्तरावर) तसेच ठेकेदाराने केलेल्या खुलाशाच्या सत्यप्रती.

३. को. प. बं. चे बांधकाम चालू झाल्यापासून तारीकवार सीमेंट वापर रजीस्टरच्या सत्यप्रती व कर्मचा-याचे नांव.

४. ठेकेदाराला आज तारकेपर्यत देणे बाकी असलेल्या रकमेचा तपशील. (एकूण कीती रकमेचे देयक देणे बाकी आहे). "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडील शाखा अभियंता श्री. आर. एम. माळी यांच्याकडे दिनांक ०८-११-२००६ रोजी पाठवून अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्वरीत देण्याचे त्यांना सूचित

केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थी यांना पाठविली असून त्यामध्ये शाखा अभियंता यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर ती अपिलार्थीस देण्यात येईल असे म्हटले आहे व त्याचबरोबर अपिलार्थी यांना सदर माहिती कशासाठी पाहिजे हे त्यांना कळविण्या-विषयी सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये व त्यायोगे अपेक्षित माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. यामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले आहे की, प्रथम देयकाची मापे नोंद केलेले मोजमाप पुस्तक व सिमेंटच्या रजिस्टरच्या प्रती उपविभागाचे तसेच संबंधीत शाखा अभियंता यांच्या कडील पत्रव्यवहारावरुन त्यांचे स्तरावर गहाळ झाल्या असल्याचीच शक्यता दिसत आहे. सदर सिमेंट रजिस्टर व मोजमाप पुस्तिका उपविभागाकडे उपलब्ध झाल्यानंतर परस्पर आपणास झेरॉक्स प्रती देण्याच्या सूचना संबंधीत उपविभागास देण्यात आलेल्या आहेत. या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना देऊन अपिलार्थीस मोजमाप पुस्तिका, सिमेंट रजिस्टरच्या प्रती परस्पर देण्याचे सूचित केले आहे. अशाच अर्थाचे पत्र त्यांनी अपिलार्थीस पुन्हाः दिनांक ३०-१२-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार,

राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने ते हे सदर अपील आयोगाकडे करत असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी यामध्ये त्यांनी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साध्या पोस्टाने पाठवून दिली आहे. त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. सदर पत्रातील या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ संदर्भातील माहिती त्यांना सदर पत्र त्यांच्या विभागात व विभागीय कार्यालयात उपलब्ध न झाल्याने, ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकले नाहीत असे नमूद केले आहे. अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे मागणी मागविली असता सदर माहिती साध्या टपालाने का पाठविली असे विचारले असता त्यांनी स्टॅम्प तुटवडा हे कारण आयोगास दिले व माहितीचा अधिकार अधिनियमाखालील माहिती पुरविण्यासाठी अताशा बराच खर्च येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने मूळ अर्जावर त्यांनी दिलेल्या पत्त्यावर सदर माहिती पाठविली आहे. तथापि अपिलार्थी यांचे प्रत्यक्ष निवासस्थान बीड या जिल्ह्याच्या मुख्यालयी असल्याने त्यांना सदर माहिती प्राप्त होऊ शकली नसल्याची शक्यता आहे असेही त्यांनी पुढे स्पष्ट केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यावर कोणतीही सुनावणी घेतली नाही. सुनावणी घेण्याची पध्दत त्यांना माहिती नसल्यामुळे त्यांनी सुनावणी घेतली नाही. मात्र अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६, २८-१२-२००६ व ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस या माहिती संदर्भातील स्थिती अवगत केली आहे. त्यांचे दिनांक २८-१२-२००६ रोजीचे पत्र त्यांनी अपिलार्थीस अपिलार्थीने बदललेल्या बीड येथील पत्त्यावर समक्ष पाठविले आहे. सदर पत्र अपिलार्थीस पोहोचल्याबद्दल अपिलार्थीने त्यांच्याकडे पोच सही दिली आहे. सदर पोच सहीची झेरॉक्स त्यांनी आयोगास दाखविली आहे. अपिलार्थीने संबंधीत पत्राची पोच देतांना त्यावर त्यांच्या सहीबरोबर बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेचा शिक्का उमटवला आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या अर्जाची प्रथम दखल दिनांक ०८-११-२००६ रोजी घेऊन अपिलार्थीचा सदर अर्ज संबंधीत शाखा अभियंता यांच्याकडे, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे असल्याने, पाठवून दिला. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कारवाई ५ दिवसाच्या आत करणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत कोणतीही कारवाई केली नाही. एवढे जरी असले तरी त्यांनी अपिलार्थीस दिनांक १०-११-२००६ रोजी माहिती पुरविली असल्याचे आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीस माहिती पुरविण्याप्रित्यर्थ त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत

पाहता व त्यामधील खाडाखोड पाहता जन माहिती अधिकारी यांचे हे वर्तन संशयास्पद असे वाटते कारण या जावक नोंदवहीमध्ये ९५५ हा क्रमांक प्रथम येऊन त्यातील शेवटच्या ५ या आकड्यावर त्याची कड गिरवल्याचे दिसून येते व क्रमांक ९५४ व ९५६ या मधील जागेमध्ये अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी तयार करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली असता सदर माहिती साध्या पोस्टाने का पाठविली असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता पोस्टाच्या तिकिटांचा तुटवडा व पत्रव्यवहार करण्यासाठी येणारा जास्तीचा खर्च असे कोणासही न पटणारे बेजबाबदार विधान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केले आहे. जलसंपदा विभागाकडे करोडो रुपयांची कामे चालू असतात अशा कामाची माहिती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला माहिती देण्यासाठी लागणारा जास्तीचा निधी व पोस्टाच्या तिकिटांचा तुटवडा ही कारणे केवळ हास्यास्पद नाहीत तर जन माहिती अधिकारी यांच्या वर्तनाबद्दल संशय निर्माण करणारी आहेत असे आयोगाचे ठाम मत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत माहिती देण्यासंदर्भात कृत्रिम पुरावा निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न संशयास्पद आहे असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या संशयास्पद वर्तनाची चौकशी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीचा पत्ता निश्चित नसल्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीमध्ये आज सांगितले. अपिलार्थीने दिलेल्या वेगवेगळ्या अर्जावरील पत्ते पाहता अपिलार्थीने मूळ अर्ज व प्रथम अपील अर्ज या दोन्ही अर्जावर एकच पत्ता दिला असून राज्य माहिती

आयोगाकडे दिलेल्या अर्जावर मात्र त्यांचा पत्ता बीड येथील असून तो मूळ अर्जातील पत्त्यापेक्षा पूर्णतः निराळा आहे. अपिलार्थीचे वर्तनही या संपूर्ण प्रकरणामध्ये संशयास्पद असल्याचे अनुमान आयोग काढत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या त्यांच्या पत्ता बदलाच्या महत्वाच्या मुद्दयाचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी सुनावणीसाठी उपस्थित नाहीत हे सर्व पाहता आयोग या निष्कर्षात आला आहे की, अपिलार्थीस अद्यापही माहिती प्राप्त न झाल्याची शक्यता जास्त वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने, तिकिटांचा तुटवडा, निधीची कमतरता या सबबी पुढे न करता विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी नाकारली आहे. त्यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपील अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना एकत्र बोलावून या दोघांचे म्हणणे नोंदवून घेऊन त्यावर आपले निर्णय अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पारीत करावे. या सुचनांची नोंद त्यांनी भविष्यात गांभीर्याने घ्यावी असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या संशयास्पद वर्तनाची चौकशी सचिव (जलसंपदा) यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर १ महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक १५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मण माणिकराव चंदनशिव, व्दारा- बी. एन. चंदनशिव, श्री. छत्रपती राजश्री शाहु अर्बन को. ऑप. जालना रोड, बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग धारुर, जिल्हा बीड यांना या निकालपत्रा-तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८२

निर्णय दिनांक १५-०३-२००८

१ श्री. बंडे भालचंद्र माधवराव, : अपिलार्थी
माजी जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी
जन आंदोलन, नांदेड, व्हाईट हाऊस टेलर्स,
मेन रोड मुखेड, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड
जन अपिलीय अधिकारी : प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बंडे भालचंद्र माधवराव, त्रयस्त पक्ष सौ. उषा मारुती पारशेवार हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड श्री. स्टीव्हन थॉमस अल्वारिस (यापुढे

त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड श्री. शंभू मलगुजी सलामे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड श्री. संजय पुंडलीक राऊत व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड श्री. हरिदास बोरकर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सौ. उषा पारशेवार यांच्या वाहनाबाबत जानेवारी २००६ ते २० नोव्हेंबर २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" सौ. उषा पारशेवार ह्यांच्या वरील वाहनाच्या नामपरिवर्तनाबाबत खालील माहिती देणेबाबत.

१. सौ. पारशेवार ह्यांचे नांवे आर. टी. ओ. लातूर ह्यांनी दिलेल्या एन. ओ. सी. ची प्रत देणे.

२. नाम परिवर्तनानंतर सौ. पारशेवार ह्यांचे नांवे वाहन झाल्यानंतरच्या आर. सी. बुकची झेरॉक्स प्रत देणे व विमा बाबतचे प्रमाणपत्राची प्रत देणे.

३. सदर वाहनावर बोजा (एच. पी.) चढवल्याबाबतचे वित्तीय संस्थेच्या पत्राची प्रत देणे.

४. सदर बोजा उतरवल्यानंतरचे वित्तीय संस्थेचे पत्राची प्रत.

५. सदर वाहन बालाजी पारशेवार ह्यांचे नांवे नामपरिवर्तनाच्या टि. टि. फॉर्मची झेरॉक्स प्रत.

६. त्याच्या आर. सी. बुकची प्रत देणे.

७. व आता ह्या वाहनावर चढवलेल्या बोजा (एच. पी.) ची प्रत देणे व विमाबाबतचे कागदपत्रे देणे.

८. सदर वाहन नामपरिवर्तनाचे कारण स्पष्ट करावे.

९. मालक स्वतः हजर न होता नामपरिवर्तनाचे अधिकार आपणास आहेत काय ?

१०. सदर नामपरिवर्तनासाठी कोणत्या दलालने सहकार्य केले.

११. एखाद्याने चाकू लावून जबरदस्ती स्वाक्षरी करवून घेतलेल्या टि. टी. फॉर्मनुसार आपण सदर वाहन नामपरिवर्तन करु शकता काय ? तपशिल द्यावा.

१२. सौ. पारशेवार ह्यांच्या "शिवा ड्रायव्हींग स्कुल" हे नांवे आहे काय ? असल्यास वा नसल्यास "शिवा ड्रायव्हींग स्कुल" ची पूर्ण कागदपत्रे (सद्यस्थितीपर्यंतची) द्यावीत.

१३. श्री. बालाजी गोविंद पारशेवार ह्यांनी आपणाकडे दाखल केलेल्या Address proof ची प्रत देणे उदा. राशन कार्ड व अन्यची झेरॉक्स प्रत.

१४. दि. ११-११-०६ रोजी आपणाकडे सौ. पारशेवार ह्यांनी दिलेल्या पत्रानुसार आपण केलेल्या कार्यवाहीचा तपशिल देणे.

१५. आपल्या कार्यालयाच्या compound wall च्या बाहेरील टेबल्स कशासाठी, कोणाचे आहेत ह्याचा तपशिल देणे.

वरील सर्व कागदपत्रे झेरॉक्स स्वरुपात व साक्षांकित हव्यात. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी शुल्क रुपये १३४ /- इतके त्यांच्या

कार्यालयात भरण्याचे सूचित केले. (माहितीचे शुल्क रुपये १०४ अधिक ३० रुपये पोस्टेज) सदर पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने दिनांक ०४-११-२००६ अशी तारीख लिहिली आहे. सदर तारीख संबंधीत लिपिकाकडून नजरचुकीने पडली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर स्पष्ट केले. या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली सही दिनांक ०४-१२-२००६ रोजी केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे आवश्यक त्या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २६-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांच्या मूळ अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी दखल न घेतल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर त्यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. सदर सुनावणीचे पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये पाठविले होते. तथापि सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलासंदर्भात त्यांचा निर्णय अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविला. यामध्ये त्यांनी माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीने आपले समाधान झाले असावे असे स्पष्ट होत असल्याचे अनुमान काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार,

राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित कालावधीत माहिती न मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता फीची बेकायदेशीर मागणी केल्याने संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर त्यांनी या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांना दिनांक २१-११-२००६ रोजी प्राप्त झाला होता. या अर्जास अनुसरुन त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये १०४ /- अधिक पोस्टेज खर्च रुपये ३०/- असे एकूण रुपये १३४ /- चा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याविषयी सूचित केले होते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन अथवा डिमांड ड्राफ्टव्दारे सदर शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कळविले होते. या पत्रावर संबंधीत लिपिकाने टाकलेली तारीख दिनांक ०४-११-२००६ ही नजरचुकीने टाकलेली असून या पत्रावर त्यांनी त्यांच्या सहीखाली दिनांक ०४-१२-२००६ अशी तारीख टाकली आहे. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने त्यांना कळविले आहे. तदनंतर दिनांक ०२-०२-२००७ रोजी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये १०४ /- इतक्या रक्कमेचा भरणा करुन घेऊन श्री. अशोक शिरुरकर यांना श्री. बंडे यांच्या नावाने माहिती व्यक्तिशः देण्यात आली. श्री. अशोक शिरुरकर यांनी पोस्टेज शुल्क

रुपये ३० न भरल्याने त्यांच्याकडून शुल्क १०४ /- भरुन घेतल्यानंतर त्यांना ही माहिती व्यक्तिशः देण्यात आली. तदनंतर दिनांक ०२-०६-२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती त्यांनी निःशुल्क व रजिस्टर पोस्टाव्दारे पाठविली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक २६-१२-२००६ रोजी केलेला अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २८-१२-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क भरले नसल्यामुळे त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय दिला. अपिलार्थीचे अपील त्यांच्याकडे प्राप्त झालेले पहिलेच अपील असल्याने अधिनियमातील तरतुदीविषयी त्यांना कल्पना नसल्याने त्यांना सदर अपिलावर सुनावणी घेण्यास उशीर झाला.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-११-२००६ रोजी त्रयस्त पक्षाशी संबंधीत माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज केला होता. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर पत्र बनावट आहे आपल्या अभिप्रायाप्रित्यर्थ त्यांनी पत्रावर जावक लिपिकाने दिनांक ०४-११-२००६ ही तारीख टाकली असल्याचे, अधिका-याने स्वाक्षरी करताना दिनांक १४-१२-२००६ अशी तारीख टाकली असल्याचे तसेच हे पत्र संबंधितांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजी पोस्टात टाकल्यानंतर त्यांना हे पत्र दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्राप्त

झाल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या या आक्षेपाची तपासणी करता असे आढळून आले आहे की, या पत्रावर दिनांक ०४-११-२००६ अशी तारीख संबंधीत लिपिकाने टाकली आहे. तथापि सदर तारीख नजरचुकीने टाकली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी या पत्रावर केलेल्या सहीखाली दिनांक १४-१२-२००६ अशी तारीख टाकली आहे. तथापि या सहीचे निरिक्षण केल्यास त्यांनी आपल्या सहीखाली दिनांक १४-१२-२००६ अशी तारीख टाकली नसून ती ०४-१२-२००६ अशी असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०१-२००७ रोजी पोस्टात टाकल्याचे व त्यांना दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. तथापि त्याच्या या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी कोणताही पुरावा, संबंधीत पाकिटाची झेरॉक्स आयोगाकडे सादर केलेला नाही. तद्वतच जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये उपस्थित केलेल्या माहितीचे खंडण करण्यासाठी अपिलार्थी आज सुनावणीस उपस्थित नाहीत. अपिलार्थीने त्रयस्त पक्षाची माहिती विचारुनही दिनांक ०२-०६-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सर्व माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे व सदर माहिती प्राप्त झाल्याची पोच देखील अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या उद्देशून लिहिलेल्या पत्रात दिली आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे किंवा माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०४-१२-२००६ रोजीचे पत्र त्यांना दिनांक ०९-०१-२००७ रोजी प्राप्त झाले असे म्हटले आहे. परंतु त्याच्या या म्हणण्याप्रित्यर्थ त्यांनी प्रत्यक्षात कोणताही पुरावा आयोगासमोर सादर न केल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील

फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. या ठिकाणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या अपील अर्जावर दिनांक २१-०३-२००७ अशी तारीख दर्शविली आहे. याची नोंदणी आयोगाच्या कार्यालयात दिनांक ०२-०४-२००७ रोजी झालेली आहे. अपील दाखल केल्यानंतर अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त झाल्याचे दिसते हे पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाखाली त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात पत्रव्यवहार करतांना येथून पुढे सतर्क राहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक १५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बंडे भालचंद्र माधवराव, माजी जिल्हा कार्याध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, नांदेड, व्हाईट हाऊस टेलर्स, मेन रोड मुखेड, जिल्हा नांदेड.

२ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१८

निर्णय दिनांक १५-०३-२००८

१ श्री. गजानन बी. पाटील (काळे), : अपिलार्थी
व्दारा - ॲडव्होकेट एस. पी. बोरा,
प्लॉट नं. एन. बी. बी. ६, न्यू बालाजीनगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप आयुक्त (मुख्यालय), पोलीस
आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस आयुक्त, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन बी. पाटील (काळे) हे

गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्री. मोसीन खान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर श्री. प्रकाश मारुती वाघमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-२००६ ते २६-१२-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ अ) आपल्या विरुध्द झालेल्या अन्यायाविरुध्द तक्रार देणे म्हणजे गुन्हा आहे का ? संबंधीत प्रकरणी कोणत्या नियमान्वये (IPC/MDC) गुन्हा दाखल होतो. संबंधीत/नियमाची व १ जानेवारी २००६ ते ३१-१२-२००६ अखेरपर्यत गुन्हा दाखल झालेलाची संख्या व तपशील देण्यात यावा.

ब) सप्टेंबर २००६ मध्ये दाखल झालेली एन सी क्र ६१८/०६ (२८-०९-२००६) ची सांक्षकीत प्रत ती चौकशी कामी ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना दिली त्यांची दिनांक, संबंधीत प्रकरणातील तक्रारदाराचा जबाब प्रत साक्षंकीत प्रत, त्या प्रकरणातील संशयीतांविरुध्द कारवाई केली असल्यास त्याचा तपशील देण्यात याव्यात.

एन. सी. प्रकरणात चौकशी करावयाची असल्यास किती दिवसात करावी याचे बंधन आहे का ? बंधन असल्यास त्याचा कालावधी किती ? संबंधीत कर्मचारी / अधिकारी मुदतीत चौकशी केली नाही (गंभीर बाबी, कायदा सुव्यवस्था वगळता) संबंधीत अधिकारी / कर्मचारी

विरुध्द काय कारवाईची तरतूद आहे ? तरतूद असल्यास सन २००६ (१-१-०६ ते २६-१२-२००६ पर्यत) ते आजपर्यंत कारवाई केली असल्यास संबंधीत कर्मचारी / अधिकारी यांचे नांवे व पदनामाची माहिती.

क) श्री. छबुराव सोनवणे, पोलीस उपनिरिक्षक, सिडको पोलीस स्टेशन (इनचार्ज टि. व्ही. सेंटर चौकी) व हेड कॉन्सटेबल श्री पुर्णपात्रे ब. नं. १६६५ सिडको पोलीस स्टेशन अंतर्गत (टी. व्ही. सेंटर चौकी) यांच्याकडे ०१-०९-२००६ ते २६-१२-२००६ दरम्यान एकूण तपासासाठी असलेल्या एन. सी. ची संख्या व त्या व्यतिरिक्त तपास कामासाठी असलेल्या गुन्ह्यांची संख्या, प्राप्त गुन्ह्यामध्ये तपासपूर्ण झालाची संख्या (फक्त संख्या घ्यावी पण दोघाची वेगवेगळी घ्यावी). या कालावधीमध्ये (११५ दिवसात) संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे बंदोबस्तासाठी असलेल्या, तपासकामी बाहेरगावी गेलेल्या दिवसाची संख्या (वैकल्पीक सुट्टी, रजा वगळता) चा दोघा अधिकारी कर्मचारी तपशील देण्यात यावा. (फक्त संख्या कळवावी).

ड) आपण स्वःताहा व आपले कनीष्ठ अधिकारी हे आपल्या पोलीस स्टेशनची गुन्ह्याची संख्या कमी रहावी. काही चोरी / गंभीर घटनाची आपण वरच्यावर नोंद घेतात घेत नाहीत त्या प्रकरणी गुन्हा दाखल करीत नाही. (F.I.R.) ह्या बाबी सत्य आहे का ? आपणास तक्रारदास अमीष दाखवुन गुन्हा दाखल करीत नाही (उदा. तुझ्या माल सापडला तर विना चौकशी देऊ, नोंद हेऊ, इतर बेवरस प्रकरणात सम माल आला तरी ॲडजेस्ट करु) ह्या बाबी सत्य आहे का ?

ह्या बाबी पुराव्यानिशी मी सिध्द करुन दिल्यात तर आपणाविरुध्द व जबाबदार अधिकारी विरुध्द नियमाप्रमाणे किंवा ग्रहमंत्रालयाच्या प्रचलीत पध्दतीनुसार काय कारवाईची तरतुद आहे त्याचा तपशील घ्यावा.

अ) दप्तर दिरंगाईचा कायदा २००६ (शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतीबंध करण्यासाठी तरतुद करण्याकरीता) च्या कलम १० (१) (२) (३) अन्वये श्री. छबुराव सोनवणे, पोलीस उपनिरक्षक, श्री. पुर्णपात्रे हे. कॉ. बं.नं. १६६५ नेमणूक सिडको पोलीस स्टेशन औरगाबाद शहर यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी म्हणून मा. श्री. उध्दव कांबळे, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांच्याकडे दिलेला तक्रार अर्ज चौकशीकामी आपल्या पोलीस स्टेशन आला असेल तर मा. पोलीस आयुक्त औरंगाबाद यांचा पत्राची सांक्षकीत प्रत.

संबंधीत पोलीस अधिकारी (श्री. छबुराव सोनवणे), कर्मचारी (श्री. पुर्णपात्रे) यांच्या संबंधीत प्रकरणी दाखल झालेल्या जबाबाच्या सांक्षकीत सत्यप्रती.

ई) माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (त्र) (एक) (दोन) (चार) नुसार आपल्या कार्यालयाच्या अभिलेखाचे सर्वेक्षण / तपासणी करावयाची आहे.

I) सप्टेंबर (१-९-२००६ ते २६-१२-२००६) माहीती दाखवीणे पर्यत एन. सी. रजीस्टर, कलम १०७, ११०, १४९ अन्वये कारवाई झालेले रजीस्टर यांची पहाणी करावयाची आहे.

II) १ जानेवारी २००६ ते २६-१२-२००६ पर्यत आपल्या पोलीस स्टेशन मार्फत पोलीस आयुक्त कार्यालयातून आलेल्या verfication (गुन्हा

दाखल नसल्याबद्दलचे NOC) (पासपोर्ट व इतर कारणासाठी) साठी आलेल्या नावाची यादी व पाठविलेल्या Verfication Report यादीच्या रजीस्टर किंवा पत्रव्यवहाराची पहाणी करावयाची आहे.

III) सुपारी घेऊन मारहाणा करणारे, नावाजलेले गुंड मारहाण प्रकरणातील आपल्या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील अशा रेकॉर्डवरील गुन्हेगाराची फोटो/नावाची यादी त्यासंबंधी त्यांचे ठेवलेले Crime Registar यांची पहाणी करावयाची आहे.

IV) आपल्या पोलीस स्टेशनचे अधिकारी / कर्मचारी हे आपल्या परवानगीने पोलीस आयुक्तालय हद्द सोडुन तपासकामी गेलेले पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे मोमेंट रजीस्टर आपल्या परवानगीपत्राच्या त्या त्या पोलीस स्टेशनला दिलेल्या सत्यप्रतीचा संचीकाची पहाणी करावयाची आहे.

V) ०१-०९-२००६ ते २६-१२-२००६ या कालावधीतील स्टेशन डायरीची पहाणी / सर्वेक्षण करावयाचे आहे.

VI) आपल्या मान्यतेने पोलीस स्टेशनच्या ड्युटी ऑफीसर / इनचार्ज पोलीस ऑफीसर व हजेरी मेजर यांच्या ड्युटी रजिस्टरची अनुक्र V च्या कालावधीची पहाणी करावयाची आहे.

वरील माहीतीची मला आवश्यकता असुन माअअ २००५ च्या तरतुदीनुसार माहीती / सर्वेक्षणाच्या तरतुदीच्या फिस भरण्यास तयार आहे. तरी मला लवकरात लवकर माहीती व सर्वेक्षणाची परवानगी देण्यात यावी. आपणाकडून सहकार्याची अपेक्षा. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सिडको यांना उद्देशून केला होता. तथापि या प्रकरणी सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय हे जन माहिती अधिकारी असल्याने संबंधीत पोलीस स्टेशनने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्याकडे सदर अर्ज दिनांक ३०-१२-२००६ रोजी पाठविला.

सदर अर्ज संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी पोलीस उप आयुक्त (परिमंडळ) यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी पुढे पाठविला. या संपूर्ण कालावधीमध्ये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तसेच पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये ८५०० /- इतकी शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०६-२००७ रोजी घेऊन आपले आदेश दिनांक ०१-०६-२००७ रोजी पारीत केले आहेत. या निर्णयामध्ये अपिलार्थीचे अपील त्यांनी मान्य केले आहे व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले आहे. तसेच संदर्भिय केलेल्या नस्त्या त्यांना पाहण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणीचा निर्णय प्राप्त होण्यापुर्वी या प्रकरणी अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००७ रोजी व्दितीय अपील

केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने व संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपिलाची सुनावणी विहित मुदतीत न घेतल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० /- इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर पोलीस आयुक्त यांच्यावरील कारवाईसाठी आयोगाने शासनाकडे शिफारस करण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी असे दिसून आले की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा अर्ज वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांच्याकडे दिनांक २६-१२-२००६ रोजी केला होता. वास्तविक पोलीस निरिक्षक हे माहिती अधिकारी नसल्यामुळे त्यांनी तो संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१२-२००६ रोजी पाठविला. त्यांनी हा अर्ज संबंधीत पोलीस उप आयुक्त यांच्याकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी पाठविला. अपिलार्थीच्या अर्जावरील होणा-या प्रक्रियेमध्ये टप्प्यावर संबंधितांकडून ५ महिने इतका विलंब केल्याचे दिसून येते. संबंधीत पोलीस उपआयुक्त यांच्याकडून हा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच दिनांक ०१-०६-२००७ रोजी सुनावणी घेऊन सुनावणीवरील आपले आदेश त्याच दिवशी पारीत केले. मध्यंतरीच्या काळात दिनांक १९-०५-२००७ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती दिल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील १९-०५-२००७ च्या पत्राच्या स्थळप्रतीवर दिनांक १९-०५-२००७ ची पोचसही दिलेली आहे. यावरुन अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००७ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते. याचबरोबर अपिलार्थीने त्यांनी मूळ अर्जाव्दारे पाहणीसाठी मागितलेल्या नस्त्या संबंधीत पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन सिडको यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०७-२००६ रोजी उपलब्ध करुन दिल्या. अपिलार्थीने या दिवशी दुपारी १२ ते

१५-३० या दरम्यान अभिलेख्याचे सर्वेक्षण केले असल्याचे त्यांनी संबंधीत पोलीस निरिक्षकास लेखी पत्र दिले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे संबंधितांकडून वेळेवर प्राप्त झाला नाही. या प्रकरणातील माहिती पोलीस मुख्यालयाशी संबंधीत नसल्याने त्यांनी सदर माहिती संबंधीत पोलीस स्टेशन ज्या पोलीस उप आयुक्तांकडे आहे त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्याकडे सदर अर्ज पाठवून दिला. सदर अपील संबंधीत पोलीस उप आयुक्त यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००७ रोजी माहिती विनामूल्य उपलब्ध करुन दिली. त्यास अनुसरुन अर्जदारास पाहण्यासाठी आवश्यक असलेल्या नस्त्या पाहण्यासाठी परवानगी देखील दिली. त्याप्रमाणे अपिलार्थीने संबंधीत पोलीस स्टेशन येथे दिनांक ०९-०६-२००७ रोजी हजर राहून त्यांना हव्या असलेल्या अभिलेख्याची पाहणी केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्राप्त झाला. तथापि प्रत्येक परिमंडळाचे उपायुक्त या प्रकरणी अपिलीय अधिकारी असल्याने त्यांनी संबंधीत परिमंडळाकडे अपिलार्थीचा अपील अर्ज पाठवून दिला. अपिलीय अधिकारी निश्चितपणे परिमंडळ आयुक्त की आयुक्त याबाबतीत संभ्रम निर्माण झाल्याने अपिलार्थीचे अपील ठरविण्यास ५ महिन्याचा अधिक विलंब लागला. त्यांनी दिनांक ०१-०६-२००७ रोजी या अपिलावर सुनावणी घेऊन त्याच दिवशी अपिलार्थीच्या अपील

अर्जासंदर्भात आपले आदेश पारीत केले आहेत व अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००७ रोजी माहिती दिली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्या-करिता निश्चितपणे विलंब झालेला आहे. परंतु संबंधीत अपिलीय अधिका-याकडे माहितीसाठीचा अपील अर्ज गेल्यानंतर त्यांनी त्यावर वेळेत कारवाई केलेली आहे. मुळात या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ५ महिन्याचा विलंब जन माहिती अधिकारी यांच्या स्तरावर झाल्याचे दिसून येतो. केवळ या विलंबाने अपिलार्थीस त्यांना हवी असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त होऊ शकली नाही. या प्रकरणातील जन माहिती अधिकारी त्यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सहाय्य करण्यास जे कर्मचारी / अधिकारी जबाबदार आहेत त्यांना देखील माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे. हे पाहता अपिलार्थीस माहिती देण्याकरिता संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक हे जबाबदार ठरतात. अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरवून संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती मागविली आहे तिचे अवलोकन करता अपिलार्थीचा मुद्दा क्रमांक अ अंशतः, मुद्दा क्रमांक ब अंशतः व मुद्दा क्रमांक क वगळता उर्वरीत संपूर्ण माहिती अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणारी विचारली आहे, जी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील

“माहिती” या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक तो खुलासा दिल्याचे दिसून येते.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहकारी कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी विलंब लावून दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती आता जन माहिती अधिकारी यांना दिनांक १९-०५-२००७ रोजी मिळाली असल्याने व सदर माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याने व त्याचबरोबर त्यांनी दिनांक ०९-०७-२००७ रोजी आवश्यक त्या नस्त्यांची पाहणी केली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहकारी कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी कोणत्याही समर्थ कारणाशिवाय विलंब लावून दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांच्यावर प्रचलीत

सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद<br>
दिनांक १५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन बी. पाटील (काळे), व्दारा - ॲडव्होकेट एस. पी. बोरा, प्लॉट नं. एन. बी. बी. ६, न्यू बालाजीनगर, औरंगाबाद.

२ सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८३

निर्णय दिनांक : १५-०३-२००८

१ श्री. नारायण बाबूराव देशमुख : तक्रारदार
रा. मंगरुळ (खरात) ता. घनसावंगी
जि.जालना.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कृषी अधिकारी,
तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी
जि.जालना

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी जि.जालना यांचे प्रतिनिधी वरिष्ठ लिपीक श्री. विश्वास चिंतामण बिडकर ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर तक्रारदार श्री. नारायण बाबूराव देशमुख (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल)हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. ११.५.२००७ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, राज्य माहिती आयोगाने दि. २२.३.२००७ रोजी आदेशित करुनही तक्रारदार यांना उत्तरवादी यांचेकडून, मंगरुळ ता.घनसावंगी येथील कपासी लाल्या रोग, शासन अनुदान यादीची माहिती प्राप्त झाली नाही. तक्रारदार यांचेप्रती उत्तरवादी हे सहानुभूती न दाखविता, अरेरावीची भाषा करीत आहेत. तसेच उत्तरवादी हे त्यांचे कार्यालयात हजर राहत नसल्यामुळे या प्रकरणी

दोषीविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २०(१) नुसार कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदार यांनी केलेल्या या तक्रारीसंदर्भात उत्तरवादी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तक्रारदार यांनी त्यांचेकडे महापूर शेती पिक नुकसान यादी व कापूस लाल्या रोग लाभार्थीची यादी, यांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने त्यांनी महापूर शेती पिक नुकसान यादी, शेतीबाबत अनुदान लाभार्थींची यादी तक्रारदारास दिली होती. तथापि कापूस लाल्या रोगाचे अनुदान उपलब्ध न झाल्याने व त्यावेळी लाभार्थीची निवड केली गेली नसल्याने, संबंधितांस माहिती देणे शक्य नव्हते. परंतु सदर अनुदान प्राप्त झाल्यानंतर लाभार्थींची यादी त्यांनी तक्रारदारास दि. ७.६.२००७ रोजी त्यांचेकडील दि. ४.६.२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली आहे. तक्रारदार यांनी मागितलेली उर्वरित माहिती तक्रारदारास दि. ७.६.२००७ रोजी प्राप्त झाली असल्यामुळे तक्रारदाराचा तक्रारअर्ज खारीज करण्यात येत आहे.

तक्रारदारांना उत्तरवादी यांचेकडून आवश्यक ती माहिती दि. ७.६.२००७ रोजी प्राप्त झाली असल्याने सदर माहिती देण्यास उत्तरवादी यांनी नकार दिला, ही बाब यामुळे सिध्द होत नाही. तसेच उत्तरवादी हे जर त्यांचे कार्यालयात नियमितपणे हजर राहत नसतील तर त्यासंबंधी माहिती अधिकारी अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार आयोगास नाहीत. सदर बाब संपूर्णपणे प्रशासकीय असल्यामुळे तक्रारदारांनी याबाबत उत्तरवादी यांचे वरिष्ठांकडे ती बाब योग्य त्या रितीने मांडावी, अशी त्यांना सूचना करण्यात येत आहे. सबब तक्रारदाराची सदर तक्रार खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १५-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण बाबूराव देशमुख,रा. मंगरुळ (खरात) ता. घनसावंगी जि.जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, घनसावंगी, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९८

निर्णय दिनांक : १८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण शेषराव घुमरे<br>रा. पारगाव घुमरा ता.पाटोदा जि.बीड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा मुख्याध्यापक,<br>बंकटस्वामी विद्यालय,खडकीघाट, ता.जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, बीड. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.नारायण शेषराव घुमरे, यांचे प्रतिनिधी ॲड एकनाथ जी. काकडे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. कावळे शाहू नारायण ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) तत्कालीन मुख्याध्यापक श्री. मस्के एस.एस. व जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी श्री.राऊत दिलीप शंकरराव ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचे कडील दि. २४.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्य महाविद्यालयासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) बंकटस्वामी विद्यालय खडकी (घाट) या शाळेत सन २००६-२००७ साठी घेण्यात आलेल्या प्रथम सत्र परिक्षेतील विज्ञान विषयाच्या वर्ग आठवी ते दहावी पर्यंतच्या मूळ उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रतीत माहिती दयावी.

२) आपल्या शाळेत सन २००५ ते २००६-२००७ साठी घेण्यात आलेल्या शिक्षक हजेरीच्या सत्यप्रतीत माहिती दयावी."

अपीलार्थी यांनी सदर माहिती शीघ्र पोस्टाने अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपैकी शिक्षक हजेरीच्या सत्यप्रतींच्या माहिती संदर्भात एकूण रु.३०५/-इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याची सूचना केली. अपिलार्थीने मागितलेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती संदर्भात सदर उत्तरपत्रिका त्या शाळेतील शिक्षक श्री. डी.डी. भुमरे यांनी  तपासणीसाठी नेल्यानंतर त्या परत केल्या नाहीत, असे उत्तर दिले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याप्रित्यर्थ त्यांचे कार्यालयातील जावक नोंदवही त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन त्यांनी सदर पत्र अपिलार्थीस पाठविले असल्याचे दिसत आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २३.२.२००७ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिल अर्जात अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांचे दि. ५.१.२००७ रोजीचे पत्र रजिस्टर्ड पोस्टाने प्राप्त झाले असल्याचे म्हटले आहे. तथापि दि. ५.१.२००७ रोजीच्या पत्रात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निश्चित माहिती देण्याचे कबूल करुनही अपिलार्थीस पूर्णपणे माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमुद केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांना, जन माहिती अधिकारी यांचेवर कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती करुन, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचेकडे अपिलार्थीचा सदर अपिल अर्ज प्राप्त न झाल्याने या अपिलावर कोणतीही सुनावणी घेतली नाही, असे त्यांचे प्रतिनिधीने आज आयोगासमोर सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणताही निर्णय पारित न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. २३.५.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना माहिती पूर्णपणे देणे

बंधनकारक असतांना देखिल अद्यापपर्यन्त माहिती दिली नाही., म्हणजेच माहिती देण्याचे जाणीवपूर्वक नाकारले, म्हणून त्यांचेवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कार्यवाहीचे व जन माहिती अधिकारी यांना सर्व माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी आदेश देण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी दि. २४.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेतली नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल अर्ज रजिस्टर्ड पोस्टाने पाठविल्याबद्दल पुरावा उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर सुनावणी घेतली नाही, यास्तव अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी आदेश व्हावेत व त्यांनी प्रथम अर्जाद्वारे मागितलेली माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थीने त्यांचे मूळ माहितीच्या अर्जात नमुद केलेल्या २००६-२००७ या वर्षासाठी घेतलेल्या प्रथम सत्र परीक्षेतील विज्ञान विषयाच्या इयत्ता ८ ते १० पर्यन्तच्या मूळ उत्तरपत्रिका, श्री. दत्तात्रय ज्ञानोबा घुमरे या शिक्षकाने तपासणीसाठी आपल्या घरी नेल्या होत्या. परंतु त्या त्यांनी शाळेस परत न करता ते कामावर परत रुजू झाले नाहीत. शाळेने त्यांचेकडे वारंवार पत्राद्वारे मागणी करुनही सदर उत्तरपत्रिका त्यांनी शाळेकडे परत केल्या नाहीत. त्यामुळे शाळेने दुसरी प्रश्नपत्रिका तयार करुन परीक्षा घेतली आहे. संबंधित शिक्षक श्री. द.ज्ञा.घुमरे हे सध्या सेवेत नाहीत. अपिलार्थी हे त्यांचे चुलत भाऊ असून, केवळ त्यांना त्रास देण्यासाठी अपिलार्थीने हे अपिल केले आहे. संबंधित शिक्षकावर फौजदारी का केली नाही, हे विचारले असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कोणतेही उत्तर दिले नाही. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तीवादाचे वेळी पुढे असेही स्पष्ट केले की, त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीने त्यांचे कार्यालयात रु. ३०५/- इतके शुल्क भरल्यानंतर देण्याची तयारी दर्शविली होती. सदर पत्र अपिलार्थीस दि. १०.१.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने प्रथम अपिल अर्जात कबूल केले आहे. अपिलार्थीने सदर शुल्क पाठवून दिल्यास दि. २४.१२.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व माहिती (नवीन उत्तरपत्रिकेसह) देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २४.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जास दिनांक ५.१.२००७ रोजी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रु.३०५/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याची सूचना केली होती. तथापि अपिलार्थीने सदर रकमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात त्यांनी दिलेली माहिती परिपूर्ण नसल्याचे कारणावरुन केला नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ५.१.२००७ रोजीच्या लिहिलेल्या पत्राचे अवलोकन करता त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा यांना त्यांनी संबंधित उत्तरपत्रिका शाळेत जमा करण्यासाठी कळविले आहे व त्यांनी उत्तरपत्रिका जमा केल्यानंतर उत्तरपत्रिकांच्या सत्यप्रती अपिलार्थीस पुरविण्याची तयारी देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दर्शविलेली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यास नाकारले असल्याचे स्पष्ट होत नाही. त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती तात्काळ देऊ केली व उर्वरित माहितीसंदर्भात त्यांनी तत्कालीन स्थिती अपिलार्थीस कळविली आहे. अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्याचा उद्देश नव्हता, असे त्यांच्या या पत्रावरुन दिसून येत नाही.अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, माहिती परिपूर्ण नाही, हे जरी खरे असले तरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जेवढी माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती ती त्यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस देण्याची तयारी दर्शविली आहे व त्याचबरोबर संबंधित शिक्षकाकडून तपासणीसाठी नेलेल्या उत्तरपत्रिका प्राप्त होताच त्याच्या प्रती अपिलार्थीस पुरविण्याचे देखिल त्यांनी अपिलार्थीस आश्वासित केले आहे. यावरुन त्यांची अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी असल्याचे दिसून येते व त्याचबरोबर त्यांच्या या विधानावरुन अपिलार्थींना त्यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याचे नाकारल्याचा अपिलार्थी यांनी काढलेला निष्कर्षही चुकीचा ठरत आहे, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलिय अधिकारी यांचे म्हणण्यानुसार संबंधित शिक्षकाने इ.८ ते १० च्या संबंधित उत्तरपत्रिका परत केल्या नाहीत. परंतु इ. ८ ते १० च्या परत नव्याने घेतलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकांची त्यांचेकडे मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती सशुल्क देण्यास ते तयार आहेत. हे पाहता, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने या प्रकरणी मूळात आवश्यक असलेली माहिती शुल्क न भरता, केवळ जन माहिती अधिकारी यांचे पत्रावरुन माहिती अपूर्ण असल्याचा निष्कर्ष काढणे बरोबर नाही, सबब

अपिलार्थीचे द्वितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.अपिलार्थीस अद्यापही सदर माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरुन सदर माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेवर त्यांनी प्रथम अपिल प्रकरणी निर्णय न दिल्याबद्दल अधिकारीतेअभावी त्यांचेवर कार्यवाही करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण शेषराव घुमरे रा. पारगाव घुमरा ता.पाटोदा जि.बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बंकटस्वामी विद्यालय,खडकीघाट, ता.जि.बीडयांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९९

निर्णय दिनांक : १८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एम.ए.रहेमान एम.ए.हमीद,<br>घ.नं.११८, ब्लॉक नं. ७, लेबर कॉलनी<br>रा. नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (सध्या कार्यरत) श्री. स्टीव्हन थॉमस अल्वारिस, (तत्कालीन) श्री. संजय पुंडलिक राऊत (त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड (सध्या कार्यरत) श्री. शंभु मलगुजी सलामे (तत्कालीन) श्री. हरिदास अंबुरु बोरकर ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे

संबोधण्यात येईल ) व अपिलार्थी श्री. एम.ए.रहेमान एम.ए.हमीद (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचे कडील दि. ०८.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून नांदेड जिल्हयातील फायनान्स कंपनीकडून घेतलेल्या वाहनांचे हस्तांतरणासंदर्भात खालीलप्रमाणे ६ मुद्यांवर माहिती मागितली होती.

"१) नांदेड जिल्हामधी मोटार साठी सरकार मान्य किती फायनान्स कंपनी किती आहेत.त्याची शाखा व पत्ता बाबत त्याची सविस्तर माहिती.

२) फायनान्सर कडून गाडी पार्टीकडून घेत असताना त्या गाडीची माहिती किंवा गाडी नंबर देत असतात का? परिवहन अधिकारी देताता का?

३) फार्म नं.३६ च्या उपयोग कशासाठी करतात.

४)गाडीवर फायनान्स असताना किती वाहन हस्तांतर करण्यात आले आहेत आणि हस्तांतर करण्यात आले. परिवहन अधिकारी समोर किती वाहन धारकांना सही साठी बोलवण्यात आले आहे. त्याची गाडी नंबर सहित लेखी माहिती मिळावी व वाहनधारक न आल्यास समोरुन येता गाडी हस्तांतर करण्यात आली. त्या गाडी नंबर लेखी कळवावे.

५) अत्तापर्यंत आपण किती गाडया फायनान्स कंपनीच्या नावे हस्तांतर केले. फायन्नसरच्या नावे करण्यासाठी काम प्रादेशिक परिवहन कार्यालयात जमा करावे लागते व अशी किती वाहन नावे करण्यात आली त्याची नंबर सहीत व जुन्या मालकाच्या व फायनान्सच्या नावासहित लेखी माहिती देण्यात यावी. ३१.८.०६ ते ८.१२.०६

६) फार्म नंबर ३६ च्या अंतर्गत किती वाहनाचे काम झाले आहेत. "

अपीलार्थी यांनी सदर माहिती समक्ष (व्यक्तिशः) अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. सदर पत्र अपिलार्थीस दि. २८.१२.२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दि. २८.१२.२००६

रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर पोच दिली आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांनी रु.२/- इतके शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात त्याच दिवशी भरल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ८.१.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस दि. १५.१.२००७ रोजी पत्र लिहून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीबाबत आपले अभिप्राय व्यक्त केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी विचारलेल्या माहितीतील क्रमांक ४ चा मुद्दा सोडून उर्वरित सर्व मुद्यामध्ये आपले अभिप्राय व्यक्त करतांना जन माहिती अधिकारी यांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्र. ४ च्या संदर्भात निरंक स्वरुपाची माहिती दिली होती. तथापि सदर माहिती निरंक होऊ शकणार नाही व जन माहिती अधिकारी हे अभिलेखे तपासून माहिती शोधतील, असे जन अपिलीय अधिकारी यांना वाटल्यावरुन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीच्या मुद्दा क्र. ४ बाबत असहमती दर्शविली आहे, असे आज सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.४.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या मध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी हे पूर्ण माहिती न देता अर्धवट माहिती देऊन पूर्ण माहिती देण्यास हेतूपूरस्सर टाळाटाळ करीत आहेत व त्यांची दिशाभूल करीत आहेत व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीसाठी बोलावले नसल्याचे नमुद करुन मूळ माहितीची मागणी अपिलार्थीने या अपिल

अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आज रोजी अपिलार्थीने असा युक्तीवाद केला की,जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही, व त्यांना अपेक्षित असलेली माहिती पूर्णतः विनामूल्य मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने दि. ८.१२.२००६ च्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि. २८.१२.२००६ रोजी पूर्णतः दिली. नांदेड जिल्हयामध्ये वाहनासाठी वित्तसहाय्य करणाऱ्या किती कंपन्या आहेत, याची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही. मात्र वाहनासाठी वित्तसहाय्य करण्यासाठी व्यवसाय प्रमाणपत्र त्यांचे कार्यालयातर्फे आता दिले जात आहे. अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त होईपर्यन्त वित्तीय कंपन्यांना सदर व्यवसाय प्रमाणपत्र घेणे सक्तीचे केले गेलेले नव्हते. अपिलार्थीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर काही कालावधीनंतर मात्र परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकाद्वारे वाहनांना वित्तीय सहाय्य करणाऱ्या कंपन्यांना सदर प्रमाणपत्र घेण्याचे सक्तीचे करण्यात आले. नांदेड जिल्हयामध्ये अशा प्रकारचे व्यवसाय प्रमाणपत्र घेतलेल्या या वित्तीय कंपन्यांची यादी ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास आज रोजी तयार आहेत. अपिलार्थीस त्यांनी दि. २८.१२.२००६ रोजी पुरविलेली माहिती बरोबर व परिपूर्ण आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली मुद्दा क्र. ४ बाबत दिलेल्या माहितीबाबत ते साशंक असल्याने त्यांनी अपीलार्थीस दि. १५.१.२००७ रोजी पाठविलेल्या पत्रावर काही अभिप्राय दिले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी दिलेली संपूर्ण माहिती बरोबर आहे. कोणत्याही अपिलार्थीकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्राप्त झालेल्या अपिल अर्जावर, त्यांनी, जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस समक्ष बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यानंतर त्यावर आपला निर्णय पारित करणे गरजेचे असल्याचे, त्यांना आज सुनावणीमध्ये स्पष्ट करण्यात आले. भविष्यात अशा पध्दतीचे पालन करण्याचे त्यांनी आयोगास आश्वासित केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. ८.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. २८.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २८.१२.२००६ च्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता सदर माहिती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सुसंगत आहे. अपीलार्थीस अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती. तथापि अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर परिवहन आयुक्त यांचेकडून जारी केल्या गेलेल्या परिपत्रकाच्या तरतुदीस अनुसरुन, त्यांना वाहनखरेदीसाठी वित्तीय सहाय्य

करणाऱ्या वित्तीय कंपन्यांना त्यांचेकडून प्रमाणपत्र देणे अनिवार्य झाले, त्यावेळी मात्र त्यांचेकडे अशाप्रकारचे प्रमाणपत्र ज्या कंपन्यांना दिले आहे, त्या कंपन्यांची यादी उपलब्ध आहे व सदर यादी ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती ज्या पध्दतीने मागितली आहे, ती पध्दत व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती पुरविली, ती पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही आवश्यक ती माहिती व त्या संदर्भातील खुलासा अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जामध्ये म्हटल्याप्रमाणे या संपूर्ण घटनेच्या कोणत्याही टप्प्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे हेतूपूरस्सर टाळले अथवा दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे आयोगाचे निदर्शनास आले नाही, सबब अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तरतुदीनुसार वेगळा अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१.अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १८-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एम.ए.रहेमान एम.ए.हमीद, घ.नं.११८, ब्लॉक नं. ७, लेबर कॉलनी रा. नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, एम.आय.डी.सी.परिसर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१७३

निर्णय दिनांक : १८-०३-२००८

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. फजलहक रमजान अन्सारी,<br>खटकीवाडा, अकबर चौक<br>धुळे | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>मुख्याध्यापक,<br>ॲग्लो उर्दू हायस्कूल,<br>एकबाल रोड, धुळे | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. फजलहक रमजान अन्सारी, खटकीवाडा (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, अब्दुल मजीद ॲग्लो उर्दू हायस्कुल श्री. वकील अहमद अ.मजीद ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.धुळे श्री. भगवान सदाशिव सूर्यवंशी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. ३.१०.२००६ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी दि. १७.८.२००६ रोजीच्या त्यांच्या माहितीच्या अर्जाद्वारे

उत्तरवादी यांचेकडे इ. ९ व १० वीच्या तुकडीनिहाय हजेरी पत्रकाच्या छायाप्रती मागितल्या होत्या. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क भरण्यास ते तयार होते. परंतु उत्तरवादी यांनी त्यांना सदर माहिती देण्याचे नाकारले आहे.सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि.४.११.२००६रोजी झालेली आहे.

तक्रारदार यांनी सुनावणीचे वेळी असा युक्तीवाद केला की, तक्रारदाराने मागितलेली माहिती लपविण्यामध्ये उत्तरवादी यांचा व्यक्तिगत फायदा आहे. कारण त्यांनी या शाळेत कोणत्याही प्रकारे कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता शाळेची पटसंख्या खोटी दर्शवून स्वतःच्या मुलाला उपशिक्षक म्हणून नोकरीस लावले आहे. उत्तरवादी यांनी त्यांना माहिती देण्यास नाकारले असल्यामुळे त्यांनी सदर अर्ज राज्य माहिती आयोगाकडे केला आहे. या अर्जामध्ये त्यांनी उत्तरवादी यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. तक्रारदार यांनी अशाच प्रकारचा अर्ज शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,धुळे व मा. मुख्य माहिती आयुक्त यांचेकडे अनुक्रमे ३.१०.२००६ व ३०.९.२००६ रोजी केल्याचे दिसून येते.तक्रारदाराच्या सदर तक्रार अर्जासंबंधी उत्तरवादी यांना विचारणा केली असता त्यांनी आयोगास असे सांगितले की, त्यांनी तक्रारदार यांनी मागणी केलेली माहिती त्यांना दि. २९.१.२००८ रोजी दिली असून, आवश्यक माहिती पूर्णतया मिळाल्याचे, तक्रारदार यांनी आयोगासमोर कबूल केले.

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.धुळे यांनी असा युक्तीवाद केला आहे की, तक्रारदाराने त्यांचेकडे केलेल्या तक्रारीवरुन त्यांना संबंधित शाळेची चौकशी केली असता, या शाळेने विद्यार्थ्यांची पटसंख्या जास्त दाखवून एका अतिरिक्त उपशिक्षकाची नेमणूक केली होती. या प्रकरणी सखोल चौकशी होऊन, संबंधित शिक्षण संस्थेवर कारवाई करण्यासंदर्भात शिक्षण उपसंचालक, नाशिक यांचेकडे योग्य तो प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावावर अद्यापि निर्णय प्रलंबित आहे.

दोन्ही बाजूने केलेल्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिलेला नसून, उलट, त्यांच्याकडील दि. २८.९.२००६ रोजीच्या तक्रारदारास माहिती नाकारण्याच्या पत्रावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील मूळ गाभ्यावर घाव घातला आहे, असे आयोगास वाटते. या पत्रामध्ये त्यांनी तक्रारदार यांचेवर, ते उत्तरवादी यांना हेतूपूरस्सर त्रास देण्यासाठी आरोप करत असल्याचे नमुद करुन तक्रारदाराने मागितलेली माहिती शाळेच्या हिताच्या दृष्टीकोनातून त्यांना पुरवता येणार नसल्याचे त्यांनी या पत्रामध्ये पुढे

म्हटले आहे. उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या माहितीच्या अर्जावर अशाप्रकारे घेतलेली भूमिका, आयोगास मान्य नाही. उत्तरवादी यांनी तक्रारदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ चा भंग केल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी तक्रारदारास माहिती नाकारुन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ चा भंग केल्याबद्दल उत्तरवादी यांचेवर, अध्यक्ष, अंजुमन-ईशाते-तालिम धुळे यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल त्या नंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा. तक्रारदारास आता माहिती प्राप्त झाली असल्याने माहिती देण्यासंदर्भात उत्तरवादी यांना कोणतेही आदेश नाहीत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.धुळे यांनी संबंधित संस्थेविरुध्द याविषयासंदर्भात सादर केलेल्या प्रस्तावावर शिक्षण उपसंचालक, नाशिक यांनी त्वरेने निर्णय घेऊन अशा प्रकारे गैरकारभार करणाऱ्या शिक्षण संस्थेवर प्रचलीत नियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही त्वरित करावी, असे त्यांनाही सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर व तक्रारदारास आता आवश्यक ती माहिती मिळाली असल्याने तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्याध्यापक, ॲग्लो ऊर्दू हायस्कुल, धुळे यांचेवर अध्यक्ष, अंजुमन-ईशाते-तालिम, धुळे यांनी तक्रारदारास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या पध्दतीनुसार माहिती मागवूनही, माहिती न दिल्याबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे हे आदेश निर्गमित होताच एक महिन्याचे आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अहवाल त्या नंतर एक महिन्याचे आत आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १८-०३-२००८** — **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. फजलहक रमजान अन्सारी, खटकीवाडा, अकबर चौक धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ॲग्लो उर्दू हायस्कूल,एकबाल रोड, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक, विभागीय महसूल आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड नाशिक.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१७४

निर्णय दिनांक : १८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार,<br>स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड,<br>बीड. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा मुख्याध्यापक,<br>महाराणी ताराबाई कन्या विद्यालय, वडवणी,<br>जि.बीड | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महाराणी ताराबाई कन्या विद्यालय, वडवणी जि. बीड श्रीमती गर्कळ कांता बापूराव (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) या हजर आहेत, तर तक्रारदार श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. ३१.७.२००६ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. १७.७.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे

रजिस्टर्ड पोस्टाने माहिती मागितली असता सदर रजिस्टर्ड पत्र सोडवून घेण्यासाठी उत्तरवादी यांनी नकार दिला व त्यांना कोणतीही माहिती आजपावेतो कळविली नाही. उत्तरवादी यांनी तक्रारदारास विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल, त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी व त्यांच्या बेकायदेशीर कारभाराची चौकशी करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. सदर तक्रारीची राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयात दि.४.८.२००६ रोजी नोंदणी केलेली आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे त्यांचेकडील १७.७.२००६ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचे शाळेसंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि तक्रारदाराचा अर्ज स्वीकारण्यास उत्तरवादी यांनी नकार दिला. याच प्रकरणात तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) च्या तरतुदीन्वये दि. ७.१०.२००६ रोजी द्वितीय अपील केले होते. या अपीलावर आयोगाने सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १५.१.२००८ रोजी पारित केलेले आहेत. या आदेशामध्ये उत्तरवादी यांनी तक्रारदारास ७ दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले गेले आहे. तद्‌वतच उत्तरवादी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य कार्यवाही करण्याचे व त्यांनी तक्रारदारास माहिती देण्यासाठी विलंब लावल्याबद्दल एकूण रु. ३०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याबाबत कारणे दाखवा नोटीसही त्यांचेवर बजावली आहे. तक्रारदार यांच्या या तक्रारीवर राज्य माहिती आयोगाकडे दि. १५.१.२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये निर्णय दिला गेला आहे उत्तरवादी यांचेवर त्यांच्या संस्थेने प्रशासकीय कार्यवाही करुन त्यांची एक वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविण्याचे आदेशित देखिल केले आहे. तक्रारदाराने आजच्या तक्रारअर्जामधील त्यांना आवश्यक असलेली माहिती व त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.१०.२००६ रोजी केलेल्या द्वितीय अपिलासंदर्भातील मूळ माहिती ही सारखीच असल्याने तक्रारदाराच्या आज विचाराधीन असलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याचे आयोगास कोणतेही कारण उरले आहे, असे दिसत नाही. तक्रारदार माहिती मिळविण्यासाठी एकाच वेळी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) व कलम १८ चा वेगवेगळा वापर करत असल्याचे दिसून येत आहे. कलम १९(३) खाली त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.१०.२००६ रोजी अर्ज केला आहे. तर कलम १८ खाली त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ३१.६.२००६ रोजी याच माहिती करता दुसरा अर्ज सादर केला आहे. या प्रकरणी आयोगाने दि. १५.१.२००८ रोजी अंतीम निर्णय घेतला असल्याने तक्रारदाराची विचाराधीन तक्रार फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १८-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महाराणी ताराबाई कन्या विद्यालय, वडवणी, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती .

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९०

निर्णय दिनांक : १९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. एम. कलशेट्टी मुकुंदराज भिमाशंकर,<br>मु. पो. सेलू जि.परभणी. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा उपकार्यकारी अभियंता,<br>निम्नदुधना प्रकल्प विभाग, सेलू<br>जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा अधीक्षक अभियंता, जा.प्र. मंडळ,<br>औरंगाबाद. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. एम. कलशेट्टी मुकुंदराज भिमाशंकर (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल),जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, निम्नदुधना प्रकल्प विभाग सेलू श्री. अलय्या परसय्या माकु, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, जा.प्र. मंडळ,औरंगाबाद श्री. राम बसवंतराव धोटे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी त्यांचे कडील दि. २२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून जायकवाडी वसाहत, सेलू या वसाहतीसंदर्भात एकूण ६ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १) सेलू वसाहतीचा Lay out plan सद्यस्थितीचा देणेबाबत. राहत असलेले कर्मचारी व त्यांचा दिनांक दर्शवून देण्यात यावा.

२) Lay out plan मध्ये बांधण्यात आलेले पत्राचे शेड क्रमांकवार,नाववार,दिनांकासह दर्शविण्यात यावे.

३) एकूण शेड व त्यानंतर मोडलेल्या शेडचा हिशोब देण्यात यावा. त्यावर किती खर्च, एकूण किती स्टीलचे पत्रे लागले व त्यावर एकूण आणखी किती खर्च झाला याचा हिशोब देण्यात यावा.

४) टिनचे शेड एकूण किती व कोणत्या तारखेला तयार करण्यात आले व त्या नंतर कोणत्या तारखेस मोडण्यात आले याची माहिती देण्यात यावी.

५) मोडलेल्या टिनचे शेडचा हिशोब देण्यात यावा.

वरील सर्व विषयाचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर मी आपले पत्र क्र. जा.क्र.नि.दु.प्र.उ.वि.क्र.१ सेलू वसाहत १४८६ दि. २१.११.२००६ च्या पत्राचे अनुषंगाने कळवितो की, माझ्या शिस्तभंगाची कार्यवाही करणे अगोदर उपरोक्त विषयातील मुद्देनिहाय खुलासा आपल्या कार्यालयाकडून प्राप्त झाल्यास आपण म्हटल्याप्रमाणे आपले पत्र क्र. जा.क्र.निदुप्र/प्र.शा.४६०३, दि. १८.१०.२००६ विभागीय पत्राप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

६) १९९४ पासून वसाहत व विश्रामगृह या दोहाचा चार्ज आजपर्यंत कोणकोणत्या उपविभागाने घेतला व वरील मुद्यावर कोणीही कार्यवाही का केली नाही, याचा खुलासा देण्यात यावा. विश्रामगृह व वसाहत या दोहोचा सुरुवातीपासूनचा कार्यभार कोणकोणत्या उपविभागाकडे व शा.अ.कडे होता त्यांचा कार्यकाल तपशिलाची यादी देण्यात यावी. "

अपीलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

सदर पत्र जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात दि. २२.१२.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने दि. २२.१२.२००६ रोजी दिलेल्या पोचसहीवरुन दिसून येत आहे.अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ द्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १.२.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस दि. १५.२.२००७ रोजी एक पत्र लिहून या पत्रामध्ये त्यांनी मागितलेली माहिती ३० दिवसांचे आत देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर  त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीस अनुसरुन राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.३.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी दि. २२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य मिळावी.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती त्यांच्याकडील पत्र ५४२/६, दि. १.२.२००८ अन्वये त्यांचे विभागामार्फत देण्यात आली आहे. अपिलार्थी हे याच कॉलनीत राहत असल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तीशः पुरविण्यासाठी प्रयत्न केला. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्वीकारली नसल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती त्यांचे विभागामार्फत पाठवावी लागली.

सदर माहिती अपिलार्थीस अद्यापही प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सांगितले. सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, ही माहिती संबंधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती संकलीत करुन अपिलार्थीस पुरवावी लागली. सदर माहिती त्यांचे कार्यालयात सहजपणे उपलब्ध नव्हती, त्यामुळे सदर माहिती त्यांचे इतर कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागली, अशी कारणे त्यांनी आयोगासमोर मांडली.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपिल अर्ज त्यांचेकडे दि. १.२.२००७ रोजी प्राप्त झाला असतांना त्यांनी तात्काळ दि. १२.२.२००७ रोजी जन माहिती

अधिकारी यांना अपिलार्थीस ३० दिवसाचे आत माहिती देण्याची सूचना त्यांचेकडील दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्रान्वये केली होती व अपिलार्थीचे अपिल अर्जासंदर्भात अपिल निर्णय दि. १५.२.२००७ रोजी पारित केला. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. १२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या सूचनांचा पुनःरुच्चार केला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी, असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचेकडील दि. २२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती सरळ व सोपी होती. अपिलार्थीस सदर माहिती विहित मुदतीत देणे जन माहिती अधिकारी यांना सर्वसाधारण परिस्थितीत सहज शक्य होते. अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस सदर माहिती दि. २१.१.२००७ रोजी अथवा तत्पूर्वी मिळावयास हवी होती. तथापि ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीपेक्षा एक वर्ष १० दिवस इतका विलंब लावल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. १२.२.२००७ रोजी लिहिलेले पत्र पाहता अपिलार्थीस उशिरा माहिती दिल्याने त्यांचेवर काय कारवाई होऊ शकते याची कल्पनाही जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिल्याचे दिसून येते. याच पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ संदर्भातील ११ प्रकरणे प्रलंबित असल्याचे निर्देशित करुन सदर बाब योग्य नसल्याचे त्यांचे अभिप्राय त्यांनी व्यक्त केले आहेत, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी काहीही कर्तव्य नसल्याचे त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यपध्दतीद्वारे स्पष्ट होत आहे. उपरोक्त प्रकरणात अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या इतर कार्यालयातून त्यांना प्राप्त करुन घ्यावयाची होती, हा युक्तीवाद त्यांचे प्रतिनिधीने मांडला आहे. ही माहिती त्यांना ज्या कार्यालयाकडून घ्यावयाची होती, ती कार्यालये देखिल त्यांचे कार्यालयाच्या नजिकच स्थापित झाली असून त्यांना अपिलार्थीस जर विहित मुदतीत माहिती द्यावयाची खरोखरीच इच्छा असती तर त्यांना अपिलार्थीस ती विहित मुदतीत देणे सहज शक्य होते, आयोगाच्या मते जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हेच अपिलार्थीस त्यांनी माहिती न देण्यामागचे मूळ कारण असावे. त्यांनी अपिलार्थीस दि. १.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविल्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. तथापि ही माहिती अपिलार्थीस अद्यापही प्राप्त झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे सदर कथित पत्र आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. ही त्याहूनही दुर्दैवाची बाब आहे, असे म्हटले पाहिजे. माहितीसाठी अर्ज करणाऱ्या कोणत्याही अर्जदारास माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना माहिती

देण्यासाठी सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सहाय्यक/कर्मचारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे. सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सहाय्यक /कर्मचारी हे देखिल तितकेच जबाबदार आहेत, असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक या सर्वात मिळून प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची रक्कम त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा-८०० इतर जमा रकमा-(१८) माहितीचा अधिकार-००७०-००६-१"

सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी अधीक्षक अभियंता,जायकवाडी प्रकल्प मंडळ, औरंगाबाद यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसांचे आत करावी. अपिलार्थीस असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात, कार्यालयीन वेळेत (सुटीची वेळ व सार्वजनिक सुटीचे दिवस वगळता) व्यक्तिशः उपस्थित राहून सदर माहिती विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी, हे आदेश प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुटीची वेळ व सार्वजनिक सुटीचे दिवस वगळून) व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिनी रु.२५०/-या प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर

शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयात दिलेल्या सूचनांप्रमाणे करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक १९-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एम. कलशेट्टी मुकुंदराज भिमाशंकर,मु. पो. सेलू ता. सेलू जि.परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, निम्नदुधना प्रकल्प विभाग सेलू जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, जा.प्र. मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९३

निर्णय दिनांक : १९-०३-२००८

१ श्री. जिवनराव रामराव उबाळे, : अपीलार्थी
आय.टी.आय.च्या पाठीमागे, स.नं.६० तरफ गिराम
नगर रोड,बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा तलाठी सजा तरफ गिराम,
तहसील कार्यालय, बीड.

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा तहसीलदार, बीड.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. जिवनराव रामराव उबाळे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा तरफ गिराम,तहसील कार्यालय,बीड ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बीड ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे सर्वजण गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचे कडील दि. १६.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून प्रेरणा हाऊसिंग सोसायटी, बीड यांच्या जमिनीसंदर्भात २००७ या वर्षातील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"१) ३७ १/२ गुंठे नावावर झालेला फेरफार नक्कल तो काशाच्या आधारे घेण्यात आलां,(२) टी.बी.कुंभार यांच्या नावावर प्लॉट क्षेत्र ११० चौ.मी,प्लॉट क्षेत्र १०९.०८ चौ.मी.नोंद ७/१२ वर आहे का (३) सन २००७ ८-अ चा उतारा देण्यात यावा (४) चंद्रकला राजेंद्र चौधरी यांची फेरफार संचीका (५) फेरफार नं.२४८५,२०८६,३०१५,३००५,४७८३,२७०७,
५०२५,२९७१,२५५०,२९६९,७७७७,१६१०,५१३२,४२७५,२३४६,२९७९,४०४०,४८८५,४९८७,
(६)सानप मारुती तुकाराम व सुनंदा भाऊसाहेब चा फेरफार व क्षेत्र, वर दिलेल्या फेरफाराचा लाभधारक व त्याच्या नावावरील क्षेत्र "

अपीलार्थी यांनी सदर माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १.३.२००७ रोजी प्रथम अपिल केले होते. अपिलार्थीच्या सदर अपिलअर्जावर जन अपिलीय यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी कोणतीही तारीख नसलेले एक पत्र या संदर्भात अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीस माहिती संदर्भात मोघम स्वरुपाचा खुलासा अपिलार्थीस केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३०.३.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिल दाखल केले असून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाचा निर्णय न देता अनावश्यक पत्र देऊन त्यांचे अपिल प्रलंबित ठेवले आहे. त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची विनंती या अपिलअर्जामध्ये त्यांनी आयोगास अंतिमतः केली आहे. त्याचबरोबर अधिनियमातील कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर कारवाई करुन त्यांनी मूळ माहिती अर्जात मागितलेली माहिती विनामूल्य मिळण्यासाठीही आयोगास पुढे विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून निर्णय पुढे घेण्यात येत आहे. या प्रकरणी असे दिसून येते की,अपिलार्थीच्या दि. १६.१.२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्रथम अपिल केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीस बिनतारखेचे एक मोघम पत्र पाठवून दिले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जावरुन दिसून येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) मधील तरतुदीचा निःसंशयपणे भंग केल्याचे सिध्द होत असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरले आहेत. अपिलार्थीस अपेक्षित माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल ते निःसंशयपणे दोषी आहेत, असे आयोगाचे मत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर सुनावणी न घेता अपिलार्थीस मोघम पत्र पाठविल्यानंतर व सदर पत्र कधी पाठविले, याचा या पत्रावरुन बोध होत नसल्यामुळे त्यांनी कलम १९(६) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. आज रोजीच्या सुनावणीबाबत दि. १४.१.२००८ रोजीच्या लेखी नोटीससह, आयोगाचे कार्यालयातून दि. ११.३.२००८ रोजी दुपारी १२.३० वा. श्री. मिसाळ या जन माहिती अधिकाऱ्यास कळवूनही जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी हे दोघेही आयोगासमोरील सुनावणीस अनुपस्थित राहिलेले आहेत, हे पाहता त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे त्यांचे वर्तनावरुन गृहीत धरण्यात येत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांचेवर एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे.

सदर शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त १० हप्त्यामध्ये करावा.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा-६० इतर सेवा- ८०० इतर जमा रकमा-(१८) माहितीचा अधिकार-००७०-००६-१

संबंधित जन माहिती अधिकारी हे सदर शास्तीची रक्कम एप्रिल,२००८ पासून पुढे दरमहा शासकीय कोषागारात नियमितपणे भरतील असे जिल्हाधिकारी, बीड यांनी पहावे व एप्रिल,०८ पासून पुढे आपला अनुपालन अहवाल दरमहा आयोगाकडे सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांचे मूळ अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरविण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी वरील प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाची यथायोग्य नोंद जिल्हाधिकारी,बीड यांनी घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने त्यासंबंधीची अपिलार्थीची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही सबब अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.
२. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.
३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिनी रु.२५०/-या प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयात दिलेल्या सूचनांप्रमाणे करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जिवनराव रामराव उबाळे,आय.टी.आय.च्या पाठीमागे, स.नं.६० तर्फ गिराम नगर रोड,बीड (By R.P.A.D.)

२ जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा तरफ गिराम,तहसील कार्यालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (By R.P.A.D.)

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,बीड जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (By R.P.A.D.)

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (By R.P.A.D.)

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/८९४

निर्णय दिनांक : १९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड,<br>मु. बाळापूर, कुंभारगल्लीजवळ,<br>धर्माबाद, जि. नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,<br>धर्माबाद जि.नांदेड. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय<br>औरंगाबाद. | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद जि.नांदेड यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. सोनकांबळे शंकर महादू, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,

औरंगाबाद श्री. सोमनाथ गुंजाळ ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत..

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचे कडील दि. १४.२.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून मौजे बाळापूर येथे त्यांच्या वडिलांच्या हिश्श्यास आलेल्या मालमत्तेसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" श्री. कोटावाड गोपालरेड्डी पि.कोनरेड्डी मौजे बाळापूर हयाच्या वडीलाच्या हिस्सेस असलेल्या मिळकती घर क्र.१-७४२,६२२,प्लाट क्र.१-९३६,१-९४६ असे दोन जुने मातीचे घरे व दोन मोकळी जागा नाव परिवर्तन मंझुर करणे बाबतचे खालील दस्ताऐवज किंवा न.पा.कडे सादर केल्या कागदपत्रांचे साक्षांकित प्रत देणे.

वरील विषय नमुद केल्याप्रमाणे खालील दस्ताऐवज किंवा न.पा.कडे सादर केल्या कागदपत्राचे

साक्षांकित प्रताची तपशिलाचे माहिती सविस्तर देणेबाबत.

१) दिनांक : ०६/०२/२००४ No.MAR.१६३९ प्रतिज्ञा पत्र क्र. A१८०३००६९३९ असे चार फाईल चे प्रतिज्ञापत्राची साक्षांकित प्रताची माहिती सविस्तर देणे.

२) दि.१८/१०/२००४ या रोजी निघालेल्या चार फाईलचे जाहिरनामा नोटीसाची साक्षांकित प्रताची माहिती सविस्तर देणे.

३) दिनांक २५/०१/२००७ या रोजी दिलेल्या अक्षेपकर्ता श्रीमती विजयलक्ष्मी गंगारेड्डी बाळापूर हयाचे लेखी आक्षेपाचे साक्षांकित प्रताची माहिती सविस्तर देणे."

अपीलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये कोणतीही कार्यवाही न केल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ९.३.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. सदर अपिल अर्ज जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.३.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे दि. ७.४.२००७ व १६.४.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि. १६.४.२००७ रोजी पारित केले. या अपिल निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपिल मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचे दि. १४.२.२००७

रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती सात दिवसांचे आत देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून सूचना प्राप्त होऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.३.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी दि. १४.२.२००७ रोजी केलेल्या अर्जातील माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. संबंधित जन माहिती अधिकारी हे त्यांना माहिती देण्यासाठी नेहमी टाळाटाळ करत असल्याने व या प्रकरणी त्यांना माहिती देण्यापासून हेतूपूरस्सर वंचित ठेवले गेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी व त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य मिळावी, अशी विनंती त्यांनी या युक्तीवादाचे वेळी आयोगास केली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांचे दि. १४.२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागितलेली माहिती अपिलार्थीस अद्यापही पुरविता आली नसून आज रोजी सदर माहिती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करण्यासाठी ते तयार आहेत. अपिलार्थीस विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याची कारणे वा त्यांच्या कृतीचे समर्थन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर स्पष्ट करु शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपिल अर्ज त्यांचेकडे दि. १३.३.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या संदर्भातील त्यांचे आदेश दि. १६.४.२००७ रोजी पारित करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(६) चे अनुपालन केले होते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता या प्रकरणी, असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचेकडील दि. १४.२.२००७ रोजी केलेल्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांचेकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला गेलेला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे या संदर्भात प्रथम अपिल केल्यानंतर देखिल जन माहिती अधिकारी यांच्या नकारात्मक वागणूकीमध्ये कोणत्याही प्रकारचा फरक पडल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेकडे झालेल्या सुनावणीचे वेळी देखिल जन माहिती अधिकारी हे स्वतः कधीही उपस्थित राहिलेले नाहीत. त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अंतीम सुनावणी होईपर्यन्त अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही सकारात्मक

प्रयत्न केले नाहीत. या सुनावणीस त्यांनी श्री. सोनकांबळे व श्री. रुक्माजी भोगावार या लिपीक स्तराच्या कर्मचाऱ्यांना अनुक्रमे दि. ७.४.२००७ व १६.४.२००७ रोजी पाठविले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात दर्शविलेली अशा प्रकारची बेपर्वाई ही अक्षम्य होती, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांचे वर्तनावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल त्यांचे निकालपत्रामध्ये खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

" शासकीय माहिती अधिकारी यांची सदर अपीलातील कृती हे दर्शविते की, त्यांना अधिनियमातील तरतुदींचे अनुपालन करावयाचे नसून, अपीलार्थी यांना माहिती देण्यामध्ये त्यांना रस दिसून येत नाही. शासकीय माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याचे किंवा त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याचे अधिकार या कार्यालयास अधिनियमान्वये प्राप्त झालेले नाहीत, त्यामुळे त्यांचेवर अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही करणे या कार्यालयास शक्य नाही. शासकीय माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदींचे अनुपालन करुन अपीलार्थी यांना विहित कालमर्यादेत माहिती देणे आवश्यक होते. परंतु त्यांनी प्रस्तुत प्रकरणात असे केलेले नाही. त्यामुळे अपीलार्थी यांना अपील दाखल करावे लागले. अपील दाखल झाल्यानंतर देखील सुनावणी अंती अपीलार्थी यांना शासकीय माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही."

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निष्कर्षाशी आयोग सहमत आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार आहे. सदर माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत असल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ती फार क्लिष्ट स्वरुपाची किंवा ती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देणे जन माहिती अधिकारी यांना फार अवघड होते, असे म्हणता येणार नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या फक्त झेरॉक्स प्रती मागितल्या होत्या. तथापि त्यांनी त्या अपिलार्थीस न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील इच्छाशक्तीचा व कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी लावलेल्या अशा प्रकारच्या विलंबाचे, मूळात कोणत्याही कारणाने समर्थन असूच शकत नाही, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. सबब अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त

होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या कामी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक या सर्वांना मिळून प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीची रक्कम त्यांनी पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात एप्रिल,२००८ पासून पुढे जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा- ६० इतर सेवा-८०० इतर जमा रकमा- (१८) माहितीचा अधिकार-००७०-००६-१"

सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी संचालक, नगर परिषद प्रशासन यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसांचे आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी हे शास्तीचे हप्ते माहे एप्रिल,२००८ पासून नियमितपणे भरतील, याची खात्री संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांनी करुन घ्यावी व आपला अनुपालन अहवाल माहे मे,२००८ पासून नियमितपणे आयोगास सादर करावा.

अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याचे दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, सदर आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेमध्ये (सुटीची वेळ व सार्वजनिक सुटीचे दिवस सोडून) उपस्थित राहून सदर माहिती त्यांचेकडून विनामूल्य हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी यांनी, हे आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (सुटीची वेळ व सार्वजनिक सुटीचे दिवस सोडून) व्यक्तिशः उपस्थित राहून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विनामूल्य प्राप्त करुन घ्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी, अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिनी रु.२५०/-या प्रमाणे

एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निर्णयात दिलेल्या सूचनांप्रमाणे करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.गोपालरेड्डी कोनरेड्डी कोटावाड,मु. बाळापूर, कुंभारगल्लीजवळ,धर्माबाद, जि. नांदेड (By R.P.A.D.)

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद जि.नांदेड. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

४ संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (By R.P.A.D.)

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८८

निर्णय दिनांक : १९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन विठ्ठल पाटील,<br>रा. सोनहिरा, मोंढा रोड<br>ता.गंगापूर जि.औरंगाबाद. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा निवासी उपजिल्हाधिकारी,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा जिल्हाधिकारी, औरंगाबाद | | |

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री. नामदेव तुळशीराम जाधव ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत व जन

अपिलीय अधिकारी तथा अपिर जिल्हाधिकारी (त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी त्यांचे कडील दि. १५.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून दि.१.४.२००४ ते ३१.१०.२००६ या कालावधीतील त्यांचे कार्यालयाशी संबंधित माहिती खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

"१) जिल्हा खनिकर्म अधिकारी व पर्यावरण अधिकारी यांच्या अनुपस्थितीत दिले गेलेली वाळू उत्खनन प्रमाणपत्रे २) या संबंधी शासननिर्णय क्र. १०/२००३ ची कॉपी ३) या शासन निर्णयाचा भंग केलेल्या अधिकाऱ्यांच्या निर्णयाची कॉपी, ४) खनिकर्म अधिकाऱ्यांनी वाळूपटटयाची २००५-२००६ मध्ये तपासणी केलेल्या अहवालाच्या कॉपीज"

अपीलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास दि. १८.११.२००६ रोजी प्राप्त झाला.अपिलार्थीच्या या अर्जास त्यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि. १८.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क रु.१३०५/- इतके त्यांचे कार्यालयात भरण्याची सूचना केली आहेत. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस सदर शुल्क भरण्याची १.१.२००७ अशी मुदत घातलेली दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याप्रित्यर्थ शुल्क भरण्यासाठी कोणतीही मुदत असत नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचे पालन न करता अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ५.१.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात दि. १५.१.२००७ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीमध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने विचारलेली माहिती देण्याच्या सूचना करुन अपिलार्थीस सदर माहिती दि. २२.१.२००७ पर्यन्त व्यक्तीशः घेऊन जाण्याची अपिलार्थीस सूचना केली. या अपिल निर्णयासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतेही वेगळे आदेश पारित केले नसून त्यांचे कार्यालयीन नस्तीवरुन सदर आदेश दिले आहेत. सदर आदेशाची अपिलार्थीस कल्पना होती कारण अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचे नस्तीवर या निर्णयासंदर्भात पोचसही दिली आहे.जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.१.२००७ रोजी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण

माहिती त्यांनी विनामूल्य दिली. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.०५.२००७ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपूरी माहिती मिळाल्याचे नमुद केले आहे. त्यांना अद्यापही त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र. १ व मुद्दा क्र. २ संदर्भातील माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी या अपिल अर्जामध्ये म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद समजून, सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १८.१२.२००६ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला होता. परंतु अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रु. १३०५/- त्यांचे कार्यालयात भरले नाहीत व जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. ५.१.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.१.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार त्यांनी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती दि. २५.१.२००७ रोजी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांना जी माहिती अद्याप प्राप्त होणे बाकी आहे, असे म्हटले आहे, त्यातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भात माहिती निरंक असून अपिलार्थीस अपेक्षित असलेला शासन निर्णय त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीने शासन निर्णयाच्या तारखेचा यामध्ये कुठलाही उल्लेख केला नाही. त्याचबरोबर राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपिल मुदतबाहय असल्याचे आयोगासमोर म्हटले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल मुदतीत प्रतिसाद दिलेला आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचेही आदेशित केले आहे. या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि.२५.१.२००७ रोजी त्यांचेकडील सर्व उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली आहे. ही माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांनी पोचसही दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे वाळू उत्खनन प्रमाणपत्र वितरणासंदर्भात असे स्पष्ट केले की, जिल्हा खनीकर्म अधिकारी व पर्यावरण विभागाचे अधिकारी यांचे संयुक्त निरीक्षणावरुन नदीच्या पात्रातील वाळू पट्टे महसूल विभागाचे

अधिकाऱ्यामार्फत निश्चित करण्यात येत होते. तथापि पर्यावरण खात्याकडे आवश्यक ते मनुष्यबळ नसल्यामुळे आजमितीस भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा या कार्यालयातील अधिकारी व जिल्हा खनीकर्म अधिकारी हे वाळू पट्टे निश्चित करुन वाळू उत्खनन प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवित असतात. त्यांचेकडून सदर प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वाळूपट्टयाच्या लिलालाची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचेमार्फत करण्यात येते. अपिलार्थी यांनी संबंधित अधिकारी यांचे अनुपस्थितीत दिलेल्या उत्खनन प्रमाणपत्राच्या प्रती मागविल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत कोणतेही उत्खनन प्रमाणपत्र दिले जात नाही. त्यामुळे सदर माहिती निरंक ठरते व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या उर्वरित माहितीतील मुद्दा क्र.२ येथे दर्शविलेल्या शासन निर्णयाची तारीख अपिलार्थीने दर्शविली नसल्याने हा निर्णय त्यांना अपिलार्थीस शोधून देता येणे शक्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे समोर सादर केलेले स्पष्टीकरण आयोगास योग्य व स्वीकारार्ह वाटते. त्याचबरोबर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्णयानंतर ९० दिवसांचे आत द्वितीय अपिल दाखल करावयाचे होते, तथापि या प्रकरणी त्यांनी सदर अपिल,हे प्रथम अपिल निर्णयापासून चार महिने तीन दिवसाने म्हणजे एकूण ३३ दिवसांचे विलंबाने दाखल केले आहे.अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २५.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेले स्पष्टीकरण, अपिलार्थीस आवश्यक ती सर्व सुसंगत व योग्य माहिती मिळाली असल्याकारणाने व अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपिल करण्यास लावलेला विलंब पाहता या मुद्यावर अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यायोग्य ठरत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गजानन विठ्ठल पाटील,रा. सोनहिरा, मोंढा रोड ता.गंगापूर जि.औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०००

निर्णय दिनांक : १९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. पुरुषोत्तम पद्माकर देशपांडे<br>रा.मायभाटे निवास,भानुनगर, उस्मानाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा वन परिक्षेत्र अधिकारी,तुळजापूर<br>मुख्यालय उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा उपविभागीय वन अधिकारी,<br>वन विभाग, उस्मानाबाद | | |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. पुरुषोत्तम पद्माकर देशपांडे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,तुळजापूर मुख्यालय उस्मानाबाद श्री. साबळे गुंडेराव शंकरराव, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,तुळजापूर श्री. आण्णा विठोबा बेडके व

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, वन विभाग,उस्मानाबाद श्री. सातेळीकर राजेश्वर आशन्ना ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपीलार्थी यांनी सर्वप्रथम त्यांचे कडील दि. ५.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांचे कार्यक्षेत्रातील कामाचे अनुदान वाटप, हजेरी पुस्तिका, मजूरांची मागणी पत्रके, सॉ मिलची माहिती इत्यादी संदर्भात २००४ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" १) धान्य ऐवजी रोख रकम या योजनेअंतर्गत सन २००४ मध्ये (जानेवारी ०४ मध्ये) प्राप्त झालेल्या ५४.२९ लक्ष रुपयाच्या वितरणाची सविस्तर माहिती व त्याच्या हजेरीपटाच्या झेरॉक्स प्रती. जानेवारी २००४ च्या तिमाही मागणी पत्रकाची झेरॉक्स प्रत.

२)संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना व धान्य ऐवजी रोख रकम या योजनेअंतर्गत सन २००५ ते २००६ पर्येन्त प्राप्त झालेल्या निधीची सविस्तर माहिती देण्यात यावी.

३) जानेवारी ०५ ते डिसेंबर ०६ या कालावधीत जिल्हाधिकारी (रोहयो विभाग) यांचेकडे सादर केलेल्या तिमाही पतमर्यादा मागणी पत्रकाच्या झेरॉक्स प्रती.

४) रोहयो अंतर्गत सध्या सुरु असलेल्या कामांची कामनिहाय मजुर संख्या व त्यावरील मजुरी व कुपन वाटपाची माहिती.

५)आपल्या कार्यक्षेत्रातील अधिकृत सॉ मिल ची नावे त्यांना मान्यता दिलेले वर्ष व मान्यता दिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत. अनधिकृत सॉ मिलवर केलेल्या कारवाईची कागदपत्रे. व सॉ मील संदर्भातील शासन आदेशाच्या झेरॉक्स प्रती.

६) लातूर जिल्हयातील चंदनाच्या बेकायदेशीर कारखान्यावर केलेल्या कारवाईची कागदपत्रे देण्यात यावीत. चंदनाच्या संदर्भातील शासन आदेशाच्या प्रती. "

अपीलार्थी यांनी सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांचेकडील दि. २३.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सॉ मिलची ८ पृष्ठांची माहिती रु. १६/- इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरुन घेऊन जाणेस कळविले. तसेच उर्वरित माहितीच्या संदर्भात अपिलार्थीस त्यांचे विभागीय कार्यालयातील वेगवेगळया कार्यालयामध्ये असलेली माहिती प्रत्यक्ष येऊन पाहून घ्यावी, म्हणजे त्यांना नक्की हवी असलेली माहिती देता येईल, असे कळविले. अपिलार्थीस सदर पत्र त्यांनी अंडर सर्टीफिकेट

ऑफ पोस्टींगद्वारे पाठविले. अपिलार्थीस सदर पत्र अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाचा शिक्का असलेली पोस्टाची पावती आयोगास दाखविली.तथापि अपिलार्थींना जन माहिती अधिकारी यांच्या सूचनांनुसार आवश्यक शुल्काचा भरणा त्यांचेकडे न करता, जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दि. १४.२.२००७ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांचे दि. १६.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस संबंधित रेंज कार्यालयाकडून अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त होताच ती त्यांना पाठविण्यात येईल, असे कळविले. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर निर्णय कसा घेऊ नये, याचा उत्तम नमुना म्हणून जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १६.३.२००७ या पत्रास निर्देशित केल्यास, ते फारसे वावगे होणार नाही, असे आयोगास वाटते.

जन अपिलीय अधिकारी यांचे वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने, त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या द्वितीय अपिल अर्जातील त्यांचे लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तीवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांनी त्यांचेकडे दि. ५.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये काही माहितीची मागणी केली होती. या माहितीपैकी काही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने त्यांनी दि. २३.१.२००७ रोजी अपिलार्थीस पत्र लिहून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती पोटीचे शुल्क रु.१६/- त्यांचे कार्यालयात भरण्याची त्यांना सूचना केली. त्याचबरोबर दि. २४.३.२००७ रोजी देखिल त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती देण्यासंदर्भात रु.५२/-इतके शुल्क त्यांचे कार्यालयात भरण्याचे कळविले होते. हे पत्र देखिल त्यांनी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले. तथापि अपिलार्थी यांनी, व्यक्तिशः माहितीची मागणी करुन देखिल त्यांचे कार्यालयात उपस्थित राहण्याचे सौजन्य कधीही दाखविले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांचे कार्यालयात माहितीसाठी कधीही व्यक्तीशः हजर झाले नाहीत. त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी माहितीपोटी आवश्यक असलेले शुल्क भरण्याची त्यांचेकडील दि. ३१.३.२००७ रोजीच्या व दि. २४.३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे लेखी विनंती करुनही अपिलार्थी हे त्यांचे कार्यालयात कधीही गेले नाहीत.आज रोजी त्यांचेकडे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती तयार आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता या प्रकरणी, या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांना माहिती व्यक्तीशः हवी असल्याचे त्यांनी त्यांचे प्रथम अर्जात नमुद केले होते.अपिलार्थीस दि. ५.१.२००७ रोजीच्या अर्जाचे संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती घेऊन जाण्याकरता अपिलार्थीस त्यांचेकडील दि. २३.१.२००७ पत्रान्वये कळविले. तथापि अपिलार्थीने माहितीबाबतचे आवश्यक ते शुल्क भरले नाही. त्यानंतर देखिल जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे युक्तीवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे व आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळोवेळी माहिती उपलब्ध असल्याचे व ती त्यांचे कार्यालयातून घेऊन जाण्यास सूचविल्याचे दिसून येत आहे. परंतु अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना कोणतेही स्वारस्य असल्याचे दाखविले नाही. या संदर्भात त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडे कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. यावरुन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना खरोखरीच आवश्यक होती किंवा कसे, या विषयी आयोगाचे मनात संभ्रम निर्माण होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन फक्त सॉ-मिलच्या संदर्भातील माहिती घेऊन जाण्यास दि.२३.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विहित मुदतीत देणे, फारसे अवघड किंवा क्लिष्ट नव्हते, तथापि त्यांनी अपिलार्थीस सॉ-मिल व्यतिरिक्त इतर माहिती देण्यासंदर्भात प्रतिसाद देण्यास विलंब लावल्याचे दिसून येत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व माहिती उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहितीकरिता अधिनियमातील विहित केलेल्या तरतुदीपेक्षा उशिराने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. विहित मुदतीपेक्षा उशीराने देऊ करण्यात आलेल्या माहिती करिता जन माहिती अधिकारी यांना

अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये कलम ७(६) मधील तरतुदीनुसार शुल्क लावता येणार नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत रु.१६/- इतके शुल्क भरुन त्यांच्या दि.५.१.२००७ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातून कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. अपिलार्थी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात (सुटीचे दिवस व वेळ वगळून) हे आदेश निर्गमित होताच, १५ दिवसांचे आत व्यक्तिशः हजर होऊन, जन माहिती अधिकारी यांचेकडून, रु.१६/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरुन, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती हस्तगत करुन घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पुरुषोत्तम पद्माकर देशपांडे,रा.मायभाटे निवास,भानुनगर, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,तुळजापूर मुख्यालय उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, वन विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७४

निर्णय दिनांक : १९-०३-२००८

१ गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, औरंगाबाद
२ ग्रामसेवक, पोखरी
पंचायत समिती,औरंगाबाद : तक्रारदार

**विरुध्द**

१ श्री. अब्दुल रऊफ एन. पटेल, : उत्तरवादी
इंदिरानगर, गारखेडा, औरंगाबाद.

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार गट विकास अधिकारी, पंयायत समिती,औरंगाबाद श्री.मनोज तात्याराव चौधर व ग्रामसेवक, पोखरी श्रीमती निता सवाईसिंग राजपूत (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल.), तसेच श्री. अब्दुल रऊफ एन.पटेल (त्यांना यापुढे उत्तरवादी म्हणून संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.९.२००७ व १६.१०.२००७ रोजीच्या अर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, उत्तरवादी हे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा गैरफायदा घेऊन त्यांचेकडे वारंवार माहिती मागत असतात. उत्तरवादी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता, ते अर्ज संबंधित अधिकाऱ्यास केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने केल्याचे दिसून येतात. उत्तरवादी हे माहितीच्या अधिकाराचा चांगल्या व विधायक कामासाठी वापर न करता केवळ कर्मचारी/ तक्रारदार यांची आर्थिक पिळवणूक करण्याच्या उद्देशाने या कायद्याचा वापर करीत आहेत.उत्तरवादी हे फोनद्वारे पैशांची मागणी करीत असतात, पैसे न दिल्यास ते त्यांना धमक्या देत असतात. या तक्रारीवर आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांना त्यांनी मूळ तक्रार माहितीचा अधिकार अधिनियमातील कोणत्या कलमाअन्वये केली आहे, असे विचारले असता त्यांनी उत्तरवादीचे वर्तन राज्य माहिती आयोगास माहित असावे, म्हणून त्यांनी ही तक्रार केली असल्याचे सांगितले. उत्तरवादी यांचे वकीलाने, तक्रारदार यांनी केलेला अर्ज मेंटेनेबल नसल्यामुळे तो दाखल करुन घेणे आवश्यक नाही

असे आयोगासमोर प्रतिपादन केले. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आयोगाची अधिकारिता ही केवळ माहिती अधिकार अधिनियमापुरतीच मर्यादित आहे. अधिनियमातील कोणत्याही तरतुदीन्वये तक्रारदाराच्या अर्जात नमुद केलेल्या तक्रारीचे निराकरण होऊ शकणार नाही. तक्रारदाराने त्यांना जर उत्तरवादी यांचेकडून त्रास होत असेल तर त्यांनी या प्रकरणी पोलीसात जाणे उचित ठरेल, असे तक्रारदार यांना सूचित करण्यात आले. तक्रारदाराने केलेली तक्रार अधिनियमातील कोणत्याही तरतुदीशी कुठल्याही प्रकारे सुसंगत नसल्याने सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक १९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ तक्रारदार क्रमांक १ तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, औरंगाबाद

२ तक्रारदार क्रमांक २ तथा ग्रामसेवक, पोखरी, ता. औरंगाबाद जि.औरंगाबाद

३ उत्तरवादी श्री. अब्दुल रऊफ एन.पटेल, रा. इंदिरानगर, गारखेडा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१५

निर्णय दिनांक २४-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. बापु शामदास बैरागी,<br>घर नं. जीबीव्ही-८२/३०९/१२९३, सप्तशृंगी<br>मंदिर, गजवरनगर, आश्वमेघनगर, आर. टी.<br>ओ. ऑफिस पेठरोड, नाशिक - ०४ | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा सदस्य सचिव, विभागीय जात<br>पडताळणी समिती, विभागीय आयुक्तालय,<br>नाशिक रोड, नाशिक | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अपर विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,<br>विभागीय जात पडताळणी समिती, विभागीय<br>आयुक्तालय, नाशिक रोड, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बापु शामदास बैरागी व जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय जात पडताळणी समिती हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव,

विभागीय जात पडताळणी समिती श्री. मधुकर नामदेव पाटोळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००४ ते २००६ या कालावधी-तील बैरागी जातीतील नाशिक विभागातील जात पडताळणी प्रलंबीत प्रकरणासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ १. JNT २३१०/२००५-०६ वरणगांव महात्मा गांधी विद्यालय मार्फत शशिकांत गोविंद बैरागी यांचे प्रकरण.

२. अर्चना बंडुदास वैष्णव बिटको विद्यालय, सिबीएस, नाशिक प्रकरण क्र. ७८०.

३. सागर गुरुदास बैरागी आरवायके विद्यालय, नाशिक N/NT/७० यांचे प्रकरण.

४. यासह नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, नगर जिल्ह्यामार्फत आलेल्या बैरागी समाजाच्या जात प्रमाणपत्र प्रलंबीत प्रकरणांची सद्यस्थिती.

५. योग्य प्रकरण देण्याचा कालावधी प्रलंबीत प्रकरणांसाठी असलेल्या अडचणी, योग्य त्या कारणांसह लेखी स्वरुपात कळवावे.

६. १७ डिसें. २००४ मुख्य सचिव वि. वा. मेहेर यांच्या सहिचा आध्यादेशाची सत्यप्रा मिळणे. ”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र पोस्टाव्दारे अपेक्षिली होती.

या अर्जात अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन नॉन क्रिमिलेअर व उत्पन्न दाखल्याची सत्यप्रत त्यासोबत जोडली असल्याचे म्हटले

आहे. तथापि सदर सहपत्रे अपिलार्थीने मूळ अर्जासोबत जोडलेली नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी आज युक्तिवादामध्ये आयोगास नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भात माहिती देण्याकरिता त्यांना जास्त तपशीलाची आवश्यकता वाटल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधण्याचे या पत्राव्दारे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १९-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ०३-१०-२००६ रोजी सुनावणी ठेवली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रातील जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या पत्रावरुन दिसून येते. सदर प्रकरणाची सुनावणी झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या पुढील कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय दिला नसल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन दिसून येते. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १०-११-२००६ व्दारे रोजी स्मरणपत्र दिल्याचे देखील दिसून येते. तथापि त्यांनी त्याची दखल घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले होते. तथापि त्यांच्या दोन्ही अर्जावर संबंधीत कार्यालयाने हलगर्जीपणा दाखविला व वेळखाऊ पणाचे धोरण अवलंबिले त्यामुळे त्यांना माहितीपासून वंचित रहावे लागले असल्याचे नमूद केले आहे. त्याचबरोबर त्यांना माहिती न देणा-या अधिका-यावर व त्यांच्या अपिलावर निर्णय न देणा-या अपिलीय अधिका-यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शिस्तभंगाची व दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावरुन अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा त्यांना अर्थबोध न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १३-०९-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधण्यास सूचित केले. तथापि त्यांच्या सुचनेप्रमाणे अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही हजर झाले नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये परत कल्पना दिली होती. तथापि अपिलार्थी त्यांच्याकडे हजर न झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी आज सुनावणीच्या दिवशी गैरहजर आहेत. त्यांनी आयोगास असे कळविले आहे की, मार्च अखेरची महत्वाची कार्यालयीन कामे पूर्ण करावयाची असल्याने तसेच विधानसभेचे अधिवेशन सुरु असल्याने ते उपस्थित राहू शकणार नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या पत्रावरुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाविषयी किती अनादर आहे हे स्पष्ट होते असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे निर्णय न पारीत करुन आपल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणा व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची नोंद सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अशा प्रकारच्या, जन अपिलीय अधिकारी यांच्या वर्तनाने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सुनावणीचे काम दिवसेंदिवस वाढत आहे व अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून व माहिती मिळण्याच्या त्यांच्या हक्कापासून वंचित राहत आहेत असे येथे खेदाने नमूद करावेसे वाटते. अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक ५ च्या मुद्दयावरील माहिती वगळता उर्वरीत पाचही मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अनिवार्य आहे. माहिती मागणे हा अपिलार्थीचा हक्क असून त्यांना आवश्यक असलेली माहिती विहित मुदतीत पुरविणे हे जन माहिती अधिकारी यांचे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार आद्य कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावा जोडला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर स्पष्ट केले आहे. तथापि हा पुरावा प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही प्रयत्न केल्याचे अथवा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ तील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांनी कोणतीही कार्यवाही

केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत आता संपली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) नुसार जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस विनाशुल्क माहिती द्यावी लागेल. अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठी च्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद दिला असला तरी सदर प्रतिसाद पाहता त्यामध्ये त्यांनी अपिलाथीस कोणतीही माहिती पुरविली असल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ व ३ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांच्याकडील कागदपत्राच्या प्रचंड व्याप्तीमुळे जरी सहज शक्य नव्हते तरीही अपिलार्थीने मागितलेली माहितीतील मुद्दा क्रमांक ४ व मुद्दा क्रमांक ६ ची माहिती ते अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सहज पुरवू शकले असते. सदर माहिती अपिलार्थीस देण्याची साधी तयारी देखिल जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या पत्रामध्ये दाखविल्यचे आयोगास दिसून येत नाही. थोडक्यात अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ त्यांचा दृष्टीकोन प्रथमपासून पूर्णतः नकारात्मक असल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुददा क्रमांक ५ वगळता उर्वरीत पाचही मुद्दयावरील ‘‘माहिती’’ , अधिनियमातील ‘‘माहिती’’ या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ वगळता उर्वरीत सर्व मुद्दयावरील माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या

आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासदंर्भात दिलेल्या नकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून या ताकीदीची संचालक समाजकल्याण पुणे व सचिव (महसूल) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ वगळता उर्वरीत सर्व मुद्दयावरील माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बापु शामदास बैरागी, घर नं. जीबीव्ही-८२/३०९/१२९३, सप्तशृंगी मंदिर, गजवरनगर, आश्वमेघनगर, आर. टी. ओ. ऑफिस पेठरोड, नाशिक – ०४.

२ जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात पडताळणी समिती, विभागीय आयुक्तालय, नाशिक रोड, नाशिक यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय जात पडताळणी समिती, विभागीय आयुक्तालय, नाशिक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक समाजकल्याण, समालकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च रोड, पुणे – ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९१६

निर्णय दिनांक २४-०३-२००८

१ श्री. विठ्ठलराव किष्टय्या मड्डूर, : अपिलार्थी
वैष्णवी सेल्स कॉर्पोरेशन भिस्तबाग रोड
सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक
न्यास नोंदणी कार्यालय, स्वास्तिक चौक,
गणेशवाडी, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा धर्मादाय आयुक्त, कार्यालय, पुणे

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यालय अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विठ्ठलराव किष्टय्या मड्डूर व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी

कार्यालय अहमदनगर यांचे प्रतिनिधी निरिक्षक श्री. अशोक बाबुराव वाघमारे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १७-०७-२००३ ते ०६-०८-२००३ पर्यतच्या कालावधीतील मार्कडेय देवस्थान ट्रस्ट नं. ए २३ च्या चेंज रिपोर्टबाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. संबंधीत ट्रस्टचे अर्ज पेंडींग ठेऊन १७/०७/०३ पर्यत परिशिष्ट एक वर असलेली नोंद अचानकपणे रद्द करुन दि. ६-८-०३ रोजी परिशिष्ट १ वर नवीन विश्वस्तांची नावे येण्याचे विशेष प्रयोजना (कारणे) चा खुलासा.

२. सदर परिशिष्टाची छायांकित प्रत मिळावी.

३. वरील बदल कसा झाला याची कागदोपत्री असलेली नोंद लिखित स्वरुपात देण्याचे करावे.

४. दि. १७-०७-०३ ते दि. ६-८-०३ पर्यतचा कार्यालयीन रोजनाम्याची छायांकित प्रत मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस मुंबई सार्वजनिक विश्वस्त नियम १९५१ च्या नियम २३ नुसार त्यांना आवश्यक असलेल्या नकला मिळण्याकरिता स्वतंत्र अर्ज त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. याचबरोबर या अर्जाबरोबर त्यांनी अपिलार्थीस रुपये ५ /- इतके झेरॉक्स सेवा शुल्क भरण्याचे या पत्रामध्ये कळविले आहे व अपिलार्थीचा माहितीच्या अधिकाराखालील अर्ज दप्तरी दाखल करण्यात आला असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी या

पत्राव्दारे कळविले.  थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे मागितलेली माहिती देण्यास या पत्राव्दारे नकार दिला असल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २३-०५-२००६ रोजी प्रथम अपील केले.  या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा अपील अर्ज जॉईंट चॉरिटी कमिशनर, धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे केल्याचे दिसून येते.  या अपील अर्जात त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना माहिती न देणारे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीसाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार केलेला अर्ज चुकीच्या प्राधिकरणाकडे केलेला आहे. मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यामध्ये माहितीच्या प्रती सशुल्क देण्याची तरतूद असतांनाही अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाचा या ठिकाणी वापर केला आहे. एवढे असूनही त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले आहे. त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार नकलेसाठी अर्ज न करता अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले आहे. त्याचबरोबर आयोगाकडे देखील त्यांनी अशा प्रकारे मुंबई सार्वजनिक न्यास कायद्याच्या तरतुदीचे पालन न करता व्दितीय अपील केले आहे. माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही खुलासा देणे अपेक्षित नाही त्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले अपील नामंजूर करावे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तरतुदीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रतिसाद म्हणजे अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा केलेला प्रयत्न आहे असे आयोग मानतो. मुळात अपिलार्थीने जरी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी चुकिच्या प्राधिकरणा-

कडे अर्ज केला असला तरीही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) च्या तरतुदीनुसार सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्याबरोबर ५ दिवसाच्या आत त्यांच्या कार्यालयातील अधीक्षक जे या प्रकरणी प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी आहेत त्यांच्याकडे हस्तांतरीत करावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास आयोगास मार्ग नाही. मुळात अपिलार्थीच्या दिनांक २८-०३-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २७-०४-२००६ रोजी अगर तत्पूर्वी या संदर्भातील आपला निर्णय कळविणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) अन्वये भाग होते. अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीत त्यांनी त्यांच्याकडील ०६-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. सदर माहिती नाकारण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत त्यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५१ च्या नियम २३ नुसार नकला मिळण्यासाठी अर्ज करावयास हवा होता. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा ऑक्टोंबर २००५ मध्ये कार्यान्वित झाल्याचे सर्वश्रुत आहे. धर्मादाय आयुक्तांचे कार्यालय त्याला अपवाद नाही. सदर अधिनियमातील कलम २२ च्या तरतुदीमध्ये सदर अधिनियमाचा अधिभावी परिणाम असल्याचे स्पष्ट केले आहे. या कायद्याची प्राथमिक माहिती देखील धर्मादाय आयुक्तांच्या क्षेत्रीय कार्यालयास नसावी हे माहितीचा अधिकार अधिनियमाचे दुर्देव म्हटले पाहिजे. माहिती मागणे हा अपिलार्थीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ अन्वये मूलभत हक्क असून त्यांना आवश्यक ती माहिती विहित मुदतीत पुरविणे हे संबंधीत माहिती अधिकारी यांचे अधिनियमातील तरतुदीनुसार आद्य कर्तव्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील एकूण ४ मुद्यापैकी मुद्दा

क्रमांक १ हा अधिनियमातील माहिती या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. सदर मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारणे व खुलासे अपेक्षिले आहे जे माहितीचा अधिकार अधिनियमातील " माहिती " या शब्दाच्या व्याख्येशी जुळत नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता टळून गेला असल्यामुळे व या कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताच प्रतिसाद दिला नसल्याने आता माहिती अधिका-यास अपिलार्थीला अधिनियमातील कलम ७ (१) नुसार विनामूल्य माहिती देणे भाग आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २, ३ व ४ ची संबंधीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांनी अपिलार्थीच्या दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या अपील अर्जावर काय कारवाई केली हे आयोगाला कळण्यास कागदपत्राच्या अनुपलब्धेमुळे मार्ग नाही. अपिलार्थीचा अपील अर्ज या प्रकरणी त्यांनी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे निर्णय घेण्यासाठी लगेच पाठवून द्यावयास हवा होता. तथापि या प्रकरणी त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केल्याचे आयोगास आढळून आले नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीचे पत्रान्वये दिलेला प्रतिसाद लक्षात घेता त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास असद्हेतू पूर्वक

टाळाटाळ केली होती असे निःसंशयपणे सिध्द झाले नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले हे सत्य शेवटी उरत आहे. त्यांनी या प्रकरणी घेतलेल्या अशा प्रकारच्या भूमिकेबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी, त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर सकारात्मक कारवाई करावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे, त्यांनी या प्रकरणी घेतलेल्या नकारात्मक भूमिकेबद्दल सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चुकांची पुनरावृत्ती करु नये असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २४-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विठ्ठलराव किष्टय्या मडूर, वैष्णवी सेल्स कॉर्पोरेशन भिस्तबाग रोड सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ धर्मादाय सह आयुक्त, ढोले पाटील रोड, वाडिया कॉलेजच्या समोर, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९८

निर्णय दिनांक : २४-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र काळू नानकर,<br>एन-५३/एजे-१/२६/५,<br>पवननगर, सिडको, नाशिक | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>जिल्हा कुटुंब कल्याण केंद्र,<br>जिल्हा परिषद, नाशिक. | : | उत्तरवादी |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. राजेंद्र काळू नानकर (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा सहा.लेखाधिकारी व प्रभारी प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग,जिल्हा परिषद,नाशिक श्री. किशोर गुणवंत भलावी (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. २२.१०.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीन्वये माहिती मागितली असता उत्तरवादी यांनी तक्रारदारास सदर माहिती त्यांना कोणत्या कारणासाठी पाहिजे आहे, याचे प्रयोजन नमुद केले नसल्याने तक्रारदारास माहिती देण्याचे नाकारले, असे आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये तक्रारदाराने आयोगासमोर आपले म्हणणे मांडले, व या मुद्यावर त्यांना आयोगाचे आदेश अपेक्षित असल्याचे आयोगास सांगितले. तक्रारदाराच्या या मुद्यांवर उत्तरवादी यांचेतर्फे असा खुलासा करण्यात आला की, तक्रारदाराने त्यांच्या दि. २२.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे डॉ.साकुरीकर वैद्यकीय अधिकारी यांच्या विषयी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या सर्व तक्रारी व त्यांच्या निलंबनाबाबत माहिती मागितली होती. तथापि सदर माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (त्र) अन्वये माहिती देणे

बंधनकारक नसल्याचा त्यांचा समज झाल्यामुळे त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः माहिती दिली नव्हती, तथापि तद्नंतर तक्रारदारास माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी दोन वेळा डॉ. साकुरीकर या त्रयस्थपक्षाकडे या संदर्भात विचारणा केली होती. परंतु त्रयस्थ पक्षाने विहित मुदतीत प्रतिसाद न दिल्याने त्यांनी तक्रारदारास त्रयस्थपक्षाशी संबंधित एकूण १०७ पृष्ठांची माहिती विनामूल्य पुरविली आहे, असे सांगितले. तक्रारदार यांनी आज उपस्थित केलेल्या मुद्दयांमधील जन माहिती अधिकारी यांना, कोणत्याही अर्जदाराकडे माहितीचे प्रयोजन मागण्याचा अधिकार नाही, हा मुद्दा आयोग मान्य करीत आहे. या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(२) अन्वये तक्रारदारास माहिती मागतांना जन माहिती अधिकारी यांना माहितीचे प्रयोजन कळविण्याची गरज नाही, या तरतुदीचा त्यांनी भंग केल्याचे दिसून येत आहे. संबंधित तक्रारदार यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे स्वतंत्र अपील केले आहे, असे सांगितले. सबब तक्रारदाराच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसांचे आत माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींप्रमाणे निर्णय घेऊन या संदर्भात आपले आदेश त्वरित पारित करावेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## **<u>आदेश</u>**

१.तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २४-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र काळू नानकर,एन-५३/एजे-१/२६/५,पवननगर, सिडको, नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कुटुंब कल्याण केंद्र,जिल्हा परिषद, नाशिक. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती .

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१७२

निर्णय दिनांक : २४-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. त्र्यंबक शामलाल बिघोत,<br>रा. सी/५८/६,संघर्षनगर,<br>११ वी योजना सिडको, मुकुंदवाडीजवळ,<br>औरंगाबाद | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा संशोधन अधिकारी,<br>विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,<br>औरंगाबाद. | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,औरंगाबाद. श्री. रामदास नारायण वैद्य ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर तक्रारदार श्री. त्र्यंबक शामलाल बिघोत (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. १२.०७.२००६ रोजीच्या अर्जान्वये (दि.२७.७.२००६ रोजी आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात नोंदलेल्या) अशी तक्रार केली आहे की, उपलोकायुक्त यांनी दि. २२.११.२००५ रोजी दिलेल्या निर्णयासंदर्भात उत्तरवादी तथा सदस्यसचिव जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद यांनी माहिती देण्यासंदर्भात अवास्तव शुल्क रु.१०००/- ची मागणी केली होती व योग्य शुल्क आकारुन माहिती देण्याची विनंती केली असता " तुम्हाला जिथे जायचे तिथे जा, माहिती मिळणार नाही, असे सांगून माहिती दिली नाही व माहिती न दिल्यामुळे मुलीस उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागले असल्याचे कळविले असून, संबंधिताविरुध्द कारवाईचे आदेश द्यावेत, अशी विनंती केली आहे."

या प्रकरणी तक्रारदार यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ नुसार लोकायुक्त यांचेकडे दि. ९.८.२००५ रोजी अपील केले होते. या अपिलावर लोकायुक्त यांनी दि. १५.१२.२००५ रोजी सुनावणी घेऊन तक्रारदाराचे अपिल अंशतः मान्य करुन उत्तरवादी यांना, त्यांचे आदेश पारित झाल्यानंतर १५ दिवसांचे आत तक्रारदारास माहिती देण्याची सूचना केली होती. लोकायुक्त यांच्या या निर्णयामध्ये सदर माहिती तक्रारदारास विनामूल्य द्यावी किंवा सशुल्क द्यावी, याबाबत कोणताही उल्लेख नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी उत्तरवादी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी तक्रारदाराच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास ३० दिवसांचे आत प्रतिसाद दिला होता. तक्रारदाराच्या मूळ अर्जानुसार त्यांना जात पडताळणी समितीचे कामकाज आणि अधिनियमाद्वारे दिलेल्या नियमांची माहिती हवी होती, अशा प्रकारचे नियम अद्यापपर्यन्त शासनातर्फे तयार करण्यात आलेले नाहीत. सदर समितीचे कामकाज, शासनाचे दि. २५.१.२००० रोजीचे परिपत्रक, मा. सर्वोच्च न्यायालयाने अशाच प्रकारच्या प्रकरणासंदर्भात दिलेले आदेश लक्षात घेऊन चालते. तक्रारदार यांनी मागितलेली माहिती अंदाजे ५०० पृष्ठांची असल्यामुळे उत्तरवादी यांनी तक्रारदार यांच्याकडे सदर माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यापोटीचे शुल्क रु.१०००/- त्यांना भरण्याचे दि. २९.१२.२००५ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले होते. त्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१.२००६ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास खुलासा करुन त्यांना किमान रु. १०००/- च्या २५ टक्के इतकी रक्कम त्यांचे कार्यालयात सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी भरण्याचे सूचित केले होते. ही रक्कम तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात भरल्यानंतर ते तक्रारदारास सदर माहिती देण्यास तयार आहेत. सदर पत्र उत्तरवादी यांनी तक्रारदारास पोस्टाने पाठविले

असल्याचे सुनावणीमध्ये सांगितले. परंतु पत्र तक्रारदारास प्राप्त झाले किंवा कसे, हे तक्रारदाराच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही.

या प्रकरणात उत्तरवादी यांनी तक्रारदारास विहित मुदतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तक्रारदार यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यासाठी लागणाऱ्या शुल्क रु. १०००/- मध्ये देखिल उत्तरवादी यांनी तक्रारदारास सूट देऊन किमान रु.२५०/- भरले, तरी तक्रारदार यांना त्यांनी मागितलेली माहिती देण्यास उत्तरवादी यांची तयारी आहे, हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांनी निर्देशित केल्याप्रमाणे रु.२५०/- इतके शुल्क उत्तरवादी यांचे कार्यालयात तात्काळ भरुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांचे आत हस्तगत करुन घ्यावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
२. तक्रारदार यांना रु. २५० इतके शुल्क उत्तरवादी यांचे कार्यालयात हे आदेश निर्गमित होताच तात्काळ भरुन ३० दिवसांचे आत भरुन त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती उत्तरवादी यांचेकडून हस्तगत करुन घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २४-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. त्र्यंबक शामलाल बिघोत,रा. सी/५८/६,संघर्षनगर,११ वी योजना सिडको, मुकुंदवाडीजवळ,औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती,औरंगाबाद. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१०

निर्णय दिनांक २५-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सुखदेव दगडुजी माने,<br>मु. पो. डोंगरकिन्ही, तालुका पाटोदा,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापिका, जानपीर माध्यमिक व<br>उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी /<br>कारेगाव, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सचिव, श्रीमती कुंदाबी पठाण शिक्षण<br>प्रसारक मंडळ, नाळवंडी, तालुका पाटोदा,<br>जिल्हा बीड संचलीत, जानपीर माध्यमिक व<br>उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी /<br>कारेगाव, तालुका पाटोदा, जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुखदेव दगडुजी माने (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापिका, जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी / कारेगाव, तालुका पाटोदा यांचे प्रतिनिधी सहाय्यक माहिती अधिकारी श्री. शेख नसीर अब्दुल (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्रीमती कुंदाबी पठाण शिक्षण प्रसारक मंडळ, नाळवंडी, तालुका पाटोदा, जिल्हा बीड श्री. पठाण जाणू लाला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेसंदर्भात ०१-१०-२००४ ते ३१-०७-२००६ पर्यतच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. श्रीमती कुंदाबी पठाण शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जानपीर माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी / कारेगाव, तालुका पाटोदा, जिल्हा बीड या विद्यालयातील मुख्याध्यापिका शिक्षक / प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी (लिपीक, ग्रंथपाल, सेवक) यांची जेष्ठता सुची मिळणे बाबत विनंती आहे.

२. या विद्यालयात कामावर येणा-या अगोदर दुस-या विद्यालयात काम केले असल्यास जे संबंधिताकडे काम केल्याचा अनुभव असेल त्या अनुभव प्रमाणपत्राच्या छायांकित सत्यप्रती मिळणेबाबत विनंती आहे. (मा. मुख्याध्यापिका, शिक्षक / प्राध्यापक) दै. झुंजार नेता ९ जून २००५ च्या जाहीरातीनुसार नविन भरती केलेल्या प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचाही उपरोक्त जेष्ठता सूचित समावेश करावा हि विनंती. श्री. अभिमन्यू बबनराव डोके, रा. नाळवंडी, ता. पाटोदा जि. बीड यांना दि बीड जिल्हा मध्य. सह. बॅक लि. बीड शाखा

पाटोदा आपल्या संस्थेचे खाते नं. ११५५८ दि. २६-१०-२००४ ला रु. २०० /- चा धनादेश व दि. १-११-२००४ ला रु. ४०,००० /- चा धनादेश कोणत्या नियमाने दिलेला आहे. मिळालेली अनुदानाची रक्कम त्या त्या प्रयोजनासाठीच वापरावी लागते मग कोणत्या नियमाने उपरोक्त धनादेश दिले व किर्दीला याबाबत खर्चाच्या रकान्यात काय खुलासा लिहिलेला आहे ? कृपया उपरोक्त माहिती मिळण्याबाबत सविनय विनंती आहे. ”

अपिलार्थीने सदर माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या पत्राव्दारे त्यांनी माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस सदर पत्र त्यांनी दिनांक ०८-०८-२००६ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते. तथापि सदर पत्र अपिलार्थी यांना प्राप्त झाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीतील झेरॉक्स प्रती देण्यासाठी एकूण रुपये १४ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०६-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सदर अपील

अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना मूळात प्राप्त झाला नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही किंवा या संदर्भात त्यांनी अपिलार्थीशी या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही असे त्यांनी आज सुनावणीमध्ये आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी हेतूपुरस्सर टाळाटाळ केल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी जाणुन बुजून सुनावणी घेण्यासाठी टाळल्याचे नमूद केले असून आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे. आपल्या मूळ माहितीच्या मागणी बरोबरच त्यांनी श्रीमती कुंदाबी पठाण शिक्षण प्रसारक मंडळ, नाळवंडी, तालुका पाटोदा, जिल्हा बीड या संस्थेच्या व्यवस्थापना-विरुध्द काही तक्रारी केल्या आहेत.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती आजतागायत मिळालेली नाही. त्यांनी आयोगासमोर सादर केलेली कागदपत्रे बनावट आहेत. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांना आवश्यक असलेली माहिती अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाव्दारे पुरविली आहे. सदर माहिती

सत्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात आयोगास यावेळी सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०८-२००६ रोजी माहिती दिली असून त्यांना अर्जात मागणी केलेल्या छायांकीत प्रती हव्या असल्यास नियमानुसार होणा-या शुल्काची रक्कम कळविली आहे. तथापि सदर शुल्काची रक्कम अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अद्यापपावेतो न भरल्याने त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती देण्यात आलेल्या नाहीत. त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ त्यांनी शाळेच्या आवक जावक रजिस्टरची प्रत आयोगास सादर केली असून आपल्या लेखी म्हणण्यामध्ये त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, अपिलार्थी हे जाणुन बुजून शाळेस व संस्थेस त्रास देण्याकरिता वेळोवेळी लोकशाहीदिनी व माहितीच्या अधिकारात व अन्य मार्गाने त्रास देत आहेत. शाळेच्या व संस्थेच्या कार्यामध्ये विनाकारण बाधा आणून शाळेस व संस्थेस वेठीस धरण्याचा प्रयत्न करत आहे. यामध्ये शाळा, संस्था यांना विनाकारण मानसीक व आर्थिक त्रास होत आहे व चौकशीला विनाकारण सामोरे जावे लागत आहे त्यामुळे आयोगाने अपिलार्थीवर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्याचबरोबर त्यांना झालेल्या नुकसानभरपाई संदर्भात अपिलार्थी यांनी किमान त्यांना रुपये २००० /- द्यावेत असे आयोगाने आदेश काढावेत याबाबत त्यांनी लेखी विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी ज्या ज्या वेळी माहिती मागविली त्या त्या वेळेस ती माहिती त्यांना पुरविली आहे. या प्रकरणी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे त्यांनी शपथपत्राव्दारे आयोगास लिहून दिले आहे. अपिलार्थीकडून त्यांना अशा प्रकारचा त्रास इतःपर होऊ नये अशी अपेक्षा त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद त्यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिला आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १४ इतके भरण्यास सूचित केले होते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी शपथपत्रावर सांगत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार केलेला प्रथम अपील अर्ज अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविला होता. तथापि सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे जन अपिलीय अधिकारी देखील शपथपत्राव्दारे आयोगास सांगत आहेत. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या शाळेच्या व्यवस्थापनासंदर्भात ब-याच तक्रारी असल्याचे दिसून येते. या तक्रारीसंदर्भात त्यांनी शिक्षण संचालक यांच्याकडे वेगळा अर्ज करुन आपल्या तक्रारीचा निपटारा करुन घ्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. शिक्षण संचालकांनी देखील अपिलार्थीचा या शिक्षण संस्थेसंदर्भातील अशा प्रकारचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अर्जाची सत्वर चौकशी करावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीकडून सदर माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये १४ /- इतके त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस २ दिवसाच्या आत पुरवावी. सदर शुल्क भरण्या-संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ते मार्गदर्शन करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल

निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी त्यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्याकडे भरल्यानंतर २ दिवसाच्या आत पुरवावी.

३. खर्चाबद्दल आदेश नाहीत.

औरंगाबाद
दिनांक २५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुखदेव दगडुजी माने, मु. पो. डोंगरकिन्ही, तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी / कारेगाव, तालुका पाटोदा, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्रीमती कुंदाबी पठाण शिक्षण प्रसारक मंडळ, नाळवंडी, तालुका पाटोदा, जिल्हा बीड संचलीत, जानपीर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नाळवंडी / कारेगाव, तालुका पाटोदा, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ०१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०११

निर्णय दिनांक २५-०३-२००८

१ श्री. ओमप्रकाश रतनलाल मालपाणी, : अपिलार्थी
पुर्णवादी बॅकेच्या पाठीमागे, बीड रोड, मु.
पो. तालुका माजलगाव
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार माजलगाव,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार माजलगाव,
जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. ओमप्रकाश रतनलाल मालपाणी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार माजलगाव श्री. किसन भानुदासराव जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार माजलगाव, जिल्हा बीड हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत ऑगस्ट २००६ मध्ये गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये अधिग्रहीत केलेल्या वाहनाच्याविषयी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. गोदावरी नदीच्या पात्रात अतिवृष्टी व पैठणच्या धरणाचे पाणी सोडल्यामुळे झालेल्या पूर परिस्थितीत मदत कार्यासाठी किती व कोणत्या स्वरुपाची वाहने अधिग्रहीत केली होती त्याची सविस्तरपणे माहिती देण्यात यावी.

२. ती वाहने अधिग्रहीत केली त्या वाहनांच्या भाड्यापोटी वाहनाच्या प्रकारानुसार ठरविण्यात आलेल्या दराची सविस्तरपणे माहिती द्यावी.

३. अधिग्रहीत केलेल्या वाहनांना दि. ०१-०१-२००७ पर्यत किती भाडे कार्यालयामार्फत देण्यात आली याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र पोस्टाने अपेक्षिली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २४-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयातील आवक जावक लिपिकाने अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या प्रतीवर दिलेल्या पोच पावतीवरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज श्री. पी. के. मिस्त्रा, नायब तहसीलदार तथा वाहतूक व्यवस्थापक प्रमुख (नैसर्गिक आपत्ती) यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी पाठविला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीविषयी अचूक माहिती अपिलार्थीस मुदतीत देण्याचे सूचित करुन त्याची एक प्रत त्यांच्या कार्यालयास देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी सूचित केले. या कामी विलंब झाल्यास होणा-या परिणामांची

जबाबदारी, जन माहिती अधिकारी यांनी, संबंधीत नायब तहसीलदार यांची राहिल असे कळविले असल्याचे या पत्राव्दारे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी माहिती मागण्यापोटीचे शुल्क रुपये ४० /- इतके जन माहिती अधिकारी यांना मनीऑर्डरने पाठविल्याचे नमूद केले आहे व त्यांच्या या दाव्यापुष्ट्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मनीऑर्डरने शुल्क पाठविल्याबाबत पोस्टाच्या दिनांक ०८-०२-२००७ रोजीच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० /- दिनांक ०८-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांना केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही किंवा यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०५-२००७

रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

अपिलाची सुनावणी चालू असतांना ११-२५ वाजता जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे सुनावणीस हजर झाले.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००७ रोजी अर्ज केला. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त झाली नाही व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावरही कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. तहसील कार्यालयाने कोणत्याही शुल्काची मागणी केली नाही तरीही त्यांनी स्वतःहून त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे शुल्क रुपये ४० /- इतके मनीऑर्डरने जन माहिती अधिकारी यांच्याककडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी पाठविले असून सदर मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाली आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. त्यांना माहिती प्राप्त होण्यासंदर्भात ज्या अधिका-यांनी दिरंगाई केली आहे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई व्हावी अशी विनंती त्यांनी आयोगास आपल्या युक्तिवादाच्या शेवटी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे कार्यालय तात्पुरत्या उभारलेल्या शेडमध्ये असून त्यामध्ये अभिलेखे ठेवण्याची व्यवस्था

नाही. सदर अभिलेखे पाण्याने भिजू नये म्हणून त्यांनी ते या शेडमध्ये कपाटाच्या वरच्या बाजूस बांधून ठेवले होते. अपिलार्थीने माहितीची ज्यावेळी मागणी केली त्यावेळेस सदर माहिती ज्या कर्मचा-याच्या ताब्यात होती त्यांची बदली झाली असल्याने अपिलार्थीस विहित माहित देता आली नाही. आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यानंतर संबंधीत कर्मचा-याला त्याच्या बीड मुख्यालयातून बोलावून घेऊन त्यांनी सदर अभिलेखे शोधून काढले व अपिलार्थीने मागितलेली माहिती तयार करुन ठेवली. आज रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप, लहान व सरळ होते. यामध्ये कोणत्याही स्वरुपाची क्लीष्ट माहिती किंवा सदर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाचे प्रमाणाबाहेर मनुष्यबळ वापरावे लागत होते अशी स्थिती असल्याचे दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाला कोणतीही किंमत न देता अर्जदारास माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवावयाचे हा जणू जन माहिती अधिकारी यांनी निर्धार केला असावा असे वाटण्याइतपत संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी या प्रकरणी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उशीरा देण्यासंदर्भात केलेला आयोग्य जागा, संबंधित कर्मचा-याची बदली हा युक्तिवाद आयोगास मान्य नाही. आयोगाची नोटीस प्राप्त झाल्यावर त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती तत्परतेने एका दिवसात तयार केली हीच तत्परता अपिलार्थीने प्रथम अर्ज, प्रथम अपील, केल्यानंतर किंवा व्दितीय अपील दाखल करण्या पुर्वी दाखविणे त्यांना सहज शक्य होते. तथापि

येथे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती देण्यासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी कोणताही टप्प्यावर व कधीही व कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणाचे वैशिष्ट्ये असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती देण्याचे शुल्क त्यांना कधीही कळविले नाही. एवढे असूनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०२-२००७ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आपण होऊन रुपये ४० /- इतके शुल्क मनीऑर्डरने पाठविले. सदर शुल्काची स्विकृती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०२-२००७ रोजी केली. आजपर्यंत म्हणजे ह्या अपिलाच्या सुनावणीच्या तारखेपर्यंत अपिलार्थीस, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कोणतीही सूचना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. या संपूर्ण प्रकरणामध्ये १ वर्ष व २ महिना इतका कालावधी व्यपगत झाला आहे. अपिलार्थीने यांच्याकडून माहितीपोटीचे शुल्क प्राप्त करुन घेऊनही जन माहिती अधिकारी व त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस माहिती देण्यापोटी दर्शविलेली अशा प्रकारची अनास्था व बेपर्वाई त्याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत होऊ शकत नाही असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर प्रथम अपील अर्जावर जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा निःसशयंपणे भंग केल्याचे येथे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी केवळ इच्छाशक्तीचा अभाव व संबंधीत अधिका-यांच्या बेजबाबदार कार्यशैलीमुळे अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहे. या परिस्थितीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्या मनोवृत्तीची किंवा त्यांच्यामध्ये असलेल्या इच्छाशक्तीचा अभाव किंवा त्यांची बेजबाबदार कार्यशैली दूर

करण्याची आयोगास गरज वाटते. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती त्यांना न देऊन त्यांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलमांचा भंग केला आहे. त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक हे सर्व जण जबाबदार ठरत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी / अधिकारी यांना देखील माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर सहाय्यक यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी करिता माहिती प्राप्त होण्याकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक ‘‘ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ‘‘ या लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी. सदर शास्तीची कर्मचारी/ अधिकारी निहाय विभागणी जिल्हाधिकारी बीड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत कर्मचारी / अधिकारी हे या शास्तीच्या रक्कमेचा भरणा नियमीत व जास्तीत जास्त ५ हप्त्यात करतील हे पहावे. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपवाईची वृत्तीची नोंद जिल्हाधिकारी बीड यांनी घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन ती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस सशुल्क माहिती प्राप्त होण्याची विहित मुदत आता संपली असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४० /- हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी त्यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती साक्षांकीत करुन ती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरिता माहिती प्राप्त होण्याकरिता वंचित ठेवल्याबद्दल त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत

आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी निकालपत्रामध्ये केलेल्या विवेचनाप्रमाणे करावा.

४. सदर शास्तीची कर्मचारी/ अधिकारी निहाय विभागणी जिल्हाधिकारी बीड यांनी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत कर्मचारी / अधिकारी हे या शास्तीच्या रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात नियमीत व जास्तीत जास्त ५ हप्त्यात करतील हे पहावे.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४० /- हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच २४ तासाच्या आत परत करावेत.

औरंगाबाद
दिनांक २५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ओमप्रकाश रतनलाल मालपाणी, पुर्णवादी बॅकेच्या पाठीमागे, बीड रोड, मु. पो. तालुका माजलगाव जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार माजलगाव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२२

निर्णय दिनांक २५-०३-२००८

१ श्री. पांडुरंग मोतीराव धोबी, : अपिलार्थी
लहान भाजी बाजार, वाडी चौक,
मु. पो. तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर,
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र. वि.),
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. पांडुरंग मोतीराव धोबी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर, जिल्हा जळगाव यांचे प्रतिनिधी सबओव्हरसीअर श्री. संजय तुकाराम पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र. वि.), विभागीय आयुक्त कार्यालय,

नाशिक विभाग नाशिक यांचे प्रतिनिधी सहाय्यक प्रादेशिक संचालक नगरपालिका प्रशासन श्री. नामदेव बंडू मोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष श्री. दगडू राधो मराठे यांचे प्रतिनिधी ॲड प्रदिप गोपाळराव भांडारकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बांधकाम परवानगीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> श्री. दगडू राधो मराठे यांना आपण सि. स. नं. १२४ मध्ये मंजूर प्लॅन प्रमाणे तळमजला बांधकामास जा. क्र./वशी/१३/५९५ दि. २६/७-२००२ रोजी परवानगी दिलेली आहे.
>
> परवानगीच्या शर्त तीन मध्ये बांधकाम करतांना शेजारील मिळकत धारकाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी शर्त घालण्यात आलेली आहे. तरी आपलेकडून खालील प्रमाणे माहीती मिळावी.
>
> १. बांधकामास परवानगी दिलेनंतर संबंधित इसमाने किती दिवसात जागेचे बांधकाम करावयास पाहिजे याबद्दल आपले काही नियम असतील त्याची माहिती.
>
> २. शर्त तीन मध्ये लिहिलेप्रमाणे बांधकाम करतांना शेजा-याचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई कोणी आणि किती दिवसात करावयाची याबद्दल आपले काही नियम असतील त्याची माहिती.
>
> ३. बांधकाम करतांना शेजा-याचे नुकसान झाले अथवा नाही हे पहाण्याची यंत्रणा आपलेकडे उपलब्ध आहे अथवा कसे ?

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०७-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०५-२००६ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०१-०६-२००६ रोजी पारीत केले. सदर आदेशान्वये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केल आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना पुरविलेली माहिती चुकीची असल्याचे नमूद केले आहे व नगरपरिषदेने बांधकाम परवानगी देतांना काढलेले आदेश निरर्थक आहे असे म्हटले आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये त्यांच्या विरुध्द कोणाकडे अपील करावयाचे याचा उल्लेख त्यांच्या निकालपत्रात केला नसल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या घराशेजारील श्री. दगडू राधो मराठे यांच्या बांधकामास परवानगी दिल्याने त्यांच्या घराचे नुकसान होऊन भिंत पडली व तदनंतर त्यांच्या घरात चोरीचा प्रकार घडला. त्यांची पडलेली भिंत त्यांना पुर्नबांधणी करुन हवी

आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादासोबत आयोगाकडे दिनांक २५-०३-२००८ रोजीचे एक पत्र सादर केले असून त्यामध्ये -- जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती चुकीची असल्याचे म्हटले आहे. सदर माहिती चुकीची वाटल्या-प्रित्यर्थ त्यांनी एकूण ३ कारणे दिली असून त्याबाबत मुद्दा क्रमांक १ मध्ये नगरपरिषदेने बांधकाम परवानगी दिल्यानंतर संबंधीत इसमाने किती दिवसात ते बांधकाम करावयास पाहिजे याची माहिती मागितली असता नगरपरिषदेने संबंधीत नियमाचा व त्यातील तपशीलाचा त्यांच्या पत्रामध्ये उल्लेख केला, मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात बांधकाम परवानगी देतांना शेजारील मिळकतधारकाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी शर्त टाकण्याची जन माहिती अधिकारी यांना आवश्यकता नव्हती. जर त्यांनी शर्त घातली असेल तर त्याचे पालन परवानगी घेणारे व परवानगी देणारे यांनी करणे जरुरीचे आहे असे त्यांना वाटते. मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात बांधकाम करतांना शेजा-याच्या मिळकतीचे नुकसान झाले किंवा नाही हे पाहण्याची यंत्रणा नगरपरिषदेकडे नसली तरी शेजारील मिळकतधारकाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी ही शर्त देखील चुकीची ठरते -- असे दर्शविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, कोणत्याही बांधकामास परवानगी देतांना सदर परवानगी काही अटीनुसार दिली जाते. यामध्ये सदरील मिळकतधारकाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी ही एक अट आहे. ही अट बांधकाम करतांना घ्यावयाची काळजी म्हणून दिलेली असते. तथापि त्यांच्या बांधकामामुळे शेजारील मिळकतीचे नुकसान झाले तर पुढील जबाबदारी कोणाची व पुढील कारवाई कोणी करावयाची याबाबत त्यांच्याकडे आज रोजी कोणतेही नियम आस्तित्वात नाहीत व यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. बांधकामाची परवानगी देतांना मिळकतधारकाचे

प्रॉपर्टी कॉर्ड बघून ती दिली जाते. कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापुर्वी संबंधीत जागेस नगरपरिषदेच्या संबंधीत विभागाकडून भेट दिली जात नाही किंवा कोणत्याही अधिका-याकडून जागेची प्रत्यक्ष पाहणी केली जात नाही.

त्रयस्त श्री. दगडू राधो मराठे यांचे प्रतिनिधी श्री. प्रदीप भांडारकर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने सुरुवातीला त्यांच्या बांधकामास हरकत घेतली होती व सदर प्रकरणी अमळनेर दिवाणी न्यायालयात दावा क्रमांक २७/१९९९ देखील दाखल केला होता, या दाव्याचा निर्णय त्रयस्त पक्षाच्या बाजुने लागलेला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०७-०४-२००६ रोजीच्या अपिलाची दिनांक २५-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आदेश दिनांक ०१-०६-२००६ रोजी पारीत केले व अपील फेटाळण्यात आले. अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याप्रित्यर्थ पूर्णतः संधी देण्यात आली परंतु अपिलार्थीस माहिती ऐवजी नुकसानभरपाई अपेक्षित आहे असे आढळल्याने व जन माहिती अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत व मोफत दिली असल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १७-०३-२००६ रोजी दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस सर्व मुद्दयावरील माहिती योग्य त-हेने व सुसंगत

दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती चुकीची असल्याबद्दल काही युक्तिवाद केला आहे. त्यातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत युक्तिवाद आयोगास मान्य नाही. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बरोबर दिली आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीच्या प्रश्नांना उत्तरे आहेत. अपिलार्थी यांच्या मते जन माहिती अधिकारी यांनी बांधकाम परवानगी देतांना संबंधीत मिळकतधारकास काही अटी घातल्या आहे. त्यामध्ये शेजारील मालकाचे काही नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी असे सूचित केले गेले आहे. मात्र नुकसान झाल्यास त्याची भरपाई कोणी करावयाची याची तरतूद नगरपरिषदे कडील कोणत्याही नियमात नाही हे जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादामध्येही स्पष्ट करण्यात आले आहे. जर नुकसानीची भरपाई करण्या-संदर्भात कोणतेही नियम नगरपरिषदेकडे नसेल तर ही अट बांधकाम करतांना का घालण्यात येते हा अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांचा मुद्दा विचारात घेण्यासारखा आहे असे आयोगाचे मत आहे. त्याचबरोबर बांधकाम करतांना शेजारच्याचे नुकसान झाले आहे किंवा नाही हे पाहण्याची यंत्रणा देखील नगरपरिषदेकडे नाही. असे अताांना देखील असे बांधकाम करतांना नगर परिषद निरर्थक अटी नगरपरिषद घालत आहे. अपिलार्थीचे हे म्हणणे नगरपरिषदे-कडे आवश्यक ते नियम व तपास यंत्रणा उपलब्ध नसल्याच्या पार्श्वभूमीवर योग्य ठरते.

सबब मुख्याधिकारी नगरपरिषद अमळनेर यांना असे सूचित करण्यात येते की, बांधकाम परवानगी देतांना यापुढे निरर्थक अटींचा समावेश त्या परवानगीमध्ये करु नये. ज्या अटींचे पाळण्यासंदर्भातील नियंत्रण नगरपरिषदेकडे आहे अशा प्रकारच्या अटी त्यांनी बांधकाम परवानगी देतांना घालण्याबाबत विचार करावा. याचबरोबर

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन असे दिसून येते की, गावामध्ये कोणत्याही बांधकामास परवानगी देतांना नगरपरिषदचे कोणतेही अधिकारी संबंधीत जागेला भेट देत नाहीत व फक्त सिटी सर्व्हेच्या प्रॉपर्टी कॉर्डावरुन बांधकामास परवानगी दिली जाते ही पध्दत सदोष असून यापुढे कोणत्याही बांधकामास परवानगी देतांना नगरपरिषदेच्या संबंधीत अधिका-यांनी प्रस्तावित परवानगी देण्याच्या पूर्वी भेट देण्यास त्यांना अनिवार्य करावे असेही त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी विहित मुदतीत माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस त्यांच्या पडलेल्या भिंतीची पुर्नबांधणी करुन हवी आहे यासंदर्भात आयोगास कोणतीही अधिकारिता नसल्याने या मुद्दयावर आयोगाचे कोणतेही अभिप्राय नाहीत. आयोगाची अधिकारिता ही केवळ माहिती देण्यापुरती मर्यादित असल्याने व उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सुसंगत माहिती पुरविली असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या तक्रार निवारणाप्रित्यर्थ दिवाणी न्यायालयात जाऊन न्याय मागणे अधिक उचित होईल असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २५-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग मोतीराव धोबी, लहान भाजी बाजार, वाडी चौक, मु. पो. तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र. वि.), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८५

निर्णय दिनांक : २५-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मच्छिंद्र अमृता फरताडे, रा. मिरजगाव ता. कर्जत जि.अहमदनगर | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कर्जत ता. कर्जत जि.अहमदनगर | : | उत्तरवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री. मच्छिंद्र अमृता फरताडे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कर्जत जि. अहमदनगर ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. २६.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये कृषी खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना, त्यांनी दि. २३.११.२००५ रोजी केलेल्या अर्जास अनुसरुन मागितलेली माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ केल्याची व त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यापासून वंचित ठेवल्याची राज्य माहिती आयोगाकडे तक्रार केली आहे. या तक्रारीमध्ये त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, त्यांना दि. २६.१.२००६ रोजी एका कृषी अधिकाऱ्याने, त्यांनी अर्जात मागितलेली माहिती न देता अर्धवट व खोटी माहिती दिली. सदर माहिती संदर्भात तालुका कृषी

अधिकारी यांचेकडे जाऊन चौकशी केली असता त्यांनी पत्र पाठवू असे सांगून संबंधितांनी पत्र पाठविले नाही व त्यांची फसवणूक केली, अशी तक्रार केली आहे. सदर तक्रारीची नोंद राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दि. २९.६.२००६ रोजी झालेली आहे. त्यांनी सदर माहिती मागविल्याबद्दल संबंधित अधिकारी त्यांना माहिती देण्याऐवजी धमक्या देतात, तक्रारदार हे रोजगार हमी योजनेवरील मजूर असून त्यांना योग्य तो न्याय देण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे.

आज रोजी सुनावणीचे वेळी उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातर्फे दूरध्वनीवरुन दि. १५.३.२००८ रोजी सूचना करुनही व लेखी सूचना दि.१२.३.२००८ च्या पत्राद्वारे (नोटीस) कळवून देखिल उत्तरवादी हे आयोगासमोरील सुनावणीस हजर नाहीत. अर्जदाराच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, तक्रारदाराने उत्तरवादी यांचे दि. २३.११.२००५ रोजीच्या अर्जामधील मिरजगाव येथील हजारे वस्तीमधील ग.नं.४०८ वरील झालेल्या नालाबंडीग कामाची जून २००४ ते ऑगस्ट २००५ या कालावधीतीत काही माहिती मागविली होती. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. ७.१.२००७ रोजी त्यांनी स्मरणपत्र देखिल दिले होते. संबंधित जन अपिलीय अधिकारी यांचेकडून, त्यांचेकडे अपील केल्यानंतर कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने तक्रारदार यांनी त्यांना उपोषणाचे पत्र देखिल त्यांचेकडील दि. २३.१.२००६ रोजी पत्र दिले. थोडक्यात या प्रकरणी तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ वरील कलम १८(१) अन्वये दि.२९.६.२००६ रोजी माहिती प्राप्त होण्यासाठी तक्रार केली आहे.

आज सुनावणीस तक्रारदार, उत्तरवादी हे दोघेही गैरहजर आहेत. तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या दि. २६.६.२००६ रोजीच्या अर्जावरुन असे दिसून येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास दि. २६.१.२००६ रोजी माहिती पुरविली असून, सदर माहिती वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे तक्रारदार यांचे मत आहे. तक्रारदार यांचे मते सदर माहिती खोटी आहे व उत्तरवादी यांनी दिलेल्या माहितीच्या प्रती या डुप्लीकेट आहेत. उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेली माहिती खोटी व चुकीची असल्याचा पुरावा तक्रारदार यांनी सादर केला नाही किंवा त्यांचे म्हणणे सिध्द करण्याकरता ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.उत्तरवादी यांच्या कार्यपध्दतीबाबत त्यांची जर काही तक्रार असेल तर या प्रकरणी रो.ह.यो.कामासंदर्भात विभागीय

आयुक्त यांना शासनाने चौकशी करण्यासाठी व त्यावरील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी प्राधिकृत केले आहे. हे पाहता तक्रारदार यांनी आयोगाकडे केलेल्या अर्ज, त्यांनी महसूल आयुक्त, नाशिक यांचेकडे करणे उचित होईल, असे आयोगाचे मत आहे. या अर्जासंबंधी, उत्तरवादी यांनी त्यांना दिलेली माहिती कशी खोटी आहे, याचा पुरावा द्यावा, म्हणजेच महसूल आयुक्त, नाशिक यांना या प्रकरणी योग्य तो निर्णय घेणे सुकर होईल.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २५-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मच्छिंद्र अमृता फरताडे,मिरजगाव ता. कर्जत जि.अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी,कर्जत ता. कर्जत जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ विभागीय महसूल आयुक्त, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/५४

निर्णय दिनांक : २५-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक रावतमलजी फुलफगर,<br>सोमवारपेठ, चांदवड, जि.नाशिक. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा अध्यक्ष श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड<br>(नाशिक).<br>जि. नाशिक | : | उत्तरवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री.अशोक रावतमलजी फुलफगर (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड जि.नाशिक यांचे प्रतिनिधी वकील श्री.अंबादास आजिनाथ कवरे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८(१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०.९.२००७ रोजी अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उत्तरवादी यांचेकडे दि. १६.८.२००७ व २३.८.२००७ रोजी संस्थेच्या विद्यमान घटनेसंदर्भात व संस्थेने रु.१०,०००/- च्या वरील किंमतीच्या खरेदी केलेल्या वस्तुसंदर्भात उत्तरवादी यांचेकडे काही माहिती मागितली हेती. सदर माहिती पाठविण्यासाठी शुल्क प्रत्येकी रु. ३०/- व

रु.६०/- इतके त्यांनी दोन वेगळया धनादेशाद्वारे उत्तरवादी यांचेकडे स्वतःहून पाठविले. तथापि उत्तरवादी यांनी त्यांना दि. ३.९.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी त्यांच्या संस्थेस लागू नसल्याचे कळवून त्यांचे दोन्ही अर्ज निकाली काढले व त्या पत्रासोबत त्यांनी तक्रारदाराचे दोन्हीही चेक (क्र.०४४६०८,०४४६४१ दि चांदवड मर्चंट बँक म. चे अनुक्रमे रु.३०/- व रु.६०/-) तक्रारदारास परत पाठविले व त्यांना आवश्यक ती माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. संस्थेने माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या नसल्याने, या प्रकरणी त्यांना आता अपिल कोणाकडे करावयाचे याचा बोध होत नसल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे याचे मार्गदर्शन मागितले आहे व त्यांना न्याय देण्याची विनंती आयोगाकडे या अर्जाद्वारे केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी उत्तरवादी यांच्याकडे त्यांचेकडील दि. १६.८.२००७ व २३.८.२००७ रोजी दोन वेगवेगळे अर्ज केले असता, संस्थेने त्यांना माहिती देण्याचे नाकारले. या संस्थेने त्यांना माहिती देण्यास दिलेला नकार, त्यांना अपमानकारक वाटत असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे सदर तक्रार केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आयोगाने संबंधित संस्थेस आयोगासमोर आज सुनावणीस हजर राहण्याची लेखी सूचना करुनही आज ते गैरहजर आहेत. त्यांनी दि. १३ व २३ रोजी केलेल्या अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे.

उत्तरवादी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तक्रारदाराने ज्या संस्थेच्या संदर्भात काही माहितीची मागणी केली आहे, त्या संस्थेस शासनातर्फे कोणतेही वित्तीय सहाय्य दिले जात नाही.संस्थेस कोणतेही वित्तीय सहाय्य प्राप्त होत नसल्याने अधिनियमातील कोणतीही तरतुद लागू होत नाही. मूळात हा कायदाच संस्थेला लागू होत नसल्यामुळे तक्रारदाराची तक्रार फेटाळण्यात यावी. तसेच धर्मादाय आयुक्त, नाशिक यांचेकडे सदर संस्था श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरुकुल) नेमीनगर, चांदवड जि. नाशिक या नावाने सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा १९५० अन्वये E-35 या क्रमांकाने नोंदणीकृत झालेली आहे. तक्रारदाराने मागणी केलेली संपूर्ण माहिती धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात उपलब्ध आहे. सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियमामध्ये अशाप्रकारची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ती तरतुद केली गेलेली आहे तथापि तक्रारदाराने या तरतुदीप्रमाणे अपील न करता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन अपिल केले आहे.

दोन्ही बाजूचा युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, उपरोक्त परिच्छेदात वर्णिल्याप्रमाणे तक्रारदार यांनी दि. १६.८.२००७ व २३.८.२००७ रोजी दोन वेगवेगळया अर्जाद्वारे वेगवेगळया प्रकारची माहिती उत्तरवादी यांचेकडे मागितली होती. तथापि केवळ शासनातर्फे कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नसल्यामुळे सदर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ त्यांचे संस्थेस लागू नाही, असे उत्तरवादी यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे नाकारले आहे. तक्रारदारास माहिती नाकारल्याची उत्तरवादी यांची सदर कृती  चुकीची आहे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये "माहितीचा अधिकार" व माहिती या शब्दाची व्याप्ती कलम २ (त्र) व २ (च) मध्ये पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. ती खालीलप्रमाणे आहे.

''माहितीचा अधिकार याचा अर्थ, ''कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे" तर

"माहिती" या शब्दाची व्याख्या अधिनियमातील कलम २(च) मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. "----त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल, अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो".

या प्रकरणी असे दिसून येते की,सदर संस्था धर्मादाय आयुक्त या सार्वजनिक प्राधिकरणाकडे नोंद झालेली संस्था आहे. तक्रारदाराने मागितलेली माहिती धर्मादाय आयुक्त यांना सदर संस्थेकडून प्राप्त करुन घेता येईल, याचाच अर्थ तक्रारदाराने मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीमधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत आहे. सबब तक्रारदाराने दि. १६.८.२००७ व दि. २३.८.२००७ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेल्या अर्जान्वये मागितलेली माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदारास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देणे त्यांना बंधनकारक आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, अध्यक्ष, श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड जि.नाशिक यांनी तक्रारदार यांना दि. १६.८.२००७ व २३.८.२००७ रोजीच्या, त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे केलेल्या अर्जाद्वारे मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

तक्रारदार यांनी आज रोजी केलेल्या युक्तीवादाचे वेळी संबंधित संस्थेच्या अधिकाऱ्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि उपरोक्त प्रकरणी उत्तरवादी यांनी माहितीचा

अधिकार अधिनियमाचा अर्थ चुकीचा लावलेला आहे. त्यांच्या संस्थेमध्ये त्यांनी माहिती अधिकाऱ्याची नेमणूकही केलेली नाही. हे पाहता त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कोणतेही आदेश देता येत नाहीत, परंतु त्यांना आता असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या संस्थेकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कराव्यात.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदाराची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. अध्यक्ष, श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड जि.नाशिक यांनी तक्रारदार यांना त्यांच्या दि. १६.८.२००७ व २३.८.२००७ रोजीच्या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे केलेल्या अर्जाद्वारे त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३० दिवसांचे आत सशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

२. उत्तरवादी यांनी श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड जि.नाशिक या संस्थेत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांचे आत कराव्यात.

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक रावतमलजी फुलफगर,सोमवारपेठ, चांदवड, जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, श्री. नेमीनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम, चांदवड जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९५

निर्णय दिनांक २६-०३-२००८

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, : अपिलार्थी
रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार),
तालुका भोकरदन, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना,
जिल्हा जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय भोकरदन, जिल्हा जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुरेश गंगाराम बनकर हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी

कार्यालय भोकरदन, जिल्हा जालना श्री. मोहम्मद अब्दुल बाकी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांचे प्रतिनिधी तंत्र अधिकारी श्री. नंदकुमार अनंतराव टाक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मातीनाला बांध दगडी पिचिंगसंबंधी २००६-२००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " मौजे सावंगी अवघडराव, पिंपळगाव (रेणू) ताडकळस, देहेड येथील मातीनाला दगडी पिचिंगचे कामावर चालू वर्षी किती रक्कम खर्च करण्यात आली. मजुरांचे हजेरीपत्रके (सत्यप्रती) "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १२५० /- त्यांच्या कार्यालयात भरणा करण्याचे सूचित केले. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रित्यर्थ जन माहिती अधिकारी आयोगासमोर कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत. आयोगाने आजच्या सुनावणीच्या नोटीसमध्ये जन माहिती अधिकारी यांना त्यांनी या प्रकरणी केलेल्या पत्रव्यवहाराची खात्री करुन घेण्यासाठी त्यांच्या दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये आवक जावक रजिस्टरची प्रत घेऊन येण्याचे सूचित करुन देखील जन माहिती अधिकारी सदर रजिस्टरची प्रत आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. तद्वतच जन माहिती

अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारचे पत्र आल्याचा उल्लेख अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये केलेला दिसून येत नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारचे पत्र अपिलार्थीस पाठविल्याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २०-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केल्याचे, अपिलाचे कारण म्हणून दर्शविले आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २१-०३-२००७ रोजी पोहोचला आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी प्रथम अपील ९ दिवस उशिराने सादर केल्याने त्यांचे अपील फेटाळल्याचे त्यांना कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-०६-२००७ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना व्यक्तिशः पुरविली असून सदर माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थी ची सही पोच घेतली आहे. सदर दिनांक ०२-०६-२००७ ची पोच त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस सर्व माहिती मिळाल्याचे सिध्द होते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कल्पना देऊनही अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती दिली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २३-०३-२००७ रोजी निर्णय दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस ५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले होते. त्यांचे सदर पत्र व त्यांच्या दिनांक २३-०३-२००७ रोजीच्या आदेशास काढलेले शुध्दीपत्र होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात दिनांक २०-०२-२००७ रोजी आवश्यक ते शुल्क भरण्याचे पत्र पाठविले होते असे त्यांचे म्हणणे आहे.

तथापि हे पत्र त्यांनी खरोखरच अपिलार्थीस पाठविले होते किंवा कसे या संदर्भातील कोणताही पुरावा ते आयोगासमोर, त्यांना आवश्यक आगाऊ सूचना देऊनही, सादर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्या कथित पत्राचा अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अथवा व्दितीय अपील अर्जामध्ये कोठेही उल्लेख केला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी त्यांच्या प्रथम अर्जासंदर्भात विहित मुदती मध्ये कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केल्याचे सिध्द होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) चा चुकीचा अर्थ काढून अपिलार्थीचे अपील फेटाळले. थोडक्यात जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून योग्य त्या समर्थनाशिवाय प्रदीर्घ कालाकरिता वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप लहान व सरळ असे होते त्यामुळे ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत देण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण होती असे आयोगास वाटत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या फक्त प्रती काढून त्या अपिलार्थीस पुरवावयाच्या होत्या हे काम जन माहिती अधिकारी यांच्या अवाक्याबाहेर चे होते असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी एकूण ८३ दिवसाचा असमर्थनीय विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही अर्जदारास माहिती देण्याकरिता सहाय्य करणारे त्यांचे इतर सहाय्यक व कर्मचारी या सर्वांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे हे पाहता संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना सहाय्य करणारे सर्व संबंधीत कर्मचारी हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत व तसेच त्यांनी

अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव येथे सिध्द करुन स्वतःला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र ठरविल्याचे दिसून येत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे इतर सहकारी कर्मचारी या सर्वांना मिळून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण ८३ दिवसाच्या विलंबाबाबत त्यांना एकूण रुपये २०७५० /- (अक्षरी- रुपये वीस हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात एप्रिल २००८ पासून करावा.

लेखा शिर्ष संकेतांक “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”

सदर शास्तीच्या रक्कमेची कर्मचारीनिहाय विभागणी उपविभागीय कृषि अधिकारी जालना यांनी यथायोग्यरित्या, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील असे पहावे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल

मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे सहाय्यक / कर्मचारी या सर्वाना मिळून त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या ८३ दिवसाच्या विलंबाबाबत एकूण रुपये २०७५० /- (रुपये वीस हजार सातशे पन्नास फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीच्या रक्कमेचा भरणा त्यांनी वर निर्णयामध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर सहाय्यक कर्मचारी हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात नियमीतपणे व जास्तीत जास्त ५ हप्त्यात करतील याची खात्री उपविभागीय कृषि अधिकारी जालना यांनी करुन घ्यावी व यासंदर्भातील आपला अहवाल एप्रिल २००८ पासून पुढे दरमहा नियमितपणे आयोगास पाठवावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश गंगाराम बनकर, रा. ताडकळस, पो. सिपोरा (बाजार), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी

कार्यालय भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कोषागार अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९६

निर्णय दिनांक २६-०३-२००८

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, : अपिलार्थी
पिंपळगाव रेणुकाआई तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय कृषि अधिकारी,
जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन संतुकराव देशमुख (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद श्री. माधव सुभाषराव बोईनवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी यांचे प्रतिनिधी तंत्र अधिकारी श्री. नंदकुमार अनंतराव टाक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील श्री. डी. एस. वनवे कृषि सहाय्यक यांच्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

' श्री. डी. एस. वनवे कृषि सहाय्यक यांच्या कार्यकाळात झालेल्या कामाची गावनिहाय यादी, मजूर हजेरी, गहू कुपन्स व टेंभुर्णी मंडळ अंतर्गत अंदाजपत्रक (सत्यप्रत) '

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असून माहितीचा कालावधी या मुद्दयासमोर श्री. वनवे कृषि सहाय्यक जाफ्राबाद कार्यालयात आल्यापासून असे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्या कार्यालयातील साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वापरावी लागणार असल्याने ही माहिती प्रत्यक्ष येऊन पाहणी करण्याचे अपिलार्थीस कळविले. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांनी आयोगासमोर सांगितले. तर जन माहिती अधिकारी यांनी सदर पत्र अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविल्याचे सांगून सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रित्यर्थ त्यांच्याकडील जावक रजिस्टर नोंदवहीची झेरॉक्स आयोगास सादर केली. याचे अवलोकन करता सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येते. तथापि जावक नोंदवहीतील सदर नोंदी या वेगळ्या अक्षरात केल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना ५ दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिका-यास सूचित केल्याचे दिसून येते. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिली आहे. तसेच सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलाची सुनावणी न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०६-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही दिली नाही त्यामुळे त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती त्यांना आजही अपेक्षित आहे. त्यांच्या दिनांक ०२-०२-२००७ च्या अर्जासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांनी अपिलार्थीस सदर माहितीची पाहणी करण्याचे त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी अर्धी माहिती आज रोजी तयार असून उर्वरीत अर्धी माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांना कमीत कमी ३ आठवडे लागतील असे त्यांनी सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या अपील अर्जासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ५ दिवसाच्या आत देण्याची सूचना त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये केली होती.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात श्री. वनवे या कृषि सहाय्यकाच्या कालावधीतील कामाची माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. श्री. वनवे हे जाफ्राबाद येथील कार्यालयात गेली दहा वर्षे कार्यरत होते. अपिलार्थीने मागितलेली माहिती या दहा वर्षाशी संबंधीत असल्याने अपिलार्थीच्या माहितीची व्याप्ती विस्तृत व मोठ्या स्वरुपाची आहे हे खरे आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदती मध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये कारवाई केली असे त्यांचे म्हणणे आहे. तथपि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याच्या जन माहिती अधिकारी यांच्या दाव्यापुष्ट्यर्थ त्यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. तथापि जावक रजिस्टरमधील

सदर नोंद आयोगास हस्ताक्षरातील फरकामुळे संशयास्पद वाटते. अपिलार्थीने माहितीसाठीच्या प्रथम अर्ज करुन आजतागायत, म्हणजे एक वर्षाहून अधिक कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती पूर्णतः प्राप्त झाली नाही ही बाब संबंधीत जन माहिती अधिकारी व कृषि विभागातील अधिकारी यांच्या माहितीचा अधिकार अधिनियमा-संदर्भातील नकारात्मक मनोवृत्तीचे दर्शन घडविते असे आयोगाचे स्पष्ट मत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती जरी मोठ्या प्रमाणात होती तरी सदर माहिती या कालावधीमध्ये तयार करुन ठेवणे हे जन माहिती अधिका-यास सहज शक्य होते. त्यांच्याच कार्यालयातील जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पाच दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दिनांक २१-०५-२००७ रोजीच्या पत्रामध्ये सूचित देखिल केले होते तथापि आज त्यांनी केलेल्या युक्तिवादा-च्या वेळी उर्वरीत माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांना किमान ३ आठवड्याचा कालावधी लागेल असे त्यांचे म्हणणे आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ती अपिलार्थीस अपेक्षित स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासाठी लागणारा कालावधी व प्रत्यक्ष व्यपगत झालेला कालावधी यांचे प्रमाण पूर्णतः व्यस्त असल्याने या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे इतर सर्व सहाय्यक हे अपिलार्थीस माहिती पासून इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्यास सारखेच जबाबदार ठरत आहेत. याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेता यापुढे माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये माहिती मागण्याच्या आकारमानावर काही मर्यादा निश्चितपणे घालणे आवश्यक आहे असे प्रकर्षाने वाटत आहे. अपिलार्थीस त्यांना हव्या असलेल्या माहितीपासून इतक्या प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवण्याच्या या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे असे आयोगाचे

मत आहे. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियमा-तील कलम ७ चा भंग केल्याचे दिसून येते. त्याचबरोबर येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, अपिलार्थीने त्यांनी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले व गेले असल्यास त्यासंबंधी पुरावा अपिलार्थी यांच्याकडे मागितला असता अपिलार्थी तशा प्रकारचा पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. आयोगास असे आढळून आले आहे की, ब-याच ठिकाणी अर्जदार विस्तृत स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कडून व्यक्तिशः मागवित असतात. तथापि एकदा अर्ज दिल्यानंतर सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात परत कधीही उपस्थित राहत नाही किंवा रहात असल्यास त्या संबंधात कोणताही पुरावा आयोगासमोर दाखल करत नाहीत. तदनंतर विहित मुदत व्यपगत झाली की जन अपिलीय अधिकारी, आयोग यांच्याकडे अपीले करत असतात. त्या सर्व अपिलामध्ये सर्वसाधारणतः संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची मागणी बहुतेक सर्व अर्जदारांनी केलेली असते हे पाहता प्राप्त झालेल्या माहितीतून अपिलार्थी खरोखरच व्यापक जनहित साध्य करणार आहेत किंवा कसे हा प्रश्न कायम अनुत्तरीत राहतो. विचाराधीन प्रकरणात नेमके असेच घडले आहे. त्यामुळे अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची मागणी मान्य करता येत नाही. मात्र या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव मात्र निश्चितपणे स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, कृषि आयुक्त, पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्यावर, उपरोक्त प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल कृषि आयुक्त, पुणे यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश

निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्य आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, पिंपळगाव रेणुकाआई तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९९७

निर्णय दिनांक २६-०३-२००८

१ श्री. रखमाजी अंबाजी दौंड, : अपिलार्थी
(ग्रामपंचायत सदस्य, लेंडेवाडी),
रा. लेंडेवाडी तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा नायब तहसीलदार (म),
तहसील कार्यालय परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रखमाजी अंबाजी दौंड व त्रयस्त पक्ष श्री. बळीराम गणपत दौंड हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय परळी वैजनाथ श्री. गणपतराव किशनराव सिरसाट (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन

अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार परळी वैजनाथ श्री. मारुती माधवराव आनंदा (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-२००६ ते ३१-१२-२००६ या कालावधीतील मौजे लेंडेवाडी तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. बळीराम गणपती दौंड यांनी धान्य व रॉकेल वाटप केलेल्या रजिस्टरच्या सत्यप्रती मिळण्याबाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. मौजे लेंडेवाडी ता. परळी वै. जि. बीड येथील स्वस्त धान्य दुकानदार यांनी मागील एक वर्षामध्ये वाटप केलेल्या धान्य व रॉकेल रजिस्टरच्या सत्यप्रत द्याव्यात.

२. सदर दुकानदार यांच्याकडे असलेल्या दौंडी रजिस्टर, साठा रजिस्टर, भेट रजिस्टर, इत्यादी रजिस्टरच्या सत्यप्रति द्याव्यात.

३. सदर दुकानदारानी सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानाची पाटी, भावफलक बोर्ड, लावला आहे किंवा नाही याची माहिती द्यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, " आपण मागणी केलेली माहिती संबंधीत विभागास संकलीत करण्यास वेळ लागत आहे करिता उक्त माहिती देण्यासाठी आणखी १५ दिवसाचा वेळ वाढवून देण्यात यावा. माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल. " तदनंतर परत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०२-२००७ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीने मागितलेली माहिती तहसील कार्यालयातील ज्या अ. का. शी संबंधीत

होती त्या अ. का. ने माहिती अधिका-यांना लिहिलेल्या पत्राची प्रत माहिती अधिका-याने दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रासोबत जोडली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधीत अ. का. ने लिहिलेले म्हणजेच जन माहिती अधिकारी यांना लिहिलेल्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्राच्या शेवटच्या परिच्छेद खालील प्रमाणे आहे.

" अर्जदार यांनी मागितलेली माहिती गैरवाजवी शासकीय यंत्रणेवर दडपण आणण्याच्या उद्देशाने व कुठल्याही समाजहिताशी संबंधीत नसून स्वतःच्या स्वार्थग्रहीत धरुन केलेली असल्यामुळे ती देता येणार नाही. वरील प्रमाणे अर्जदारास कळविण्यात यावे." थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील माहिती त्यांच्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये देण्याचे नाकारले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १५-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सदर अपील दिनांक १५-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन संबंधीत जन माहिती अधिकारी, अ. का. पुरवठा त्यांचेवर, अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अंतीमतः दिनांक १६-०३-२००७ रोजी सुनावणी घेऊन या प्रकरणातील आपले आदेश दिनांक २८-०३-२००७ रोजी पारीत केले आहेत. सुनावणीसाठी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०३-२००७ रोजी उपस्थित होते. अपिलार्थीच्या

अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत पुरवठा तपासणी अधिकारी, संबंधीत अ. का. पुरवठा व संबंधीत स्वस्त धान्य दुकानदार यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरवावी असे आदेश देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या अपील निणयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाबाबत त्यांनी तत्कालीन पुरवठा तपासणी अधिकारी श्रीमती लटपटे व अ. का. पुरवठा श्री. सुरवसे यांना जबाबदार धरले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर संबंधीत दुकानदाराने अपिलार्थीस दिनांक ०५-०४-२००७ रोजी व तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाने दिनांक १७-०४-२००७ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविल्याचे दिसून येते. संबंधितां-कडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना दिनांक १७-०४-२००७ रोजी दिलेली माहिती त्यांनी मूळ अर्जात नमूद केल्याप्रमाणे सत्यप्रतीच्या स्वरुपात दिली नसल्याचे नमूद करुन संबंधीत जन माहिती अधिकारी, पुरवठा तपासणी अधिकारी व पुरवठा अ. का. यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० अन्वये कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे आयोगास लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला असून सुनावणीसाठी अपिलार्थी स्वतः गैरहजर आहेत. यामध्ये त्यांनी आयोगाकडे करण्यात आलेल्या दुसरे अपील केवळ श्री. एम. डी. सुरवसे, अ. का. पुरवठा यांनी त्यांना माहिती देतांना “ अर्जदार यांनी मागितलेली माहिती गैरवाजवी, शासकीय यंत्रणेवर दडपण आणण्याच्या उद्देशाने व

कुठल्याही समाजहिताशी संबंधीत नसून स्वतःच्या स्वार्थग्रहीत धरुन केलेले असल्यामुळे ती त्यांना देता येणार नाही." असे नमूद केले असल्यामुळे व सदर विधानात त्यांनी अपमानकारक शब्द वापरल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना शासन व्हावे या उद्देशाने सदर अपील केले आहे असे नमूद करुन माहिती मिळण्याबाबत आता त्यांची कोणतीही तक्रार राहिली नसून इतर अधिकारी अथवा कर्मचारी यांच्याविषयी त्यांची कोणतीही तक्रार नाही असेही त्यांनी या अर्जात अंतीमतः नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे ०३-०१-२००७ रोजी प्राप्त झाला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार श्रीमती लटपटे व अ. का. यांच्याशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी या अर्जाची प्रत त्यांना दिनांक ०४-०१-२००७ रोजी पाठवून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे दिनांक १४-०१-२००७ पर्यत देण्याचे पत्राव्दारे सूचित केले. संबंधीत नायब तहसीलदार व अ. का. पुरवठा यांच्याकडून त्यांना वेळोवेळी स्मरणपत्रे देऊनही अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांच्याकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस ती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना पुरविता येणे शक्य झाले नाही. या प्रकरणी पुरवठा विभागाचे संबंधीत नायब तहसीलदार श्रीमती लटपटे यांना प्रथम दिनांक १४-०१-२००७ रोजी पत्र व तदनंतर दिनांक १७-०१-२००७, २५-०१-२००७ रोजी स्मरपणपत्रे देखील दिली होती. सदर स्मरणपत्रे प्राप्त झाल्यानंतर पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार श्रीमती लटपटे व अ. का. सुरवसे यांनी दिनांक २८-०१-२००७ रोजी त्यांच्याकडे पत्र पाठवून अपिलार्थीकडून वेळ वाढवून घ्यावा अशी त्यांना विनंती केल्याने त्यांनी दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यास वेळ वाढवून देण्याची विनंती केली. यानंतर

त्यांनी पुरवठा विभागाच्या संबंधित अधिका-याना दिनांक १२-०२-२००७ रोजी तिसरे स्मरणपत्र पाठविले. तथापि सदर स्मरणपत्रावर संबंधितांनी आक्षेप घेऊन त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५ (५), २० बाबत खुलासा मागितला. एवढा पत्रव्यवहार होऊन वेळ वाढविण्यास पत्र देऊनही अपिलार्थीस माहिती न पुरविता त्यांनी दिनांक १४-०२-२००७ रोजी जन माहिती अधिका-यास कायद्याशी विसंगत असे पत्र देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जावर विहित कालावधीमध्ये निर्णय देणे बंधनकारक असल्यामुळे त्यांनी पुरवठा विभागाकडून आलेले पत्र अपिलार्थीस जसेच्या तसे पाठविले. यानंतर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी अपील केल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या निर्णयामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यास संबधितांना सूचित केल्यावरुन संबंधीत दुकानदार व पुरवठा विभागाच्या संबंधीत अधिका-याने अनुक्रमे दिनांक ०५-०४-२००७ व १७-०४-२००७ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य दिली आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्या स्तरावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्रामाणिक प्रयत्न केले असून संबंधीत पुरवठा शाखेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने व अंतीमतः ती अपिलार्थीस संबंधीत शाखेकडून नाकारली गेली असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता विलंब झाला. सदर विलंब तत्कालीन नायब तहसीलदार श्रीमती लटपटे व अ. का. यांच्या स्तरावर झालेला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याशी सरळ संबंधीत नव्हती त्यामुळे त्यांनी सदर माहिती ज्या यंत्रणेशी संबंधीत होती त्या

यंत्रणेशी संपर्क साधून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात प्रामाणिकपणे प्रयत्न केले आहेत. तथापि तत्कालीन नायब तहसीलदार पुरवठा व अ. का. पुरवठा यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात विलंब लावल्याने अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली. या संदर्भातील अपिलातील दिनांक २८-०३-२००७ रोजी दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाकडे त्रयस्त पक्षाने त्यांचा लेखी युक्तिवाद सादर करुन त्यांनी दिनांक ०५-०४-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याचे नमूद केले आहे व त्यांनी त्याचबरोबर त्याच दिवशी संबंधीत माहिती अधिकारी यांना देखील त्याप्रमाणे अवगत केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मुळात त्यांच्या दिनांक ०३-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याशी सरळ संबंधीत नव्हती मात्र त्यांच्या कार्यालयातील पुरवठा शाखेशी ती संबंधीत होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (त) तरतुदीनुसार संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती कारवाई विहित मुदतीत या प्रकरणी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तहसील कार्यालया-तील पुरवठा विभागाने त्यांना कोणत्याही प्रकारचा विहित मुदतीत सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती पुरविण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर वेळोवेळी स्मरणपत्रे पाठवून अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब होत असल्याबाबतची जाणीव पुरवठा विभागातील संबंधीत अधिका-यांना दिल्याचे देखील त्यांच्या पत्रव्यवहारावरुन स्पष्ट होते. पुरवठा विभागातील अधिका-यांनी प्रथमतः अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठी जास्तीची

मुदतवाढ मागवून घेतली त्यांची ही कृती माहितीचा अधिकार अधिनियमा-तील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत असून अशा प्रकारची कोणतीही मुदतवाढ अपिलार्थीस जन माहिती अधिका-यास मागता येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी संबंधितास वेळोवेळी स्मरणपत्रे पाठवून देखील अंतीमतः त्यांनी माहिती देण्यास नाकारले. माहिती नाकारण्याचे कारण त्यांनी खालील प्रमाणे दिले आहे.

“ अर्जदार यांनी मागितलेली माहिती गैरवाजवी शासकीय यंत्रणेवर दडपण आणण्याच्या उद्देशाने व कुठल्याही समाजहिताशी संबंधीत नसून स्वतःच्या स्वार्थग्रहीत धरुन केलेली असल्यामुळे ती देता येणार नाही. वरील प्रमाणे अर्जदारास कळविण्यात यावे. ” थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील माहिती त्यांच्या दिनांक १४-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये देण्यास नाकारले आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीस माहिती नाकारण्यासाठी त्यांनी दिलेले वरील कारण समर्पक नाही. याउलट केवळ अपिलार्थीस माहिती या ना त्या कारणाने नाकारणे असा उद्देश संबंधित अधिका-याच्या मनात असावा असे या त्यांच्या उत्तरावरुन स्पष्ट होत आहे. त्यांनी अपिलार्थीस माहिती नाकारण्याचे हे कारण वैध ठरत नसल्यामुळे व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ७४ दिवसाचा विलंब या घटनाक्रमाचे कोणत्याही टप्प्यावर समर्थनीय असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक ०२-०२-२००७ रोजी त्यांना अपेक्षित असलेली माहिती मिळणे अभिप्रेत असतांना त्यांना संबंधितांकडून दिनांक १७-०४-२००७ रोजी माहिती पुरविली गेली. ही माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांच्याककडून एकूण

७४ दिवसांचा असमर्थनीय विलंब लागल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीन्वये जन माहिती अधिका-यास अर्जदाराने मागितलेली माहिती देण्यासाठी जे इतर सहाय्यक व कर्मचारी जबबदार असतात त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून संबोधावे अशी तरतूद आहे.

सबब उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ७४ दिवसांचा विलंब लावल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे तत्कालीन सहाय्यक यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण एकूण रुपये १८५०० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात एप्रिल २००८ पासून करावा.

लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा एप्रिल २००८ महिन्यापासून पुढे नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची खात्री तहसीलदार परळी वैजनाथ यांनी करुन यासंदर्भातील आपला अहवाल मे २००८ महिन्यापासून पुढे दरमहा आयोगास पाठवावा. अपिलार्थीस साक्षांकीत माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना साक्षांकीत स्वरुपात हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना साक्षांकीत स्वरुपात हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांना या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे तत्कालीन सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण एकूण रुपये १८५०० /- (अक्षरी- रुपये आठरा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये निर्णयात दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

४. तहसीलदार परळी वैजनाथ यांनी संबंधीत अधिकारी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून नियमीत शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात करतील असे पहावे व आपला अनुपाल अहवाल आयोगास मे २००८ महिन्यापासून दरमहा नियमीत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रखमाजी अंबाजी दौंड, (ग्रामपंचायत सदस्य, लेंडेवाडी), रा. लेंडेवाडी तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२४

निर्णय दिनांक २६-०३-२००८

१ श्री. महेंद्र कन्हैयालाल जैन, : अपिलार्थी
१७६, पोलन पेठ, कापड बाजार,
जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था,
नाशिक विभाग नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. महेंद्र कन्हैयालाल जैन यांचे प्रतिनिधी श्री. अमीत महेंद्र जैन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, श्री. उत्तम मगदुमहुसेन जागीरदार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०३-२००५ रोजीच्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

' मा. पोलिस निरिक्षक, शहर पोलिस स्टेशन, जळगाव यांनी श्री महावीर अर्बक को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. जळगाव यांची चौकशी करण्याबाबत दिलेल्या अर्जाची प्रत व चौकशी केल्याबाबतचा अहवाल. '

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर दिनांक १०-०४-२००५ असा दिनांक लिहिला गेला आहे तथापि सदर दिनांक चुकीने लिहिला गेला असल्याचे अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर लेखी शपथपत्र सादर केले आहे. तद्वतच सदर दिनांक १०-०४-२००६ असा समजावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक १२-०४-२००६ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला आहे.

अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी तालुका उप निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दिनांक १५-०४-२००६ रोजी संबंधीत तक्रार अर्ज चौकशीकरिता पाठवून त्याच्यावर अहवाल मागविला. सदर अहवाल त्यांच्याकडे संबंधीतांकडून दिनांक १२-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस सदर अहवालाच्या प्रती दिनांक १९-०६-२००६ रोजी पाठविण्याचा प्रयत्न केला. तथापि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीने समक्ष टपाल घेण्यासाठी नकार दिल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००६ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती पोस्टाने पाठविली.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याने सदर माहिती मिळण्याची व संबंधीतावर नियमाप्रमाणे शास्ती लावण्याची मागणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या अपील अर्जामध्ये केली आहे.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १५-०७-२००६ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची शास्ती न लावल्याने राज्य माहिती आयोगाकडे सदरचे अपील दाखल केल्याचे म्हटले आहे. तद्वतच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नसल्याचेही या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जी माहिती मागितली होती ती त्यांना अधिनियमातील

विहित तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी न पुरविता त्यांना दिनांक २२-०६-२००६ रोजी पोस्टाने प्राप्त झाली. सदर माहिती त्यांना अधिनियमातील विहीत तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली असल्याने त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी. याच बरोबर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्याअगोदर आवश्यक ते शुल्क देखील कळविले गेले नाही. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती त्यांनी साक्षांकीत करुन दिलेली नाही. या कारणामुळे त्यांचे अपील मंजूर करुन जन माहिती अधिका-यास शास्ती लावावी अशी त्यांनी त्यांच्या निवेदनात विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १२-०४-२००६ रोजी प्राप्त झाला. तदनंतर सदर तक्रार अर्ज त्यांनी तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रारीची चौकशी करण्यासंदर्भात दिनांक १५-०४-२००६ रोजी पाठविला. तालुका उपनिबंधक सहकारी संस्था यांच्याकडून सदर चौकशी अहवाल त्यांना दिनांक १२-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. तदनंतर त्यांनी दिनांक १५-०६-२००६ रोजी अपिलार्थीस सदर माहितीच्या नकला पुरविण्यास प्रयत्न केला. तथापि अपिलार्थी हे उपलब्ध न होऊ शकल्याने अपिलार्थीस त्यांनी दिनांक २०-०६-२००६ रोजी सदर माहिती पोस्टाने पाठविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीन्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००५ रोजी अर्ज देऊन पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन शहर जळगाव यांच्या श्री. महावीर अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी जळगाव यांची चौकशी करण्याबाबत दिलेल्या अर्जाची प्रत व चौकशी केलेल्या अहवालाची प्रत

मागविली होती. पोलीस निरिक्षकाकडून सदर तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००६ रोजी प्राप्त झाला होता. या टप्प्यावर त्यांनी सदर तक्रारीची प्रत व या तक्रार अर्जासंदर्भातील चौकशीची तत्कालीन स्थिती जर अपिलार्थीस लागलीच कळविली असती तर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली असती. तथापि जन माहिती अधिकारी सदर तक्रारीची संबंधीत तालुका उपनिरिक्षकाकडून पूर्ण चौकशी होण्याची वाट पाहत राहिले व तदनंतर चौकशी अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तो अपिलार्थीस दिनांक २०-०६-२००६ रोजी अंतीमतः पोस्टाने त्यांना पाठवून दिला. अपिलार्थीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिका-यास प्राप्त होणे व त्यांनी अपिलार्थीस अंतीमतः उत्तर देणे यामधल्या कालावधीतील घटनाक्रमाचा उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५-०७-२००६ रोजीच्या निर्णयामध्ये ऊहापोह केला आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधीत शाखेचे काम पाहणा-या तत्कालीन लिपीक श्रीमती पाटील यांच्याकडून अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. यासंदर्भात श्रीमती पाटील यांचा खुलासा विभागीय सह निबंधक यांनी घेतला असता त्यांनी दिनांक २२-०६-२००६ रोजी सादर केलेल्या खुलाशामध्ये कार्यबाहुल्यामुळे नजरचुकीने सदरची कारवाई राहून गेली आहे असे म्हटले आहे. अर्थात संबंधीत सदर खुलासा प्रशासनाने अमान्य केला आहे. माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने कोणतीही माहिती सार्वजनिक प्राधिकरणाकडे मागितल्यास त्याच्यावर कशा प्रकारे कारवाई करावयाची त्याचे विस्तृत विवेचन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ मध्ये केलेले आहे. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावरील निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे प्रथमतः करावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केल्याचे

आयोगास आढळून येत नाही. सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस त्यांना अपेक्षित केलेली माहिती दिनांक ११-०५-२००६ रोजी अगर तत्पूर्वी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी देणे अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत होते. तथापि अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी दिनांक २२-०६-२००६ रोजी माहिती देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ४२ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे कारण त्यांनी संबंधीत लिपीकाने अपिलार्थीच्या अर्जावर कार्यबाहुल्यामुळे कोणतीही कारवाई केली नाही असे दिले आहे. विलंबाची अशा प्रकारची कारणे कोणत्याही परिस्थितीमध्ये विशेषतः माहिती अधिकार अधिनियम अस्तित्वात असतांना, समर्थनीय ठरु शकत नाहीत त्यामुळे हा विलंब असमर्थनीय ठरतो असे आयोगाचे मत आहे. संबंधीत लिपिक अपिलार्थीस माहिती देण्याकरिता नियुक्त केलेले जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे कर्मचारी आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याप्रित्यर्थ सहाय्य करणारे त्यांचे इतर कर्मचारी व अधिकारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे.

सबब अपिलार्थीस या सर्वांनी मिळून माहिती देण्यासाठी ७४ दिवसांचा असमर्थनीय विलंब लावल्याबद्दल संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक कर्मचारी / अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण एकूण रुपये १०५०० /- (अक्षरी- रुपये दहा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात करावा.

लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी विभागीय सह निबंधक सहकारी संस्था नाशिक यांनी त्यांना हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत करावी व संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची खात्री विभागीय सह निबंधक सहकारी संस्था नाशिक यांनी करुन यासंदर्भातील आपला अहवाल मे २००८ महिन्यापासून पुढे दरमहा आयोगास पाठवावा. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये माहिती साक्षांकीत करुन मागितली नसल्याने त्यांनी आज रोजी युक्तिवादामध्ये उपस्थित केलेला साक्षांकीत माहितीचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहाय्यक व कर्मचारी / अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या एकूण ४२ दिवसाच्या असमर्थनीय विलंबाबाबत प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण एकूण रुपये १०५०० /- (अक्षरी- रुपये दहा हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा

भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये निर्णयात दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

३. विभागीय सह निबंधक सहकारी संस्था नाशिक यांनी सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी त्यांना हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत करावी.

४. विभागीय सह निबंधक सहकारी संस्था नाशिक यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी / अधिकारी हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात मे २००८ पासून पुढे दरमहा करतील असे पहावे व आपला अनुपाल अहवाल आयोगास मे २००८ महिन्यापासून दरमहा नियमीत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २६-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महेंद्र कन्हैयालाल जैन, १७६, पोलन पेठ, कापड बाजार, जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२१

निर्णय दिनांक : २६-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री.शेख खॉजा नसरुद्दीन निजामुद्दीन<br>रा. डॉ. पठाण यांच्या दवाखान्याच्यावर,<br>झेंडीगेट,अहमदनगर | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय)<br>अहमदनगर,औरंगाबाद रोड, एस.पी.चौक,अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर,<br>औरंगाबाद रोड, एस.पी.चौक,अहमदनगर | | |

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.शेख खॉजा नसरुद्दीन निजामुद्दीन (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक

(मुख्यालय) अहमदनगर, श्री. सुहास राजाराम राणे, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,अहमदनगर श्री. अशोक डोंगरे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत,

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. ४.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या पारपत्र चौकशीसंदर्भात दि. १५.७.२००५ ते अर्ज करण्याच्या तारखेपर्यन्तच्या कालावधीतील माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

"१.माझ्या पारपत्र संदर्भात मी १५.७.२००५ रोजी केलेल्या अर्जावर आपल्या विभागामार्फत जी माहिती पाठविली गेली त्याचा संपूर्ण तपशील.

२. उपरोक्त आहावालावर ठेवलेला रिपोर्ट स्वाक्षऱ्या व अहवाल ज्या बाबीनवर आधारीत होता त्या सर्व बाबी, कागदपत्र, पुरावे संदर्भ.

३. सोबत जोडलेल्या झेरॉक्स पत्राच्या आपल्या मार्फत जी कारवाई झाली असल्यास त्याचा तपशील-

सोबत पत्राची झेरॉक्स पत्र जा.क्र.५८७६/०५ दि. १९ जून ,२००५"

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे उत्तर दिले आहे.

"वरील विषय व संदर्भान्वये आपला दिनांक ०४.०७.२००७ चा अर्ज आमचे कार्यालयात दिनांक ०७.७.०७ रोजी प्राप्त झालेला आहे.

कृपया आपण मागणी केलेल्या माहितीबाबत पोलीस निरिक्षक जिल्हा विशेष शाखा यांचे कडून माहिती मगविली असता, मा.उप सचिव, महाराष्ट्र शासन गृहविभाग म.रा.मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक एचडीओ-१००५/२४२४/प्रक्र-२९२/आस्था-१दि.२९.१०.२००५ अन्वये केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम-२००५

अंतर्गत तयार केलेला नियम व अधिनियमाच्या व्याप्तीतून जिल्हा विशेष शाखेमधील **गुप्तवार्ताची माहिती** देणेस वगळण्यात आलेले आहे.

गुप्तवार्ताची माहिती देणेस वगळण्यात आलेले असल्यामुळे आपणास माहिती पुरविता येत नाही."

जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १७.८.२००७ रोजी प्रथम अपिल केले. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.८.२००७ रोजी घेऊन या संदर्भातील आदेश दि. २८.८.२००७ रोजी पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थींना त्यांनी प्रथम अपिल सुनावणीचे वेळी मागणी केलेली दि. ११.१०.२००५ च्या राजपत्राची प्रत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.९.२००७ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची आयोगाचे कार्यालयात दि. १९.९.२००७ रोजी नोंद झाली आहे. या अपिल अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्याचे व त्यांना माहिती नाकारल्याबद्दल व अपिलात काहीही कार्यवाही न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांचेवर नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश निर्गमित करण्याबद्दल आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी पारपत्र मिळविण्यासाठी पारपत्र कार्यालयाकडे दोन वर्षापूर्वी अर्ज केला होता. तथापि अद्यापही जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातर्फे दिल्या जाणाऱ्या योग्य त्या अहवालाअभावी त्यांचे पारपत्र प्रलंबित आहे. या पारपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये निश्चित कोणता अडथळा आहे, हे जाणून घेण्यासाठी त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. त्यांनी दि. ४.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक आहे. त्यांना पारपत्र मिळण्यात निश्चितपणे काय अडथळा आहे, हे समजल्यानंतर ते योग्य त्या

प्राधिकरणाकडे न्याय मागू शकतील व त्यांना पारपत्र मिळणे सुकर होईल, असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील विशेष शाखेशी संबंधित आहे. सदर शाखेस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमधून शासनाचे दि. ११.१०.२००५ च्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वगळले गेले असल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या शाखेला लागू होत नाही व त्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती देता येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जरी राज्याच्या विधानसभा अथवा विधान परिषदेत जरी विचारली गेली तरी, सदर माहिती उघड करता येणार नाही, असा युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांनी सदर युक्तीवादामध्ये अंतिमतः केला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जिल्हा विशेष शाखेमधील गुप्तवार्तासंबंधी असून, ती माहिती देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीतून वगळण्यात आली असल्यामुळे, अपिलार्थीस देता येणार नाही, व अपिलार्थीस तसे जन माहिती अधिकारी यांचेकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांच्या जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्राप्त अपिल अर्जावरील झालेल्या सुनावणीमध्ये त्यांनी केलेल्या विनंतीवरुन त्यांना, संबंधित अधिसूचनेची प्रतही देण्यात आली असून, त्यांची पोच अपिलार्थी यांचेकडून घेण्यात आली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पोलीस दलाच्या जिल्हा विशेष शाखेशी संबंधित असून, ही विशेष शाखा महाराष्ट्र शासनाच्या दि. २४.१०.२००५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे माहिती अधिकारातील कलम २४ च्या उपकलम ४ अन्वये वगळली गेली असल्याने, आयोगाच्या अधिकारीतेवर येथे मर्यादा येत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या शाखेशी संबंधित होती त्या शाखेस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश देता येणार नाहीत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी विहित नियमानुसार व

तरतुदीनुसार या प्रकरणी कार्यवाही केली असल्याने, त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे,

## निर्णय

अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री.शेख खॉजा नसरुद्दीन निजामुद्दीन,रा. डॉ. पठाण यांच्या दवाखान्याच्यावर, झेंडीगेट,अहमदनगर
२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) अहमदनगर,औरंगाबाद रोड, एस.पी.चौक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अहमदनगर,औरंगाबाद रोड, एस.पी.चौक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८६

निर्णय दिनांक : २६-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. संपतराव निवृत्ती गोंदकर,<br>मु.पो. शिर्डी, पिंपळवाडी रोड, ता.राहाता<br>जिल्हा अहमदनगर. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा कार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,<br>शिर्डी, जि.अहमदनगर. | : | उत्तरवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. संपतराव निवृत्ती गोंदकर (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री. साईबाबा संस्थान, विश्वस्त व्यवस्था, शिर्डी जि.अहमदनगर श्री. प्रकाश प्रभाकर देशपांडे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. ८.७.२००६ रोजीचे अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे त्यांचेकडील दि. ५.१२.२००५/६.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये रजिस्टर्ड पोस्टाने काही मागिविली होती व त्या माहितीपोटी लागणारे शुल्क रु.५०/- त्यांनी उत्तरवादी यांचेकडे मनिऑर्डरद्वारे पाठविले होते. तथापि उत्तरवादी यांनी तक्रारदाराचे सदर शुल्क जनरल डोनेशनमध्ये वर्ग करुन त्यांना पोच दिली व दि. २४.१२.२००५ च्या पत्रान्वये त्यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन लागलीच पाठविण्यात येईल, असे आश्वासित केले

तथापि, उत्तरवादी यांनी त्यांना कोणतीही माहिती पुरविली नाही. त्यामुळे संबंधित उत्तरवादी यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचे दि. ५.१२.२००५ रोजीच्या अर्जान्वये (जो जन माहिती अधिकारी यांनी दि.६.१२.२००६ रोजी सादर केला) उत्तरवादी यांचेकडून खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"अ) शिर्डी शनी मंदीराची व्यवस्था पहाणाऱ्या श्रीमती कोळी यांना रुई पानाच्या माळा व तेल विकण्यासाठी त्यांचे बांधून दिलेले दर व भक्तांचे माहितीसाठी दरपत्रकाची पाटी लावणे व लिव्ह अँड लासेन्स तत्त्वावर कराराबाबत.

ब) ता.२/१०/१९९८ रोजी शिर्डीचे व्यवस्थापन मंडळाने ठराव निर्णय क्र. २१२(०२) शी निगडीत

क) ता.२/१०/१९९८ रोजी साईसंस्थान व्यवस्थापन मंडळाचे निर्णय ता.२१२/०२ मध्ये वृध्द महिला श्रीमती कोळी हिचे संपूर्ण नाव दिलेले नाही. तसेच सर्व न्यायालयीन दावे म्हटलेले आहे. ते दावे किती त्याचे नंबर व कोणते कोर्टात होते व किती दावे परत घेतले त्याचे नंबरची माहिती मिळावी. तसेच त्यांना फक्त रुईच्या माळा व तेलच विकण्याची परवानगी दिलेली आहे कां? त्याचे दर संस्थानने ठरवून दिले आहेत कां? त्या ठरावाची नक्कल व लिव्ह अँड लायसेन्स या पध्दतीवर चालविण्यास दिल्याच्या करारनाम्याची नक्कल व भक्तांच्या माहितीसाठीच्या आशयाच्या पाटीचा एक फोटो अधिकृत मिळणेस विनंती.

ड) सदरची माहिती पोस्टाने पाठविण्यात यावी त्यासाठी तयाची होणारी फी रु.५० मनीऑर्डने पाठविली आहे.

इ) माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

ई) ता.२/१०/१९९८ रोजीचा ठराव क्र.२१२(०२) अन्वये काय कारवाई केली त्याची माहिती मिळावी तसेच श्रीमती कोळी यांनी कोणत्या कोर्टात दावे दाखल केलेले आहे व किती दाव्यांत तडजोडी झाल्या त्यासंबंधी माहिती कोर्ट कामी आवश्यक आहे. तरी वरीलप्रमाणे माहिती मिळणेस विनंती आहे."

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला आहे की, तक्रारदार यांनी माहितीचा अर्ज केल्यानंतर उत्तरवादी यांनी, तक्रारदारास, त्यांचेकडील दि. २४.१२.२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, त्यांनी मागितलेली माहिती संकलीत करुन त्यांना पाठविण्यात येत असल्याचे कळविले. तथापि सदर माहिती उत्तरवादी यांनी तक्रारदारास अधिनियमाद्वारे

विहित केलेल्या मुदतीत पुरविली नाही. तद्नंतर तक्रारदार यांनी उत्तरवादी यांना दि. ५.९.२००६ रोजी त्यांच्या वकीलामार्फत नोटीस पाठविल्यानंतर उत्तरवादी यांनी दि. २५.६.२००७ रोजी तक्रारदारास ती माहिती पाठविली. तक्रारदारास निश्चितपणे उत्तरवादी यांनी त्यांनी केलेल्या दि. ५.११.२००५ च्या अर्जातील कोणती माहिती दिली, याची पडताळणी करता तक्रारदारास उत्तरवादी यांनी त्यांच्या अर्जातील 'भक्तांच्या माहितीसाठीच्या आशयाच्या पाटीचा एक फोटो' वगळता, उर्वरित सर्व माहिती तक्रारदारास या पत्राद्वारे पुरविल्याचे दिसून येत आहे. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी, उत्तरवादी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियमातील योग्य त्या तरतुदीनुसार अर्ज केला असतांना व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क त्यांचेकडे भरल्यानंतर देखिल, त्यांना, उत्तरवादी यांचेकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांचेवर योग्य ती कठोर प्रशासकीय कार्यवाही करावी.

उत्तरवादी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मूळात माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी शिर्डी संस्थानला लागू होतात किंवा कसे, हे माहित नसल्याने व तक्रारदाराने ज्यावेळी माहिती मागितली त्यावेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका झाल्या नसल्याने तक्रारदारास त्यांनी माहिती पुरविली नाही. त्यावेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांना लागू होतात, हे त्यांना माहिती नव्हते व त्यांनी कायद्याच्या अज्ञानामुळे तक्रारदारास आवश्यक ती माहिती दिली नाही. आता त्यांना शासनाकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू असल्याचे पत्र प्राप्त झाले असून, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार उत्तरवादी यांच्या कार्यालयामध्ये जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नेमणूका केल्या आहेत. शिर्डी संस्थानचा कारभार ज्या विश्वस्त मंडळातर्फे चालविला जातो, त्या विश्वस्त मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी असून सदर संस्थानची धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंद झालेली आहे व तक्रारदार यांनी मागितलेली माहिती धर्मादाय आयुक्त यांनी मागणी केल्यास त्यांना माहिती उपलब्ध होऊ शकेल. हे पाहता, माहितीचा अधिकार अधिनियमातील संपूर्ण तरतुदी शिर्डी संस्थानला लागू होतात, असे दिसून येते.

या प्रकरणी तक्रारदाराच्या मूळ अर्जाकडे उत्तरवादी यांनी आवश्यक ते गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. तक्रारदार यांना, त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांच्या माहितीचा अधिकार अधिनियमाखाली केलेल्या अर्जाच्या संदर्भानुसार हवी आहे, म्हणून असे

आदेशित करण्यात येते की,

## आदेश

१) उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी दि. ५.१२.२००५ च्या अर्जातील मागितलेली संपूर्ण माहिती तक्रारदारास हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) तक्रारादारास माहिती देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीपेक्षा जास्त विलंब झाला असल्याने त्यांनी संस्थानकडे सदर माहिती पोटी भरलेले शुल्क रु.४२/- हे त्यांना उत्तरवादी यांनी हे आदेश निर्गमित होताच आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी करुन, तीन दिवसांचे आत परत करावे.

३) उत्तरवादी यांनी राज्य माहिती आयोगातर्फे या प्रकरणी दर्शविलेल्या हलगर्जीपणाबद्दल सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी यापुढे त्यांचेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीखालील प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर अधिनियमातील तरतुदीआधारे यथायोग्य कार्यवाही त्वरेने करावी, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संपतराव निवृत्ती गोंदकर,मु.पो. शिर्डी, पिंपळवाडी रोड, ता.राहाता जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी, जि.अहमदनगर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८७

निर्णय दिनांक : २६-०३-२००८

१ श्री. निलेश सत्यवान म्हसे पा. : तक्रारदार
फकिरवाडा, इरिगेशन कॉलनी,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,
लालटाकी रोड
अहमदनगर-४१४ ००१.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. निलेश सत्यवान म्हसे पा. (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर श्री. सदाशिव तुकाराम मोढवे हे, त्यांचे वकील श्री. आबासाहेब धर्माजी शिंदे यांचेसह (त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी त्यांच्याकडील दि. ८.९.२००६ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार त्यांचे शैक्षणिक संस्थेसंदर्भात माहिती मागितली होती. सदर

माहिती त्यांना देण्यासाठी उत्तरवादी यांनी एकूण ४०,०००/- इतके शुल्काची त्यांचेकडे मागणी केलेली आहे. सदर शुल्क अवास्तव व कायद्याला धरुन नसल्याचे तक्रारदार यांचे म्हणणे आहे. या अर्जावर त्यांनी संबंधित शिक्षण संस्था कुठलेही पत्र स्वीकारत नाही व पत्र देणाऱ्यास रजिस्टर्ड पोस्टाने पत्र देण्याचे सूचित करतात आणि हे सर्व पाहता, संबंधित संस्थेची चौकशी करण्याचे आदेशित करावे, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे दि. २५.७.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ च्या तरतुदींनुसार उत्तरवादी यांच्या शिक्षण संस्थेसंदर्भात २००० ते २००५ या कालावधीतील काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये काही संस्थेच्या प्रत्येक विभागाचे लेखा परीक्षण अहवालाच्या सत्यप्रती, प्रत्येक विभागाचा जमाखर्च, ताळेबंदपत्रकाच्या सत्यप्रती, नॅक समितीच्या मूल्यांकनाद्वारे संस्थेस मिळालेले एक कोटी रुपये इतक्या रकमेचे विवरणपत्र, संस्थेकडून विद्यार्थ्यांना आकारली जात असलेली फी व इतर संस्थेतर्फे आकारली जात असलेली फी यातील फरकाची कारणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना संपूर्ण वर्षात मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कम, चलनावरील व प्रत्यक्षात हातात पडणारी रक्कम या मधील फरकाची कारणे संस्थेने त्यांच्या शाळेमधून गृहपाठ व निबंधवहया घेण्याकरता विद्यार्थ्यांवर केलेले सक्तीची कारणे- इत्यादी माहितीचा समावेश होता. तक्रारदाराच्या सदर अर्जास उत्तरवादी यांनी त्यांचेकडील दि. १६.८.२००८ रोजी पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन तक्रारदारास आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रु. ४०,०००/- इतके त्यांचे कार्यालयात जमा करण्याची सूचना केली, या पत्रामध्ये त्यांनी तक्रारदारास आवश्यक असलेली माहिती किती पृष्ठांची आहे व सदर माहिती तक्रारदारास देण्यासाठी प्रतिपृष्ठ दर काय याचा उल्लेख केलेला नाही. उत्तरवादी यांचे दि. १६.६.२००६ रोजीच्या पत्रावर तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. २४.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तरवादी यांचेकडे रु.४००००/- शुल्काचे सविस्तर विवरण मागितले होते, तथापि सदर विवरण तक्रारदारास दिले किंवा कसे या संदर्भातील माहितीचा आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रामध्ये समावेश नाही.

या प्रकरणी असे दिसून येते की, तक्रारदार यांना उत्तरवादी यांचेकडून विहित मुदतीत जर, माहिती मिळाली नव्हती तर, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम १९(१) नुसार योग्य त्या अपिलीय प्राधिकरणाकडे प्रथम अपील करावयास हवे होते, तथापि त्यांनी

अधिनियमातील तरतुदींच्या अवलंब न करता, जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल न करता आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ च्या तरतुदीनुसार सदर उत्तरवादी यांचेविरुध्द सरळ तक्रार दाखल केली आहे. मूळात या प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे कोणत्याही प्रकारची सुनावणी होऊन आदेश पारित केले गेलेले नाहीत. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले नाही त्यामुळे तक्रारदाराची तक्रार दाखल करुन घेण्यायोग्य नाही, असे आयोगाचे मत आहे. सबब तक्रारदाराने आयोगाकडे केलेली सदर तक्रार फेटाळण्यात येत आहे. तक्रारदारास आवश्यक असलेल्या व प्राप्त झालेल्या माहिती संदर्भात काही तक्रार असल्यास, त्यांनी योग्य त्या प्राधिकरणाकडे प्रथम अपिल करावे व त्या प्राधिकरणाने दिलेला निर्णय जर त्यांना मान्य नसेल किंवा सदर प्रकरणी अधिनियमातील विहित मुदतीत त्यांनी कोणताही निर्णय दिला नाही, तर ते माहिती अधिकार अधिकार २००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल राज्य माहिती आयोगाकडे दाखल करु शकतील, असे तक्रारदार यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी तक्रारदाराने उत्तरवादी यांच्याकडे प्रथम अपिल केल्यास त्याची प्राधान्याने सुनावणी घेऊन त्यावर संबंधितांनी आपले आदेश त्वरित पारित करावेत, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे करावयाच्या या प्रस्तावित अपिलास होणारा भविष्यातील विलंब क्षमापित करण्यात यावा, असेही त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. निलेश सत्यवान म्हसे पा.फकिरवाडा, इरिगेशन कॉलनी,अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,लालटाकी रोड

अहमदनगर-४१४ ००१ यांना  या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१३

निर्णय दिनांक २७-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मिलींद त्रिंबकराव आठवले,<br>मु. पो. पारगाव, तालुका वाशी,<br>जिल्हा उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, श्री. बंकटस्वामी<br>विद्यालय, खडकीघाट, तालुका जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,<br>बीड, तालुका जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मिलींद त्रिंबकराव आठवले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. बंकटस्वामी विद्यालय, खडकीघाट श्री. कावळे शाहू नारायण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड यांचे प्रतिनिधी क. स. श्री. राऊत दिलीप शंकरराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. बंकटस्वामी विद्यालय, खडकीघाट श्री. म्हस्के सुधाकर शिवाजीराव  हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. बंकटस्वामी विद्यालय खडकी तालुका जिल्हा बीड संदर्भात सन २००० ते २००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १. आपल्या विद्यालयासाठी शासन नियमानुसार तयार केलेल्या रोस्टर रजिस्टरची प्रमाणित प्रत.   सन २००० ते २००६-०७ या कालावधीत नियुक्ती आदेशासह यादी देण्यात यावी. "

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.  अपिलार्थी यांनी या अर्जावर ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे म्हटले असून या अर्जासोबत प्रमाणपत्राची प्रत जोडली असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील २ मुद्यापैकी एका मुद्यासंदर्भातील (नियुक्ती आदेशाच्या प्रती) माहिती अपिलार्थीस पुरविली.  सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १७-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन

जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० नुसार कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

सदर अपिलाची सुनावणी क्ष्यांनी दिनांक १०-०८-२००६ रोजी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ११-०१-२००७ रोजी पारीत केले आहेत. यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ४१ दिवसांचा विलंब लावल्याचा निष्कर्ष काढून त्यांच्यावर विलंबाच्या प्रतीदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये १०२५० /- ची शास्ती लावण्याची आयोगास शिफारस केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०४-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांना पूर्ण माहिती न दिल्याने शास्ती लावण्याची व तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तद्वतच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची देखील आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या दिनांक २८-०६-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेल्या २ मुद्यावरील माहितीपैकी एका मुद्यावर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २८-०७-२००६ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाली आहे. तथापि त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ची म्हणजेच त्यांच्या विद्यालयासाठी नियमानुसार तयार केलेल्या रोस्टर रजिस्टरची प्रत त्यांना जन

माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही व या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुधाकर शिवाजीराव म्हस्के यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे बंकटस्वामी विद्यालयासाठी शासन नियमानुसार तयार केलेल्या रोस्टर रजिस्टरची प्रत मागविली होती. तथापि शासन नियमाप्रमाणे आवश्यक असलेले रोस्टर संस्थेच्या पातळीवर तयार केले जाते व ही माहिती संबंधीत संस्थेकडे उपलब्ध असते. अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीने अर्ज केल्यानुसार एक महिन्याच्या कालावधीमध्ये संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे अपिलार्थीस संबंधीत रोस्टरच्या रजिस्टरची प्रत देण्याची एकदा तोंडी विनंती केली होती. तदनंतर या माहितीसाठी चा संस्थेकडे कोणताही पाठपुरावा केला नाही. कारण लगेच दिनांक १०-०८-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी झाली व या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतेही आदेश दिले नसल्याने त्यांनी यासंदर्भात पुढे काहीही कारवाई केली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जावर त्यांनी आपले आदेश दिनांक ३०-०८-२००६ रोजी पारीत केले आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुलतः अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. वंकटस्वामी विद्यालयात ठेवलेल्या

रोस्टर रजिस्टरची प्रत व २००० ते २००७ या कालावधीतील नियुक्तीच्या प्रती अशा दोन मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती. यापैकी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस श्री. बंकटस्वामी विद्यालयातील रोस्टरच्या संदर्भात योग्य तो खुलासा करुन २००० ते २००७ या कालावधीतील नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या नियुक्ती आदेशाच्या प्रती पुरविल्या आहेत. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २८-०७-२००६ रोजी प्राप्त झाली असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये मान्य केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या रोस्टरसंदर्भातील माहिती उपलब्ध नसल्याचे त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीस कळविले आहे. जर अपिलार्थीने मागितलेल्या माहिती बाबत ही माहिती त्यांच्याकडे तयार नव्हती तर त्यांनी यावेळी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) प्रमाणे कारवाई करावयास हवी होती. म्हणजेच त्यांनी अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाची प्रत संबंधीत संस्थेच्या सचिवाकडे पाठवून त्या पत्राची प्रत अपिलार्थी यांना पाठवावयास हवी होती. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केलेली या प्रकरणी आढळून येत नाही. अशा प्रकारची कृती न करण्याचे कारण त्यांना सुनावणीच्या वेळी विचारले असता त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील या तरतुदीची माहिती नसल्याने त्यांनी अशा प्रकारची कारवाई केली नसल्याचे आयोगास सांगितले. मात्र अपिलार्थीने मागितलेली माहिती आता संस्थेच्या संबंधीत सचिवाकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे त्यांनी कबूल केले आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या सद्सदविवेकबुध्दीला पटेल अशी माहिती दिली आहे. केवळ अधिनियमातील कलम ६ (३) (i) च्या तरतुदीबाबत जन माहिती अधिकारी यांना माहिती नसल्यामुळे ते अपिलार्थीस

आवश्यक ती माहिती पुरवू शकले नाहीत. मात्र सदर माहिती संस्थेकडे उपलब्ध असल्याचे त्यांनी अपिलार्थीस याच पत्रामध्ये कळविले आहे हे पाहता अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने माहिती लपविण्याचा किंवा माहिती दडविण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केला असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ४१ दिवसाच्या विलंब लावल्याचे काढलेले अनुमान चुकीचे आहे कारण सदर विलंबाचा कालावधी ठरवितांना त्यांनी जन माहिती अधिका-यास माहिती देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीन्वये देय असणा-या कालावधीची दखल यामध्ये घेतली नसल्याचे यामध्ये दिसून येते. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरवून अपिलार्थीस माहिती मिळाल्याची दिनांक २८-०७-२००६ ची पोच देखील घेतली आहे. या मुद्यांचा समावेश जन अपिलीय अधिकारी यांच्या उपरोक्त निर्णयामध्ये कोठेही नाही किबंहुना जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस माहिती विहित मुदतीत पुरविल्याचे ज्या कागदपत्रावरुन सिध्द होत आहे त्या कागदपत्राचा विचार जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना केला नसल्याचे दिसून येत आहे. तेव्हा या प्रकरणी केवळ जन माहिती अधिकारी यांच्या कायद्याविषयी असलेल्या अज्ञानापोटी अपिलार्थी माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याचे दिसून येते आहे. अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे व जी माहिती त्यांच्या कडे उपलब्ध नाही ती कोठे उपलब्ध आहे याचेही अपिलार्थीस मार्गदर्शन केले आहे. अपिलार्थीस उर्वरीत माहिती विनामूल्य देण्यासाठी ते आज रोजी तयार आहेत हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ च्या संबंधात संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत

होताच ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. कायद्याचे अज्ञान हा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद आयोग मान्य करत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमातील माहितीच्या तरतुदीचे अज्ञान असणे हे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाचे द्योतक आहे असे आयोग मानतो. त्यांनी उपरोक्त प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (i) चा भंग केल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येऊन इतःपर भविष्यात त्यांनी अशा प्रकारच्या चूका टाळाव्यात असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. याचबरोबर शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद बीड यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात त्यांच्या कार्यक्षेत्रातील खाजगी शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापकाकरिता वेळोवेळी प्रशिक्षण शिबीरे व कार्यशाळा आयोजित कराव्यात जेणेकरुन माहितीचा अधिकार अधिनियमाचा मूळ हेतू सफल होऊ शकेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

४. शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद बीड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीच्या अंमलबजावणीसंदर्भात त्यांच्या कार्यक्षेत्रा-तील खाजगी व सरकारी अनुदानीत, विना अनुदानीत शाळाकरिता वेळोवेळी कार्यशाळा / शिबीरे आयोजित करावीत.

औरंगाबाद
दिनांक २७-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मिलींद त्रिंबकराव आठवले, मु. पो. पारगाव, तालुका वाशी, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. बंकटस्वामी विद्यालय, खडकीघाट, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बीड, तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१४

निर्णय दिनांक २७-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण शेषेराव घुमरे,<br>रा. पारगाव घुमरा, तालुका पाटोदा,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण शेषेराव घुमरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष मुख्याध्यापक बंकटस्वामी विद्यालय, खडकी घाट बीड श्री. कावळे शाहू नारायण हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे बंकटस्वामी विद्यालय खडकी (घाट) जिल्हा बीड या संस्थेसंदर्भात सन २००० ते २००७ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. बंकटस्वामी विद्यालय खडकी (घाट) या शाळेला सन २००० ते २००६-२००७ साठी दिलेल्या संच मान्यतेची सत्यप्रतीत माहिती द्यावी.

२. सन २००० ते २००६-२००७ पर्यत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नवीन नियुक्तीसाठी आपल्याकडे दाखल केलेल्या फाईलची दिलेल्या पावतीसह व आपण मान्य केलेल्या फाईलची पूर्ण पानासह सत्यप्रतीत माहिती द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहीत केलेल्या मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याचे अथवा त्यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक २४-१२-२००६ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिलेला नाही आणि यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतरही त्यांनी त्यांना हव्या असलेल्या माहितीसंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही अथवा त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अद्यापही माहिती अप्राप्त असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आज दिनांक २७-०३-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. सदर माहितीच्या दर्जाविषयी व पुर्णतेविषयी त्यांना माहिती नाही. केवळ कायद्यातून पळवाट काढण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आज माहिती पाठविली आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती देखील अपूर्ण असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

त्रयस्त पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना ०८ किंवा ०९-०३-२००८ रोजी त्यांना शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांच्या कार्यालयातील शिक्षणाधिकारी श्री. सोनवणे यांनी दूरध्वनीवरुन सूचित केल्यावरुन त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे पाठविली. यापूर्वी शिक्षणाधिकारी कार्यालयातून त्यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती पुरविण्यासंदर्भात

कोणत्याही प्रकारचा दूरध्वनी संदेश अथवा लेखी पत्र प्राप्त झालेले नाही. शिक्षणाधिकारी कार्यालयास त्यांनी दिनांक १३-०३-२००८ रोजी माहिती पुरविल्याचे त्यांना स्मरत आहे.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी व त्रयस्त पक्ष यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सरळ व सोपी होती. सदर माहितीची व्याप्ती देखील अत्यंत मर्यादीत स्वरुपाची होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर त्यांना कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने कोणतीही सकारात्मक कारवाई केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय न देऊन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे येथे सिध्द होत आहे. त्यांनी आपल्या कार्यशैलीमध्ये अशा त-हेने दर्शविलेल्या त्यांच्या बेपर्वाईची नोंद शिक्षण संचालक, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुळात विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी प्रथम ०८ किंवा ०९ मार्च २००८ रोजी म्हणजेच आयोगाकडील सुनावणीच्या सुमारे १८ दिवस आधी त्रयस्त पक्षाकडे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची मागणी प्रथम केली ही बाब त्रयस्त पक्षाच्या वरील युक्तिवादावरुन सिध्द होत आहे. अपिलार्थीने माहितीसाठी केलेला मूळ अर्ज व त्यांनी त्रयस्त पक्षाकडे माहितीसाठी केलेली विचारणा यामधील कालावधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहित देण्यासाठी कोणताही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. आजच्या

सुनावणीस देखील संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे त्यांना तोंडी व लेखी पूर्वसूचना देऊनही ते सुनावणीस गैरहजर आहेत हे पाहता त्यांच्या वृत्तीतील बेपर्वाई अधिक स्पष्ट होते असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती दिली नाही व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापासून विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी करिता वंचित ठेवल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या कालावधीत त्यांच्याकडून कोणताही खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणी काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. सबब सचिव (शिक्षण) यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर

एक महिन्याच्या आत आपला अनुपालन आाल आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होाच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. या कालावधीत त्यांच्या कडून कोणताही खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांना या प्रकरणी काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

३. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (शिक्षण) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन आाल आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २७-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण शेषेराव घुमरे, रा. पारगाव घुमरा, तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमीक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ शिक्षण संचालक (माध्यमिक), शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, ससून हॉस्पिटल जवळ, पुणे – ४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (शिक्षण), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०१५

निर्णय दिनांक २७-०३-२००८

१ श्री. माधव संताजी अटकोरे, : अपिलार्थी
तथागतनगर, तरोडा खुर्द मालेगाव रोड,
तालुका जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि
विद्यापीठ, परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जन अपिलीय अधिकारी : विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. माधव संताजी अटकोरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप विद्यापीठ

अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ श्री. संजय रामराव परळीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ श्री. प्रमोद मोतीराम बावीस्कर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००२ ते २००७ या कालावधी-तील त्यांच्या कार्यक्षेत्राखालील झालेल्या बांधकामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ १. विद्यापीठाच्या नांदेड प्रक्षेत्रात इमारत दुरुस्ती, नाली बांधकाम, गोडावून दुरुस्ती, किरकोळ बांधकाम, चारी, पाईपलाईन, संरक्षक भींत, वायर फेसींग, तसेच कापुस संशोधन केंन्द्रातील अंतर्गत रस्ते, इमारतीची दुरुस्ती, संरक्षक भींत, शेततळे, केळी संशोधन केंद्रात अंतर्गत रस्ते, इमारत बांधकाम, किरकोळ दुरुस्ती. वरील सर्व कामाच्या अंदाजपत्रकासह झालेल्या खर्चाचा संपूर्ण कामनिहाय तपशील, गुत्तेदार, मजूर संस्थेचे नांव, मोजमाप पुस्तीकेच्या सर्व छायांकीत प्रती देण्यात याव्यात तसेच वरील कामे पुर्ण झाल्याच्या प्रमाणपत्रा-च्या छायांकीत प्रती त्वरीत देण्यात याव्या ही विनंती. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जावर अपिलार्थी यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडला असल्याचे म्हटले आहे. सदर पुरावा म्हणजे गट विकास अधिकारी (वर्ग-१) पंचायत समिती, नांदेड यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०१-२००६ रोजी दिलेल्या प्रमाणपत्राच्या झेराक्सची सत्यप्रत असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये खालील प्रमाणे उत्तर दिले आहे.

“ १. आपण मागविलेल्या माहितीपैकी नाली बांधकाम, चारी, पाईपलाईन, कापुस संशोधन क्रेंद्रातील शेततळे, केळी संशोधन केंद्रातंर्गत रस्ते या बाबी या कार्यालयाने पार पाडलेल्या नाहीत. त्यासंबंधी माहिती आपण संबंधीत प्रमुखाकडे विचारावी.

२. या कार्यालयात कार्यभाराच्या तुलनेत तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यांची अत्यंत कमतरता आहे, त्यातच वर्षअखेर होत आहे व निवडणूक कार्यातही कर्मचारी गुंतलेले आहेत. या सर्व कारणांमुळे आपण मागविलेली फार मोठी माहिती लगेचच तयार होवू शकत नाही. आपण पुर्ण पाच वर्षाची मोठी माहिती मागविलेली आहे. त्यास वेळ लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपणास सूचित करण्यात येते की, आपण प्रत्यक्ष या कार्यालयात उपस्थित रहावे. आपणास उपलब्ध सर्व नोंदवह्या, अंदाजपत्रक, रेकॉर्ड सर्व मोजमाप पुस्तिका कामाच्या देयके सर्व दर्शविण्यात येईल. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. कार्यालयात बसण्याची व निवासाचीही व्यवस्था विद्यापीठात केली जाईल. तरी आपण व्यक्तिशः उपस्थित राहून या कार्यालयास सहकार्य करावे. ”

सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०३-२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. यानंतर परत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी त्यांच्याकडे त्यांनी सादर केलेल्या दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्राची मूळ प्रत त्यांच्या स्तरावरुन तपासण्याकरिता व आवश्यक वाटल्यास माहितीचे शुल्क ठरविण्याकरिता परत मागितली.

जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्रातील सुचनांचे पालन करण्यापूर्वीच अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १६-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले होते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

मध्यंतरीच्या काळात दिनांक २८-०३-२००७ रोजी दिनांक ०३-०४-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी त्यांच्याकडे या विषयासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे दिसून येते. याबाबत दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १६२४ /- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस काही माहिती याप्रमाणे सशुल्क देण्याची तयारी दर्शविली आहे व उर्वरीत माहिती तयार होत असल्याचे अपिलार्थीस अवगत केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत सादर केलेले दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र त्यांना बोगस असल्याचे आढळून आले आहे असे म्हटले आहे व कुलगुरु यांना प्राप्त झालेल्या अपील अर्जावर त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांच्या पत्रावरील अभिप्रायाव्दारे सूचित केले असल्याचे म्हटले आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची या पत्रामध्ये तयारी दर्शविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली तर नाहीच मात्र जन माहिती अधिकारी यांच्या कडून दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये धमकी देण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांनी त्याना माहिती देण्याचे नाकारले. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधतेविषयी वेळोवेळी शंका उपस्थित करुन त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे अंतीमतः ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहे असे त्यांनी सिध्द केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या दिनांक २०-०१-२००७ च्या अपिलार्थीच्या दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्राबाबत त्यांना शंका आल्याने संबंधीत गट विकास अधिकारी पंचायत समिती नांदेड यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांच्या अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची सत्यता व वैधता पडताळणीकरिता व यासंदर्भातील अभिप्राय पाठविण्याकरिता सदर पत्र पाठविले. जन माहिती अधिकारी यांच्या वरील विषयास अनुसरुन संबंधीत गट विकास अधिकारी पंचायत समिती नांदेड यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या

कडील दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस सदर प्रमाणपत्र दिनांक २७-०२-२००७ रोजी दिले असल्याचे कळविले. पंचायत समितीने अपिलार्थीस दिलेले प्रमाणपत्र दिनांक २७-०२-२००७ रोजीचे असल्याने व अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज दिनांक १३-०२-२००७ रोजीचा असल्याने अपिलार्थीने सादर केलेले प्रमाणपत्र बोगस असल्याचे त्यांचा समज झाला. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जासोबत दाखल केलेले ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असलेल्या प्रमाणपत्रावर जावक क्रमांक लिहिलेला नसून सदर पत्र पंचायत समिती नांदेड यांच्या कार्यालयातून दिनांक २०-०१-२००७ रोजी निर्गमीत केल्याचे दिसून येते. तदनंतर अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००७ रोजी दिलेले प्रमाणपत्र पाहता गट विकास अधिकारी कार्यालयाने दिनांक २०-०१-२००७ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रावर दिनांक २०-०१-२००७ ही तारीख खोडून दिनांक २७-०२-२००७ अशी तारीख दिली आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक १६-०३-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले त्यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु हे जन अपिलीय अधिकारी होते. अपिलार्थीचा अपील अर्ज कुलगुरु त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना बोलावून अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती, अपिलार्थीच्या दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्राची वैधता तपासून, देण्याचे सूचित केले व तसे अभिप्राय अपिलार्थीच्या अपिल अर्जावर नोंदविले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १३-०२-२००७ रोजी केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या अपिलार्थीच्या दारिद्र्य रेषेखाली प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत जन माहिती अधिकारी यांना शंका आली

व सदर प्रमाणपत्राची वैधता ठरविण्याच्या दृष्टीने अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व संबंधीत गट विकास अधिकारी हे एकमेकांशी पत्रवयवहार करत राहिले. अंतीमतः अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे गट विकास अधिकारी पंचायत समिती नांदेड यांनी दिलेल्या दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या व ३८४ क्रमांकाच्या प्रमाणपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीने प्रमाणपत्राची प्रत जन माहिती अधिकारी याच्या अर्जासोबत जोडली होती परंतु या प्रतीवर प्रमाणपत्राचा जावक क्रमांक नव्हता. गट विकास अधिकारी यांच्याकडून दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना दिले जाणा-या प्रमाणपत्रावर जावक क्रमांक न टाकताच ते दिले म्हणून जन माहिती अधिकारी यांच्या मनात संदेह निर्माण होऊन त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीच्या मूळ अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेल्या दिनांक २२-०२-२००७ रोजीचे पत्र पाहता अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देण्याची जन माहिती अधिकारी यांची मानसिकता नव्हती असे दिसते. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या लिहिलेल्या पत्रातील मजकूर पाहता त्यामध्ये देखील त्यांनी “ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करण्यात येत असून ती लवकरच त्यांना देण्यात येईल ” अशा अर्थाचे विधान केले आहे. तसेच अपिलार्थीस महिती देण्याकरिता परत दिनांक २८-०३-२००७ रोजी पत्र लिहिले व त्यामध्ये अपिलार्थीस एकूण रुपये १६२४ /- इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. यावेळी देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार नव्हती असे या पत्रावरुन दिसून येते कारण या पत्रामध्ये त्यांनी सदर माहिती तयार झाल्यावर लागलीच कळविण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले आहे. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पूर्णतः तयार नव्हती हे येथे सिध्द होत आहे.

तर अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे त्यांनी आयोगास सादर केलेल्या गट विकास अधिकारी पंचायत समिती नांदेड यांच्या दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या ३८४ क्रमांकाच्या प्रमाणपत्रावरुन सिध्द होते. सदर प्रमाणपत्राची मूळ प्रमाणपत्र त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थी दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे सिध्द होत आहे असे आयोगाचे मत आहे. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक ०३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उर्वरीत माहिती तयार असून ती घेऊन जाण्यासाठी सूचित केले याचाच अर्थ जन माहिती अधिकारी यांच्या कडे अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती दिनांक ०३-०४-२००७ रोजी तयार होती.

येथे असे दिसून येईल की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या दारिद्र्य रेषेखालच्या प्रमाणपत्राच्या वैधतेबाबत शंका आल्याने त्यांनी या शंकेचे निरसन वेगवेगळ्या मार्गाने करुन घेतले व यासंदर्भात ते अपिलार्थीशी पत्रव्यवहार करत राहिले. अंतीमतः ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे गट विकास अधिकारी पंचायत समिती नांदेड यांच्या पत्राव्दारे सिध्द केल्याने त्यांनी दिनांक ०३-०४-२००७ रोजी (ज्या दिवशी त्यांच्याकडे माहिती तयार होती त्या दिवशी) त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनामूल्य द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी तसे केल्याचे आयोगास आढळून येत नाही. दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र निर्गमीत करणा-या कार्यालयाने जावक क्रमांक टाकणे जरुरीचे आहे. तथापि पंचायत समिती नांदेड तर्फे दिलेल्या गेलेल्या प्रमाणपत्रावर अशा क्रमांकाचा उल्लेख या प्रकरणी आढळला नाही त्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती मिळण्यापासून वंचित राहावे लागले.

सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व गट विकास अधिका-यांना व

दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना प्रमाणपत्रे निर्गमीत करणा-या इतर प्राधिकरणांना या प्रमाणपत्रावर क्रमांक व दिनांक स्पष्टपणे लिहिण्याचे आदेश सत्वर निर्गमीत करावे व आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा. अपिलार्थी हे निःसंशयपणे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे आता सिध्द होत असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असल्याने अपिलार्थीने सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत कार्यालयीन सुटीची वेळ व सुटीचे दिवस सोडून ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी हेतुपुरःस्सर माहिती देण्याचे टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व गट विकास अधिका-यांना व दारिद्रय रेषेखालील व्यक्तींना प्रमाणपत्रे

निर्गमीत करणा-या इतर प्राधिकरणांना या प्रमाणपत्रावर क्रमांक व दिनांक स्पष्टपणे लिहिण्याचे आदेश सत्वर निर्गमीत करावेत व आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २७-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. माधव संताजी अटकोरे, तथागतनगर, तरोडा खुर्द मालेगाव रोड, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विद्यापीठ अभियंता, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२५

निर्णय दिनांक २७-०३-२००८

१ श्री. मोहमंद युसूफ अहमद, : अपिलार्थी
सर्वे नं. १८, प्लॉट नं. १ बाबुकोहितूर
कंम्पाऊंड, मालेगाव जिल्हा नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अस्थापना अधिकारी,
मालेगाव महानगरपालिका, मालेगाव,
जिल्हा नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक आयुक्त (सा.) मालेगाव
महानगरपालिका, मालेगाव जिल्हा नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अस्थापना पर्यवेक्षक, मालेगाव महानगर पालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक आयुक्त (सा. प्र.) मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जिल्हा नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहमंद युसूफ अहमद हे गैरहजर

आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अस्थापना पर्यवेक्षक, मालेगाव महानगर पालिका, मालेगाव श्री. अशोक दगा पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (सा. प्र.) मालेगाव महानगरपालिका, मालेगाव श्री. अशोक मोतीराम कापडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात मानधन तत्वावर नोकरभरतीसंदर्भात १० मार्च ते ०५-०४-२००६ या कालावधीमधील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ १. नागरी आरोग्य केंद्रच्या जाहिरात संबंधी १६ मार्चनंतर मानधन पध्दती वर नियुक्त झालेले १० लोकांची आर्डरची खरी नक्कल मिळावी.

२. महाराष्ट्र शासन २३/०१/०६ चे परिपत्रकानुसार आरोग्य विभागात कोणतेही तत्वावर भरती न करण्याचा आदेशाचा उल्लंघन करुन सदरची भरती करण्यात आली त्याची खरी नक्कल मिळावी.

३. माझी माहिती प्रमाणे आरोग्य खातेचे अधिका-यांचे मुलांना मानधन तत्वावर जी ऑर्डर देण्यात आली त्यात किती रुपयांची देवाणघेवाण झाली त्याचीही माहिती मिळावी.

४. सदर प्रकरणात नियुक्त झालेले १० लोकांची शैक्षणिक पात्रताची खरी नक्कल तसेच ऑर्डर देण्याचे आगोदर त्याच्याकडून २० रु.चे स्टॅम्प पेपरवर, प्रतिज्ञा घेण्यात आली का की कायम स्वरुपी नौकरीसाठी आम्ही कोर्टात जाणार नाही. त्याचाही खरा नक्कल मिळावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये २० इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याच्या अपिलार्थीस सूचना दिल्या. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचे त्यांनी आयोगासोर सादर केलेल्या जावक नोंदवहीच्या उता-यावरुन दिसून येते. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टाने पाठविले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०६-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०५-२००६ रोजी सुनावणी ठेवली असल्याबाबतचे पत्र संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविले तथापि दिनांक २२-०५-२००६ रोजी सुनावणी झाली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. परंतु या सुनावणी संदर्भातील आपले आदेश संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये निर्गमीत केले असून या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी

व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतरही संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये ठरल्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या कडील दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपोटी रुपये २० /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयामध्ये भरण्यास त्यांनी सूचित केले होते. त्यांच्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी सदर दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या पत्राची प्रत व त्यांच्या कार्यालयाचे जावक रजिस्टर आयोगास दाखविले. याची पाहणी करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कडील दिनांक २२-०५-२००६ रोजीचे पत्र दिनांक २३-०५-२००६ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०५-२००६ च्या पत्राव्दारे आवश्यक ती फी भरण्याचे सूचित करुनही अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क न भरल्याने ही माहिती अपिलार्थीस पुरविता आली नाही असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत अशीही माहिती त्यांनी पुढे दिली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या अपिलावर त्यांनी आपले आदेश दिनांक २४-०५-२००६ रोजी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत निर्गमीत केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क रुपये २० इतके घेऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात न करता त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०४-२००६ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्याकडील दिनांक ०१-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये २० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीत देखील अशाच प्रकारचा निर्णय झाला होता. तथापि अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कोठेही दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या दिनांक ११-१०-२००५ च्या क्रमांक पीटीआय/२००५/सीआर-३५०/०५/५ क्रमांकाच्या अधिसूचनेनुसार अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी प्रती पृष्ट २ रुपये इतके शुल्क सदर अधिसूचनेच्या क्रमांक ४ च्या कलमाव्दारे निश्चित केले गेले आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी हे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती नसल्याने व यासंदर्भात त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये कोठेही उल्लेख केला नसल्याने

त्यांना सदर शुल्क २० रुपये हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणे भाग आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर शुल्क भरण्याबाबत वेळोवेळी लिखित सूचना केल्याचे येथे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती आवश्यक असल्यास त्यांना सदर प्राधिकरणाकडे माहिती घेण्यासाठी शुल्क रुपये २ भरणे हे वरील सूचनेप्रमाणे भरणे अनिवार्य आहे. या आदेशाचे अपिलार्थी यांच्याकडून पालन न झाल्याने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मोफत माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क उरत नाही असे आयोगाचे मत आहे. कारण त्यांनी ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावाही या अर्जासाबत जोडलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी कडून माहिती देण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क प्राप्त करुन घेऊन नंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरता आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीची ही कृती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विधानाचे खंडण करण्यासाठी आज सुनावणीस अपिलार्थी गैरहजर आहेत या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमी वर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २७-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहमंद युसूफ अहमद, सर्वे नं. १८, प्लॉट नं. १ बाबुकोहितूर कंम्पाऊंड, मालेगाव जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा अस्थापना पर्यवेक्षक, मालेगाव महानगर पालिका, मालेगाव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (सा. प्र.) मालेगाव महानगरपालिका, मालेगाव जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२६

निर्णय दिनांक : २७-०३-२००८

१ श्री. हेमंत शंकरराव कवडे , : अपीलार्थी
जय योगेश्वर बागदर्डी रोड शिवाजीनगर नं.२
मनमाड ता.नांदगाव, जि.नाशिक

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मनमाड

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन विभाग)
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. हेमंत शंकरराव कवडे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, मनमाड श्री.विजय कुलकर्णी, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.) विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक यांचे प्रतिनिधी नगर परिषद प्रशासन विभाग, श्री. नामदेव बंडू मोरे ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांचेकडील दि. २७.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १.१.१९९३ ते अर्जाच्या दिनांकापर्यंत मनमाड नगर पालिका हद्दीतील मिळकत स.नं.२५५अ व २५५ ब मधील आरक्षणासंदर्भात खालीलप्रमाणे मागितली होती.

"१) सदरील ग.नं.२५५अ व २५५ ब या मधिल आरक्षण नगर विकास आराखडयात कोणत्या कारणासाठी करण्यात आलेले आहेत, त्याचा सविस्तर तपशिल देण्यात यावा.

२) सदरील स.न.वर नगरपालीकेने आरक्षण केले त्याबाबत केलेल्या ठरावाची नक्कल कॉपी साक्षांकित करुन देण्यात यावी.

३) आरक्षण केले त्यावेळी कोणत्या कायदयाच्या कलमाने आरक्षण केले त्या कायदयाचे व त्या कलमा अन्वये सविस्तर मार्गदर्शनपर माहिती देण्यात यावी. तसेच त्य कायदयाचे फोटो कॉपी देण्यात यावी.

४) सदरील आरक्षणाबाबत आपल्या कार्यालयाला किती अर्ज दाखल झाले त्या सर्व अर्जाची फोटो कॉपी देण्यात यावी.

५) सदरील स.नं.वर आरक्षण घोषीत झाले नंतर आपल्या बांधकाम खात्याने सदरील स.नं.वर कीती बांधकाम परवानग्या देण्यात आल्या त्याची नावे, क्षेत्र, तारीख इत्यादि संकलन करुन देण्यात यावी.

६) M R T P 1966 च्या कायदया अन्वयेबांधकाम परवानगी मीळणेबाबत आलेल्या अर्जावर आपल्या कार्यालयाने कोणती कार्यवाही केली, त्याबाबत केलेल्या टीपणींची फोटो कॉपी देण्यात यावी.

७) सदरील स.नं.च्या आरक्षणाबाबत आलेल्या अर्जाबाबत कोणतीही केली नसेलेस कारण काय ? कार्यवाही केली नाहीतर ते कायदेशीर आहे का बे कायदेशिर आहे त्याबाबत खुलासा करावा.

८) सदरील आरक्षण कीती कालावधी साठी केले आहे.

९) सदर विकास आराखडा अंतीम स्वरुपात प्रदर्शित केल्यानंतर या आराखडयातील आरक्षणाबाबत किती हरकती, सुचना आल्या त्यांची सर्व माहिती संकलन करुन देण्यात यावी.

१०) सदर स.नं. मधिल आराखडा अंतीम स्वरुपात मंजूर झाले नंतर १९६६ कायदयाच्या कलम (१२७) नुसार आरक्षण रद्द होण्यास व विशिष्ट कालावधीनंतर आरक्षीत मीळकत आपन ताब्यात न घेतल्यास नोटीस दिलेनंतर आपण विकत घेण्याच्या दृष्टीने आपण काय कृती केली आणि कृती केले नसलेस सदर आरक्षण रद्द होणेचेदृष्टीने काय कारवाई करावी लागेल याबाबत मार्गदर्शनपर माहिती द्यावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीस या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ३१.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पाठविली आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने म्हणणे आहे. मध्यंतरीच्या काळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी

यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १८.५.२००६ रोजी प्रथम अपिल केले. या अपिलावर त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून संबंधित माहिती अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभगाची कार्यवाही करण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे. तसेच त्यांचे मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नसल्याचे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणले आहे.

सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.६.२००६ रोजी घेऊन अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात दि. २०.६.२००६ रोजी आदेश पारित केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस जी माहिती सत्वर देणे शक्य आहे ती माहिती त्यांच्या आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत व जी कागदपत्रे देण्यासाठी काही वेळ लागण्याची शक्यता आहे ती कागदपत्रे त्यांच्या आदेश पारित झाल्यापासून एक महिन्याचे आत अपिलार्थीस साक्षांकित स्वरुपात माहिती देण्याच्या सूचना केल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडील सुनावणी झाल्यानंतर दि. १४.६.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली. सदर माहिती दि.१४.६.२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील  दि. ३१.५.२००६ रोजीच्या संबंधित पत्राच्या स्थळप्रतीवर पोचसही केली आहे. मध्यंतरीच्या काळात दि. ३१.५.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रु.३५/- भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याची सूचना केली. तथापि अपिलार्थीने सदर माहिती मुदतबाहय असल्याने सदर न शुल्क भरता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडील दि. ३१.५.२००६ रोजीच्या पत्र दिनांक १४.६.२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून विनामूल्य हस्तगत करुन घेतली आहे. अपिलार्थी यांना जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करतांना जन माहिती अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची व दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती केली होती. तथापि त्यांच्या या विनंतीसंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचेकडे कोणतेच आदेश पारित न झाल्याने व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. १०.७.२००६ रोजी द्वितीय अपिल दाखल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व सहायक माहिती अधिकारी यांचेवर कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कार्यवाही करण्याची विनंती आयोगास केली असून या कामी त्यांना झालेल्या खर्चाची नुकसानभरपाई त्यांना मिळावी,

अशी त्यांनी आयोगास पुढे विनंती केली आहे. त्याचबरोबर त्यांना विनामूल्य माहिती प्राप्त झाल्याने मनमाड नगर पालिकेच्या आर्थिक हानीस जबाबदार असलेले संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून सदर रकमेची वसूली करण्यास देखिल त्यांनी आयोगास विनंती केली आहे. तद्वतच या अपिलाचे कामासाठी करावा लागणारा भाडेखर्च व जेवण खर्च मनमाड नगरपालिकेकडून प्राप्त व्हावा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्याबद्दल विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- या प्रमाणे शास्ती लावण्यात यावी व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती द्यावी लागल्यामुळे नगर परिषदेचे झालेले आर्थिक नुकसान भरपाई देखील जन माहिती अधिकारी यांचेकडून करुन घ्यावी. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना अपेक्षित असलेली माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्यामुळे त्यांना सदर द्वितीय अपिल करावे लागले व त्यात त्यांना कराव्या लागणाऱ्या खर्चाची भरपाई संबंधित नगर पालिके कडून मिळावी. त्याचबरोबर अपिल कामास हजर राहण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना जो प्रवासभत्ता नगर पालिका देणार आहे, तो त्यांना देण्यात येऊ नये.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे सदर माहिती तयार करण्यासाठी त्यांना वेळ लागला आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती सुमारे १३ वर्षांशी संबंधित व एकूण १० मुद्यांवरील असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लागला आहे, असे त्यांनी कबूल केले.

जन अपिलीय अधिकारी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १८.५.२००६ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर दि. १३.६.२००६ सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश दि. २०.६.२००६ रोजी पारित केले आहेत. सदर आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना एकूण ३० दिवसांची मुदत दिली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे दि. १४.६.२००६ रोजी माहिती पुरविली आहे. सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णयामधील घालून दिलेल्या मुदतीत दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येईल की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १३ वर्षे

कालावधीशी संबंधित असून ती एकूण १० मुद्यांवर मागवली आहे. तथापि अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीस विलंबाकरता ही माहिती विहित मुदतीत देणे जन माहिती अधिकारी यांना दुरापास्त होते किंवा या माहितीसाठी त्यांचे कार्यालयाचे मनुष्यबळ प्रमाणाबाहेर वळवावे लागले होते, अशी परिस्थिती येथे उद्‌भवल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्यास जन माहिती अधिकारी यांनी विलंब केला असून अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्र.७ मध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे काही खुलासा अपेक्षित केला आहे. अशा प्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही किंवा तसा खुलासा देणे त्यांना अधिनियमान्वये अभिप्रेतही नाही. अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांनी सर्वसाधारणपणे २६.४.२००६ रोजी अथवा तत्पूर्वी जन माहिती अधिकारी यांनी देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही न करुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) च्या या ठिकाणी भंग केला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबाचे समर्थन जन माहिती अधिकारी यांनी माहितीची विस्तृत व्याप्ती व त्यांचे नियमित कारभार असे दिले आहे.तथापि त्यांचा हा युक्तीवाद आयोग मान्य करीत नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एकूण ४९ दिवस इतका विलंब लावल्याचे या ठिकाणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक व इतर अधिकारी यांना देखिल जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, असे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५(५) अन्वये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस ४९ दिवस इतक्या विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यांनी या कामी त्यांच्या सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी तितकेच जबाबदार ठरतात, असे आयोगाचे मत आहे. सबब या सर्वांवर विलंबाचे प्रतिदिनी रु.२५०/- या प्रमाणे रु.१२२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखाशीर्षाखाली जास्तीत जास्त पाच हप्त्यात भरावी. “ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”

सदर शास्तीची कर्मचारी/अधिकारी निहाय विभागणी मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी हे आदेश निर्गमित होताच यथायोग्यरित्या सात दिवसांचे आत करावी. सदर शास्तीची रक्कम संबंधित

अधिकारी/कर्मचारी हे नियमितपणे शासकीय कोषागारात भरतील, असे मुख्याधिकारी, नगर परिषद, मनमाड यांनी पहावे व या संदर्भातील आपले अनुपालन अहवाल मे, २००८ पासून दरमहा शास्तीची संपूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत आयोगास पाठवावा. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत. अपिलार्थीनी त्यांना सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी करावा लागणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई भरण्या आयोगाकडे केली आहे. तथापि या संदर्भात कोणताही पुरावा त्यांनी या द्वितीय अपिलासोबत जोडला नाही किंवा त्यासंबंधित आज सुनावणीचे वेळी आयोगास सादर करु शकले नाहीत. म्हणून त्यांची ही विनंती मान्य करता येणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी मनमाड नगरपरिषदेस पोहोचलेले कथित आर्थिक हानीबद्दल कोणतेही आदेश नाहीत. संबंधित जन माहिती अधिकारी व सदर कर्मचाऱ्यांना त्यांना या अपिलाकामी कराव्या लागणाऱ्या प्रवास खर्चाची भरपाई मनमाड नगर पालिकेने करु नये, ही अपिलार्थीस मागणी फेटाळण्यात येत आहे. कारण माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलाचे कामी हजर राहणे, हा त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचा भाग आहे, असे आयोगाचे मत आहे. वरील विषयाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

आदेश

१) अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले इतर सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर त्यांनी अपिलार्थीस ४९ दिवस इतक्या विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल विलंबाचे प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.१२,२५०/- इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

३) मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी संबंधित कर्मचारी/अधिकारी शास्तीचा भरणा शासकीय कोषागारात नियमितपणे करतील, असे पहावे व या संबंधीचा अहवाल मे, २००८ पासून शास्तीची रक्कम पूर्णपणे वसूल होईपर्यंत सादर करावा.

४) खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २७-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. हेमंत शंकरराव कवडे जय योगेश्वर बागदर्डी रोड शिवाजीनगर नं.२ मनमाड ता.नांदगाव, जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मनमाड जि.नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८९

निर्णय दिनांक : २७-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती मेघा वसंत पाटील,<br>एस.टी.स्टँडजवळ, त्रंबक भवन,<br>धुळेरोड, अंमळनेर जि. जळगाव | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>मुख्य प्रशासकीय अधिकारी,<br>उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ,<br>अकोला. | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्रीमती मेघा वसंत पाटील (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) या हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला श्री. बी. जी. मालचे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर होते. तथापि ते सुनावणीनंतर ५.३० वाजता कार्यालयात हजर झाले होते.

उपरोक्त प्रकरणातील तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचेकडील दि. ५.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांना उत्तरवादी यांनी त्यांनी मागितलेली माहिती उशिरा दिल्याबद्दल व व्यवस्थित माहिती न दिल्याबद्दल तक्रार केली आहे.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडून त्यांचेकडील दि.५.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांचे कार्यालयाला "दि. २८.५.२००६ रोजी आरोग्य सेवा, अकोला येथे झालेल्या तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती कोणत्या निकषावर करण्यात आली ? अनुकंपा साठीचे पदे कशाप्रकारे भरण्यात आली ?तसेच त्यासाठी कोणते निकष लावण्यात आले होते?", याची माहिती मागितली होती. तक्रारदाराच्या या अर्जास उत्तरवादी यांनी त्यांचेकडील दि. २३.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये तयार करुन तक्रारदारास आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे. तथापि सदर माहितीने तक्रारदाराचे समाधान झाले नाही, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे सरळ त्यांचेकडील दि. ५.१२.२००६ च्या पत्रान्वये तक्रार केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, तक्रारदार यांना दि. ५.६.२००६ रोजी प्रथम अर्ज केला असता, त्यांना उत्तरवादी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील दि. ४.७.२००६ रोजी म्हणजेच अधिनियमातील तरतुदीपेक्षा ५० दिवस इतक्या विलंबाने प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. जर तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून त्यांचेकडील दि.२३.८.२००६ च्या पत्राद्वारे दिलेल्या माहितीने समाधान झाले नसले तर, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करावयास हवे होते, तथापि या प्रकरणी त्यांनी अशा प्रकारचे प्रथम अपिल केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. सबब तक्रारदारास असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी उपसंचालक, आरोग्य यांचे कार्यालयातील जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील करावे. सदर प्रथम अपिल करण्यासाठी त्यांना लागलेला विलंब संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी क्षमापित करुन त्यांचेकडून या संदर्भातील अपिल प्राप्त झाल्यानंतर, सदर अपिलावर आपला निर्णय ३० दिवसांचे आत निर्णय द्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जर जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही तर, ते राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार,अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत, द्वितीय अपील करु शकतील. तक्रारदाराने त्यांच्या विचाराधीन अर्जामध्ये उपसंचालक, आरोग्य यांनी तक्रारदारास त्यांच्या तक्रारीसंदर्भात त्वरित निर्णय देण्याबाबत आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे, तथापि अशाप्रकारचे सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकीय प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप करणारे आदेश देण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने तक्रारदाराची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. तक्रारदार यांनी उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ,अकोला यांचे कार्यालयातील जन अपिलीय अधिकारी यांचेकडे उपरोक्त प्रकरणी प्रथम अपिल करावे.तक्रारदार यांना जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिल करण्यास यापुढे लागणारा विलंब संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी क्षमापित करावा. तक्रारदाराच्या दाखल केलेल्या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिल अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसांचे आत त्यावर सुनावणी घेऊन आपले निर्णय द्यावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती मेघा वसंत पाटील,एस.टी.स्टँडजवळ, त्रंबक भवन, धुळेरोड, अंमळनेर जि. जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९२

निर्णय दिनांक : २७-०३-२००८

१ श्री. विक्रम हिरामण तायडे, : तक्रारदार
विखरण (देवाचे), ता. शिंदखेडा
जि. धुळे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, शिंदखेडा
जि. धुळे.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी तक्रारदार श्री. विक्रम हिरामण तायडे (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शिंदखेडा जि.धुळे यांचे प्रतिनिधी विस्तार अधिकारी (ग्रा.पं.) श्री. राजू झगा मोरे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल)हे हजरआहेत.

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. ५.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे आयोगाकडे अशी तक्रार केली आहे की, त्यांनी दि. २४.५.२००६ च्या अर्जाद्वारे (ग्रामपंचायत विभाग) पंचायत समिती शिंदखेडा यांचेकडून ग्रामीण रोजगार योजनेखालील मौजे विखरण येथील कामासंबंधी (रस्ता खडीकरण इ.) माहिती मागितली होती. ती संबंधित ग्रामसेवकाकडे असल्यामुळे, त्यांचेकडून घेण्याबद्दल गट विकास

अधिकारी यांनी दि. २९.५.२००६ रोजी कळविले तर ग्रामसेवकाने संबंधित कागदपत्रे पूर्वीच्या ग्रामसेवकाने त्यांचेकडे हस्तांतरित केली नाही, म्हणून माहिती देता येत नसल्याचे कळविले.त्यामुळे तक्रारदार यांनी गट विकास अधिकारी यांचेकडे दि. २.८.२००६ रोजी प्रथम अपिल केले. त्यांनीसुध्दा टाळाटाळ केल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दि. १६.१२.२००६ रोजी तक्रार केली. त्यांनीसुध्दा पुन्हा गट विकास अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा असे कळविले व शेवटपर्यंत माहिती दिली नाही. सर्वांनीच या प्रकरणी टाळाटाळ केल्यामुळे, त्यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करुन माहिती मिळवून देण्याची विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी आयोगासमोर असा युक्तीवाद केला आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. २४.५.२००६ रोजी माहिती मागवली असता, सदरची माहिती ग्रामपंचायतीच्या कार्यकक्षेतील असल्याने ही माहिती ग्रामपंचायतीकडून प्राप्त करुन घ्यावी, असे गट विकास अधिकारी यांचे कार्यालयातील त्यांना दि. २६.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त न झाल्याने तक्रारदाराने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २.८.२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. तथापि या अपिलाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही प्रकारची सुनावणी न घेतल्याने व तक्रारदारास त्यांनी हरतऱ्हेने प्रयत्न करुनही आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व त्यायोगे तक्रारदारा यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिल्याने त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ५.४.२००७ रोजी तक्रारअर्ज केला आहे. या अर्जामध्ये त्यांनी वर उल्लेखिल्याप्रमाणे तक्रार केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी असे दिसून येते की,तक्रारदारास आवश्यक ती माहिती देण्यापासून असमर्थनीय कालावधीकरता वंचित ठेवण्यास, संबंधित ग्रामसेवक जबाबदार आहेत. तक्रारदारास सदर माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार न मिळता त्यांना लोकशाही दिनी जिल्हाधिकारी, धुळे यांचेकडे केलेल्या

तक्रारीसंदर्भात दि. ५.११.२००७ रोजी आवश्यक ती माहिती मिळाली आहे. हे पाहता, धुळे जिल्हा परिषद मधील अधिकारी/कर्मचारी यांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीशी काहीही कर्तव्य नसल्याचे ध्वनित होत आहे. माहिती प्राप्त न झाल्याने तक्रारदाराने केलेल्या अपिल अर्जावर संबंधित उत्तरवादी यांनी कोणतीही कार्यवाही न करता २००५ मधील कलम १९(६) चा भंग केला आहे व त्याचबरोबर त्यांचे कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव पुरेपूर स्पष्ट केला आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. तक्रारदारास त्यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती प्राप्त न होण्यास संबंधित ग्रामसेवक हे निश्चितपणे दोषी असल्याचे आयोगास आढळून आले आहे. अद्यापपावेतो त्यांनी तक्रारदारास मूळ माहितीच्या अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही, ही त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीचे दर्शन घडविते, असे आयोगाचे मत आहे. तक्रारदारास आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून, संबंधित ग्रामसेवकाने कोणत्याही असमर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवले असल्यामुळे, ते कलम २०(१) च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज केला असतांना देखिल अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न पुरविण्याबद्दल एकूण रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी खालील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात जास्तीत जास्त पाच हप्त्यात करावा.

" ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीची जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांचेमध्ये यथायोग्य विभागून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.धुळे यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत करावी, संबंधित जन माहिती अधिकारी हे शासकीय कोषागारात शास्ती नियमितपणे भरतील, असे मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, धुळे यांनी पहावे व या आपला अनुपालन अहवाल मे,२००८ पासून पुढे दरमहा शास्तीची रक्कम पूर्णपणे वसूल होईपर्यंत पुढे दरमहा सादर करावा. तक्रारदारास माहिती प्राप्त करुन देण्यासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी तक्रारदारास त्यांनी मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

३. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

४. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास त्यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज केला असतांना देखिल अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न पुरविण्याबद्दल एकूण रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा या निकालपत्रातील सूचनांनुसार शासकीय कोषागारात करावा.

५. उत्तरवादी यांनी या प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धुळे यांनी यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २७-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विक्रम हिरामण तायडे, विखरण (देवाचे), ता. शिंदखेडा जि. धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा जि.धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जिल्हा परिषद, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९२६

निर्णय दिनांक २८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गणेश रामराव वाघचौरे,<br>मु. पो. धुपखेडा, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम,<br>उपविभाग, पैठण जिल्हा औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम<br>विभाग, पैठण जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम,<br>उपविभाग, पैठण जिल्हा औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम,<br>विभाग, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गणेश रामराव वाघचौरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक

बांधकाम, उप विभाग, पैठण यांचे प्रतिनिधी सहाय्यक अभियंता-२ श्री. रमेश महादेवराव कांबळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, विभाग, औरंगाबाद श्री. प्रमोद खुशाल पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग पैठण श्री. दिलीप वसंतराव देशपांडे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामा-संदर्भात सन २००४-२००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " १. मौजे कवडगाव ते धुपखेडा साईबाबा मंदिर या रस्त्याचे एम बी रेकॉर्डची नक्कल मिळणेबाबत. जनतेकरिता माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता आपल्या कार्यालयाने कोणते प्रायोजन केले आहे त्याचा सविस्तर खुलासा (लेखी) करावा. "

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची व या प्रकरणी त्यांना नुकसानभरपाई मंजूर करण्याचे आदेश देण्याची विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही. येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने उप अभियंता यांनाच उद्देशून प्रथम माहितीचा अर्ज व नंतरचा अपिलाचा अर्ज केला आहे. अपिलार्थीने सदर अर्ज करण्याच्या वेळी उप अभियंता हे माहिती अधिकारी होते व कार्यकारी अभियंता हे अपिलीय अधिकारी होते असे उपस्थित कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. उप अभियंता यांच्याकडे अपिलार्थीचा प्राप्त झालेला अपील अर्ज त्यांनी विना कारवाई त्यांच्याकडे ठेऊन दिला. वास्तविकतः त्यांनी सदर अपील अर्ज कार्यकारी अभियंता तथा जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नसल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना निर्णय मिळू शकला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, त्यांना माहिती पुरविली नाही व त्यांच्या या कृती व्दारे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अधिनियमाचे उल्लंघन केले असल्याचे म्हटले आहे. याचबरोबर संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक लावले नसल्याचे त्यांनी या अर्जाव्दारे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मार्च २००६ च्या कालावधीतील कामाच्या कार्यबाहुल्या मुळे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. तदनंतर त्यांची २२ मे २००६ रोजी बदली झाल्यानंतर या अर्जासंदर्भात पुढील घटनाक्रम त्यांना माहित नाही.

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्या कामासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागविली होती ते काम वैधानिक विकास मंडळाच्या निधीमधून केले गेले आहे. अपिलार्थी हे काम ज्या गावात झाले आहे त्या गावचे रहिवासी आहेत. सदर काम सुरु झाल्यापासून संबंधीत अपिलार्थी यांनी या कामाविरुध्द विभागीय आयुक्त, औरंगाबाद, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ औरंगाबाद यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या तसेच या कामासंदर्भात विधानसभेत मार्च २००६ च्या आधिवेशना मध्ये प्रश्न देखील विचारला गेला होता. तदनंतर या कामाची तपासणी होऊन या संदर्भातील अहवाल दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने शासनास सादर केला आहे. त्याचबरोबर या कामाची माहिती घेऊन जाण्यासंदर्भात त्यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००८ रोजी कळविले होते. तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित न झाल्याने त्यांनी दिनांक १३-०३-२००६ रोजी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगा-समोर केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे

पाहता येथे असे दिसून येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यांनी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे असलेल्या कामाचा कार्यभार व त्यांची या पदावरुन झालेली बदली असे आयोगास सांगितले. तथापि त्यांचा हा खुलासा आयोग ग्राह्य धरु शकत नाही. कारण माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जासंदर्भात काम करणे हा शासकीय कर्मचा-याच्या दैनंदिन कर्तव्याचा आता एक मूलभूत भाग झाला आहे. माहितीच्या अधिकाराखाली माहिती देण्यासंबधातील प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांना करावयास लागणे हे त्यांच्याकडे असलेला कार्यभार जादा झाला याचे द्योतक होऊ शकत नाही. येथे जन माहिती अधिकारी यांनी त्यांची झालेली बदली हे कारण अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देण्यासमर्थनार्थ दिले आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्याचे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदत दिनांक १२-०४-२००६ रोजी संपली होती. परंतु संबंधीत जन माहिती अधिकारी यांची बदली मे २००६ मध्ये झाली म्हणजेच त्यांच्या बदलीने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला हा त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरता येणार नाही. अपिलार्थीस लागणारी माहिती त्यांना त्यांचे सहाय्यक व कर्मचारी यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती त्यामुळे येथे अधिनियमतील कलम ५ (५) तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागलेल्या विलंबास ते व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी असे सर्व जण जबाबदार ठरत आहेत. या प्रकरणी त्यांनी दर्शविलेल्या विलंबाचे कोणतेही समर्थन मूळात असूच शकत नाही असे आयोगाचे मत आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांनी या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यात पुढील लेखाशीर्षाखाली शासकीय कोषागारात करावा.

लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी त्यांना हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत करावी. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा नियमीतपणे शासकीय कोषागारात करतील याची खात्री कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी करुन यासंदर्भातील आपला अहवाल मे २००८ या महिन्यापासून पुढे शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात पूर्णपणे भरुन होईपर्यत दरमहा आयोगास पाठवावा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी सदर शास्तीची कर्मचारीनिहाय विभागणी त्यांना हे आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत करावी. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती दिली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये संबंधीत उप अभियंता यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक लावले नसल्याचे म्हटले आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने उपस्थित केलेल्या मुद्दयामध्ये सध्याचे जन माहिती अधिकारी यांचे विधानावरुन सत्यांश आढळून

आला आहे त्यामुळे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व उप विभागीय व इतर क्षेत्रिय कार्यालयामध्ये संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक त्यांच्या कार्यालयात दर्शनी भागात सहज पणे दृष्टीस पडतील अशा प्रकारे, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत, लावावेत व यासंदर्भातील आपला अनुपालन अहवाल तदनंतर आयोगास ७ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक / कर्मचारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याप्रीत्यर्थ लावलेल्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी-रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी जास्तीत जास्त ५ हप्त्यामध्ये निर्णयात दिलेल्या सुचनेप्रमाणे करावा.

३. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक कर्मचारी / अधिकारी हे शास्तीच्या रक्कमेचा भरणा शासकीय कोषागारात मे २००८ पासून पुढे दरमहा करतील असे पहावे व आपला अनुपाल अहवाल आयोगास मे २००८ महिन्यापासून

दरमहा शास्तीच्या रक्कमेचा पूर्णपणे शासकीय कोषागारात भरणा होईपर्यत नियमीत सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक २८-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश रामराव वाघचौरे, मु. पो. धुपखेडा, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम, उपविभाग, पैठण जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ वरिष्ठ कोषागार अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९४७

निर्णय दिनांक २८-०३-२००८

१ श्री. संतोष श्रावण भिंगारे, : अपिलार्थी
पहाडसिंगपुरा, लेणी रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मिलींद कला महाविद्यालय,
नागसेन वन, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मिलींद कला महाविद्यालय,
नागसेन वन, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्राध्यापक (मराठी), मिलींद कला महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. संतोष श्रावण भिंगारे व जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक (मराठी) मिलींद कला महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद हे गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, मिलींद कला

महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद श्री. लक्ष्मण बाबुराव वाघमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या कारभारा-संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" अ) आपल्या महाविद्यालयातील अपिलीय अधिका-याचे नांव व पत्ता देण्यात यावा. (द्यावा)

ब) आपल्या माहिती दिलेल्या पत्राच्या क्रमांक ३ नुसार " प्राचार्य शामकुलेंना संस्थेने निलंबित केले," प्राचार्य शामकुलेंना संस्थेने निलंबीत करण्याच्या आदेशावर ज्या चेअरमन व सेक्रेटरीने (सदस्य) सह्या केल्यात, त्यावेळी चेअरमन रंगनाथ व सदस्य गांगुर्डे ह्यांना चॅरीटी कमिश्नर मुंबई यांनी मान्यता दिली होती काय ? माहिती द्यावी.

क) आपल्या म्हणण्यानुसार क्रमांक ५ मध्ये गैरव्यवहार झाल्याची रक्कम ३० ते ३५ लाख स्पष्ट झाले आहे. ह्या विषयीची लिखीत पुराव्याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी, किंवा स्पष्टीकरण द्यावे.

ड) प्राचार्य शामकुलेंच्या चौकशी अहवालाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. (निर्णयाची प्रतसह)

ई) आपल्या पत्रातील क्रमांक ११ नुसार त्यांना प्राचार्य म्हणून पदावनती करुन प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. पदावनती करताना चेअरमन व सेक्रेटरीने, जे नियम, कायदा, सर्क्युलर वा शासनाचा आदेश वापरला

त्या आदेशाची झेरॉक्स प्रत द्यावी. किंवा पदावनती करता येते काय ? स्पष्टीकरण द्यावे.

फ) विधन सभेच्या अधिवेशनात प्राचार्य शामकुलेंच्या भ्रष्टाचाराविषयी विचारलेल्या प्रश्नावर संस्थेने शासनाला जे उत्तर दिले त्या पत्राची झेरॉक्स प्रत पाहिजे.

ज) क्रमांक १२ नुसार ज्या कर्मचा-यांना (चार) आपण कमी केले त्यांना संस्थेने कमी करण्यासाठी आदेश दिला होता काय ? त्या आदेशाची झेरॉक्स प्रत द्यावी. कमी केल्यावर त्या कर्मचा-यांच्या रिक्त पदांवर जे नवीन कर्मचारी घेतलेत त्याविषयी संस्थेचा आदेश होतो काय ?

ह) दोन कर्मचारी ह्या प्रकरणी न्यायालयात गेलेत त्याविषयी न्यायालयाचा खर्च संस्थेव्दारे होतो की, आपण स्वतः प्राचार्य म्हणून खिशातून करता. ह्या प्रकरणी वकिलाला (संस्थेने वा आपण) किती रुपये देण्यात आलेत, माहिती द्यावी.

य) श्री. प्रमोद जोगदंड व अविनाश पाटील ह्यांना आपण कामावरुन कमी केले होते. श्री. प्रमोद जोगदंडला आपण परत घेतले. अविनाश पाटीलला समान न्याय तत्वानुसार जोगदंड प्रमाणे का घेतले नाही ? प्राचार्य म्हणून आपण पाटीलवर अन्याय अथवा भेद-भाव केल्याचे वाटते काय ? माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी त्यांच्या अर्जासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या पूर्णतः नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०८-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही व अपिलाची सुनावणी झाली नाही असे अपिलार्थी यांनी म्हटले असून आपल्या मूळ माहितीची मागणी त्यांनी या अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर तात्पुरत्या स्वरुपात सध्या कारभार सांभाळत आहेत. आयोगाचे दिनांक ०६-०२-२००८ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी लागलीच कारवाई करुन त्यांच्या कडील दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिनांक

२९-०२-२००८ रोजीच्या आयोगाकडील प्रस्तावित सुनावणीच्या संदर्भात रुपये २००० /- इतके शुल्क त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी त्यांच्या कार्यालयात भरण्यास सूचित केले. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या या पत्रास कोणत्याही प्रकारे उत्तर दिले नाही अथवा प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती आज रोजी त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीने त्यांच्याशी कोणत्याही प्रकारे संपर्क न साधल्याने व आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही. या माहितीमध्ये फक्त त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस देऊ केली आहे. संस्थेकडे उपलब्ध असलेल्या माहितीचा यामध्ये समावेश नाही.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या ठिकाणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियमाची पुरेपूर अवहेलना केल्याचे दिसून येत आहे. त्यांनी अपिलार्थी च्या प्रथम अर्जावर व प्रथम अपिलावर कोणताही प्रतिसाद न देऊन या कायद्याविषयी अनादर व्यक्त केला आहे असे आयोगाचे मत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) व १९ (६) चा निःसंशयपणे भंग केल्याचे येथे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी माहिती देण्याची तयार दर्शविली आहे परंतु या माहितीमध्ये त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहितीच अपिलार्थीस देऊ केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस उद्देशून त्यांनी लिहिलेल्या दिनांक २७-०३-२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीस मुद्दा क्रमांक "ब" संदर्भात त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती संस्थेच्या मुख्यालयातून मागवावी असे सूचित केले आहे. तर मुद्दा क्रमांक "क", "ड", "फ" च्या बाबत संबंधीत कागदपत्राच्या झेरॉक्स

प्रतीची किंमत भरल्यानंतर ती तत्काळ देण्यात येतील असे अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती तील मुद्दा क्रमांक "इ" च्या संदर्भात सदरील माहिती फक्त संस्थेचे मा. चेअरमन देऊ शकतात असे उत्तर दिले आहे. अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक "य" च्या संदर्भात तर त्यांनी या सर्वांवर कळस करुन अपिलार्थीस – " त्यावेळेस जे प्राचार्य पदावर होते त्यांनाच याबाबतची माहिती आहे "-- अशी माहिती दिली आहे. अर्थात अपिलार्थीने या मुद्दयाव्दारे मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने व सदर माहिती जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित करणारी असल्याने या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देणे अभिप्रेत नाही. थोडक्यात येथे असे दिसून येते की, अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत टळून गेल्यानंतर देखील जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याची मानसिकता तयार झालेली नाही तर काही बाबतीत अपिलार्थीस त्यांनी संबंधीत माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित करुन अप्रत्यक्षपणे नाकारल्याचे दिसून येते. किंबहुना त्यांनी अपिलार्थीच्या विचाराधीन असलेल्या अर्जास प्रतिसाद देण्यासंबंधी जे दुर्लक्ष केले आहे किंवा अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून ज्या प्रकारे वंचित ठेवले आहे त्याची भरपाई कोणत्याही प्रकारे होऊ शकेल असे आयोगास वाटत नाही. या प्रकरणी संस्थेकडे असलेल्या संस्था व संबंधीत कॉलेज हे एकाच प्राधिकरणाचे दोन भाग असल्यामुळे अपिलार्थीस संस्थेकडे माहिती मागण्याचे सूचित करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती ही बरोबर नाही. त्यांच्याकडे जर अपिलार्थीने मागितलेली माहिती नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत संस्थेकडे पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि त्यांनी या प्रकरणी अशा प्रकारे कोणतीही कारवाई

केली नाही. किंबहुना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना पुरेसे स्वारस्य होते असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या संस्थेसंदर्भात आयोगाकडे यापूर्वीही ब-याच अपिलाची सुनावणी झाली असता असे आढळून आले आहे की, संबंधीत संस्थेने जन माहिती अधिकारी म्हणून शाळा, महाविद्यालये यांच्यातील प्राध्यापक व प्राचार्य यांना माहिती अधिकारी नेमले आहे. परंतु त्यांच्याकडे आवश्यक ते अभिलेखे मात्र संस्थेने ठेवल्याचे दिसून येत नाही. सबब सदर संस्थेच्या अध्यक्षांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कडील सर्व अभिलेखे संस्थेच्या प्राचार्याकडे हस्तांतरीत करावेत व अपिलीय अधिकारी म्हणून प्राचार्याची व माहिती अधिकारी म्हणून प्राध्यपकांची नेमणूक करावी म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकास आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यासंदर्भात योग्य ती कारवाई होणे सुकर होईल.

वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे या प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल व त्याव्दारे स्वतःस अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीस पात्र ठरविल्याने विलंबाच्या प्रतिदिन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी अन्वये रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत आयोगास सरळ सादर करावा. सदर मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास हेच आदेश कायम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी

संस्थेशी संबधीत असलेली सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी संस्थेकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी. सदर संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी जन माहिती अधिकारी यांना ही माहिती देण्यासंदर्भात तात्काळ सकारात्मक प्रतिसाद द्यावा असे त्यांनाही सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवल्याबद्दल, विलंबाच्या प्रतिदिन रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी- रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २८-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संतोष श्रावण भिंगारे, पहाडसिंगपुरा, लेणी रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक मराठी, मिलींद कला महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ प्राचार्य, मिलींद कला महाविद्यालय, नागसेन वन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ अध्यक्ष, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, आनंदभवन, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, आनंदभवन, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/९८६

निर्णय दिनांक २८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख अथर शेख हक्कानी,<br>दुबई टेलरच्या मागे, रशिदपुरा,<br>टि. व्ही. सेंटर रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख अथर शेख हक्कानी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद श्री. दत्ता नरहरी भारस्कर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व त्रयस्त पक्ष सौ. विमल विश्वनाथ गवळी यांचे

प्रतिनिधी श्री. विश्वनाथ मार्तंडराव गवळी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीमती विमलबाई राजपूत गवळी यांचा किरकोळ रॉकेल परवाना क्रमांक १९/८५ हा गणेश कॉलनी येथून सिडको येथे बदलला गेल्याबाबत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

' विमलबाई राजपुत गवळी यांचे नावे असलेला किरकोळ केरोसीन परवाना क्रमांक १९/८५ असे असून हा परवाना त्यांनी गणेश कॉलनी येथून सिडको येथे गेल्या काही महिन्यात ट्रान्सफर केलेला आहे. आपल्या कार्यालयाकडून तीला सिडको येथे चालविण्याकरीता दिलेले आहे. त्यामुळे गणेश कॉलनी रशिदपुरा येथील नागकरीकांना रॉकेल कोणाकडुन मिळणार आल्या कार्यालयाने गणेश कॉलनी येथील दुस-या दुकानला ॲटेच केले असे आम्हाला आपल्या कार्यालयाकडुन समजले आहे. तसेच या दुकानाचा कोठा हा गणेश येथील किरकोळ दुकानदाराला जोडलेला आहे असे समजते. तरी आपण विमलबाई राजपुत गवळी यांना दुसरा नवीन परवाना दिलेला आहे का असल्यास त्या परवानाची झेरॉक्स प्रत आम्हाला माहीतीस्तव देण्यात यावी किंवा जर त्यंना नवीन परवाना दिला गेला नाही तर तेथे सद्या ते कोणता परवाना वापरीत आहे. तसेच त्यांच्या दुकानाची चौकशी संबंधीत पुरवठा निरीक्षक यांचेकडून चौकशी करुन चौकशी अहवालाची प्रत आम्हाला (विमलबाई राजपुत गवळी यांचे विरुध्द कुठल्याही प्रकार्यवाही केली) त्याची देण्यात यावी. तसेच विमलबाई गवळी यांचा किरकोळ केरोसीन परवाना हा कोणत्या आधारे गणेश कॉलनी येथुन सिडको एरीयामध्ये ट्रान्सफर करण्यात आला त्या विषयी लेखी पुरावा आम्हास देण्यात यावा. '

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी, आयोगाने पूर्वसूचना देऊन देखील, आयोगाकडे जावक नोंदवहीची प्रत सादर केली नाही. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस साध्या पोस्टाने पाठविले असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविले किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. सदर अपील अपिलार्थीने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा आधी केलेले आहे व या अपील अर्जावर त्यांनी फक्त दहा रुपये इतक्या किंमतीचा कोर्ट फी स्टॅम्प चिकटविलेला आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीस पत्रव्यवहार केल्याचे दिसून येत नाही. या ठिकाणी असे दिसून येते की, अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज व अपील अर्ज एकाच प्राधिकरणाकडे केले आहे त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात अपील अर्ज पोहोचला किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांना यासंबंधात विचारले असता त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज संबंधीत अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत पाठविला गेला नाही असे आयोगास सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते तसेच आयोगाकडे सदर केलेल्या या व्दितीय अपील अर्जावर देखील त्यांनी प्रत्येकी पाच रुपये किंमतीचे दोन कोर्ट फी स्टॅम्प चिकटविले आहेत. अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेतांना आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्य प्रतिसाद दिल्याचे म्हटले आहे तरी प्रत्यक्षतः त्यांचे दिनांक ०५-०४-२००७ रोजीचे पत्र अपिलार्थीस खरोखरच पोहोचले आहे किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही कारण जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांच्या कार्यालयाच्या नोंदवहीचा संबंधीत भाग सादर केलेला नाही व अपिलार्थी यांनी सदर पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचे विधान केले आहे. येथे असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडून प्रथम अपील करतांना रुपये वीस इतका अपील फीस भरणा केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी या अर्जावर फक्त दहा रुपये किंमतीचे एक कोर्ट स्टॅम्प चिकटविले आहे तर आयोगाकडे अर्ज करतांना देखील त्यांनी आवश्यक ती कोर्ट फी भरल्याचे दिसून येत नाही. आयोगाकडे केलेल्या अपील अर्जावर त्यांनी प्रत्येकी पाच रुपये किंमतीची दोन, अशी दहा रुपये किंमतीची अपील फी भरल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २७ च्या उप कलम २ मधील तरतुदीन्वये अपिलार्थीस अपील करण्या-संदर्भात निश्चित नियम प्रसिध्द केले आहेत. सदर नियम शासनाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या अधिसुचनेन्वये व आरटीआय २००५/सीआर/३१५/०५/५ या

क्रमांकाने प्रसिध्द केले असून सदर अधिसूचनेतील कलम ५ (२) अन्वये निश्चित केलेली अपील फी अपिलार्थीने भरली नसल्याने अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगा-कडे अपील अवैध ठरत आहे. अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले अपील वरील कारणास्तव अवैध ठरत असल्याने ते फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २८-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख अथर शेख हक्कानी, दुबई टेलरच्या मागे, रशिदपुरा, टि. व्ही. सेंटर रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२७

निर्णय दिनांक २८-०३-२००८

१ श्री. किशोर भबुतमलजी शहा, : अपिलार्थी
प्लॉट नं. २०+२१/३, गजानन हाऊसिंग
सोसा. पार्वतीनगर, जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अध्यक्ष, श्री जैन श्वेतांबर मूर्तीपूजक
ट्रस्ट, जळगाव

२ सहा. धर्मादाय आयुक्त कार्यालय, जळगाव

३ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहा. धर्मादाय आयुक्त, जळगाव
विभाग, जळगाव

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय जळगाव विभाग जळगाव

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव विभाग जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. किशोर भबुतमलजी शहा (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय जळगाव श्री. बाबुलाल जगदेवराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव श्री. बद्रीप्रसाद रामविशाल गुप्ता (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जळगाव येथील सिटी सर्व्हे नंबर १९९२ मधील श्री. जैन श्वेतांबर मंदिराच्या आवारातील अनाधिकृत बांधकामा-संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. वरील विषयास अनुसरुन सन २००० मध्ये राजेंद्र गृह वस्तू भांडार यांना मंदिराचे अध्यक्ष व विश्वस्तांनी तात्पुरते स्वरुपाचे दुकान मंदिराचे मुख्य प्रवेशव्दारालगत बांधकाम करुन देण्यात आले. त्या बांधकामा-साठी आलेल्या खर्चाचे विवरण.

२. सन २००२-०३ मध्ये सदरचे दुकान तोडून त्या ठिकाणी अध्यक्ष व विश्वस्तांनी तात्पुरते स्वरुपाचे अनाधिकृत ऑफिस बनविले, त्या बनविलेल्या ऑफीसास आलेला एकूण खर्च व तोडण्यात आलेल्या दुकानाचा एकूण खर्चाचे विवरण.

३. सन २००६ मध्ये अनाधिकृत बांधलेले ऑफीस महापालिकेतर्फे तोडण्यात आले तर त्या तोडण्यात आलेल्या ऑफीसचा खर्च व ऑफीस बांधतांना झालेला एकूण खर्च याचे विवरण.

४. मंदिराच्या श्री च्या मुर्तीलगत मंदिराचे अध्यक्ष व विश्वस्तांनी अनाधिकृत संडास बाथरुम बांधले ते बांधण्यात आलेल्या संडास बाथरुमचे खर्चाचे विवरण.

५. सद्य परिस्थितीत मंदिराचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाच्या नावाची यादी मिळणेबाबत.''

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या संदर्भातील माहिती उपलब्ध नसल्याने त्यांना देता येत नसल्याचे कळविले व मुद्दा क्रमांक ५ बाबत सहाय्यक धर्मादाय आयुक्त जळगाव यांच्या कार्यालयात ५ रुपये इतके शुल्य भरण्याचे सूचित केले होते. या पत्राची प्रत त्यांनी अध्यक्ष, श्री जैन श्वेतांबर मूर्तीपूजक ट्रस्ट, जळगाव यांना देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची झेराक्स प्रत संबंधिताकडे या पत्राव्दारे पाठविली.

संबंधितांकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची दिनांक ०७-०७-२००६, १४-०७-२००६ व २८-०७-२००६ या दिवशी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जा-संदर्भात आपला निर्णय दिनांक २८-०७-२००६ रोजी पारीत केला. या निर्णयाव्दारे

त्यांनी अपिलार्थीचे अपील चालविण्यायोग्य नसल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे अपील फेटाळले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलीय अधिकारी यांनी अध्यक्ष जैन श्वेतांबर मुर्तीपूजक ट्रस्ट यांना माहिती अधिकारातंर्गत माहिती पुरविली नाही म्हणून दंडात्मक कारवाई करणे नियमानुसार बंधनकारक असतांना त्यांच्यावर काही कारवाई न करता अपील फेटाळले म्हणून माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व त्यांनी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना प्राप्त व्हावी.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा दिनांक ०६-०५-२००६ रोजीचा अर्ज अध्यक्ष, श्री जैन श्वेतांबर मूर्तीपूजक ट्रस्ट, जळगाव यांच्याकडे दिनांक ०८-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला होत. तथापि त्यांच्या अर्जावर संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. यापूर्वी देखील त्यांनी संबंधीत ट्रस्टकडे माहितीचा अधिकार अधिनियमातंर्गत मागितलेली माहिती त्यांना ती संबंधीत ट्रस्टकडून नाकारण्यात आली. उलट त्यांच्यावर कायदेशीर कारवाईची धमकी संबंधीत ट्रस्टकडून देण्यात आली. त्यांना अपेक्षित असलेली माहिती संबंधितांकडून

वेळोवेळी न पुरविल्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होऊन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडे कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नसल्याने ते ती अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत परंतु अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भातील आवश्यक ते शुल्क रुपये ५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे संबंधीतांनी दिनांक ०८-०५-२००६ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केले होते. त्यांच्याकडे नोंदणी झालेल्या संस्थेचे ऑडिट रिपोर्ट, ट्रस्टीमध्ये झालेला बदल इत्यादी स्वरुपाची माहिती उपलब्ध असते. अपिलार्थीने येथे ट्रस्टने केलेल्या बांधकामाविषयी माहिती मागितली होती. सदर माहिती संबंधीत ट्रस्टच्या कार्यालयात उपलब्ध असणे शक्य असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीचा दिनांक ०६-०५-२००६ रोजीचा संबंधित अर्ज दिनांक ०८-०५-२००६ रोजी पाठविला व अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्याचे संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २६-०६-२००६ चा अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी दिनांक ०७-०७-२००६, १४-०७-२००६ व २८-०७-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे हजर न राहिल्याने त्यांनी आपला अंतीम निर्णय दिनांक २८-०-७-२००६ रोजी पारीत केला आहे. सदर ट्रस्टला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे चालविण्याकरिता आर्थिक अनुदान प्राप्त होत नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी या ट्रस्टला लागू होत नसल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज फेटाळून लावला.

त्रयस्त पक्षाचे प्रतिनिधी तथा अध्यक्ष, श्री जैन श्वेतांबर मूर्तीपूजक ट्रस्ट, जळगाव यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, श्री जैन श्वेतांबर मूर्तीपूजक ट्रस्ट हे धार्मिक न्यास असून सदर न्यासाचा कारभार भाविकांनी नियमीतपणे दिलेल्या देणग्यावर चालू असतो. शासनाकडून त्यांना कोणत्याही प्रकारचे आर्थिक अनुदान प्राप्त होत नाही. तसे अनुदान संबंधीत ट्रस्ट हे घेत नसल्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदी लागू होत नाहीत. संबंधीत न्यासाच्या जमाखर्चाचा हिशोब नियमीतपणे ठेवण्यात येत असतो. या हिशोबाचा ऑडिट रिपोर्ट धर्मादाय आयुक्तांना नियमीतपणे सादर करण्यात येत असतो. अपिलार्थी यांचे दिनांक ०६-०५-२००६ रोजीचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही. आयोगाच्या सुनावणीची नोटीस त्यांना दिनांक ११-०३-२००८ रोजी प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्याचे प्रथम त्यांना कळाले. अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रश्न येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी त्यांच्या ट्रस्टला लागू होत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील घटनाक्रमृ दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा दिनांक ०६-०५-२००६ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षाकडे दिनांक ०८-०५-२००६ रोजी पाठविला होता. त्यांनी त्यांच्या या दाव्या-पुष्ट्यर्थ त्यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे यावरुन त्यांनी अपिलार्थीचा अर्ज संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षाकडे पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भातील माहिती आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरुन प्राप्त करुन घेतली आहे. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते

४ संदर्भातील माहिती हवी आहे. अपिलार्थीचा विनंती अर्ज जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत संस्थेच्या ट्रस्टकडे पाठविला. तथापि संबंधीत ट्रस्टचे अध्यक्ष अपिलार्थीचा अशा प्रकारचा कोणताही अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे आयोगास सांगत आहेत. संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षांच्या मते त्यांच्या ट्रस्टला शासना-कडून कोणत्याही प्रकारचे भरीव आर्थिक सहाय्य मिळत नसल्याने व त्यांचे ट्रस्ट शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत घेत नसल्याने त्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी लागू नाहीत. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये "माहिती" या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केलेली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

"माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

वरील व्याख्येमध्ये, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशा कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती -- अशी स्पष्ट तरतूद आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जर सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षाकडे मागितली तर सहाय्यक धर्मादाय आयुक्तांना ते सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सदर माहिती त्यांना प्राप्त होऊ शकत असल्याने त्यांस सार्वजनिक स्वरुप प्राप्त होते त्यामुळे

साहजिकच माहिती प्राप्त करुन घेण्याचा अपिलार्थीचा हक्क आहे आयोगाचे मत आहे. त्यामुळे संबंधीत ट्रस्टच्या अध्यक्षाचा माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी त्यांच्या ट्रस्टला लागू नाहीत हा दावा आयोग मान्य करत नाही.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ४ संदर्भातील माहिती संबंधीत ट्रस्टकडून हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. अन्यथा त्यांचेवर मुंबई सार्वजनिक न्यास नोंदणी कायद्यान्वये आवश्यक ती कारवाई करावी.

जन अपिलीय अधिकारी यांच्यावर त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले म्हणून दंडात्मक कारवाई करण्याची अपिलार्थीची विनंती आयोग अधिकारितेअभावी व जन अपिलीय अधिकारी हे स्वतंत्र अर्धन्यायिक प्राधिकरण असल्याने, फेटाळून लावण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारचा हेतुपुरःस्सर कसूर केला नसल्याने व त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार यथायोग्य कारवाई विहित मुदतीत केली असल्याने त्यांच्यावरही कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ ते ४ शी

संबंधीत माहिती संबंधीत ट्रस्टकडून प्राप्त करुन घेऊन ती त्यांना ३० दिवसा-च्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २८-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. किशोर भबुतमलजी शहा, प्लॉट नं. २०+२१/३, गजानन हाऊसिंग सोसा. पार्वतीनगर, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, श्री जैन श्वेतांबर मूर्तीपूजक ट्रस्ट, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय जळगाव विभाग जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जळगाव विभाग जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२८

निर्णय दिनांक : २८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजाराम सिताराम मराठे,<br>रा. छाईल ता.साक्री जि.धुळे | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा मुख्याध्यापक,<br>पूज्य मनिबाई माणकलाल अग्रवाल,बालविकास मंदिर,<br>सटाणा ता. बागलाण जि. नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा सचिव,<br>पूज्य मनिबाई माणकलाल अग्रवाल,बालविकास मंदिर,<br>सटाणा ता. बागलाण जि.नाशिक. | | |

## <u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. राजाराम सिताराम मराठे (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, पूज्य मनिबाई माणकलाल अग्रवाल बालविकास मंदिर, सटाणा श्रीमती मीना परशराम पगार, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, पूज्य मनिबाई

माणकलाल अग्रवाल बालविकास मंदिर,सटाणा ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २८.३.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वेतनासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"श्रीमती सुवर्णा राजाराम मराठे यांना कायम स्वरुपी शिक्षक मान्यता असतांना त्यांना नियमित मिळणाऱ्या वेतनापासून वंचित ठेवण्यात आले या संदर्भातल सबळ कारणे व त्याबाबतचे कागदपत्रे उपलब्ध व्हावीत."

सदर माहिती अपिलार्थीने रजिस्टर्ड टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ६.४.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांचे वेतनासंदर्भात काही माहिती अपिलार्थीस दिली. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २४.४.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीस त्यांनी या अपिलासंदर्भात दि. १८.५.२००६ रोजी एक पत्र पाठवून त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीवर घेतलेल्या आक्षेपासंदर्भात आवश्यक तो खुलासा केला असल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने व्यथित होऊन जन अपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २.८.२००६ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपिलाची आयोगाच्या मुंबई कार्यालयामध्ये दि. १०.८.२००६ रोजी नोंद झाली आहे. या अपिलअर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना पुरविलेली माहिती खोटी, बनावट व दिशाभूल करणारी असल्याचे नमुद केले आहे व त्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) व (२) प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या मूळ अर्जाचे संदर्भात दि. ६.४.२००६ रोजीच्या

पत्रान्वये जी माहिती दिली आहे त्यातील परिच्छेद क्र.५ व ६ मध्ये दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.५.२००६ रोजी त्यांना उद्देशून दिलेल्या पत्रातील श्री. शिवाजी पंडीत काकडे व श्री. द.रा.मराठे यांनी संस्थेची परवानगी व विश्वासात न घेता रेकॉर्डमध्ये फेरफार करुन त्यांच्या वैयक्तिक मान्यतेचा प्रस्ताव सादर केला व शाळेची दिशाभूल करुन अनधिकृतपणे वैयक्तिक मान्यता प्राप्त करुन आणली या व इतर काही विधानामुळे त्यांची बदनामी झाली असे त्यांचे मत आहे. आजमितीस अपिलार्थी यांना त्यांच्या संपूर्ण पगार वेतनातील फरकासह वेतन प्राप्त झाले आहे. आता त्या बाबत त्यांचे कोणतेही गाऱ्हाणे शिल्लक नाही.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. नाशिक यांच्या दि. २०.१२.२००५ च्या पत्रान्वये वैयक्तिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस सर्व पगार वेतनाच्या फरकासह अदा केला आहे. त्यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या दि. ६.४.२००६ रोजीच्या पत्रामधील अपिलार्थीने वेतन घेण्यास नकार दिला, या माहिती संदर्भात त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या संस्थेतर्फे त्यांना पगार रोखीने देण्यात येत होता. अपिलार्थीस सदर पगार रोखीने देऊ केला असता, त्यांनी सदर पगार बँकेत जमा करण्यात यावा, अशी जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती. त्यामुळे अपिलार्थीने वेतन घेण्यास नकार दिला असे विधान त्यांनी या पत्रामध्ये केले आहे.शिक्षणाधिकारी यांचेकडील दि. २०.११.२००५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस वैयक्तिक मान्यता प्राप्त झाल्याने त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या त्यांच्या दि.६.४.२००५ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस संपूर्ण वेतनपासून वंचित ठेवण्यात आले नाही, असे विधान केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूने केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी निम्मा भाग माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती ' या कलम २(च) मधील व्याख्येशी सुसंगत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपिलार्थीने अथवा अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांच्या प्रशासकीय निर्णयाबाबत अथवा एखाद्या कृतीबाबत कारणे देऊन खुलासा करण्याची मागणी अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत नाही. अपिलार्थीने या अर्जामधील त्यांच्या वेतनासंदर्भात प्रलंबित असलेल्या कागदपत्रांची मागणी जन माहिती अधिकारी यांचेकडे केली होती.तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दि. ६.४.२००६ रोजीच्या

पत्राद्वारे अपिलार्थीस फक्त खुलासा पाठविण्यात आलेला आहे. या खुलाशासोबत अपिलार्थीस त्यांनी मूळ माहितीच्या अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे त्यांना पाठविल्याचे दिसून येत नाही.थोडक्यात, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे पाठविली नाहीत अथवा सदर कागदपत्रांविषयी त्यांचे कोणतेही अभिप्राय अपिलार्थीस पाठविलेल्या दि. ६.४.२००६ रोजीच्या पत्रामध्ये दिलेले नाहीत. यावरुन अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व बदनामीकारक माहिती दिली, असे म्हणणे जरी सिध्द होत नसले तरी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिली असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती बनावट व खोटी का वाटते, असे विचारले असता, या संदर्भात स्पष्टीकरण त्यांच्या वरील युक्तीवादामध्ये दिले असल्याचे सांगितले. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या ६.४.२००६ रोजीच्या पत्रातील मुद्दा क्र.५ व ७ चे अवलोकन केले असता, त्यांनी सर्वसाधारण स्वरुपाचे विधान या पत्रात केल्याचे दिसून येत आहे. या विधानाद्वारे अपिलार्थीस बनावट व दिशाभूल करणारी माहिती मिळाली आहे, असे आयोगास वाटत नाही. मात्र जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय देतांना श्रीमती मराठे व श्री. काकडे हे पंडीतराव भि.काकडे यांचे सून व मुलगा असल्यामुळे संस्थेने आजपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही, अशाप्रकारची विधाने केली आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर निर्णय देतांना अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून, त्यांचे म्हणणे नोंदवून त्यावर आपले माहिती संदर्भातील निर्णय देणे, हे अपिल ठरविणे या प्रकरणी अभिप्रेत आहे.जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांचे अपिलावर निर्णय देतांना वैयक्तिक बाबीचा अनावश्यक उल्लेख केला असून, अशा प्रकारचे अनावश्यक अभिप्राय त्यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अपिलावर निर्णय देतांना टाळावे, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस आज रोजी त्यांचे पूर्ण वेतन फरकासह प्राप्त झाले आहे. जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती देणे अथवा अपिलार्थीपासून माहिती दडविण्याचा कोणताही असद्हेतू होता, असे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून आले नाही. मात्र त्यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती दिली हे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी, त्यांचे कार्यशैलीतील दर्शविलेल्या, अशा प्रकारच्या कर्तव्य परायणणेचा अभावाबाबत, आयोगातर्फे त्यांना

सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीन्वये त्यांचेकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाबाबत अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याचे दृष्टीने, जन माहिती अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेल्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली सर्व कागदपत्रे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे,

## निर्णय

१) अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली सर्व कागदपत्रे हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांचे आत विनामूल्य पुरवावीत.

३) संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूरी माहिती दिल्याबद्दल त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी भविष्यात अशा प्रकारच्या चुका टाळाव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २८-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजाराम सिताराम मराठे, रा. छाईल ता.साक्री जि.धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, पूज्य मनिबाई माणकलाल अग्रवाल,बालविकास मंदिर, सटाणा ता. बागलाण जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव,पूज्य मनिबाई माणकलाल अग्रवाल,बालविकास मंदिर, सटाणा ता. बागलाण जि. नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९३

निर्णय दिनांक : २८-०३-२००८

१ श्री. प्रभाकर मल्हारी निकम : तक्रारदार
४२४०,काळाराम मंदिरामागे, पंचवटी
नाशिक-४२२ ००३.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
आगार व्यवस्थापक (वरिष्ठ) नाशिक-२
आगार पंचवटी, नाशिक.

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. प्रभाकर मल्हारी निकम (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (वरिष्ठ) नाशिक-२, पंचवटी आगार, नाशिक श्री. सुधीर फकीरा पाटील ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी त्यांचे दि. २८.९.२००७ रोजीच्या तक्रारअर्जान्वये उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार उत्तरवादी यांचेकडे दि. १४.७.२००७ रोजी माहितीचा अर्ज दिला होता. विहित मुदतीत दि. १४.८.२००७ पर्यंत उत्तरवादी यांनी, त्यांना माहिती न दिल्यामुळे, त्यांनी दि. १४.८.२००७ रोजी उत्तरवादी यांना परत अर्ज दिला होता, तो देखिल त्यांनी स्वीकारला नाही. या अर्जासोबत त्यांनी रु.१५०/- मनिऑर्डरने

उत्तरवादी यांचेकडे पाठविले होते व या अर्जासंदर्भात त्यांनी दि. २८.८.२००७ रोजी अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील दाखल केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपिल अर्जावर उत्तरवादी यांचेकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती घेऊन जावी, असे दि. २७.९.२००६ रोजी कळविले. अपिलीय अधिकारी यांचे पत्र घेऊन ते उत्तरवादी यांचेकडे गेले असता. उत्तरवादी यांनी तक्रारदारास नवीन अर्ज करण्यास सांगितले. तक्रारदार यांचे मते उत्तरवादी हे हेतूपुरस्सर माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत, त्यामुळे त्यांना तक्रारदाराने मागितलेली माहिती देण्यासंदर्भात आदेशित करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

तक्रारदाराच्या या तक्रारीसंदर्भात उत्तरवादी यांनी असा खुलासा केला आहे की, तक्रारदाराचा दि.१४.७.२००६ रोजीचा अर्ज त्यांना दि. १८.७.२००७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जामध्ये त्यांनी व्यक्तीशः माहिती मागितली असल्यामुळे, त्यांनी सदर माहिती दि. २३.७.२००६ रोजी तक्रारदारास व्यक्तीशः देऊ केली, तथापि सदर माहिती घेण्यासाठी तक्रारदाराने नकार दिला, उत्तरवादी यांनी तक्रारदाराने माहिती घेण्यास नकार दिल्याबद्दल पंचनामा करुन ठेवला आहे व त्या पंचनाम्याची प्रत आयोगास सादर केली. तक्रारदाराने व्यक्तीशः माहिती स्वीकृत करण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी ती माहिती दि. ४.८.२००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली. तथापि सदर रजिस्टर्ड पत्राची तक्रारदारदारास तामिली न झाल्याने ते त्यांचेकडे दि. ११.८.२००७ रोजी विनातामिली परत प्राप्त झाले. त्यानंतर तक्रारदाराने विभाग नियंत्रक यांचेकडे दि. २३.८.२००७ रोजी प्रथम अपिल केले, या अपिलावर विभाग नियंत्रक यांनी उत्तरवादी यांना तक्रारदारास माहिती देण्याची सूचना केली असून त्यांनी तक्रारदारास त्यांच्याकडील दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये, दि. २२.११.२००७ रोजी ही माहिती घेतो, असे सांगितले, प्रत्यक्षात दि. २२.११.२००७ रोजी माहिती घेण्यास नकार तक्रारदाराने दिला, याबाबतही त्यांनी पंचनामा केला आहे. या नंतर चौथ्या वेळी त्यांच्याकडील दि. २५.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदारास रजिस्टर्ड पोस्टाने माहिती दिली असून ती माहिती तक्रारदाराने स्वीकारली आहे. थोडक्यात तक्रारदाराने व्यक्तीशः माहितीची अपेक्षा करुनही त्यांनी सदर माहिती उत्तरवादी यांचेकडून व्यक्तीशः हस्तगत केली नाही व आयोगाकडे अशाप्रकारची तक्रार केली असल्याचे दिसून येत आहे.

तक्रारदार यांना, तक्रारदारास उत्तरवादी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती अमान्य असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. यावर तक्रारदारास जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली सदर माहिती जर अमान्य असेल तर, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल करावे व जन अपिलीय अधिकारी

यांचा निर्णय जर त्यांना मान्य नसेल तर, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिल करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी प्रस्तावित प्रथम अपिलास झालेला विलंब संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी क्षमापित करावा व अपिलार्थीचे प्रथम अपिलावर अधिनियमातील विहित मुदतीमध्ये निर्णय द्यावा, असे जन अपिलीय अधिकारी यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रभाकर मल्हारी निकम,४२४०,काळाराम मंदिरामागे, पंचवटी, नाशिक ४२२ ००३.

२ जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक (वरिष्ठ) नाशिक-२ पंचवटी आगार, नाशिक.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९४

निर्णय दिनांक : २८-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. किशोर पंढरीनाथ चौधरी<br>प्लॉट नं.२६, संभाजीनगर, शहादा जि.नंदूरबार. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>समाज कल्याण अधिकारी,वर्ग-२,<br>विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय,<br>नाशिक विभाग, नाशिक. | : | उत्तरवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. किशोर पंढरीनाथ चौधरी (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.२, श्री. मधुकर नामदेव पाटोळे ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. ०३.५.२००७ रोजीच्या तक्रारअर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार उत्तरवादी यांचेकडून दि. १९.१.२००७ रोजी काही माहिती मागितली होती. सदर अर्ज उत्तरवादी यांना दि. २३.१.२००७ रोजी प्राप्त झाला असून, उत्तरवादी यांचेकडून त्यांना त्यांच्या अर्जासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. या तक्रार अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेली माहिती

उत्तरवादी यांनी देण्याचे त्यांना आदेशित करण्याची विनंती त्यांनी आयोगास केली आहे. या तक्रारअर्जाची नोंद आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. ८.५.२००७ रोजी झाली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारदाराने उत्तरवादी यांचेकडे जातप्रमाणपत्र पडताळणी करुन मिळण्यासंदर्भात दि. १.१२.२००४ ते १९.१.२००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. तथापि तक्रारदाराच्या या अर्जास उत्तरवादी यांचेकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद मिळाला नाही. त्याचबरोबर येथे असेही दिसून येते की, तक्रारदाराने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे पालन न करता, या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदींनुसार प्रथम अपील न करता, आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये सरळ तक्रार केली आहे. यावर तक्रारदारास अशी सूचना करण्यात येते की, त्यांनी या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील अर्ज करावा, त्यांचे कडून प्राप्त झालेल्या निर्णयाने जर त्यांचे समाधान झाले नाही तर, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये आयोगाकडे द्वितीय अपील करावे.

उत्तरवादी यांचेकडून तक्रारदाराच्या तक्रारीबाबत असा खुलासा करण्यात आला की तक्रारदार यांना आवश्यक असलेले इतर मागासवर्गातील तेली जातीचे वैधता प्रमाणपत्र क्र. १५३९५ हे निर्गमित करण्यात आले असून तक्रारदारास सदर प्रमाणपत्र दि. ११.१०.२००७ रोजी रोजी प्राप्त झाले आहे. उत्तरवादी यांचा सदर युक्तीवाद आयोगास मान्य नाही, कारण तक्रारदाराने त्यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार केलेल्या अर्जामध्ये जी माहिती मागितली होती, त्या माहितीचा उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या दुसऱ्या व वैयक्तिकरित्या केलेल्या कार्यवाहीशी कोणताही संबंध येत नाही. तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे मागितलेल्या माहिती संदर्भात तक्रारदाराच्या माहितीच्या अर्जावर उत्तरवादी यांनी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीन्वये विहित केलेल्या मुदतीत माहितीच्या अर्जांचा निपटारा करणे, हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे. तक्रारदाराच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार उत्तरवादी यांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरेने करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २८-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किशोर पंढरीनाथ चौधरी २६, संभाजीनगर, शहादा जि.नंदूरबार.

२ जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,वर्ग-२,विभागीय समाज कल्याण अधिकारी कार्यालय,नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००१

निर्णय दिनांक २९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. चितेवाड राजेश धोंडीबा,<br>अध्यक्ष भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,<br>तालुका शाखा, नायगाव व्यंकटेशनगर,<br>नायगाव, तालुका नायगाव जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसील कार्यालय नायगाव तालुका<br>नायगाव जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा तहसीलदार, नायगाव जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय नायगाव जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, नायगाव जिल्हा नांदेड |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. चितेवाड राजेश धोंडीबा, (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय नायगाव श्री. कमलाकर कुलप्पा देमगुंडे,

(यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव जिल्हा नांदेड श्री. संदीप सुधाकरराव कुलकर्णी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय नायगाव श्री. संदीप सुधाकरराव कुलकर्णी व तत्कालीन तहसीलदार, नायगाव जिल्हा नांदेड श्री. संभाजी ईश्वरराव अडकुणे हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सन २००५-२००६ या कालावधीतील त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या पोटकलम ४ च्या संदर्भातील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " माहितीच्या अधिकारातील पोटकलम ४ (चार) ची अंमलबजावणी केलेल्या अहवालाची संपूर्ण झेरॉक्स प्रत साक्षांकीत स्वरुपात देण्यात यावी नाही केल्यास पोटकलम ४ (चार) ची अंमलबजावणी करुन त्यांच्या अंमलबजावणी केलेल्या संपूर्ण आहावालाची झेरॉक्स प्रत देण्यात यावी आणि अंमलबजावणी का करण्यात आलेली नाही त्याचा रितसर खुलासा देण्यात यावा. संपूर्ण माहिती त्वरीत देण्याचे करावे. "

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपोटी शुल्क रुपये ९० /- हे त्यांच्या कार्यालयात जाऊन भरण्याचे या पत्राव्दारे सूचित केले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालया-

मार्फत अपिलर्थीस पाठविले असून ते अपिलार्थीस ०१-०१-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले.

जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात न भरता अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०२-०२-२००७ रोजी पारीत केले आहे. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचा अर्ज निकाली काढून अपिलार्थीस ९० रुपये इतकी फी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात करुन जमा करुन माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दिलेला निर्णय चुकीचा असल्यामुळे आयोगाकडे व्दितीय अपील केले असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीसाठीचा अर्ज स्विकारण्यास नकार दिल्याचे म्हटले आहे व याचबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधीत लिपिकाने न स्विकारल्याने त्यांना त्यांचा माहितीसाठीचा अर्ज

जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाने पाठवावा लागला. या अर्जा-बरोबरच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज देखील त्यांना त्यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने अर्ज स्विकारण्यास नकार दिल्याने तो रजिस्टर पोस्टाने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठवावा लागला. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हे एकाच मुख्यलयी राहत असल्यामुळे त्यांचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिकाने स्विकृत केला असता तर त्यांचा दोन्ही वेळेचा पोस्टाचा खर्च वाचला गेला असता तसेच माहिती अधिका-याने त्यांचे दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केलेले शुल्क हे मोघम स्वरुपाचे व अंदाजे असल्याने व या शुल्काचा तपशील दिला नसल्याने तसेच सदर शुल्क चुकीचे असल्यामुळे त्यांनी दिनांक १७-०१-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांच्या कार्यालयात देखील याच प्रकाराची पुनरावृत्ती होऊन त्यांना तो जन अपिलीय अधिकारी यांना त्याच मुख्यालयी रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठवावा लागला व टाळता येण्याजोगा खर्च त्यांना नाहक करावा लागला. यावरुन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघांनीही संगनमत करुन त्यांना त्रास दिल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या मूळ अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी चुकीच्या बाजुने निकाल दिल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये म्हटले असून जन अपिलीय अधिकारी यांनी ०२-०२-२००७ ही मागील तारीख टाकून त्यांना निकालाची प्रत दिनांक ०८-०२-२००७ रोजी दिली आहे. या सुनावणीस देखील जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेली माहिती बरोबर आणली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अशा त-हेने माहितीचा अधिकार अधिनियमाचा भंग केल्याने त्यांच्यावर चौकशीचे आदेश पारीत करण्यात यावे व त्यांना झालेल्या त्रासाबद्दल संबंधीताकडून नुकसानभरपाई देण्याविषयी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत म्हणजेच दिनांक ३०-१२-२००६ रोजी अधिनिमातील तरतुदीनुसार योग्य प्रतिसाद दिला असून सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ०१-०१-२००७ रोजी प्राप्त झाले आहे. अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील विहित मुदतीत कळविले गेले असल्याने अपिलार्थीने सदर माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरणे भाग होते. तथापि सदर शुल्काचा भरणा न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करणे पसंत केले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (ब) च्या तरतुदीनुसार त्यांनी माहिती तयार ठेवली असून सदर माहिती त्यांनी त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दिनांक ०६-१२-२००५ रोजीपासून सर्व नागरिकांना मोफत पाहण्यासाठी उपलब्ध करुन ठेवली आहे. अपिलार्थीने शुल्क न भरल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज दिनांक २२-०१-२००७ रोजी प्राप्त झाला. तद नंतर त्यांनी दिनांक ३१-०१-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस आपला निर्णय दिनांक ०२-०२-२००७ च्या आदेशान्वये कळविण्यात आला आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती आवश्यक ते शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करण्याचे आदेशीत करुन त्यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक

असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ९० इतके त्यांच्याकडील दिनांक ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये भरण्याचे सूचित केले. सदर पत्र देखील अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्राप्त झाल्याचे दिसून येते. या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शुल्काची रक्कम व ज्या लेखाशीर्षाखाली सदरील शुल्क भरणा करावयाचे ते कळविले आहे. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस शुल्क भरण्यात येऊन माहिती द्यावयाचा निर्णय निश्चित झाला की, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) प्रमाणे कारवाई करणे जरुरीचे आहे. अधिनियमातील कलम ७ (३) (क) मध्ये असे स्पष्ट उल्लेख केला आहे की, " कलम ७ (३) (क) अन्वये विहित केलेल्या फी नुसार ती जादा रक्कम जन माहिती अधिकारी यांनी कशाच्या आधारे ठरविली त्या हिशोबासह, माहिती पुरविण्याचा जन माहिती अधिकारी यांनी निर्देशीत केलेला खर्च दर्शविणारा जादा फीचा तपशील नमूद करणारी सूचना पाठविली, तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त त्यांच्या माहितीपोटी लागणारे शुल्क ठोक स्वरुपात कळविले आहे. या रक्कमेचा तपशील म्हणजे अपिलार्थीस देण्यात येणा-या माहिती पुष्ठांची संख्या, त्यासाठीचा दर याचा या पत्रामध्ये कोणताही उल्लेख नाही. सदर तपशील नसल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्याचे व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या शुल्काचा तपशील केव्हाही कळविला नाही हा युक्तिवाद आयोग मान्य करत असून जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येत की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थी माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे

टाळाटाळ केल्याचे अथवा त्यांनी हेतू पुरस्सर विलंब लावल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द न झाल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाही. तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमातील तरतुदीनुसार विहित कालावधीत आवश्यक ती कारवाई केली असल्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या कृतीवर आजच्या त्यांच्या युक्तिवादामध्ये घेतलेले आक्षेप फेटाळून लावण्यात येत आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात लावलेल्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या नावाच्या फलकाच्या पाटीच्या छायाप्रती आयोगास दाखविल्या यावरुन त्यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची माहिती दर्शविणारे फलक लावण्याचे सिध्द होत आहे. मात्र अपिलार्थीने आजच्या सुनावणी मध्ये कथन केलेल्या प्रसंगाची पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अशी सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी आपल्या कार्यालयातील संबंधीत लिपिकांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणारे सर्व अर्ज तत्परतेने स्विकारण्याच्या सूचना त्वरीत पारीत कराव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक २९-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चितेवाड राजेश धोंडीबा, अध्यक्ष भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, तालुका शाखा, नायगाव व्यंकटेशनगर, नायगाव, तालुका नायगाव जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-२), तहसील कार्यालय नायगाव जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००२

निर्णय दिनांक २९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नामदेव ग्यानोबा डोगाले,<br>मु. राजनगर, पो. यशवंतनगर,<br>तालुका जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशीक),<br>वन विभाग किनवट, तालुका किनवट,<br>जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास),<br>किनवट, जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नामदेव ग्यानोबा डोगाले व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), किनवट हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशीक), वन विभाग किनवट श्री. सोपानराव मारोतीराव पोतुलवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामाच्या हजेरीपत्रकासंदर्भात २००६ या वर्षातील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

" १. मस्टर क्र. १८२८६३ ते १८२८६७, दि. १ मार्च ते १५ मार्च २००६

२. मस्टर क्र. ०७६२८९ ते ०७६२९१ दि. १-३-०६ ते १५-३-०६

३. मस्टर क्र. ०२१२३७६ ते २१२३७७ दि. १६-५-०६ ते २४-५-०६

४. मस्टर क्र. ०६५०७३१ ते ०६५०७३६ दि. १६-३-०६ ते ३०-३-०६

५. मस्टर क्र. ०२१२४२२ ते ०२१२४२४ दि. १-४-०६ ते १५-४-०६

६. मस्टर क्र. ०२१२४३४ ते ०२१२४३६ दि. १३-४-०६ ते ३०-४-०६"

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपोटी एकूण रुपये १९२८ /- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीच्या पृष्ठांची संख्या व दर याचा उल्लेख केला आहे.

अपिलार्थीने या अर्जासंदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी दिनांक २८ या तारीखेमध्ये खाडाखोड करुन ती दिनांक १७ असल्याचे भासविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. या खाडाखोडीवर त्यांची स्वाक्षरी नाही.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २९-०३-२००७ व ०५-०५-२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि अपिलार्थीस त्यांनी दिनांक २९-०३-२००७ च्या सुनावणीचे पत्र दिनांक २३-०३-२००७ रोजी तर दिनांक ०५-०५-२००७ चे सुनावणीचे पत्र दिनांक ३०-०४-२००७ रोजी पाठविल्याचे दिसून येते. एवढे होऊनही अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्या कडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती मोठ्या व क्लीष्ट स्वरुपाची असल्यामुळे ती त्यांना विहित मुदतीत पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती विभागीय कार्यालयात मासिक लेखा (Monthly Account) सोबत सादर केल्याने अपिलार्थीस ती वेळेच्या आत देणे त्यांना जमले नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी

दिनांक २८-०३-२००७ रोजी पत्र दिले आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रस्तावित केलेल्या दिनांक ०७-०६-२००७ रोजीच्या सुनावणीनंतर अपिलार्थीस दिनांक १५-०६-२००७ रोजी त्यांनी मूळ अर्जाव्दारे अपेक्षित केलेली सर्व माहिती विनामूल्य पुरविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याबद्दल त्यांनी त्यांच्याकडे पोच दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या या विधानापुष्ट्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे अपिलार्थीची सही असलेले पोच पत्र आयोगास सादर केले आहे. सदर पोच पत्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०६-२००७ रोजी दिले असून सदर झेरॉक्स प्रत सत्यप्रत असल्याबद्दल सहाय्यक वन संरक्षक (जकास) (श्री. लक्ष्मणराव जाधव) किनवट यांची त्यावर सही आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २७-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक १५-०६-२००७ रोजी म्हणजे सुमारे साडेतीन महिने इतक्या विलंबाने दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या पोच पत्रामध्ये त्यांना माहिती मिळाल्याने ते माहितीसाठीचा अर्ज मागे घेत असल्याचे विधान केले आहे. सदर विधान त्यांनी दिनांक १५-०६-२००७ रोजी म्हणजे राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलानंतर केलेले आहे. या विधानाच्या सत्यतेची पडताळणी करण्यासाठी किंवा जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विधानाचे खंडण करण्याकरिता आज रोजी अपिलार्थी सुनावणीसाठी आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती आता त्यांना मिळाली असल्याने व त्यावर अपिलार्थीने दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या पोच पत्राव्दारे समाधान व्यक्त केले असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत मात्र येथे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित

मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याची बाब विचारात घेणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २७-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०३-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. जो जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी देणे त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे भाग होते. मुळात अपिलार्थीचा अर्ज विचारात घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी प्रमाणाबाहेर विलंब लावला आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा अर्ज जरी मागे घेतल्याचे जन माहिती अधिकारी यांना लिहून दिले असले तरी त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे ही बाब उरत आहे. तद्वतच अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या अर्जामध्ये त्यांनी केलेल्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून त्यांचा कशा प्रकारे छळ झाला याचे या अर्जामध्ये विवेचन केले आहे. त्याच्या मते सदर माहिती मिळण्यासाठी त्यांना चार महिने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अनेक चकरा माराव्या लागल्या त्यांचा आर्थिक व मानसीक छळ होऊनही त्यांना माहिती मिळाली नाही. तद्वतच त्यांच्या कार्यालयातील लेखापाल श्री. शेवाळे यांनी देखील आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन देण्याकरिता त्यांना चलन भरुन दिले नाही. या सर्व बाबी राज्य माहिती आयोगास निश्चितपणे व्यथित करणा-या आहेत असे आयोगाचे ठाम मत आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविणा-या जन माहिती अधिकारी व त्यांचा सहाय्यक यांच्यावर मुख्य वन संरक्षक औरंगाबाद यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्या च्या करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा. वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कार्यालयातील लेखापाल श्री. शेवाळे

यांच्या कार्यपध्दतीबाबत देखील त्यांच्या स्तरावरुन त्यांनी चौकशी करुन त्यांच्यावर आवश्यकता वाटल्यास प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. सोबत अपिलार्थीच्या आयोगास उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या अर्जाची प्रत जोडण्यात येत आहे. अपिलार्थीस आता दिनांक १५-०६-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त झाली असल्याने माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य वन संरक्षक औरंगाबाद यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत करुन तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०५-०५-२००७ रोजीच्या अर्जामध्ये उल्लेखलेले लेखापाल श्री. शेवाळे यांच्या वर्तनासंदर्भात मुख्य वन संरक्षक,औरंगाबाद यांनी सविस्तर चौकशी करुन आवश्यक वाटल्यास

त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद
दिनांक २९-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नामदेव ग्यानोबा डोगाले, मु. राजनगर, पो. यशवंतनगर, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशीक), वन विभाग किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (जंकास), किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वन संरक्षक,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (अपिलार्थीचा आयोगास उद्देशून लिहिलेला दिनांक ०५-०५-२००७ च्या पत्राची प्रत)

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१००३

निर्णय दिनांक २९-०३-२००८

१ श्री. तुकाराम शरदराव सराफ, : अपिलार्थी
प्लॉट क्र. ३०, विद्युत कॉलनी, बेगमपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा अन्न व औषध प्रशासन विभाग,
महाराष्ट्र राज्य, सर्वे नं. ३४१, बांद्रा कुर्ला
कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, बांद्रा (पु.),
मुंबई - ५१

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सह आयुक्त (विधी) अन्न व औषध
प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, सर्वे नं.
३४१, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, दुसरा मजला,
बांद्रा (पु.), मुंबई - ५१

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी, आयुक्त अन्न व प्रशासन, ३४१ बांद्रा कुर्ला संकुल, रिझर्व्ह बॅकेसमोर, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

जन अपिलीय अधिकारी : सह आयुक्त (विधी), आयुक्त अन्न व प्रशासन, ३४१ बांद्रा कुर्ला संकुल, रिझर्व्ह बॅकेसमोर, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. तुकाराम शरदराव सराफ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा मुख्य

प्रशासकीय अधिकारी, आयुक्त अन्न व प्रशासन श्री. भीमसेन शिवप्पा कापसे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त (विधी), आयुक्त अन्न व प्रशासन हे गैरहजर आहेत.

वरील प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अन्न निरिक्षक व इतर पदासाठी भरती करण्यासाठी आयोजित केलेल्या भरतीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

‘ अ) अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ११-०२-२००७ रोजी अन्न निरिक्षक व इतर पदांसाठी आयोजित केलेली लेखी परिक्षेची तपशीलवार माहिती.

ब) अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ११-०२-२००७ रोजीची परिक्षा कुठल्या परिक्षामंडळामार्फत घेतली व तत्पुर्वी तसा ठराव झाला होता काय ? असल्यास त्याची सत्यप्रत.

क) अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ११-०२-२००७ च्या परिक्षेत केवळ इंग्रजीतूनच प्रश्नपत्रिका काढून महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा अनिवार्य असतांनाही व्दिभाषिक प्रश्नपत्रिका का नाही काढली ?

ड) अन्न व औषध प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ११-०२-२००७ च्या परिक्षेत बॉल पॉईन्ट पेन ऐवजी पेन्सिल चा उपयोग अनिवार्य केला तो कुठल्या शासकीय निर्णयाच्या आधारे ? त्या निर्णयाची सत्यप्रत. ’

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली.

सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना दिलेली माहिती बरोबर असल्याचे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०५-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही संदिग्ध अपुरी व दिशाभूल करणारी असल्याने त्यांना वस्तुनिष्ठ माहिती हवी असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे पुरविली गेलेल्या माहितीमध्ये अन्न निरिक्षकांची ९८ व वरिष्ठ लिपिकाची १३ रिक्त पदे असल्याचे कळविले होते. परंतु प्रत्यक्षात निवड करतांना अन्न निरिक्षक या पदावर १०६ व वरिष्ठ लिपीक या पदावर १२ पदे भरण्यात आली होती. यावरुन जन माहिती

अधिकारी यांनी त्यांना चुकीची माहिती दिल्याचे सिध्द होते. तसेच त्यांनी मागितलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ अन्वये त्यांनी अन्न व औषध प्रशासन यांनी दिनांक ११-०२-२००७ रोजीची परिक्षा कुठल्या परिक्षा मंडळामार्फत घेतली आहे व तत्पूर्वी तसा ठराव झाला काय अशी माहिती मागितली असता परिक्षेतील निवड प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८ (छ) अन्वये माहिती देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. जन माहिती अधिकारी यांनी कळविलेली ही माहिती त्यांना मान्य नाही. त्यांनी मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ''क'' बाबत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून समाधानकारक उत्तर अद्यापही प्राप्त झाले नाही. तसेच त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ''ड'' च्या संदर्भात त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान झालेले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्याकडील रिक्त पदासंदर्भात दिलेल्या जाहिरातीमध्ये उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना दिली आहे. त्यातील सूचना क्रमांक १ मध्ये या जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या कमी-जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता स्पष्ट केली होती. तसेच संबंधीत निवड प्रक्रिया इन्स्टिट्यूट ऑफ बॅकींग पर्सोनेल सिलेक्शन मुंबई या संस्थेमार्फत करुन घेण्यासाठी शासनाने त्यांच्याकडील दिनांक २६-०२-२००६ च्या पत्राने मान्यता दिली होती. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दाखल केला होता त्यावेळी निवड प्रक्रिया चालू असल्यामुळे त्यांना अपिलार्थीस संबंधीत एजन्सीचे नाव कळविता आले नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ''क'' संदर्भात प्रश्नपत्रिका इंग्रजीमध्ये का काढतात हा प्रश्न प्रशासकीय स्वरुपाचा आहे व अन्न

निरिक्षकांची पदांची जाहिरात देतांना उमेदवारांना त्यांची नियमीत दैनंदिन कर्तव्ये पार पाडण्याकरिता किमान आवश्यक असलेली पात्रता लक्षात घेतली होती. अपिलार्थीने मूळ माहितीसाठीच्या अर्जात उपस्थित केलेल्या क्रमांक ''ड'' च्या संदर्भात कोणतीही प्रशासकीय निर्णय आज रोजी आस्तित्वात नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या एकूण ४ मुद्दयावरील माहितीपैकी मुद्दा क्रमांक ''अ'' वगळता उर्वरीत ३ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे तसेच या अर्जाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित केला आहे. अपिलार्थी यांनी आज रोजी युक्तिवादामध्ये उपस्थित केलेल्या मुद्दा क्रमांक ''अ'' च्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरील युक्तिवादामध्ये उत्तर दिले आहे व जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ''ब'' च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (छ) अन्वये माहिती देता येणार नसल्याचे कळविले आहे. अपिलार्थीने ज्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर परिक्षा घेणा-या यंत्रणेच्या नावाची विचारणा केली त्यावेळी उमेदवार निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (छ) अन्वये माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ''ब'' संदर्भात, या टप्प्यावर निवड प्रक्रिया पूर्ण न झाल्याने, अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा निर्णय आयोगास योग्य वाटतो.उमेदवारांची परिक्षा खाजगी यंत्रणेमार्फत घेण्याचा पूर्ण निर्णय प्रशासकीय स्वरुपाचा

असून हा निर्णय त्यांनी कोणत्याही ठरावाव्दारे घेतला नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले आहे. अशा प्रकारचा ठराव मुळात आस्तित्वात नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याची सत्यप्रत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक "क" च्या संदर्भात प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असून त्यांना जन माहिती अधिकारी यांचा या मुद्दयाव्दारे खुलासा अपेक्षित केल्याचे दिसून येते. वास्तविकतः माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येमध्ये अशा प्रकारचा कोणताही खुलासा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक "ड" च्या संदर्भात देखील अपिलार्थीने बॉलपेन ऐवजी पेन्सिलचा उपयोग कोणत्या निर्णय आधारे घेतला त्या निर्णयाच्या सत्यप्रतीची मागणी केली आहे. अशा प्रकारचा कोणतीही शासन निर्णय आस्तित्वात नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर स्पष्ट केले. पदे भरतीसाठी कोणती पध्दती अवलंबावयाची व निवड प्रक्रिया कशा प्रकारे करावयाची हा पूर्णतः प्रशासकीय निर्णय असून सदर प्रशासकीय निर्णय कोणत्या परिस्थितीमध्ये व का घेतला हे विचारण्याची अधिकारिता माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये आयोगास नाही व अपिलार्थीने नेमक्या याच मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या मूळ अर्जाव्दारे खुलासा अपेक्षिला आहे. अशा प्रकारचा स्पष्टीकरणात्मक खुलासा अपिलार्थीस देण्याचे आदेशीत करण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये नाही. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती अधिनियमातील ' माहिती ' या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसते ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत पुरविली असल्याने व अपिलार्थीस खुलासा देणे हे माहितीचा अधिकार

अधिनियमातील तरतुदीन्वये अभिप्रेत नसूनही त्यांनी आवश्यक तो खुलासा केल्याचे दिसून येत असल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०३-२००७ रोजी दिलेल्या उत्तराने अपिलार्थी यांचे समाधान झालेले नाही. अपिलार्थीचा मूळ आक्षेप जन माहिती अधिकारी यांच्या प्राधिकरणाने नोकरभरती केलेल्या प्रक्रियेशी संबंधीत असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तरावर, अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये देखील परत जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलाशाची अपेक्षा केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अपेक्षित असलेला खुलासा त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्या कडून या प्रकरणाशी संबंधीत त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या नस्तीवरुन प्राप्त करुन घेणे शक्य आहे असे आयोगास वाटते त्यामुळे अपिलार्थीने ज्या विषयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडील माहिती मागविली आहे त्या विषयाच्या संपूर्ण नस्तीची त्यांनी पाहणी केल्यास त्यांच्या मनातील अनेक प्रश्नांना त्यामध्ये उत्तरे मिळू शकतील असे आयोगास वाटते. सदर अभिलेख्याची पाहणी करतांना त्यांना आवश्यक असणा-या कागदपत्रांच्या प्रती देखील त्यांना काढून घेता येतील. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून अपेक्षित असलेला खुलासा प्राप्त करुन घेण्यासाठी या विषयाशी संबंधीत नस्तींच्या पाहणीची मागणी वेगळ्या अर्जाव्दारे करावी. तद्वतच जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीचा सदर नस्तीच्या पाहणीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कारवाई करुन सदर नस्ती अपिलार्थीस त्यांचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत त्यांना पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहितीसंबंधीच्या विषयाशी संबंधीत सर्व नस्त्या व आवश्यक ते अभिलेखे त्यांना अपिलार्थीकडून त्या पाहणीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत त्यांना, अधिनियमातील तरतुदीनुसार पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद
दिनांक २९-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तुकाराम शरदराव सराफ, प्लॉट क्र. ३०, विद्युत कॉलनी, बेगमपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आयुक्त अन्न व प्रशासन, ३४१ बांद्रा कुर्ला संकुल, रिझर्व्ह बॅंकेसमोर, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त (विधी), आयुक्त अन्न व प्रशासन, ३४१ बांद्रा कुर्ला संकुल, रिझर्व्ह बॅंकेसमोर, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०२९

निर्णय दिनांक २९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ सौ. सुनंदा सिध्दार्थ सिरसाट,<br>मु. पो. नांदगाव बु. तालुका इगतपुरी,<br>जिल्हा नाशिक | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, इगतपुरी,<br>जिल्हा नाशिक | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक<br>उपविभाग, नाशिक | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. सुनंदा सिध्दार्थ सिरसाट (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, इगतपुरी जिल्हा नाशिक यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार (प्रशासन) श्री. सुदामराव धोडींबा कदम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक श्री. महेश भास्करराव पाटील हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे नांदगाव तालुका इगतपुरी येथील गट नंबर ६५५ मधील जमीन विक्री प्रस्तावासंदर्भात सन १९९७ ते २००० या कालावधीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" अ) भुतपूर्व कनिष्ठगाव नोकर वतन जमीन नोंद नं. ३५५४ दि. २-६-५९ मौजे नांदगाव बु. ता. इगतपुरी जि. नाशिक गट नं. ६५५ क्षेत्र ८-७१ पैकी क्र. कक्ष/१२/भुसुधार/१/वतन/एसआर/१६०/१९९७ दि. २७-४-२००० रोजीच्या ज्ञापन अन्वये विभागीय आयुक्त नाशिक विभाग यांनी अतिरिक्त (जास्त) ९७ गुंठे (०-२-०) जमीन विक्रीस दिलेली मंजुरी नियमाबाह्य/कायदेशीर आहे का ? हे बघण्याकरिता मा. तहसीलदार इगतपुरी यांचे मार्फत विक्री मंजुरीबाबत पाठविलेल्या प्रस्तावामधील (संचिका) सर्व कागदपत्राच्या सत्यप्रतिच्या नकला. (पु. १ ते १७१)."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात आढळून येत नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक १९-०८-२००६

रोजी पारीत केले आहे.  या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या नस्तीचा शोध घेऊन नस्ती प्राप्त होताच अर्जदारास त्याच्या सत्यप्रती उपलब्ध करुन देण्याचे त्यांना सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.  तसेच या अपिलामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी मोघम स्वरुपाच्या दिलेल्या आदेशाने त्यांना माहिती प्राप्त होण्याची शक्यता नसल्याने त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये बराच शोध घेतल्यानंतरही त्यांना आढळून आली नाही व तसे शपथपत्र त्यांनी आयोगास सादर केले आहे. आज रोजी अपिलार्थी यांच्या जमिनीसंदर्भात जिल्हाधिकारी यांनी दिनांक १६-१०-२००६ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १५०/२ अन्वये दिलेल्या सुचनेची प्रत, फेरफार नोंद क्रमांक २२६, संबंधीत जमिनीचा ७/१२ चा उतारा व खरेदीखताची प्रत एवढीच माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे व ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक २१-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर या अपील अर्जासंदर्भात त्यांनी ०५-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १९-०८-२००६ रोजी पारीत केले आहेत. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बराच शोध घेऊनही आढळून आली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देणे शक्य झाले नाही. सदर जमिनीच्या संदर्भात झालेला पत्रव्यवहार पाहता आयुक्त कार्यालयामार्फत संचिका जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व जिल्हाधिकारी कार्यालयाने तहसील कार्यालयाकडे पाठविल्याचे दिसून येते. जमिनीची खरेदी व्यवहार पूर्ण झाल्यानंतर कदाचीत सदर संचिका "ड" वर्ग अभिलेख्यामध्ये समाविष्ठ केली गेली असल्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर अभिलेखे जतन करण्याचा अनुज्ञेय कालावधी एक वर्षाचा असल्याने सदर प्रस्ताव नष्ट झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या कागदपत्राच्या आधारे ते त्यांचे जे वैयक्तीक प्रश्न सोडवू इच्छित असतील ते त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे वेगळ्या अर्जाव्दारे मांडल्यास त्याचा प्राधान्याने विचार करुन त्यांचे प्रश्न सोडण्याची तयारी जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगासमोर दर्शविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार पूर्ण झाल्यानंतर सदर प्रस्ताव "ड" वर्ग

अभिलेख या प्रवर्गात समाविष्ठ होऊन तसे नष्ट झाल्याची शक्यता देखील नाकारता येत नाही हे पाहता अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्याची शक्यता कमी दिसते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी या कागदपत्राच्या आधारे त्यांचे जे जमीनीसंदर्भात प्रश्न सोडवू पहात आहेत त्या प्रश्नाची प्राधान्याने दखल घेऊन सकारात्मक कारवाई करण्याची त्यांची तयारी दर्शविली आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीचा विचाराधीन माहितीसाठीचा अर्ज ज्या विषयाशी संबंधीत आहे त्या विषयावरील अपिलार्थी यांच्या इतर प्रश्नाबाबतच्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी सहाय्य करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २९-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. सुनंदा सिध्दार्थ सिरसाट, मु. पो. नांदगाव बु. तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, इगतपुरी, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नाशिक उपविभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३०

निर्णय दिनांक : २९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. खैरनार सुभाष शिवलाल,<br>एकतानगर, साक्री रोड, पिरबाबाजवळ,<br>धुळे. | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन)<br>धुळे. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी,<br>तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक),<br>धुळे. | | |

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. खैरनार सुभाष शिवलाल (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल), तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) धुळे श्री. हिम्मत नामदेवराव पाटील, ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) धुळे श्री. सर्वेशकुमार ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २०.२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे बिंदू नामावली रजिस्टर व मागासवर्गीय कक्ष यांनी दिलेल्या परवानगीच्या प्रतींची खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" बिंदू नामावली रजिस्टरची x-rox प्रत तसेच मागासवर्गीय कक्ष यांनी दिलेल्या परवानगीपत्राची x-rox प्रत (आता निघालेली जाहिरात संदर्भात)."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.३.२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना पुरविली असल्याचे दिसून येते.

तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीअन्वये जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. १३.४.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. अपिलार्थीच्या सदर अपिल अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २.५.२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थीस सदर पत्र प्राप्त न झाल्याने अपिलार्थी या सुनावणीसाठी हजर राहू शकले नाही व अंतीमतः सदर सुनावणी प्रत्यक्षात होऊ शकली नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक ती माहिती खुलाशासह देऊन अपिलार्थीचा अर्ज निकाली काढला आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांचेकडे अर्ज करतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास नकार दिला असल्याचे म्हटले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या अपिल निर्णयामध्ये अपिलार्थीचे सदर म्हणणे खोडून काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राजय माहिती आयोगाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि. २९.७.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. सदर अपिलाची आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. ४.८.२००६ रोजी नोंद झाली आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी असे नमुद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देतांना सर्वप्रथम अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार त्यांना माहिती पुरविण्यापृष्ठयर्थ आवश्यक ते शुल्क त्यांना कळविणे आवश्यक होते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १८.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे बिंदू नामावली रजिस्टरच्या पानांच्या छायाप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत, असे नमुद करुनही या झेरॉक्स प्रती सदर पत्रास जोडल्या नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी

यांनी त्यांची फसवणूक केली आहे व या बाबतची शहानिशा न करता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपिल नामंजूर केल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे. तसेच या अर्जामध्ये शेवटी त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे, व जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या संगनमताने त्यांचे अपिल नामंजूर केल्याने त्यांचेवर शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्याचीही आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी अपिलार्थी यांचे तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून मागितलेली माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झालेली नाही. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांना फक्त बिंदू नामावली रजिस्टरची झेरॉक्स प्रत हवी होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अनावश्यक माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांनी त्यांना सुनावणीच्या आजच्या टप्प्यावर काही अतिरिक्त माहिती हवी असल्याचे आयोगास सांगितले तथापि सुनावणीच्या वेळी त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपेक्षा जास्तीची माहिती आता देता येणार नाही. अपिलार्थीस ज्या जादा माहितीची आवश्यकता आहे, ती त्यांनी वेगळया अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडून मागवावी, असे त्यांना आयोगातर्फे सांगण्यात आले. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. १८.३.२००६ रोजीच्या पत्राद्वारे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविली आहे. त्यांनी अपिलार्थीस दि.१८.३.२००६ रोजी माहिती पुरविल्याप्रित्यर्थ त्यांचेकडील जावक नोंदवही रजिस्टर आयोगास दाखविले. या रजिस्टरमध्ये त्यांनी अपिलार्थीस पाठविलेले पत्र क्र. १३६८९ या क्रमांकाने नोंदवून घेतले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १३.४.२००६ रोजीच्या अपिल अर्जावर त्यांनी अपिलार्थीस त्यांचेकडील दि. ३.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक तो खुलासा करुन आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती लपवून ठेवण्याची किंवा सदर माहिती दडविण्याचा त्यांचा अथवा त्यांचे कार्यालयातील अधिकाऱ्यांचा हेतू नव्हता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि.२०.२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत दि.१८.३.२००६ रोजी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ

पोस्टींगने पाठविली आहे. अपिलार्थीस माहिती पाठविल्यापृष्ठ्यर्थ आवश्यक तो पुरावा सादर केला आहे, यावरुन त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे. तथापि सदर माहिती प्राप्त झाली नसल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त होताच त्यांना माहिती पुरविण्यापोटीचे शुल्क व माहितीच्या पृष्ठांची संख्या कळविण्यास हवे होते तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी केली नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पाठविली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग अग्राहय मानत असून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामूल्य माहिती पाठविली असल्याचे गृहित धरण्यात येत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस बिंदू नामावली रजिस्टरच्या अखेरीस मागासवर्ग कक्षाने काढलेल्या गोषवाऱ्याची झेरॉक्स प्रत अपिलार्थीस पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडील बिंदू नामावली रजिस्टरच्या सर्व पृष्ठांच्या प्रतींची आवश्यकता आहे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्या पुरविल्याचे दिसून येत नाही. अर्थात सर्व पृष्ठांच्या प्रती अपिलार्थीस न पुरविण्यामागे जन माहिती अधिकारी यांचा कोणत्याही प्रकारचा असद्हेतू यामध्ये आयोगास आढळला नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील बिंदू नामावली रजिस्टरमधील सर्व पृष्ठांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवाव्यात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित मुदतीत प्रतिसाद दिला आहे व अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती अपिलार्थीस न देण्यामागे त्यांचा कोणताही असद्हेतू आयोगास आढळला नसल्याने जन माहिती अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची अथवा त्यांना शास्ती लावण्याची कोणतीही कार्यवाही आयोग आदेशित करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना (त्यांचेकडील बिंदू नामावली रजिस्टरच्या सर्व पृष्ठांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती) हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरविण्यात यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष शिवलाल खैरनार, एकतानगर, पिरबाजारजवळ, साक्रीरोड, धुळे

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (नियोजन) धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९५

निर्णय दिनांक : २९-०३-२००८

१ श्री. पांडुरंग किसन आहेर, : तक्रारदार
फ्लॅट नं.१, पंचामृत
को.ऑपरेटीव्ह हौसींग सोसायटी,
आर.टी.ओ.कॉलनी रोड,नाशिक -पुना रोड,
नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद,
नाशिक, जि.नाशिक.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. पांडुरंग किसन आहेर (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी जिल्हा परिषद, नाशिक ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेविरुध्द त्यांचेकडील दि. २१.३.२००७ रोजीच्या तक्रारअर्जान्वये अशी तक्रार केली आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना त्यांच्या प्रथम अपिल अर्जावर आदेशित केल्याप्रमाणे ते उत्तरवादी यांचेकडे उर्वरित माहिती घेण्यासाठी गेले असता, उत्तरवादी

यांनी, त्यांना उर्वरित माहिती न देता "तुम्हाला माहिती देत नाही, तुम्ही येथून निघून जावे अथवा माझे हातून तुझे काही बरेवाईट होईल." अशी धमकी दिली व उर्वरित माहिती देण्याचे नाकारले. तद्नंतर उत्तरवादी यांनी, त्यांना उर्वरित सर्व माहिती पुरविल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. उत्तरवादी यांनी त्यांना नक्की केव्हा माहिती दिली याची माहिती ते आयोगास देऊ शकले नाहीत तथापि आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी आयोगासमोर त्यांनी असा मुद्दा मांडला की, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे केलेल्या दि. १५.७.२००६ रोजीच्या अर्जान्वये, त्यांनी उत्तरवादी यांचेकडे सर्व माहिती साक्षांकित करुन मागितली होती. तथापि अद्यापही उत्तरवादी यांनी सदर माहिती साक्षांकित करुन दिली नाही. तक्रारदाराच्या तक्रारीमधील या मुद्यावर अभिप्राय देण्यास उत्तरवादी हे सुनावणीस हजर नाहीत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (j)(ii) नुसार अपिलार्थीने मागणी केल्यास त्यांना साक्षांकित प्रती जन माहिती अधिकारी यांनी देणे अभिप्रेत आहे. उत्तरवादी यांचेकडून तक्रारदार यांना प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता सदर माहिती उत्तरवादी यांनी साक्षांकित करुन दिली नसल्याचे दिसून येत आहे. सबब उत्तरवादी यांना असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी उत्तरवादी यांना त्यांचे दि. १५.७.२००६ रोजीच्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जी माहिती दिली आहे ती सर्व माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य साक्षांकित करुन द्यावी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक यांनी उत्तरवादी यांनी तक्रारदारास दिलेल्या कथित धमकीसंदर्भात आपले पातळीवर चौकशी करुन या प्रकरणी योग्य तो निर्णय घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २९-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. पांडुरंग किसन आहेर,फ्लॅट नं.१, पंचामत को.ऑपरेटीव्ह हौसींग सोसायटी,
आर.टी.ओ.कॉलनी रोड,नाशिक -पुना रोड,नाशिक.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती .

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/७२

निर्णय दिनांक : २९-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती शैला प्रेमचंद सरोदे<br>(शैला प्रकाश येवले)<br>१, निर्माण पार्क हौ.सोसा. विसे-मळा,<br>कॉलेजरोड, नाशिक-४२२००५ | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>विभागीय सचिव,<br>गोखले एज्यूकेशन सोसायटी,<br>विद्यानगर, नाशिक-४२२००५ | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्रीमती शैला प्रेमचंद सरोदे (हल्ली सौ.शैला प्रकाश येवले) (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा विभागीय सचिव, गोखले एज्यूकेशन सोसायटी, विद्यानगर नाशिक श्री. बैकाडी देवराज ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी त्यांचेकडील दि. २९.९.२००७ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये त्यांना आवश्यक असलेली

माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात उत्तरवादी यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, तक्रारदार यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करुनही उत्तरवादी यांनी त्यांना चुकीची व अपूर्ण माहिती दिली आहे.त्यांनी संस्थेला दि. ३.९.२००७ रोजीच्या दिलेल्या माहितीच्या अर्जाची तसेच या संस्थेच्या एस.एम.आर.के. कॉलेजची मागितलेल्या माहितीची अद्यापही पूर्तता केली नाही. उत्तरवादी यांचेकडे दि. १८.८.२००५ पासून वेळोवेळी पत्रव्यवहार करुन माहिती मागितली असता, त्यांना उत्तरवादी यांनी अपूर्ण, दिशाभूल करणारी माहिती दिली आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारअर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती खालीलप्रमाणे नमुद केलेली आहे.

"१) गोखले एज्यूकेशनच्या नेमलेल्या माहिती अधिकाऱ्याकडून Ref.GES/RO/२०७३/२००६-०७ आलेल्या या पत्रातील अपूर्ण माहिती (या आधी याच संस्थेला १८.०८.२००५ पासून वेळोवेळी पत्रव्यवहार करुन चुकीची व अपूर्ण दिलेली माहिती.

२) याच संस्थेला दि.३.९.२००७ ला दिलेल्या माहिती अर्जाची अजूनही पूर्तता नाही.

३) याच संस्थेच्या एस.एम.आर.के.कॉलेजच्या मागितलेल्या माहिती अर्जाची अजूनही पूर्तता नाही. "

तक्रारदाराच्या या माहिती संदर्भात उत्तरवादी यांना खालीलप्रमाणे लेखी सूचना सादर केल्या आहेत.

"१) सौ. शैला प्रकाश येवले यांनी दिनांक ३०.१.२००७ रोजी माहिती अधिकारी, गोखले एज्युकेशन सोसायटी, प्रि.टी.ए.कुलकर्णी विद्यानगर, नाशिक-४२२ ००५ यांच्या नावाने केलेला अर्ज माहिती अर्जाच्या नमुन्याप्रमाणे नाही. तसेच त्यास कोर्ट फी स्टँप रु.१०/- लावलेला नाही. याबाबत आम्ही आमची पत्र Ref.GES/RO/२०७३/२००६-०७ दि. १२/२/२००७ रोजी उत्तर पाठविले आहे. सौ. येवले यांचा अर्ज व संस्थेने पाठविलेले उत्तर यांची प्रत सोबत जोडत आहोत. वरील माहतीसाठी त्यांनी रीतसर अर्ज करावा, म्हणजे नेमक्या प्रश्नास नेमकी माहिती पुरविणे शक्य होईल असे कळविले होते. तरीही त्यांचा अर्ज आलेला नाही. त्यामुळे वरील पत्रात कुठलीही अपुर्ण माहिती दिलेली नाही यांची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

२) श्रीमती शैला येवले यांनी दि. ३/९/२००७ रोजी माहिती अधिकारी एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय, नाशिक ४२२ ००५ यांना पत्र लिहून माहिती विचारलेली आहे. गोखले एज्युकेशन सोसायटी

या संस्थेला माहिती विचारलेली नाही. महाविद्यालयाचे व संस्थेचे माहिती अधिकारी हे वेगवेगळे आहेत. सौ. येवले यांचे पत्रास एस.एम.आर.के.महिला महाविद्यालयाने दि. १/१०/२००७ रोजी उत्तर दिलेले आहे. सौ. येवले यांचा अर्ज व त्यास दिलेले उत्तर सोबत जोडत आहोत. "

तसेच तक्रारदार यांच्या दि. ३.९.२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

"१) सौ. येवले यांनी त्यांचे दि. ३/९/२००७ चे माहिती अधिकारी एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय, नाशिक-४२२ ००५ यांचे पत्रात उल्लेख केलेल्या बाजुच्या पहिल्या मुद्याप्रमाणे त्यांनी मागितलेल्या माहितीत त्यांनी केलेला त्यावेळचा त्यांचाच बाळंतपणाच्या अर्जाची प्रत मागीतली आहे. सदरहू अर्जाचे रेकॉर्ड हे जवळ पास १८ वर्षापूर्वीचे आहे. संस्था असले रेकॉर्ड साधारणतः पाच वर्ष ठेवते. १८ वर्षापुर्वीचे अशा प्रकारचे रेकॉर्ड जपून ठेवण्याची पध्दत नाही.

२) सौ. येवले यांनी त्यांचे ३/९/२००७ चे माहिती अधिकारी एस.एम.आर.के. महिला महाविद्यालय, नाशिक-४२२ ००५ यांचे पत्रात उल्लेख केलेल्या बाजुच्या दुसऱ्या मुद्याप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती ही सदरहू हजेरी पत्रकाचे रेकॉर्ड हे देखील जवळ पास १८ वर्षापूर्वीचे असल्याने ते नष्ट केलेले आहे. साधारणतः पाच वर्षापुर्वीचे रेकॉर्ड जपून ठेवण्याची पध्दत आहे. "

उत्तरवादी यांनी तक्रारदाराच्या मुद्यांवर दिलेले स्पष्टीकरण पाहता, त्यांनी तक्रारदारास आवश्यक ती माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे, तथापि तक्रारदार यांचे, उत्तरवादी यांनी, त्यांना पुरविलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याचे दिसून येत आहे. तक्रारदार यांच्या युक्तिवादावरुन उत्तरवादी हे त्यांचे समाधान होइपर्यंत माहिती उपलब्ध करुन देतील किंवा कसे याबाबत शंका व्यक्त करण्यात आली. त्यांच्या शंकेचे निरसन केवळ त्यांनी जर उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध असलेले अभिलेखे पाहिले तरच होऊ शकेल, असे आयोगास वाटते. तक्रारदार यांनी उत्तरवादी यांचेकडे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे ते तक्रारदार यांना पहाणीसाठी उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत. सबब असे आदेशित करण्यात येते की, तक्रारदार यांनी, उत्तरवादी यांचेकडे वेळोवेळी केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे, उत्तरवादी यांनी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत पहाणीसाठी तक्रारदारास विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत व तक्रारदार यांनी सदर अभिलेखे पहाणीचे काम तद्नंतर १५ दिवसांचे आत संपवावे.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उत्तरवादी यांनी, तक्रारदार यांना, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या सर्व माहितीच्या अर्जासंदर्भात उत्तरवादी यांचेकडे उपलब्ध असलेले सर्व अभिलेखे तपासणीसाठी हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

३. तक्रारदार यांनी सदर अभिलेखे तपासणीचे काम, तपासणीसाठी संबंधित अभिलेखे उपलब्ध झाल्यानंतर १५ दिवसांचे आत (सुटीचे दिवस सोडून) संपवावे.

**औरंगाबाद**
**दिनांक २९-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती शैला प्रेमचंद सरोदे (शैला प्रकाश येवले) १, निर्माण पार्क हौ. सोसा. विसे-मळा, कॉलेज रोड नाशिक-४२२ ००५

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय सचिव, गोखले एज्यूकेशन सोसायटी, विद्यानगर, नाशिक-४२२ ००५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती .

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३१

निर्णय दिनांक ३१-०३-२००८

१ श्री. मर्दानखा हैदरखा खान, इस्लामपुरा, : अपिलार्थी
सुर्यवंशी बिल्डींगचे मागे, मु. पो. अमळनेर,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर,
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग,
नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मर्दानखा हैदरखा खान, इस्लामपुरा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर यांचे प्रतिनिधी कर निरिक्षक श्री. सुकदेव रामभाऊ होलार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त

नाशिक यांचे प्रतिनिधी सहा. प्रादेशिक संचालक न. प. प्रशासन श्री. नामदेव बंडू मोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत

वरील प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक १०-०७-२००६ रोजी दिलेल्या पत्रासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" तरी आपले सदरचे पत्र घरपट्टी फेरपाहणीचे आहे अथवा मागणीपत्र आहे. फेरपहाणी आणि मागणीपत्र यात फरक आहे अथवा कसे ? कायद्यात नेमकी काय तरतूद आहे याबद्दलची माहिती मिळावी. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि सदर माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ३०-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. या अपिलामध्ये त्यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कडून प्राप्त झालेल्या दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्रातील, त्यांच्या मते असलेल्या, विसंगती जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणल्या आहेत. तद्वतच या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांनी पाठविलेली नोटीस बेकायदेशीर ठरत असल्याने ती परत घेण्यासंदर्भात आदेश देण्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००६ रोजीच्या सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक २८-०९-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले आहे. सदर आदेश त्यांनी त्यांच्या दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या सहीने अपिलार्थीस बिनतारखेची पत्राने पाठविले आहे. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये निर्देशीत केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रत्यक्षात न पुरविता त्यांच्या दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये वेगळ्यासंदर्भात माहिती पुरविली असल्याचे नमूद केले आहे. तसेच या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने अपील अमळनेर नगरपालिकेविरुध्द करुनही त्यांनी आपल्या निकालपत्रात सावदा नगरपरिषदेचा उल्लेख केला आहे त्यामुळे त्याचा आदेश चुकीचा आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मालमत्ता धारक आपल्या मालमत्तेसंबंधीची -- आपल्या मालमत्तेत केलेले फेरबदल व भाडेकरु संबंधी माहिती महानगरपालिकेस पुरवित असल्यामुळे मालमत्ता धारकाकडे भाडेकरुसंबंधी त्यांनी माहिती मागण्याची आवश्यकता नाही. पाहणी व मागणी एकाच दिवशी केली जाऊ शकत नाही. पाहणीचे व आकारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर मागणीपत्र येते. मालमत्ताधारक ७/१२ चा उतारा, सिटी सर्वे उतारा जोपर्यंत महानगरपालिकेस पुरवित नाही तोपर्यंत महानगरपालिका रेकॉर्डला त्याचे नांव दाखल करुन घेतले जात नाही. या फेर पाहण्याच्या वेळी परत त्या कागदपत्राची नगरपालिकेला

आवश्यकता वाटण्याचे कारण नाही. मालमत्ताधारकाने त्याच्या मालमत्तेसंबंधी वर्णनासह फेरबदल व फेर आकारणी संबंधी नगरपालिकेकडे माहिती पुरविण्यात आल्यानंतर भाडेकरु असल्यास भाडे पावती जोडावी असे त्यांच्या पत्रात लिहिण्याची देखील आवश्यकता नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००६ च्या पत्रावर त्यांनी मागणी केलेली माहिती दिनांक ०३-०८-२००६ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर व्यक्तिशः माहिती मागवूनही अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर न झाल्याने त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती रजिस्टर टपालाने पाठविली. अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली माहिती पूर्णतः सत्य असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात पुढे असे स्पष्ट केले की, नगरपालिका अधिनियमातील कलम ११५ (२) परिशिष्ट ''ब'' हे चतुर्थ वार्षिक रिव्हीजन ज्या वर्षी असते किंवा नगर परिषद नवीन इमारतीवर ज्यावेळी प्रथम कराची आकारणी करते त्यावेळी मालमत्ताधारकास (परिशिष्ट ब) पुरवण्यात येते त्यामुळे दिनांक १०-०७-२००६ चे पत्र हे घरपट्टी फेरपाहणीचे आहे. मागणीपत्र हे नगरपालिका अधिनियमातील कलम १५० प्रमाणे आहे. घरपट्टी व मागणीपत्र यामध्ये फरक आहे. सदर फरक त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्राने समजावून सांगितला आहे. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती अपूर्ण किंवा संदिग्ध आहे हे अपिलार्थी यांचे म्हणणे त्यांना मान्य नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक २६-०८-२००६ रोजीचा अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक ३०-०८-२००६ रोजी प्रथम प्राप्त झाला. सदर अपील अर्जाची सुनावणी त्यांनी दिनांक १२-०९-२००६ रोजी घेऊन या अपिलासंदर्भातील आपले आदेश दिनांक २८-०९-२००६ रोजी पारीत केले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना सामनेवाले या संदर्भात त्यांनी सावदा नगरपरिषदेचा उल्लेख केला आहे ते चुकीने झाला आहे. सदर आदेशाचे शुध्दीपत्रक त्यांनी अद्याप निर्गमीत केले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती विहित मुदतीत असल्याने व ती कायदेशीर असल्याने त्यात अपिलार्थीचे अपील फेटाळण्याचा निर्णय या आदेशाव्दारे दिलेला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-०७-२००६ रोजीच्या पाठविलेल्या पत्रातील विसंगीतबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडून फेर पाहणी व मागणी पत्र यातील तफावतीसंबंधी जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित केला होता. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १०-०७-२००६ रोजी पाठविलेल्या विना क्रमांकाच्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडे ७/१२ चा उतारा सिटी सर्वे उतारा व भाडेकरु असल्यास भाडे पावती जोडण्याची विनंती केली होती. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ज्यार्थी सदर पत्र मालमत्ताधारकास आणि अपिलार्थीस प्राप्त झाले त्याअर्थी नगरपरिषदेकडे त्यांच्या मालमत्तेसंबंधी सर्व कागदपत्रे उपलब्ध असली पाहिजेत केवळ त्यामुळेच नगरपरिषद त्यांना सदर पत्र पाठवू शकली. नगरपालिकेकडे सर्व कागदपत्र उपलब्ध असल्यानंतर परत या कागदपत्राची मागणी मालमत्ताधारकाकडून करणे नगरपरिषदेस आवश्यक नव्हते त्यामुळे सदर पत्र बेकायदेशीर ठरत आहे. याचबरोबर अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयातील सावदा नगरपरिषद व अमळनेर नगरपरिषद यातील विसंगतीबाबत आक्षेप घेतला आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, नगरपरिषदेने अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १०-०७-२००६ रोजीच्या पत्राच्या वैधतेवर अभिप्राय व्यक्त करणे हे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेमध्ये नाही. मात्र अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेत व

योग्य प्रकारे दिली आहे किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिला आहे किंवा कसे हे पाहण्याची जबाबदारी आयोगावर आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०८-२००६ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती माहिती दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीस त्यांनी केलेला खुलासा योग्य वाटतो. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील -- कायद्यात नक्की काय तरतूद आहे या प्रश्नावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १२४ अन्वये मालमत्तेवर कर आकारणी करण्याबाबत स्पष्ट केले आहे -- असे कळविले आहे. या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना निर्देशीत केलेल्या कलम १२४ ची साक्षांकीत प्रत अपिलार्थीस पुरविली असती तर अपिलार्थीस पूर्ण माहिती मिळू शकली असती असे आयोगाचे मत आहे.

यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पुरविलेली माहिती संदिग्ध ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना कोणतीही माहिती असदहेतूपूर्वक अथवा टाळाटाळ करण्याच्या दृष्टीने दडवून ठेवल्याचे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर या संदर्भात कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयासंदर्भात नगर परिषदेच्या नांवासंदर्भात आवश्यक ते शुध्दीपत्रक हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत निर्गमीत करुन त्यांची प्रत अपिलार्थीस द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ३१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मर्दानखा हैदरखा खान, इस्लामपुरा, सुर्यवंशी बिल्डींगचे मागे, मु. पो. अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३२

निर्णय दिनांक ३१-०३-२००८

१ श्री. सुकदेव अमृत पाटील, : अपिलार्थी
मु. खंडाळे, पो. मोंढाळे, तालुका भुसावळ,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग
जळगाव भाग, जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सुकदेव अमृत पाटील हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग जळगाव श्री. किसन रामभाऊ कानडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण श्री. किरण भालचंद्र कुलकर्णी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग जळगाव श्री. सुरेंद्र भाऊराव जोशी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील १९८५ ते २००५ या कालावधीतील मौजे मोंढाळा पाझर तलावाबाबत पाणीगेट नादुरुस्त असल्यामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात एकूण ९ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ मौजे मोंढाळा पाट तलावावर पाणी गेट नादुरुस्ती (अगर सामान्याच्या) नासधुसमुळे व पाटचा-या भरपुर वर्षापासून नादुरुस्त असल्याने शेतीचे भरपूर नुकसान झाल्यामुळे

१. पाणी सोडण्याची गेट नादुरुस्त कधीपासून होती ? व आजपावेतो ती दुरुस्त का करण्यात आली नाही ?

२. खंडाळे पाटतलावासाठी व मोंढाळा पाटतलावासाठी प्रत्येक पाट तलावास व प्रत्येक वर्षास किती रुपये देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात येत होते ? व त्यांचा विनियोग देखभाल दुरुस्तीसाठीच वापरला गेला किंवा कसे ? कागदोपत्री मोजमाप निव्वळ दाखविण्यात असे यावर सुस्पष्ट सत्य लेखी खुलासा करण्यात यावा.

३. संबंधीत चौकीदार, कॅनाल इन्सपेक्टर, शाखा अभियंता व उप अभियंता या सर्वाच्या जबाबदारी कोणती होती आणि त्यांनी शासकीय नियमा नुसार बजावली आहे काय ?

४. मौजे मोंढाळा तलावाच्या पाटचारीसाठी व खंडाळे पाटचारी दुरुस्ती कामी सन १९८५ पासून ते २००५ पर्यत प्रत्येक वर्षाला प्रत्येक पाटचारी

दुरुस्ती कामी शासकीय अनुदान प्राप्त झालेले होते. याचा संपूर्ण अहवाल लेखी स्वरुपात घ्यावा व संपूर्ण अनुदान चारी दुरुस्तीसाठी वापरले गेले होते काय ? किंवा कागदोपत्री मजूर सोसायटीच्या नावावर टाकून शासकीय दुरुस्ती अनुदान संगनमताने हिस्से राशी आपल्या स्तरावर करण्यात आली किंवा कसे ? अगर चांगल्या प्रतिचे केले होते. पाटचा-या फुटून भयंकर शेतीचे नुकसान झाले कसे याला जबाबदार कोणा कोणास धरण्यात येईल याचा लेखी अहवाल देण्यात यावा ?

५. खंडाळे तलावावर बांधलेल्या शेडचे अंदाजपत्र किती रुपायाचे होते. तसेच मोंढाळा तलावाचे शेडचे अंदाजपत्र किती रुपयाचे होते आणि मोजमाप नोंद किती रुपये आहे. मग बांधकामातील साहित्य, दरवाजे, खिडक्या व मोजमाप पुस्तीकेतील चिज वस्तू आणि शेडवरती ठेवलेले डेडस्टॉक साहित्य आज रोजी आस्तित्वात नाही याला जबाबदार कोण ? अगर जबाबदारी निश्चित करुन कोणती कार्यवाही करणार किंवा कसे लेखी खुलासा करण्यात यावा.

६. मा. कार्यकारी अभियंता यांनी पावसाळ्या आधि भेट दिली होती काय ? किंवा उप अभियंता यांनी सुध्दा पुढील कार्यवाहीस पाहणी केली होती काय ? तशी पाहणी केली होती त्यास्तव लॉक बुकात नोंद केली आहे काय ? मग भेट दिली होती तर गेट दुरुस्तीचे काम का केले नाही किंवा शाखा अभियंता यांनी मोंढाळा तलावासंदर्भात गेट दुरुस्तीचा अहवाल दिला नाही काय ? दिला असेल तर आपण दृतराष्ट्रासारखे अंधळे का बनले किंवा मोंढाळे तलावाच्या गेट नादुरुस्तीमुळे फार मोठा अनर्थ होऊन शेतक-याच्या शेती फार मोठे

नुकसान झाले याला जबाबदार शासन किंवा आपले कार्यालयातील संबंधीत कर्मचारी याचा सखोल लेखी खुलासा करावा ?

७. प्रत्येक पाटतलावावर अनमोल किंमतीचे शासकिय शेड हे चौकीदारा च्या निवास स्थानासाठी बांधले किंवा शेतक-याच्या आत्महत्या होऊन प्रेते जाळण्यासाठी स्मशान म्हणून ? किंवा शासकीय मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी रखवालदार यांचे विश्रांतीसाठी ? मग शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले यास कोणास जबाबदार धरुन कोणती कार्यवाही करणार आहात ?

८. प्रत्येक वर्षी चारी दुरुस्ती कामी अनुदान येते. रिपेरींगसाठी किती टक्के योग्य विनियोग करण्यात आला ? मग पाटचा-या भयंकर उथळ का झाल्या अगर उथळ झाल्या नसत्या तर शेतीची आर्थिक हानी का झाली ?

९. मोंढाळा व खंडाळा तलावाच्या पाटचा-यामुळे शेतीचे नुकसान झाले व शेतीमध्ये शेतक-यांनी सुपिकता निर्माण करण्यासाठी भाडे तत्वावर गाळ टाकला होता तसेच सेंद्रीय खत विकत घेऊन शेतात टाकले होते. याचे अनोनात नुकसान झाले यास जबाबदार शासन किंवा आपण याचा खुलासा करावा.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. या अर्जावर अपिलार्थीने ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असून यासंबंधीचा योग्य वेळी पुरावा देण्यात येईल असे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागितलेल्या

माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस देण्यासाठी दिड ते २ महिन्याचा कालावधी लागू शकेल अशी कल्पना दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. तथापि त्यांच्याकडील दिनांक २२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्व्ये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीशी संपर्क साधून त्यांच्या अर्जानुसार आवश्यक ती देय असलेली माहिती देण्याचे सूचित करुन अंतीमतः अहवालाची त्यांच्याकडे मागणी केली आहे. सदर पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस पाठविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून गट नंबर १०३ मौजे खंडाळा शिवारातील शेती नुकसानीसंदर्भात कोणतीही माहिती न मिळाल्याने सदर अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी, आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामधील त्यांचे लेखी म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे कार्यालय १९९३ साली स्थापन झाले. अपिलार्थीने मागितलेली माहिती १९८५ ते २००५ म्हणजे या कालावधीशी संबंधीत होती म्हणजेच अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी ८ वर्षे इतक्या कालावधीची माहिती त्यांच्या विभागाकडे उपलब्ध नसून ती दुस-या विभागाकडे उपलब्ध होती. सदर माहिती गिरजा पाटबंधारे विभाग या जळगावस्थित विभागाकडे होती व दोन्ही कार्यालयामधील जुनी अभिलेख शोधून त्यांनी अपिलार्थीस सदर माहिती दिनांक ०९-१०-२००६ रोजी पुरविली आहे. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस रजिस्टर पोस्टाने पाठविली असून अपिलार्थीस सदर माहिती दिनांक ११-१०-२००६ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ पोस्टाच्या संबंधीत पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास दाखविली. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेली माहिती दिनांक ११-१०-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्याकडे दिनांक २१-०९-२००६ रोजी तयार होती. तथापि अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित न झाल्याने त्यांची वाट पाहून शेवटी त्यांनी दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या पत्राने पुरविली व अपिलार्थीने त्यांच्या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुनही यासंबंधीचा पुरावा त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता. त्याचा पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे कधीही सादर केला नव्हता.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज दिनांक २०-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात त्यांच्या

कडील दिनांक २२-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये सूचित केले व त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीची वाट पाहून शेवटी अंतीमतः दिनांक ०९-१०-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती पाठविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्या-संदर्भात दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या लिहिलेल्या अर्जावर ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आहेत व योग्य वेळी पुरावा सादर करण्यात येईल असे विधान केले आहे. तसेच अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षित केली होती. अपिलार्थीच्या दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात तर होतीच परंतु अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली मुद्दा क्रमांक २ मधील अंशतः माहिती वगळता उर्वरीत सर्व मुद्दयावर अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांचेकडून खुलासेवजा माहिती मागितल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियमातील माहिती या शब्दाची व्याख्या अधिनियमातील कलम २ (च) प्रमाणे खालीलप्रमाणे दिलेली आहे.

**कलम २ (च)**

"माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात

असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

वरील व्याख्येचे अवलोकन केले असता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील काही माहिती वगळता उर्वरीत सर्व माहिती "माहिती" या शब्दाच्या अधिनियमाव्दारे स्पष्ट केलेल्या व्याख्येशी विसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती परंतु ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात विचाराधीन अर्ज केल्यानंतर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी व्यक्तिशः कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहितीची व्याप्ती लक्षात घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती गोळा करण्याकरिता वेळ लागेल असे त्यांना कळविले होते परंतु त्यांनी दिनांक २०-०९-२००६ रोजी म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती तयार ठेवली होती. तथापि अपिलार्थी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात हजर न झाल्याने अपिलार्थीची वाट पाहून त्यांनी अपिलार्थीस अंतीमतः त्यांच्याकडील दिनांक ०९-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर पोस्टाने अपिलार्थीस सदर माहिती पाठविली हे पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागवूनही त्यांना,सदर माहिती विहित मुदतीत विनामूल्य पुरविली. अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक २३-०८-२००६ रोजी केलेला अर्ज त्यांनी या अर्जासोबत ते दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा उल्लेख करुनही या पृष्ट्यर्थ त्यांनी पुरावा सादर न केल्यामुळे तो मूळ अर्ज अवैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या युक्तिवादाचे खंडण करण्यासाठी आज अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीच्या मूळ अर्जाची वैधता अशा त-हेने संपुष्टात आल्याने व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत संपूर्ण माहिती विनामूल्य पुरविली

असल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक ३१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुकदेव अमृत पाटील, मु. खंडाळे, पो. मोंढाळे, तालुका भुसावळ, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग जळगाव भाग, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३३

निर्णय दिनांक ३१-०३-२००८

१ श्री. कृष्णा गिरधर पाटील, : अपिलार्थी
रा. गडखांब, तालुका अमळनेर,
जिल्हा जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत गडखांब, तालुका अमळनेर,
जिल्हा जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अमळनेर, जिल्हा जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कृष्णा गिरधर पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत गडखांब श्री. जितेंद्र पंडित पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास

अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर श्री. नथ्थू रामभाऊ पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रुप ग्रामपंचायत गडखांब येथील घर नंबर १६३ च्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> " तरी ज्या नियमान्वये गडखांब येथील घर नं. १६३ (वठाण जागा) वर श्री. गिरधर बाप आखाडू उर्फ महादू पाटील यांचे नांव दाखल करण्यात आले नाही. त्याची माहिती मिळावी. सोबत खरेदीखताची झेरॉक्स प्रत दिली आहे. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०६-२००६ रोजी उत्तर दिले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, ' घर नंबर १६३ (वठाण जागा) दिनांक २८-०४-१९२५ रोजी गिरधर बापू उर्फ महादू पाटील यांनी श्री. श्रीपत खंडू पाटील यांच्याकडून खरेदी केली आहे. तर खडखांब या गावी दिनांक २८-०४-१९२५ रोजी ग्रामपंचायत अस्तित्वात नव्हती. सदर ग्रुप ग्रामपंचायत गडखांब ही ३०-१०-१९५४ रोजी स्थापन झाली आहे. तसेच आज रोजी ग्रामपंचायत नमुना नं. ८ ला घर नंबर १६३ ही कृष्णा गिरधर पाटील यांच्या नांवाने नोंद आहे.'

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे चुकीचे

असल्याचे नमूद करुन २ जागांना एकच घर नंबर असू शकत नाही असे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दिनांक ३१-०७-२००६ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेली माहिती बरोबर असल्याचे त्यांना आढळल्यावरुन त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या कडील दिनांक ०५-०८-२००६ रोजीच्या आदेशान्वये फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी घर नंबर १६३ हे कृष्णा गिरधर पाटील यांच्या नावावर नको होते असे नमूद करुन २ जागांना एकाच नंबर असू शकत नाही त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना घर नंबर १६३ (वठाण जागा) ही त्यांच्या नांवे का झाली नाही त्याची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहेत. सदर जागा त्यांनी खरेदी केल्याप्रीत्यर्थ संबंधी खरेदीखताची प्रत संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जासोबत जोडली आहे. जर जन माहिती अधिकारी यांच्या मते घर नंबर १६३ व प्रश्नाधीन जागा हे एकच असतील तर त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रमाणपत्र द्यावे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, १६३ हा घर क्रमांक असून सदर घर अपिलार्थी यांच्या वडिलाने दिनांक २८-०४-१९२५ रोजी खरेदी केले असून सदर मालमत्तेवर आज रोजी कृष्णा गिरधर पाटील यांच्या

नावाने नोंद आहे. अपिलार्थीने माहिती अर्जासोबत जो मुद्दा उपस्थित केला आहे तो या घराच्या मोकळ्या जागेसदर्भातील आहे. सदर मोकळ्या जागेवर अपिलार्थी यांना आपल्या नावाची मालकी करुन हवी आहे. तसेच या जागेच्या मालकीसंदर्भात न्यायालयाचा निर्णय होऊन अपिलार्थीचे अपील अमळनेर जिल्हा न्यायालयाने दिनांक २२-०९-१९९३ च्या निर्णयाव्दारे फेटाळले आहे. यावर अपिलार्थीने अपील केल्यानंतर ते अपीलही दिनांक १३-०७-२००४ रोजीच्या आदेशान्वये अपर जिल्हा सत्र न्यायालयाने फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १३-०७-२००६ रोजी अपील अर्जावर दिनांक ३१-०७-२००६ रोजी सुनावणी आपले आदेश दिनांक ०३-०८-२००७ रोजी पारीत केले आहे. सदर अपील निर्णयाच्या वेळी अपिलार्थी यांचे चिरंजीव हजर होते त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील या जागेसंदर्भातील सर्व उपलब्ध कागदपत्रे दाखविण्यात आली व त्याचप्रमाणे दिनांक ३१-०७-२००६ रोजी श्री. कैलास कृष्णा पाटील या अपिलार्थीच्या प्रतिनिधीने त्यांच्याकडे लेखी कबुली दिली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक ०२-०६-२००६ रोजीच्या या प्रकरणीतील माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थी यांचे गडखांब येथील घर १६३ (वठाण जागेवर) त्यांच्या नांवे कोणत्या अधिनियमान्वये दाखल करण्यात आले नाही. त्याची माहिती हवी होती. अपिलार्थीने उपस्थित केलेला मुद्दा हा त्यांच्या नावावर जागा हस्तांतरीत करण्यासदंर्भातील आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कडील उपलब्ध कागदपत्रावरुन दिनांक २६-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती पुरविल्याचे दिसून येते. या उत्तरावर

अपिलार्थीने यांच्या वडिलाने सदर जागा ज्यावेळी खरेदी केली त्यावेळी ग्रामपंचायत गडखांब आस्तित्वात नव्हती. सदर ग्रामपंचायत दिनांक ३०-१०-५४ रोजी आस्तित्वात आल्यानंतर सदर जागा कृष्णा गिरधर यांच्या नावाने नोंद असल्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले आहे. अपिलार्थीने या जागेवर मालकी हक्काचा दावा केला आहे या जागेला सिटी सर्वे नंबर नाही असे जन माहिती अधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले. अपिलार्थीने मागितलेली माहिती व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहितीवरुन विहित मुदतीत दिलेले उत्तर पाहता अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगाचे मत आहे. सबब अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या प्रश्नाची तड लावण्याकरिता योग्य त्या न्यायालयीन प्राधिकरणाकडे दावा दाखल करणे उचित होईल असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ३१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कृष्णा गिरधर पाटील, रा. गडखांब, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत गडखांब,

तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अमळनेर, जिल्हा जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३४

निर्णय दिनांक ३१-०३-२००८

१ श्री. योगेश अरविंद झांबरे, : अपिलार्थी
राजयोग, शामा कॉम्प्लेक्स समोर,
गणपतीनगर, जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा परिक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठ, बांभोरी, जळगाव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,
बांभोरी, जळगाव

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. योगेश अरविंद झांबरे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ श्री. मधुकर मुकूंदराव पवार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ श्री. मुकूंद वसंतराव बशिदे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयासंदर्भात सन २००५-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. पत्र क्र. उमवि/७झेड/कला/ By Hand /२००५ दि. ०७-०३-२००५ मधील पॅराग्राफ क्र. ३ मध्ये नमूद केले प्रमाणे “ ... याबाबत आपल्यावर दंडात्मक कारवाई का करण्यात येऊ नये. ” बाबतचे कार्यवाहीबाबतचे आदेश परिक्षा नियंत्रक यांनी ज्या नियमाच्या आधारावर देण्यात आले त्याची सुस्पष्ट झेरॉक्स प्रत.

२. वरील प्रकरणात दि. ०३-०६-२००५ रोजी स्मरणपत्र देऊनही संबंधित महाविद्यालयांनी विद्यापिशंच्या नियमाचे / आदेशांचे पालन न करण्याबाबत काहीही खुलासा केलेला नाही. म्हणून संबंधित विषय व्यवस्थापन परिषदेत ठेवण्याबाबत मा. कुलसचिव यांनी केलेला आदेश द्यावा लागतो तरी याबाबत त्यांना कार्यवाहीबाबत अधिकार आहे किंवा नाही याबाबत स्पष्ट खुलास्याची प्रत.

३. वरील प्रकरणात दि. ०२-०९-२००५ रोजी व्यवस्थापन परिषदेकडील दोन महाविद्यालयांनी केलेल्या अक्षम्य चुकीत साम्यता आहे म्हणून सदर बाब नस्तीबध्द करण्यात यावी. याबाबतचा स्पष्ट उल्लेख असलेल्या विद्यापिठाची नियमाची प्रत.

४. जर दोन महाविद्यालयांनी केलेल्या अक्षम्य चुकीत साम्यता असेल तर ते प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे असे नियमात आहे तर मग वरील बाबी या संबंधित कक्षाधिकारी यांना नियमानुसार असल्याबाबतची जाणीव देण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबत स्पष्ट खुलास्याची

प्रत. तसेच त्यांच्या अधिकार कक्षेत त्यांना संबंधितांवर कार्यवाही करता येते किंवा नाही याची माहिती मिळावी.

५. व्यवस्थापन परिषदेवर असलेल्या सर्वांची नावे – पदनिहाय माहिती मिळावी.

६. वरील बाब ही विद्यापिठाचे नियमांचे / आदेशांचे पालन करणारी असतांना व्यवस्थापन परिषदेत मंजूर केल्याची मूळ साक्षांकीत प्रत.

७. सदरील बाब नस्तीबध्द होऊ नये व विद्यापिठ नियमानुसार कार्यवाही होणेबाबत व्यवस्थापन परिषदेवर असलेल्या विद्यापिठातील कायदेशिर सल्लागार यांनी याबाबत त्यांचे मत निर्देश करणारी कागदपत्रांची प्रत. ”

अपिलार्थीने सदर माहिती युपीसी व्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास हेतूपुरःस्सर टाळले असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००६ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०९-०३-२००६ रोजी पारीत केले आहे. सदर निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य

करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती १५ दिवसाच्या आत देण्याचे सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटी रुपये २२, इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रुपये २२ जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २२-०५-२००६ रोजी भरले. सदर शुल्क भरल्यापोटी संबंधीत प्राधिकरणाने त्यांच्याकडील २०४६४ च्या क्रमांकाच्या पावतीने अपिलार्थीस पोच दिली आहे.

अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिनांक २६-०५-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठवून दिली. तथापि सदर माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस निर्णयानुसार विनामूल्य माहिती देणे अभिप्रेत असतांना देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी रुपये २२ /- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे करावयास लावला. तसेच त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना न देता जन माहिती अधिकारी यांनी दुसरीच माहिती पुरविली आहे.

त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता देण्यात यावी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास लावलेल्या विलंबाबद्दल त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २८-१२-२००५ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. अपिलार्थीने मागितलेली काही माहिती ही छापील स्वरुपात उपलब्ध असून तसे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मुदतीत कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे अपेक्षित केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली गेली आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर दिनांक ०९-०३-२००६ रोजी निर्णय दिला आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे एकूण ९ मुद्दयावर दिनांक २८-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. (१४-०१-२००६) जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १४-०१-२००६ च्या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ६ आणि ७ संदर्भात माहिती देतांना अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती अपेक्षित आहे त्याचा अर्थबोध होत नसल्याने व

ती अत्यंत मोघम स्वरुपाची असल्याने उपलब्ध करुन देणे शक्य होणार नसल्याचे कळविले आहे. जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस कोणती माहिती आवश्यक आहे याचा त्यांनी स्पष्टपणे उल्लेख केल्याचे दिसून येत नव्हते तर संबंधीत माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर सदर माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळवावयास हवे होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २३-०५-२००६ च्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती सुधारीत स्वरुपात दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात कुलसचिव यांना कारवाई करण्याबाबत आदेश देण्याचे अधिकार नाहीत असे त्यांनी सुनावणी मध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मुद्दा क्रमांक ३ मध्ये सदर बाब नस्तीबध्द करण्यात आली होती बाबत उल्लेख असला तरी अधिनियमाची प्रत अपिलार्थीने मागितली आहे. अशा प्रकारचे कोणतेही नियम नाहीत असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले आहे. सदर बाब नस्तीबध्द करण्याचा निर्णय हा पूर्णतः प्रशासकीय स्वरुपाचा आहे असे त्यांनी पुढे स्पष्ट केले. अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे परिक्षा नियंत्रक यांना अधिका-यावर अशी कारवाई करता येते किंवा कसे अशी जन माहिती अधिकारी यांना माहिती विचारावयाची होती. अपिलार्थीस या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे हक्क व कर्तव्य याबाबतचे नियम पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेली माहितीतील मुद्दा क्रमांक ५ ची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. तसेच सदर माहिती विद्यापीठच्या वेबसाईटवर असल्याचे देखील

दिनांक १४-०१-२००६ रोजीच्या पत्रात कळविलेले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ६ या मुद्दयावरील माहिती, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या पत्रात अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. अपिलार्थीने विचारलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या पत्रात समर्पक उत्तर दिल्याचे दिसून येते. थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित सर्व माहिती दिल्याचे दिसून येते. अपिलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीपैकी अंशतः माहिती जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक २३-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. अपिलार्थीस दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००६ रोजी अपिलार्थीस माहितीपोटीचे रुपये २२ इतके शुल्क भरण्याविषयी सूचित करण्याची त्यांची कृती चुकीची आहे कारण यावेळेपर्यत अपिलार्थीस माहिती देण्याची विहित मुदत व्यपगत झाली होती. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य माहिती द्यावी लागेल.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीचे माहिती पोटी भरुन घेतलेले शुल्क रुपये २२ हे त्यांना ७ दिवसाच्या आत परत करावेत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस कोणतीही माहिती देण्यास हेतूपुरःस्सर टाळाटाळ केल्याचे किंवा माहिती दडविल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईची कोणतेही आदेश नाहीत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या आयोगाकडे सादर केलेल्या लेखी म्हणण्यामध्ये त्यांनी सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना रुपये २२ इतक्या शुल्काचा

भरणा मनीऑर्डरने केला होता तथापि जन माहिती अधिकारी यांनी या मनीऑर्डरचा स्विकार न करता ती परत पाठविली व त्यांना माहिती प्राप्त होण्या-पासून वंचित ठेवले याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असा खुलासा केला की, विद्यापीठामध्ये कोणतीही मनीऑर्डर स्विकारली जात नाही. मनीऑर्डरने माहितीसाठीची स्विकृती करण्याची पध्दत त्यावेळी त्याच्या विद्यापीठात नसल्याने अपिलार्थीची मनऑर्डर घेतली नाही. राज्य शासनाच्या ११ ऑक्टोंबर २००५ मध्ये प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेतील, मनीऑर्डरव्दारे शुल्काचा भरणा करता येतो, ही तरतूद त्यावेळी त्यांना माहित नव्हती असे त्यांनी सांगितले व येथून पुढे आवश्यक ती दक्षता घेण्याचे आयोगास आश्वासीत केले. त्यांची ही कृती केवळ शासनाच्या अधिसूचनेविषयीच्या अज्ञानातून घडली आहे असे आयोगाचे मत आहे. यामध्ये अपिलार्थीस त्रास देण्याचा त्यांचा हेतू असल्याचे दिसून येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे माहिती पोटी भरुन घेतलेले शुल्क

रुपये २२ हे त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करावेत.

औरंगाबाद
दिनांक ३१-०३-२००८

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. योगेश अरविंद झांबरे, राजयोग, शामा कॉम्प्लेक्स समोर, गणपतीनगर, जळगाव.

२ जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१०३५

निर्णय दिनांक : ३१-०३-२००८

१ श्री. नरेंद्र भास्करराव पाटील, : अपीलार्थी

७१,दिक्षीतवाडी, जिल्हा पेठ,

सिव्हील हॉस्पिटल समोर, जळगाव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तथा उपप्राचार्य,
जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे,
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वरणगाव ता
भुसावळ,जि. जळगाव,

२ जन अपिलीय अधिकारी,
तथा सचिव,
जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे,
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वरणगाव ता
भुसावळ,जि. जळगाव,

## विवेचन

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. नरेंद्र भास्करराव पाटील (त्यांना यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधण्यात येईल) हे त्यांचे वकील सौ.अभया शेलकर यांच्यासह, जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वरणगाव श्री. दिनु लक्ष्मण पाटील ( त्यांना यापुढे जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे त्यांचे वकील श्री. आबासाहेब डी. शिंदे यांच्यासह, तर जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, जळगाव जिल्हा मराठा विद्या

प्रसारक सहकारी समाजाचे कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वरणगाव ( त्यांना यापुढे जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी सर्व प्रथम त्यांचेकडील दि. २३.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शिक्षण संस्थेस मिळणाऱ्या अनुदानासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसार सह.समाज मर्या. जळगाव या संस्थेचे जळगाव जिल्हयात जळगाव, यावल व वरणगाव या तीन ठिकाणी वरिष्ठ महाविद्यालये असून या सर्व महाविद्यालयांमध्ये शासन मान्यता तसेच विद्यापीठ मान्यता असुन शासनाकडून तर वर्षी या सर्व महाविद्यालयांना कोटयावधी रुपयांची वेतन व वेतनेतर अनुदाने मिळतात. या संदर्भात आपल्या संस्थेच्या वरणगाव महाविद्यालयाने (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वरणगाव.) संस्थेकडे वेळोवेळी मोठया प्रमाणात रकमा जमा केलेल्या आहेत. त्यांची माहीती घेणेसाठी सदरचा अर्ज

खालील तक्त्यामध्ये कृपया माहीती देण्यात यावी. आवश्यक असेल तेथे कागद पत्रांच्या सही शिक्क्याच्या नकला स्वतंत्ररित्या जोडण्यात याव्यात

| आर्थिक वर्ष | वरणगाव महाविद्यालयाने संस्थेकडे रक्कम जमा केल्याचा दिनांक | वरणगाव महाविद्यालयाने संस्थेकडे जमा केलेली रक्कम रुपये | वरणगाव महाविद्यालयाने संस्थेकडे वर्ग (जमा) केलेली रक्कम रोखीने/चेकने (चेकने असल्यास बँकेच नाव,शाखा,चेक नं. दिनांक इ. | संस्थेने महाविद्यालयास दिलेली जमा पावती/रिसीट क्रमांक व दिनांक, त्यांची झेरॉक्स प्रत | ज्या कारणासाठी/सदरची रक्कम संस्थेकडे जमा केली ते काम संस्थेने केली ते काम संस्थेने केले किंवा कसे याचा संपूर्ण तपशिल | ज्या कारणासाठी सदरची रक्कम संस्थेकडे जमा केली ते काम संस्थेने केले किंवा कसे याचा संपूर्ण तपशिल | ज्या खात्यातून (हेड) रक्कम संस्थेकडे वर्ग/जमा केली त्या हेडचे नाव (उदा. वेतनेतर अनुदान,फी, इमारत भाडे... इ.) | महाविद्यालयाने ज्या कालावधीत सदरच्या रकमा संस्थेकडे वर्ग केल्यात त्या कालावधीतील प्राचार्यांचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

वरील तक्ता नमुन्या दाखल असून त्यातील रकाना क्र.६ व ७ या साठीचा सविस्तर तपशिल स्वतंत्र रित्या द्यावा व तसेच सोबत संस्थेने दिलेल्या जमा पावत्यांच्या झेरॉक्स प्रती ॲटेस्टेड करुन द्याव्यात. सदरची माहिती बिनचुक देण्यात यावी."

सदर माहिती अपिलार्थीने टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १.७.२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी अपिलार्थीस दि. ११.७.२००६ रोजी दिलेल्या पत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी

त्यांच्याकडील दि. ११.७.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी मागितलेली माहिती संस्थेशी संबंधित असल्याने अपिलार्थीस संस्थेच्या मानद सचिवांशी संपर्क साधण्याचे, त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीस सूचित केल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दि. २१.७.२००६ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस या अपिल अर्जावर जन अपिलीय यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या या अपिल अर्जासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दि. १०.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देऊ शकत नसल्याचे कळविले. माहिती न देण्यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस खालील कारणे कळविली आहेत.

"१) उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठाकडे केस नं.३२७४/२००१ प्रलंबित आहे.

१) सन ९६-९७ नंतर कोणत्याच प्रकारचे वेतनेतर अनुदान महाविद्यालयास मिळालेले नाही.

२) संस्थेचे माहिती अधिकारी म्हणून ॲड तानाजीराव केशवराव भोईटे हे कामकाज करीत असतात त्यांचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

ॲड. नानासाहेब, तानाजीराव भोईटे,

भोईटेनगर प्लॉट नं.१ प्रिंप्राळा रेल्वे गेट समोर, जळगाव"

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचेकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.८.२००६ रोजी द्वितीय अपिल केले आहे. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न देता त्यांना, संदर्भहीन, अधिनियम व कायद्यास सोडून चुकीचे उत्तर देऊन त्यांनी गैरकारभार दडविण्याचा निंदनीय प्रकार केलेला आहे. त्याचबरोबर त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या पत्राद्वारे, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे व माहिती देण्याचे संबंधितांनी टाळल्याचे दिसून येत असल्याचे त्यांनी या अपिल अर्जामध्ये शेवटी नमुद केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी, त्यांच्या दि. २३.६.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असून सदर माहिती त्यांना न देण्यासाठी माहिती अधिकार अधिनियमातील कोणतेही कलम लागू होत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना दि. १०.८.२००६ रोजीच्या पत्राद्वारे दिलेल्या उत्तरामध्ये संदर्भित केलेल्या उच्च न्यायालयातील प्रकरण क्र. ३२७४/२००१ याचा त्यांनी मागितलेल्या माहितीशी कोणत्याही प्रकारे संबंध नाही. संबंधित कॉलेजवर प्रशासक नेमण्याच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ठरावाच्या अंमलबजावणीसंदर्भात संस्थेच्या एका हितचिंतकाने सदर रिट याचिका मा. उच्च न्यायालयाकडे केलेली आहे, त्यासंदर्भातील हे प्रकरण आहे. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अद्याप आवश्यक असलेली माहिती न दिल्याने त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २०(१) प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचेतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले सदर अपिल केवळ संस्थेस त्रास देण्याच्या उद्देशाने केले असून, त्यांनी संस्थेविरुध्द वेगवेगळया प्राधिकरणाकडे बऱ्याचवेळा तक्रारी करुन संस्थेच्या कार्यामध्ये अडथळे निर्माण केले आहेत. सदर महाविद्यालयाची स्थापना १९८६ साली झाली आहे. या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते १९९२-९३ या वर्षापर्यंत सदर महाविद्यालय विनाअनुदानित तत्त्वावर चालविले जात होते. या कालावधीत त्यांना शासनातर्फे कोणतेही अनुदान प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे संस्थेकडे महाविद्यालयातर्फे अशाप्रकारचे कोणतेही अनुदान देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. १९९६-९७ नंतर त्यांना शासनातर्फे कोणतेही 'वेतनेतर अनुदान' न मिळाल्याने सदर माहिती निरंक असून त्यांचा उल्लेख त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये केलेला आहे. संबंधित संस्थेला १९९३ ते १९९६ या कालावधीमध्ये देखिल कोणत्याही प्रकारची रक्कम प्राप्त झालेली नाही. १९९३ ते १९९६ या कालावधीमध्ये इतर स्त्रोताकडून संस्थेच्या वरणगाव येथील महाविद्यालयाने संस्थेकडे कोणतीही रक्कम जमा केली नाही. जन माहिती अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीचा मूळ गाभा हा आहे व त्यांनी या संदर्भात अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती त्यांचेकडील दि. ११.७.२००६ च्या पत्रान्वये पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती नाकारतांना त्यांनी योग्य ते कारण दिले असल्यामुळे व माहिती देण्यास कोणत्याही असद्‌हेतूने

टाळाटाळ केली नसल्याने त्यांचेवर शास्ती लावण्याची कार्यवाही करण्यात येऊ नये, तसेच अपिलार्थीचे अपिल फेटाळून लावावे, अशी त्यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या शेवटी विनंती केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तीवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन १९९०-९१ ते सन २००५-०६ या कालावधीमध्ये वरणगाव महाविद्यालयाकडून संस्थेकडे वेळोवेळी जमा केलेल्या रकमांची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, त्यांनी महाविद्यालयास १९९३ पासून शासनाची मान्यता प्राप्त झाली असून १९९०-९१ ते १९९३ पर्यंत त्यांनी कोणतीही रक्कम संस्थेकडे जमा केली नाही. परंतु त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि. १०.८.२००६ रोजीच्या पत्रामध्ये १९९६-९७ नंतर कोणत्याच प्रकारचे वेतनेतर अनुदान महाविद्यालयास मिळालेले नाही, असे नमुद केले आहे. यामध्ये १९९१ ते १९९६ च्या संबंधित माहितीचा समावेश नाही. या कालावधीमध्ये देखिल संबंधित महाविद्यालयाकडून संस्थेस कोणत्याच प्रकारचे अनुदान मिळाले नसल्याचा, जन माहिती अधिकारी यांनी आजच्या युक्तीवादामध्ये मुद्दा मांडला आहे.

थोडक्यात अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रत्यक्षात 'निरंक' असल्याचे येथे दिसून येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवितांना अर्धवट माहिती कळविल्याचेही त्याचबरोबर सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १०.८.२००६ रोजी अपिलार्थीस माहिती न देण्यापृष्ठ्यर्थ जी कारणे दर्शविली आहेत, ती कारणे आयोगास मान्य नाहीत. यापैकी प्रथम कारण म्हणून त्यांनी उच्च न्यायालयामध्ये प्रकरण क्रमांक ३२७४/२००१ चा उल्लेख केला आहे. या प्रकरणावर अद्यापपर्यंत उच्च न्यायालयाने कोणतेच आदेश दिलेले नाहीत. केवळ उच्च न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित आहे, म्हणून अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही, ही जन माहिती अधिकारी यांची भूमिका माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींशी पूर्णतया विसंगत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती अधिनियमातील कलम ८ व ९ मधील तरतुदींस छेद देत नसेल तर ही माहिती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे, याची त्यांनी येथे नोंद घ्यावी. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट माहिती देऊन व चुकीची कारणे दर्शवून अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे हे अशाप्रकारे येथे सिध्द होत

आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही, असे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही भूमिका देखिल या प्रकरणी अपिलार्थीस माहिती द्यावयाची नाही, अशीच आहे, जी पूर्णतया चुकीची आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या पूर्ण कालावधीची संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यापासून वंचित ठेवून जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, सबब असे आदेशित करण्यात येते की, अध्यक्ष,जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन त्यानंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे,

## निर्णय

१. अपिलार्थीचे अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

३. अध्यक्ष,जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांनी उपरोक्त प्रकरणात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमित होताच दोन महिन्याचे आत करुन तद्नंतर एक महिन्याचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक ३१-०३-२००८**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नरेंद्र भास्करराव पाटील, ७१,दिक्षीतवाडी, जिल्हा पेठ,सिव्हील हॉस्पिटल समोर, जळगाव

२ जन माहिती अधिकारी तथा उपप्राचार्य, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वरणगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाजाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वरणगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१९६

निर्णय दिनांक : ३१-०३-२००८

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिनेश लक्ष्मीनारायण मुंदडा,<br>रा. येवला जि.नाशिक | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>कृषी विकास अधिकारी,<br>जिल्हा परिषद, नाशिक | : | उत्तरवादी |

## निर्णय

उपरोक्त प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१-०३-२००८ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. दिनेश लक्ष्मीनारायण मुंदडा (त्यांना यापुढे तक्रारदार म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक ( त्यांना यापुढे उत्तरवादी असे संबोधण्यात येईल), हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणात तक्रारदार यांनी दि. १८.२.२००८ च्या अर्जाद्वारे कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेविरुध्द अशी तक्रार केली आहे की, काही शेतकऱ्यांनी त्यांचेकडून माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकारणाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीचे अर्ज भरुन घेऊन ते उत्तरवादी यांचेकडे सादर केल्यामुळे, त्याचा राग धरुन, त्यांचे हस्ताक्षरासंबंधी खुलासा मागितला होता. उत्तरवादी यांचेकडून त्यांनी खते, औषधी बियाणे इत्यादि विक्रीबाबत परवाना घेतलेला

असल्याने व शेतकऱ्यांना माहितीसाठीचे अर्ज भरुन दिल्याने उत्तरवादी यांचेकडून त्यांची रोजीरोटी बंद होणार नाही, अशी तजवीज करण्याची तक्रारदाराने या तक्रारीद्वारे आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाचे वेळी, तक्रारदार यांनी त्यांच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल केलेल्या तक्रार अर्जातील नमुद केलेल्या मुद्यांवर, आपले अभिप्राय देण्यास उत्तरवादी हे हजर नाहीत. तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारअर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, ते केवळ शेतकऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज भरुन देण्यास मदत करतात. त्यांचा उत्तरवादी यांना राग येऊन त्यांनी तक्रारदारास त्यांचेकडील दि. ३०.११.२००७, २.१.२००८ व ४.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये 'कारणे दाखवा नोटीस' बजावली असल्याचे दिसून येत आहे. तक्रारदार हे स्वतः कृषी पदवीधर असून त्यांचा 'नंदा सीडस्' या नावाने येवला येथे १९८५ पासून उद्योगव्यवसाय अस्तित्त्वात आहे. कृषी विषयातील मार्गदर्शनाकरिता अनेक शेतकरी त्यांचेकडे सल्ला घेण्यासाठी वारंवार येत असतात. यातील काही शेतकरी बांधवांनी उत्तरवादी यांचेकडून माहिती मागविण्याकरिता तक्रारदार यांचेकडून सदर फॉर्म भरुन घेतल्याबद्दल, उत्तरवादी यांच्या मनात आकस असून, सदर आकसापोटी उत्तरवादी यांनी तक्रारदारास कारणे दाखवा नोटीस पाठविल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तक्रारदार यांना त्यांच्या व्यवसायाकरिता लागणारा परवाना हा उत्तरवादी यांचेकडून दिला जातो. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी केवळ माहितीचा अधिकार २००५ च्या चळवळीस प्रोत्साहन देण्याचे दृष्टीने काही नागरिकांना अधिनियमातील तरतुदींप्रमाणे आवश्यक असलेले फॉर्म भरुन देण्यास मदत केली आहे.

सकृतदर्शनी व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, शेतकऱ्यांना फॉर्म भरुन देण्याची कृती तक्रारदार यांनी खाजगी व्यक्ती म्हणून केलेली आहे. त्यांची ही कृती व उत्तरवादी यांनी दिलेली 'कारणा दाखवा नोटीस' याचा अर्थाअर्थी कोणताही संबंध असेल, असे दिसून येत नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(४) च्या तरतुदीनुसार "या अधिनियमान्वये जेव्हा अभिलेख्यांची किंवा त्याच्या भागाची माहिती मिळवून द्यावयाची असेल आणि जिला ती माहिती मिळवून द्यावयाची आहे, अशी व्यक्ती ज्ञानेंद्रियांच्या दृष्टीने विकलांग असेल त्याबाबतीत, यथास्थिती, जन माहिती अधिकारी यांनी माहिती मिळवून देण्यास सहाय्य करावे," अशी तरतुद आहे. ही तरतुद या प्रकरणी अगदी तंतोतंत जरी, लागू पडत नसली तरी या तरतुदींमागची सर्वसामान्यांना हे अर्ज

जर भरता येत नसतील, तर ते भरुन देऊन त्यांना मदत करण्याची भूमिका येथे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, असे आयोगास वाटते.

उपरोक्त प्रकरणी संबंधित अर्जदारास तक्रारदार यांनी केलेले सहाय्य हे केवळ सहकार्याचे व विधायक स्वरुपाचे असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी केवळ नागरिकांना उत्तरवादी यांचेकडून माहिती मागण्यासाठी सहाय्य केले म्हणून त्यांचा परवान्यासंदर्भात काही कारवाई करण्याचे जर उत्तरवादी यांनी प्रस्तावित केले असेल तर उत्तरवादी यांची ही कृती चुकीची आहे, एवढेच नव्हे तर त्यांनी तक्रारदारास वरील निर्देशित केलेली पत्रे/नोटीस पाठविण्याची त्यांची कृती देखिल या प्रकरणी सपशेल चुकीची व गैरलागू आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, उत्तरवादी यांनी अशाप्रकारच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ शी संबंधित कारणे दाखवावजा पत्रे तक्रारदारास लिहू नयेत व त्यांनी संबंधित अर्जदारांना/शेतकऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीसंदर्भात केलेले सहाय्य हे त्यांना पुढील परवाना/परवाना नुतनीकरण नाकारण्याचे अंशतः देखिल कारण होणार नाही, याची पुरेपूर दक्षता त्यांनी वैयक्तिकरित्या घ्यावी. थोडक्यात कोणत्याही परिस्थितीत तक्रारदारास त्यांच्या परवान्याचे नुतनीकरण नाकारतांना, त्यांनी संबंधित अर्जदारास माहितीसाठीचे भरुन दिलेले अर्ज हे कारण असता कामा नये.

वरील विवेचनाचे पार्श्वभूमीवर तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक ३१-०३-२००८** **राज्य माहिती आयुक्त ,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिनेश लक्ष्मीनारायण मुंदडा,रा. येवला जि.नाशिक

२ जन माहिती अधिकारी तथा कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ निर्णय नस्ती .